# मविप्र पत्रिका

स्त्रीशक्ती विशेषांक

शिक्षणातून सामाजिक समृध्दीकडे

वर्ष : दुसरे | अंक : पहिला | मार्च २०२५




# मविप्र पत्रिका

वर्ष: दुसरे, अंक: पहिला, मार्च २०२५



मुख्य संपादक :
**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**
(सरचिटणीस, म. वि. प्र. समाज, नाशिक)

अतिथी संपादक :
**खा. सुप्रियाताई सुळे**
(लोकसभा सदस्य, बारामती)

कार्यकारी संपादक : **प्राचार्य डॉ. दिलीप पुंडलिक पवार**

सल्लागार मंडळ :
म. वि. प्र. समाज, नाशिक कार्यकारी मंडळ पदाधिकारी

**डॉ. सुनील उत्तमराव ढिकले** (अध्यक्ष)
**श्री. विश्वास बापुराव मोरे** (उपाध्यक्ष)
**श्री. बाळासाहेब रामनाथ क्षीरसागर** (सभापती)
**श्री. देवराम बाबुराव मोगल** (उपसभापती)
**श्री. दिलीप सखाराम दळवी** (चिटणीस)

कार्यकारी मंडळ तालुका सदस्य

**ॲड. संदीप गोपाळराव गुळवे**
**श्री. रवींद्र शंकर देवरे**
**डॉ. सयाजीराव नारायणराव गायकवाड**
**श्री. प्रवीण एकनाथ जाधव**
**ॲड. लक्ष्मण फकिरा लांडगे**
**श्री. शिवाजी जयराम गडाख**
**श्री. अमित उमेदसिंग बोरसे**
**डॉ. प्रसाद प्रभाकर सोनवणे**
**ॲड. रमेशचंद्र काशिनाथ बच्छाव**
**श्री. नंदकुमार बालाजी बनकर**
**श्री. कृष्णाजी गणपत भगत**
**श्री. विजय पोपट पगार**
**श्री. रमेश पांडुरंग पिंगळे**
**श्रीमती शोभा भागवत बोरस्ते** (महिला सदस्य)
**श्रीमती शालन अरुण सोनवणे** (महिला सदस्य)

सेवक सदस्य

**प्रा. डॉ. संजय खंडेराव शिंदे** (उच्च माध्य. व महाविद्यालयीन विभाग)
**श्री. चंद्रजित दयाराम शिंदे** (प्राथमिक व माध्यमिक विभाग)
**श्री. जगन्नाथ मधुकर निंबाळकर** (प्राथमिक व माध्यमिक विभाग)

शिक्षणाधिकारी

**प्रा. डॉ. भास्कर ढोके**
**प्रा. डॉ. नितीन जाधव**
**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे**
**प्रा. डॉ. विलास देशमुख**
**प्रा. दौलत जाधव**
**प्रा. डॉ. अजित मोरे**
**प्रा. डॉ. कैलास शिंदे**
**प्रा. शशिकांत मोगल**

संपादन सहाय्य

**प्राचार्य श्री. प्रशांत पाटील**
**श्री. नितीन कवसकर**
**श्री. रवींद्र आखाडे**
**श्री. सोमनाथ गांगुर्डे**



प्रकाशक
**सरचिटणीस, म. वि. प्र. समाज, नाशिक**

मुद्रक
**मराठा विद्या प्रसारक समाज, प्रिंटिंग प्रेस, नाशिक.**



या विशेषांकातील साहित्यात व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखिकांची आहेत. त्यांच्याशी मुख्य संपादक, सल्लागार मंडळ व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही. - मुख्य संपादक

# स्त्रीशक्ती विशेषांक - मार्च २०२५


- स्वाभिमानाने स्वावलंबी होऊ या **संपादकीय - खा.सुप्रियाताई सुळे** (अतिथी संपादिका) ... १
- या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता **संपादकीय - ॲड.नितीन बाबुराव ठाकरे** (मुख्य संपादक) ... २


## पूर्वार्ध - स्त्रीशक्ती : कथा संघर्षाच्या, गाथा यशाच्या...


१. 'अनिता दाते' एक सशक्त अभिनेत्री ... ३
२. आम्ही बचतनभीच्या तारका... डॉ. अश्विनी अशोक बोरस्ते ... ४
३. 'अश्विनी' दी फर्स्ट आयर्नलेडी ... ५
४. वाचनाचा संस्कार रूजवणारं 'आजीचं पुस्तकांचं हॉटेल'- सौ भिमाबाई जोंधळे ... ७
५. पाणीदार महिलांचा प्रेरणादायी प्रवास! - मिनाज लाटकर ... ९
६. रिओ ऑलम्पिक व्हाया सावरपाडा ... ११
७. फिल्ड हॉकीची राजकुमारी : 'रेणुका यादव' ... १२
८. अभिनयाचा सोज्वळ चेहरा 'मृणाल दुसानीस' ... १३
९. चंदेरी दुनियेची लखलखती तारका - 'संयामी खेर' ... १४
१०. चेतना सिन्हा आणि माणदेशी फाऊंडेशन : एक प्रेरणादायी प्रवास ... १५
११. ज्योती देशमुख : दारूबंदीची ढाल ... १६
१२. अशी बनले ' सायबर सुरक्षा अम्बॅसेडर' - ज्योती वाकचौरे ... १७
१३. ...आणि मी अधिकारी झाले ! - डॉ. वंदना चौधरी ... १९
१४. कथा माझी धावण्याची... - संजीवनी बाबुराव जाधव ... २०
१५. मी धावतेय.. तुम्हीसुध्दा ...? - मोनिका रोहन आथरे - जाधव ... २१
१६. खुरपण ते प्रकाशन - सुनिताराजे पवार ... २३
१७. मविप्रच्या सभासद झाल्या खासदार ... २६
१८. कृषी क्षेत्रातील आयकॉन : 'श्रीमती लीलाबाई भास्कर पवार' ... २७
१९. 'सौ.शालन अरुण सोनवणे' आदर्श गृहिणी ते महिला संचालिका ... २८
२०. कृषी व ज्ञानमळा फुलविणाऱ्या 'शोभाताई' ... २९
२१. संघर्षशील माऊली 'संगीताताई' ... ३०
२२. 'तन्वी' इंग्लिश खाडी पार करणारी पहिली भारतीय माता ... ३१
२३. ...आणि मी नगर रचनाकार झाले! - आर्कि. दिपाली सागर पाटील ... ३४
२४. फ्रॉम लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स ... ३५
२५. आंबई ते आय.आय.टी... - फशाबाई देवराम लचके ... ३६
२६. बेस्ट डिझायनर : 'निधी गोपियानी' ... ३७
२७. मी लेक गोदामाईची - ॲड. गोदावरी राजाराम देवकाते ... ३८
२८. कचऱ्यातून 'फुले' वेचणारी ... ३९
२९. दिव्यांगांची माउली : 'सौ. रेखा बागुल' ... ४०
३०. 'शब्दमालती' ... ४१
३१. 'स्नेहा' द बॉडी बिल्डर... ... ४२
३२. कथा एका शिक्षिकेची... - सौ. सविता भास्कर पवार ... ४३
३३. 'श्रद्धा काम से रखो, सफ़लता मुट्ठी में होगी' - ॲड. श्रद्धा कासुर्डे ... ४४

मतिप्र पत्रिका

# अनुक्रमणिका

# स्त्रीशक्ती विशेषांक - मार्च २०२५

## उत्तरार्ध - स्त्रीशक्ती : स्त्री जीवनजाणिवा आणि सन्मानाच्या दिशा...


१. मातृसत्ताक पद्धतीचा प्रभाव - डॉ. प्रतिमा इंगोले ... ४५
२. संस्कृती, परंपरा आणि स्त्रिया - प्रा.डॉ. कमल आहेर - कुंवर ... ४६
३. स्त्री आणि सृजन - डॉ. वर्षा तोडमल ... ४७
४. महिला सबलीकरणाच्या निमित्ताने... - डॉ. स्नेहल तावरे ... ४८
५. महिला सक्षमीकरण - डॉ. वेदश्री विजय थिगळे ... ४९
६. मॉरिशसमधील महिला जगत - डॉ. मधुमती कुंजल ... ५१
७. स्रीजन्म म्हणवुनि न व्हावे उदास... कवयित्री जयश्री वाघ ... ५२
८. स्त्रियांवरील अन्याय व महिलाविषयक कायदे- ॲड. विद्या अविनाश गाढे ... ५४
९. कायदा आणि महिला सक्षमीकरण - डॉ. संध्या गडाख ... ५६
१०. इंटरनेटच्या माध्यमातून तिची जागतिक भरारी - डॉ. विजया सयाजीराव गायकवाड ... ५७
११. बौद्धिक संपदा संरक्षण चळवळीतील अज्ञात लढवय्या - डॉ. मृदुला बेळे ... ५८
१२. कौशल्य विकास आणि स्वयंरोजगारातून महिलांचे सक्षमीकरण - ज्योती लांडगे ... ५९
१३. महिलांसाठी शिक्षणाच्या संधी देणारी ॲप्स - डॉ. प्रतिमा पंडित वाघ ... ६१
१४. स्त्री : कुटुंबाचा कणखर कणा - सौ. सुरेखा अशोक बोऱ्हाडे ... ६२
१५. महिलांचे आरोग्य आणि भौतिकोपचार - डॉ. अमरित कौर ... ६४
१६. 'ती' ची कसरत - सविता दिवटे - चव्हाण ... ६५
१७. गरज महिला सुरक्षिततेची - कु. श्रुती पाटील ... ६६
१८. स्त्री जीवनातील योग साधनेचे महत्त्व - डॉ. मीनाक्षी गवळी ... ६७
१९. वास्तुकला- महिलांना करिअर संधी देणारं सर्वोत्तम क्षेत्र - डॉ. प्राजक्ता बस्ते ... ६८



*(पूर्वार्धातील लेखांचे शब्दांकन डॉ. श्री. दिलीप पवार, श्री. नितीन कवसकर व श्री. रवींद्र आखाडे यांनी केलेले आहे.)*

# स्वाभिमानाने स्वावलंबी होऊ या

सस्नेह नमस्कार..!

छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची उभारणी करताना जी समतेची व न्यायाची भावना समाजात रुजविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला होता. त्याला वारकरी संप्रदायाने केलेल्या पायाभरणीचा भक्कम आधार होता. ही संतपरंपरा व स्वराज्यधोरण यांनी केलेल्या मशागतीचा स्वाभाविक परिणाम म्हणून महाराष्ट्रात समता चळवळ आणि स्वातंत्र्य आंदोलन उभे राहिले. फुले-शाहू-आंबेडकर आणि गोखले-गांधी-नेहरू या दोन्ही परंपरांच्या परस्परपूरक चळवळींनी आधुनिक भारताची मूस घडवली. महाराष्ट्र हा तर या सर्व जडणघडणीत आघाडीवर होता.

संत मुक्ताबाई, संत जनाबाई या संतपरंपरेपासून स्वराज्याची प्रेरणा देणाऱ्या राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योति सावित्रीबाई, पुण्यश्लोक अहिल्यामाता, माता रमाई अशा महान स्त्री-शक्तींची महाराष्ट्राला परंपरा लाभली आहे. त्याची खरीखुरी ओळख नव्या पिढीला करून देण्याची नितांत आवश्यकता आहे.

देशाचे मानबिंदू आणि महाराष्ट्राचे थोर सुपुत्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समानता मान्य करण्यात आली आहे. राज्यघटनेतील कलम १४ नुसार देशातील सर्व महिलांना समानतेची ग्वाही दिली आहे. तर कलम १६ नुसार संधीच्या समानतेचे आश्वासन दिले आहे.

१ मे १९६० रोजी स्थापन झालेल्या प्रागतिक महाराष्ट्राला आदरणीय यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व लाभले. परंपरा आणि आधुनिकता यांचे संतुलन साधत नवमहाराष्ट्राचे शिल्प त्यांनी साकारले. गृहिणी असलेल्या पत्नीशी - आदरणीय वेणुताई चव्हाण यांच्याबरोबर व्यतीत केलेले आदर्श सहजीवन आजही आपणा सर्वांना प्रेरणा देते. समता, बंधुता, न्याय या मूल्यांच्या आधारावर त्यांनी महाराष्ट्राचे समाज-जीवन घडविण्याचा श्रद्धापूर्वक प्रयत्न केला. त्यांनी अनेक नेते व कार्यकर्ते या विचारांच्या मुशीत तयार केले. त्या संचिताच्या आधारावरच गेली सहा दशकांहून अधिक काळ राज्याची वाटचाल सुरू आहे. त्यामुळेच संपूर्ण देशांत प्रागतिक विचारांचे समृद्ध राज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक झाला.

आदरणीय यशवंतरावांचा पुरोगामी वारसा पुढे नेताना १९९४ साली देशातील पहिले महिला धोरण राज्याने स्वीकारले. तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय पवार साहेबांनी समता चळवळीतील संस्था, संघटना, व्यक्ती यांच्या प्रत्यक्ष सहभागाने हे धोरण तयार केले. २२ जून १९९४ रोजी तत्कालीन उपराष्ट्रपती मा. के. आर. नारायणन यांच्या हस्ते मुंबईतील नेहरू सेंटर येथे या धोरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि मागील तीस वर्षात समाजातील सर्व स्तरांवर (शिक्षण, आरोग्य, रोजगार, प्रशासन, न्यायपालिका, लोकप्रतिनिधित्व, शेती, सहकार, संपत्ती-वारसा आदि) विविध मार्गाने स्त्री-पुरुष समानता प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या पार्श्वभूमीवर आपल्या मविप्रच्या स्त्री-शक्ती विशेषांकाकडे पाहिले पाहिजे.

या स्त्री-शक्ती विशेषांकात आपण स्त्रियांच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.अनेक यशोगाथा या अंकात वाचायला मिळतील. आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, संस्कृती-परंपरा, शेती, कौटुंबिक समस्या, बदलते तंत्रज्ञान व नवकल्पना, पर्यावरण आदि विविध विषयांबाबत त्यातील अभ्यासकांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सर्वांनी त्याचे मनापासून वाचन करून प्रतिसाद दिला पाहिजे. सूचना केल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या विचार मंथनातूनच समाजात आवश्यक असे बदल, सुधारणा घडत असतात.



मविप्र पत्रिकेचे मागील तीन अंक अत्यंत दर्जेदार आशय असलेले आहेत व निर्मितीही तितकीच उत्तम आहे. आपण या स्त्री-शक्ती विशेषांकासाठी मला लिहिण्याची संधी दिलीत, त्याबद्दल आपले मनपूर्वक धन्यवाद व पुढील अंकासाठी खूप खूप शुभेच्छा !

**- सुप्रियाताई सुळे**

कार्याध्यक्ष, यशवंतराव चव्हाण सेंटर

# या देवी सर्वभूतेषु शक्तीरुपेण संस्थिता

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता...' या श्लोकाचा अर्थ समाजाला पुन्हा योग्य पद्धतीने समजावण्याची गरज असलेला, असा हा काळ म्हणता येईल. एकीकडे सर्वच क्षेत्रात भरारी घेत असलेल्या महिला आणि दुसरीकडे त्यांच्यावर होणारे अत्याचार, अशी आजची परिस्थिती आपण सर्वचजण अनुभवत आहोत. त्यामुळे सजग समाज निर्मितीत सक्रिय सहभाग असलेली व सुजाण नागरिक घडविणारी शैक्षणिक संस्था म्हणून आपली जबाबदारी वाढली आहे. या श्लोकाप्रमाणे पूजनाची अपेक्षा आपल्या माता-भगिनींना नाही, तर त्यांना अपेक्षा आहे ती समाजाने आपल्याला समभावाने माणूस म्हणून स्वीकारण्याची, आपला आदर करण्याची आणि वर्षानुवर्षे दडपल्या गेलेल्या क्षमता विस्तारण्यास पाठबळ देण्याची.

गेल्या काही वर्षांतील महिलांच्या स्थित्यंतरावर प्रकाश टाकला, तर त्यांना स्वक्षमतेची झालेली जाणीव आणि त्या जोरावर त्यांनी मिळविलेले यश या दोन्ही गोष्टी कौतुकास्पद आहेत. पुरुषी क्षेत्र म्हणून उल्लेखल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्येही त्यांनी अधिक चांगल्याप्रकारे आपला ठसा उमटवला आहे. विविध क्षेत्रांतील कार्यरत महिलांचा वाढलेला टक्का, हे याचे बोलके उदाहरण म्हणता येईल. मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढत असून, 'ऑल इंडिया सर्वे ऑफ हायर एज्युकेशन'नुसार (एआयएसएचई) हे प्रमाण २०१४-१५ पासून २०२१-२२ पर्यंत ५० टक्क्यांनी वाढले आहे. त्याचप्रमाणे लेबर ब्युरोने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार महिलांचा नोकरी, व्यवसायाच्या सहभागातील आलेखही चढता आहे. २०१८ मध्ये हा दर २३.३ टक्के होता, तर २०२३ मध्ये हे प्रमाण ३७ टक्क्यांवर पोहोचले आहे. हे आकडे महिलांच्या सक्रिय शैक्षणिक आणि सामाजिक सहभागाचे उदाहरण म्हणावे लागतील. पण, ही वाट त्यांच्यासाठी नक्कीच पुरुषांइतकी सोपी नव्हती आणि आजही नाही. त्यामुळे आपल्या मार्गातील आव्हाने, सामाजिक बंधने, सांसारिक जबाबदाऱ्यांच्या कचाट्यातून वाट काढत त्यांनी गाठलेला पल्ला नक्कीच मोठा आहे. त्या-त्या काळात पुरुषांच्या बरोबरीने महिलांनीही समाज सुधारणेत पुढाकार घेतला आहे. राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुलेंपासून सुरू झालेली ही परंपरा आजही अनेक महिलांनी आपल्या कार्यातून जिवंत ठेवली आहे. राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवरायांमध्ये रुजविलेले स्वराज्याचे स्वप्न आणि दिलेली प्रेरणा तर आपण सर्व जाणतोच. पण, त्याचसोबत त्यांनी शिवरायांमध्ये एक महत्त्वाचा संस्कार रुजविला तो म्हणजे, महिलांचा आदर करण्याचा. म्हणूनच शत्रू पक्षातील स्त्री चा आदर-सन्मान करण्याचा धडा शिवरायांनी आपल्या सैन्याला घालून दिला. या माता जिजाऊ, रमाई, सावित्रीच्या लेकी म्हणजे शक्तीची विविध रूपे आहेत. त्यांच्या या यशाचा, त्यांच्या ध्येयपूर्तीच्या प्रवासाचा सन्मान करणे समाज म्हणून आपले कर्तव्य आहे. याच विचाराने विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने उंची गाठलेल्या अनेक महिलांचा सन्मान आपण या मविप्र पत्रिकेच्या माध्यमातून केला आहे. या महिलांचे कार्य समाजातील अन्य महिलांसाठी, मुलींसाठी प्रेरणादायी ठरावे, हाच यामागचा प्रमुख हेतू आहे. क्षेत्र कोणतेही असले तरी महिलांची जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक योगदान देण्याची वृत्ती त्यांना यशाच्या शिखरावर पोहचविते, हेच या लेखांमधून दिसून येते. याशिवाय प्रतिभावंत महिलांनी मानवी जीवनातील बहुविध क्षेत्रांतील स्त्रीजीवनाचे कडा आणि कंगोरे उलगडण्याचा केलेला प्रयत्न आणि जपलेले विचारधन मौलिक आहे.

महिलांचे कालानुरूप शिक्षणाने बदललेले जीवन, निर्णय प्रक्रियेत वाढलेला सहभाग, अभिव्यक्तीसाठीची धडपड यावरून त्यांच्या बदलत असलेल्या जीवनपद्धतीचा अंदाज आपल्याला येईल. हे त्यांचे बदलते विश्व इथून पुढेही मोठ्या प्रमाणावर विस्तारणार आहे. परंतु त्यासाठी गरज आहे, ती आपण त्यांच्या मार्गातील अडथळा बनणार नाही, याची काळजी घेण्याची. महिलांच्या यशाचा हा आलेख किती उंचावत आहे हे आपण पाहत असलो, तरी ही आकडेवारी बहुतांश प्रमाणात शहरी व निमशहरी भागाचे प्रतिनिधित्व करते. अद्यापही लाखो महिला शिक्षणसंधी आणि सामाजिक सहभागापासून वंचित आहेत. लोकसंख्येत ४८ टक्के महिला असताना त्यांचा देशाच्या 'जीडीपी'मधील वाटा मात्र १८ टक्केच असल्याचे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे. यावरून अद्याप ३० टक्के महिला रोजगार संधींपर्यंत पोहचल्याच नसल्याचे दिसून येते. ही दरी मोठी आहे. ती कमी करण्यात आपला सहभाग गरजेचा आहे. म्हणूनच 'मविप्र'च्या जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून आदिवासी, ग्रामीण भागातील महिलांना विविध प्रशिक्षणे देऊन स्वावलंबी आणि सक्षम बनविण्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न सुरू आहेत.

'देवी म्हणून पूजा करण्यापेक्षा, माणूस म्हणून योग्य वागणूक द्या', ही महिलांची अपेक्षा अतिशय रास्त आहे. एकीकडे देवी म्हणून त्यांचे गुणगान गाताना, त्यांच्यावर होत असलेल्या वाढत्या अत्याचारांकडे अजिबात दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी समाज म्हणून आपण स्वीकारायलाच हवी. पण, त्याही आधी हे अत्याचार रोखण्याची खबरदारी घ्यायला हवी.

म.वि.प्र.संस्थेचे आद्य संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांनी,"भारतात महिलाच प्रथम ज्ञानसंपन्न झाल्या पाहिजेत. या ज्ञानावर अशिक्षित भारतमातांचा हक्क आहे. या माताच राष्ट्राला चेतना देणारा राष्ट्रसूत्रधार अर्पण करतात."असे गौरवोद्गार काढलेले आहे.ग्रामीण भागातील मुलींच्या

**(... पान क्रमांक ०३ वर)**





पूर्वार्ध :

# स्त्रीशक्ती

कथा संघर्षाच्या

गाथा यशाच्या

# राणी छत्रपती ताराबाई



छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा महाराष्ट्राची अंबाई
शत्रूवर घाली छापा काळ तयाची ती होई
जेरीस शत्रूला करून करी बेफाम चढाई
न्हाऊन टाकी रणभूमी
शत्रू रक्तानी सारी
चपळता विजेची जैसी
तशीच कडाडे संहारी
ही एकच शूर रणगाजी छत्रपती ताराबाई
शिवधनू प्रतापी माझी वीरांची रणदेवाई
जयभवानी जयजयकार, जय ताराराणी ललकार
तिज करी मी नमस्कार, शूर देवीचा जयजयकार
कोल्हापूरची महान राणी
छत्रपती शोभते भूषणी
शुभहस्ते तलवार भवानी
ताराबाई असुरमर्दिनी
ताराबाई माझी मर्दिनी
भासे चंडिका रणांगणी
रणदेवी ती श्रद्धास्थानी
नमन माझिये तिचिया चरणी



**– क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले**

(काव्य फुले कविता संग्रहातून)

# अनिता दाते

## एक सशक्त अभिनेत्री



नाशिकने कला आणि साहित्य क्षेत्राला अनेक दिग्गज दिले आहेत. या कलाकारांनी त्यांच्या कौशल्याने त्यांच्यासह नाशिकचेही नाव मोठे केले आहे. अशा कलाकारांपैकीच आपली वेगळी ओळख निर्माण करणारी एक अभिनेत्री म्हणजे अनिता दाते-केळकर. आपल्या सशक्त अभिनयाने त्यांनी मालिका, चित्रपट आणि नाट्य अशा तिन्ही क्षेत्रांत  नाव कमावले आहे. नाशिकसारख्या छोट्याशा शहरात लहानाची मोठी झालेल्या अनिता यांचे चंदेरी दुनियेतील हे यश अनेकींसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

आपल्या विविधांगी कामातून अभिनय क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या अभिनेत्री अनिता दाते-केळकर या मूळच्या नाशिककर. तिळभांडेश्वर गल्लीत लहानपण गेलेल्या अनिता यांचे शिक्षण सारडा कन्या शाळेत झालेले आहे. लहानपणापासून शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेणाऱ्या अनिता यांना आपण अभिनय क्षेत्राकडे वळू, असं त्यावेळी अजिबात वाटलं नव्हतं. पण हळू-हळू त्यांना आपल्यातील या गुणांची जाणीव झाली आणि  त्यांनी या क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला. पुण्यातील ललित कला केंद्रामध्ये प्रवेश घेऊन त्यांनी या क्षेत्रातील शिक्षणही पूर्ण केले. आवड म्हणून सुरू झालेला अभिनयाचा हा प्रवास त्यांच्यासाठी व्यवसाय बनला. अभिनयाची आवड, हाच त्यांचा व्यवसाय बनल्यामुळे  आपल्या अभिनयाच्या जोरावर त्यांनी अनेक संधी मिळविल्या. 'माझ्या नवऱ्याची बायको'मधील नवऱ्याच्या विवाहबाह्य संबंधांविरोधात उभी ठाकणारी खमकी राधिका सुभेदार, 'नवा गडी नवं राज्य' मालिकेत रमा आणि सध्या सुरू असलेल्या 'इंद्रायणी' या मालिकेतही अनिता दाते या महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. या प्रत्येक भूमिकेत त्या-त्या पात्राला पूर्ण न्याय देत त्यांनी आपला अनुभव फुलवल्याचं दिसून येतं.

'जोगवा' चित्रपटातील 'सखू', वाळवी चित्रपटातील 'अवनी' या भूमिकांमध्येही त्यांनी आपलं वेगळेपण दाखवून दिलं. 'तो राजहंस एक' या नाटकात त्यांनी साकारलेली भूमिकाही त्यांच्या कसदार व उत्तम अभिनय क्षमतेचं उदाहरण म्हणावे लागेल. याचसोबत सनई-चौघडे, अय्या, कॉफी आणि बरंच काही, तुंबाड यासारख्या अनेक हिंदी, मराठी चित्रपटांत त्यांनी भूमिका केल्या आहेत. त्यांनी या अनेक भूमिका साकारलेल्या असल्या, तरी 'माझ्या नवऱ्याची बायको' या मालिकेतील राधिका सुभेदार या त्यांच्या पात्राला प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतलं. कारण एक सामान्य गृहिणी ते एका कंपनीची मालकीण या प्रवासादरम्यान त्यांनी दाखविलेलं अभिनय कौशल्य अनेक महिलांना प्रेरणा देणारं होतं. या कामाने  त्यांना एक वेगळी ओळख दिली. राधिका बनून ही नायिका घराघरांत पोहचली आणि अनेक प्रेक्षकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली.

याबाबत बोलताना अनिता दाते म्हणतात की, "प्रत्येक भूमिका आपल्याला नक्कीच काहीतरी देऊन जाते. फक्त आपल्याला ते ओळखता आलं पाहिजे. राधिका सुभेदारच्या भूमिकेने मला सहनशीलता दिली. या पात्राकडून मी लोकांना समजून कसं घ्यायचं हे शिकले. जसे आपण एखाद्या भूमिकेकडून काही शिकत असतो, तसे आपणही त्या भूमिकेला काही देत असतो. माझ्यात असलेला कणखरपणा मी त्या भूमिकेला दिला."

अभिनयात त्या-त्या पात्राच्या गरजेनुसार वेगळेपण जपणाऱ्या अनिता आधीच्या कामापेक्षा पुढचं काम अधिक चांगलं कसं करता येईल, याचा सातत्याने विचार करीत असतात. 'ड्रीम रोल', असं काही अजूनतरी नसल्याचं त्या सांगतात. प्रत्येक कलाकार आपलं काम चांगलंच करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे अभिनयाबाबत कोणाशी तुलना करण्यापेक्षा आपली भूमिका योग्य पद्धतीने साकारण्याला त्या प्राधान्य देतात. " अभिनय क्षेत्रात संधी मिळण्याची ठराविक वेळ किंवा वय नाही. ती संधी तुम्हाला कधीही मिळू शकते. कधी लवकर, तर कधी उशिरा. पण मिळालेल्या संधीकडे तुम्ही कसे पाहता? हे महत्त्वाचं आहे. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुमच्याकडे प्रचंड संयम हवा. अभिनय क्षेत्रात नाव कमावण्यासाठी अनेक कलाकार धडपडत असतात. कधी खूप काम मिळतं, तर कधी काहीच मिळत नाही. अशावेळी जिद्द आणि चिकाटीने टिकून राहणं गरजेचं असतं. अभिनय करताना नवीन गोष्टी आत्मसात करत राहाव्या लागतात."असं त्या आवर्जून सांगतात.

'माझ्या नवऱ्याची बायको'मध्ये अनिता या नागपुरी बोलीभाषेत बोलणारं पात्र साकारत होत्या. या भूमिकेसाठी ही भाषा शिकून त्यांनी त्यातले चढ-उतार, वैशिष्ट्यपूर्ण शब्द, लहेजा हे सगळं आत्मसात केलं. या क्षेत्रातही अभ्यास गरजेचा असतो. त्यामुळे दुसरं काही जमत नाही म्हणून अभिनय क्षेत्रात येऊ नये, असं स्पष्ट मत त्या व्यक्त करतात. आपल्या सशक्त अभिनयाच्या जोरावर अनिता यांनी अनेक भूमिकांमध्ये स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवला असून, येत्या काही वर्षात अनेक उत्तम भूमिकांमधून त्या आपल्याला भेटत राहतील व नवे कीर्तिस्तंभ प्रस्थापित करतील यात शंका नाही!

---

## या देवी सर्वभूतेषु शक्तीरुपेण संस्थिता

**(... पान क्रमांक ०२ वरून)**

शिक्षणातून ते सत्यात उतरत आहे.म्हणूनच 'मविप्र'च्या उभारणीतील सर्वच कर्मवीरांचे योगदान कधीही न विसरण्यासारखे आहे.तसेच संस्था उभारणीच्या कामात ते स्वत:ला झोकून देऊ शकले, कारण त्यांना असलेली त्यांच्या माता-पत्नी, भगिनींची खंबीर साथ! त्यात सारजाबाई गणपतराव मोरे, पार्वतीबाई रावसाहेब थोरात, भागीरथीबाई वाघ आदींचा उल्लेख करता येईल. आज या संस्थेत १,२५,००० विद्यार्थिनी, ७६५० शिक्षिका व महिला कर्मचारी कार्यरत आहेत. या सर्वच महिलांचे 'मविप्र' च्या वाटचालीतील आणि समाजातील योगदानही मोठे आहे.  सर्वांच्या कष्टाने आणि त्यागातून उभारलेल्या या संस्थेचे नाव आज अनेक महिला सभासद,शिक्षिका, प्राध्यापिका आणि विद्यार्थिनींनी आपल्या कार्यकर्तृत्वाने मोठे केले आहे. संशोधन, खेळ, कौशल्य विकास,विविध परीक्षा, कला-गुण,रोजगार यातील या विद्यार्थिनींचा सहभाग वाढविण्यासाठी संस्थेमार्फत केले जाणारे प्रयत्न यापुढेही कायम राहतील. या सर्व महिला आमच्या संस्थेची 'शक्ती' आहेत. 'मविप्र'ची ही 'महिलाशक्ती' उत्तरोत्तर वाढावी आणि या शक्तीने सामाजिक विकास साधला जावा, याच सदिच्छा..!

**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**
मुख्य संपादक, मविप्र पत्रिका

# आम्ही बचतगटीच्या तारका

**"हे ईश्वरा सगळ्यांना चांगली बुद्धी दे,**
**आरोग्य दे, सर्वांचं रक्षण कर**
**आणि तुझे गोड नाम मुखात माझ्या असू दे.**
**सर्वांचे कल्याण कर सुखात राहू दे"**

गाडी जसजशी पुढे जात होती तसतशी ही सामूहिक प्रार्थना ऐकून प्रवासातला गोडवा अधिकच सुखदायी वाटत होता. सुखाच्या कल्पनेच्या परिभाषा या व्यक्तीपरत्वे किती विभिन्न असू शकतात हे मला या महिला बचत गटाच्या चळवळीत आल्यानंतर पुरते उमगले. कष्टकरी काम करणाऱ्या महिला ज्यांची सकाळ झाली की चालू होते लगीनघाई ! चहाचे दोन घोट पोटात गेले की निघाल्या कामाला, कुठे भांडी वाट बघतायेत, कुठे कपडे धुवायचे, कुठे फरशी पुसायची आहे आणि असे सगळे करत करत दिवस कुठे जातो हे ज्यांना कळत नाही ,अशा महिलांना जेव्हा "तुमच्या जीवनातली स्वप्नं सांगा?" असा प्रश्न मी विचारला. त्यावेळेला त्यांच्या स्वप्नांना की गरजांना पूर्ण करावं असा प्रश्न पुढे आला. कोणी म्हणालं ,"माझं घर झालं पाहिजे, मुलगा शाळा शिकला पाहिजे." तर कोणी म्हणालं," माझ्या नवऱ्याने दारू सोडली पाहिजे, माझ्या मुलीनं माझ्यासोबत कामाला मदत केली पाहिजे." या सगळ्या दैनंदिन जीवनातल्या आपल्या अपेक्षा व्यक्त करताना कुठेतरी सारखी स्वप्नं बघत असणाऱ्या ह्या महिलांना खरी खरी स्वप्नं दाखवण्याचं काम आम्ही केलं.आमच्या नाशिक जिल्हा महिला बचत गट विकास सहकारी पतसंस्थेने व जिजाऊ महिला सेवाभावी संस्थेने ८ मार्च जागतिक महिला दिन कसा साजरा करावा यावर जेव्हा विचार केला. त्यावेळेला ज्या महिलांना आपल्या देशात बर्फ कुठे पडतो हे देखील माहित नव्हते.अशा वर्गाचे बर्फ बघण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या निर्णयाने आमची खरी सुरुवात झाली. बर्फ बघायचा असेल तर तिथे गेलं पाहिजे आणि तो प्रवास आपला विमानातून असायला हवा म्हणून चक्क विमानात बसून मनाली- दिल्लीची ट्रिप घडवत आम्ही बायकांना त्यांच्या स्वप्नातल्या जगाची ओळख करून दिली. डोंगरातून वळणा वळणाच्या मनालीच्या रस्त्यावरून जाताना वामनराव पै यांच्या प्रार्थना म्हणणाऱ्या बायकांच्या चेहऱ्यावरचा आनंद काही औरच होता, त्यावेळेला खराखुरा आनंद व समाधान या चळवळीच्या माध्यमातून व्यक्तिशः मला देखील मिळाले. इथूनच खरी तर यशोगाथेची सुरुवात झाली. खरं तर संघर्ष हा बायकांच्या पाचवीला पुजलेला असतो.प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टीत मग त्या आर्थिक, मानसिक ,शारीरिक वा कुठल्याही असो. परंतु स्वयंसहायता समूहाच्या योजना राबवताना आलेले



अनुभव आयुष्यात सप्तरंगी सुखाची उधळण करणारे होते हेही या निमित्ताने अनुभवायला मिळाले.

संस्था स्थापनेवेळी एक एक रुपयाची भ्रांत असलेल्या महिला आज जेव्हा एक एक लाखाच्या गप्पा मारतात तेव्हा आर्थिक सक्षमीकरणाचा हा टप्पा सूक्ष्म वित्त फायनान्स पासून महिला बचतगटाच्या स्वयंसहायतेपर्यंत पूर्णपणे आत्मसात केलेला आजमितीला दिसतो आहे. आज देशामध्ये लाखोंच्या संख्येने बचत गट आहेत. त्यांच्याही यशोगाथा आहेत. पण नाशिक जिल्ह्यातल्या आमच्या चळवळीतून आम्ही स्वतः सत्य परिस्थिती अनुभवलेल्या यशोगाथा आपल्यापर्यंत आणण्याचा हा प्रयत्न आहे.

सुनिताताई आहेर ही सामान्य गृहिणी नाशिक शहरांमध्ये कमोद नगर परिसरात एका बिल्डिंगमध्ये रहात असे. सातत्याने स्वामींच्या बैठकीला जाणं असल्यामुळे आध्यात्मिक चिंतन चांगले होते. स्वामीकृपेने समाजासाठी काहीतरी भलं करावं या हेतूने सेवानिवृत्तीनंतर हे कुटुंब मूळ गाव पळसपूर ता.पारनेर ला शिफ्ट झालं. आणि त्यांचं खऱ्या अर्थाने सामाजिक कार्य उभं राहिलं. त्या स्वतः एका बचत गटाच्या अध्यक्षा होत्या. अनेक बचत गट कसे सांभाळावे याचा देखील त्यांना अनुभव होता. समुपदेशनाच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडवणे व अडचणींमध्ये त्यांना मदत करणे या सगळ्या गुणांचा त्यांना फायदा झाला. त्यातूनच त्यांना संधी मिळाली. गावाच्या सरपंचपदी विराजमान होत गावाचा सर्वांगीण विकास केला.

कावेरी रतन कासार ह्या घरातील भाऊबंदकीला तोंड देत देत केवळ महिला बचत गटाच्या माध्यमातून तळागाळातल्या महिलांना आर्थिक सक्षम केल्यामुळे राजकारणात लौकिक मिळवू शकल्या. प्रत्येक कुटुंबाच्या सदस्याने त्यांना मतदान करून दोन वेळा नगरसेवक केले. देवळाली व त्या परिसरात महिला बचत गटाच्या माध्यमातून खाजगी सावकारी मोडीत काढत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे. त्यांची एका बचत गटापासून झालेली सुरुवात आज सक्षम अशा ३८ बचत गटांपर्यंत पोहोचली आहे. या सर्व महिला आपल्या प्रापंचिक गरजा मिटविण्यात यशस्वी झालेल्या आहेत. बायकीपणाच्या सगळ्या दुर्गुणांना बाजूला सारून धडाडीचे काम करून त्या खऱ्या अर्थानं दुर्गा झालेल्या आहेत.

प्रतिभा नरेंद्र मस्के यांनी पन्नास बचत गट करून अनेक महिलांना त्यांच्या अडीअडचणीतील काळात बचत गटाद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे. शिवाय एका सेवाभावी संस्थेद्वारा सामाजिक कार्यातून गोदावरी स्वच्छता अभियान मोहीम हाती घेतली. धडाडीच्या व प्रचंड धमक असलेल्या प्रतिभाताई या स्वतःच्या मुलांना शिक्षण घेऊन परदेशात पाठवण्याची इच्छा बाळगत,महिलांच्या गृह उद्योगांस मदत करीत आहेत.

एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत चांगल्या गुणांची रुजवण करण्याचं काम आमच्या या

**(... पुढील पानावर)**

(... मागील पानावरुन)
महिला बचत गटाच्या चळवळीच्या माध्यमातून होत आहे. मी स्वतः संस्था स्थापनेपासून ब्युटी पार्लर, पापड उद्योग, शिलाई व्यवसाय, घरगुती छोट्या मोठ्या खानावळ या सगळ्या व्यवसायांना अहोरात्र मदत करण्याचं काम करीत आहे. द्वारका परिसर, नासिक रोड, कमोदनगर, विनय नगर, पंचवटी या भागात आमचे हे काम सुरू आहे. कोकणातून आलेल्या रुचिता दळवी आज सातपूर, श्रमिक नगर नाशिकच्या भागात बचत गटाच्या माध्यमातून सगळ्या महिलांना एकत्र करून व्यवसाय उभारत स्वतःचे पार्लर चालवत आहे. कुटुंब व महिलांचे जीवन व आरोग्य अबाधित राखण्याचे काम करीत आहे. दळवीताई या नवऱ्याचा कडक स्वभाव, सासुबाईंची जबाबदारी व मुलांचे शिक्षण यातून मार्ग काढत आपल्या दातृत्त्व व अचूक हिशोबीपणा, प्रेमळ गोड स्वभावामुळे अनेक बचतगटांच्या माध्यमातून महिलांचा हात सक्षम करीत आहेत.

स्वामी समर्थ केंद्राच्या माध्यमातून कामगार वस्तीत आध्यात्मिक संस्कार देत देत मीनाताई मोरे या अनेक बचत गटांना उभे करत आहेत. यातून छोटे मोठे उद्योग व्यवसाय निर्माण होऊन त्यांची यशाच्या दिशेने जोरदार वाटचाल सुरू आहे. पर्स बनविणे, हळद बनविणे मिरची पावडर बनविणे, लोणची बनविणे, पापड उद्योगांमध्ये निर्यात करणे तसेच सेवाभावी वृत्तीने खाद्यसेवांमध्ये डबे पोहोचविणे, मेस चालवणे असे अनेक उद्योग या गटांतील महिलांच्याद्वारे चालविले जात आहेत. महिला बचतगटांनी तयार केलेल्या हळदीकुंकवाच्या कळ्या या निर्यात करण्यामध्ये महिलांना यश प्राप्त झाले आहे . तसेच अगदी छोट्याशा खणाच्या कापडापासून बनवलेल्या पर्स, बटवे, स्कूल बॅग्ज व मोठ्या डिझायनर पर्सेस तयार करणाऱ्या श्रमपुंजी बचत गटाच्या स्नेहलताई व कुलकर्णीताई, त्यांच्या सगळ्या सहकारी मनापासून गृह उद्योगांमध्ये सक्रिय झालेल्या आहेत. दिवाळीमध्ये तयार केले जाणारे फराळ हे बचत गटांचे वेगळेपण आहे. 'चव आमची ,अगदी घरचीच' या ब्रीद वाक्यावर महिलांनी तयार केलेल्या वस्तू आज बाजारपेठांमध्ये लाखोंचा व्यवसाय देत आहेत. हस्तकलेद्वारे अनेक वैशिष्ट्यपूर्ण कलाकुसरीच्या वस्तू या देखील गटाच्या महिलांच्याद्वारे निर्माण केल्या जात आहेत. महिलांनी घरी बसून फावल्या वेळात वाती, अगरबत्ती , सुगंधी अत्तरे तयार करणे आदी व्यवसाय उभे केलेले आहेत. एकीकडे व्यावसायिक वाटचाल होत असताना महिलांच्या मानसिक सक्षमीकरणासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व गटातील महिलांसाठी स्वयंसिद्धा प्रशिक्षण राबविल्यामुळे अधिक गुणवत्तापूर्ण बचतगट पुढे आले. या गटातील शेकडो महिलांच्या प्रेरणादायी कथांची दखल अनेक वर्तमानपत्रे व मासिकांद्वारे घेतली जात आहे. स्वतःच्या बचतीतून तयार केलेल्या बचतगटांकडे आज व्यवसायाचे, भांडवलाचे व हक्काचे स्त्रोत म्हणून बघितले जात आहे. यातून क्लस्टर उभारताना या बीजातूनच वटवृक्ष होईल यात शंका नाही. आज मुलांचे शिक्षण, आजारपण, वैद्यकीय उपचार, लग्न यासाठी महिला कुणावरही विसंबून न राहता स्वकमाईवर आपल्या कुटुंबातील सदस्यांना मदत करतात. त्यामुळे अनेक कुटुंब उभी राहत आहेत. त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याने सामाजिक अडचणी सोडवत आहेत.त्या चारचौघींसह मदतीसाठी भेटताना, बोलताना दिसत आहेत. आपले प्रश्न निर्भयपणे कसे सोडवावेत, अन्यायाविरुद्ध कसे लढावे व समतेने समाज सक्षम कसा करावा याविषयी सजग होताना दिसत आहेत. शंभर रुपयाची बचत आज दहा लाख आकडा सहज पार करताना दिसत आहे. नाशिक जिल्ह्यातील महिला बचत गटाच्या चळवळीतील ३५ ते ४० हजार महिलांना प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभी करणारी व दहा कोटीचा व्यवहार जपणारी,११७० बचतगट असलेली आमची ही आर्थिक, सामाजिक, सेवाभावी व व्यावसायिक जिल्हा महिला बचतगट पतसंस्था आहे.या पतसंस्थेची संस्थापक अध्यक्षा (डॉ. सौ अश्विनी अशोक बोरस्ते), इतर पदाधिकारी व महिलांचा हा परिवार निष्ठेने, सेवावृत्तीचे काम करीत स्वयंपूर्णतेच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. संस्थेच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल संस्थेला आजवर ८६ पुरस्कारांनी सन्मानित केले गेलेले आहे. एक बचतगट हा मायक्रो फायनान्स च्या माध्यमातून जन्म घेतो आणि तो पुढे जाऊन संस्था म्हणून महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त करतो, यात खरंतर नोबेल मानकरी प्रा. युनूस यांनी मांडलेल्या कल्पनेची मुळे आज भक्कमपणे एका मोठ्या वृक्षांमध्ये रूपांतरित झालेली दिसत आहेत असे म्हणता येईल.

**- डॉ.अश्विनी अशोक बोरस्ते**
संस्थापक, नाशिक जिल्हा महिला बचत गट पतसंस्था

# अश्विनी दी फर्स्ट आयर्नलेडी



कोरडवाहू शेतीतून भागत नाही म्हणून दुसऱ्याच्या शेतात मजुरी करून कुटुंब सावरताना बापाची होणारी दमछाक बघून बालवयातच शेतात, घरकामात मदत करणारी, दिवसभराच्या कष्टाच्या बदल्यात ८ रुपये कमावून कुटुंबाला हातभार लावणारी निरागस पोर दहावीनंतर लगेच लग्न नको अशी ठाम भूमिका घेते. ‘काय करणार एवढे शिकून शेवटी भाकरीच तर थापायच्या आहेत नवऱ्याच्या घरी’ अशा खोचक टोमण्यांना उडवून लावते. घरच्यांना विश्वासात घेऊन, स्वतःचे स्वप्न त्यांच्या पुढ्यात ठेवते. मोठ्या जिद्दीने पोलीस होते. शाळेत खेळाच्या मैदानावर रमणारी मुलगी स्वप्नांची झोळी पाठीवर टांगून सातत्याने धावण्याचा सराव करते आणि एक नाही, दोन नाही तर तब्बल १४० राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय पुरस्कार पटकावते. ही कहाणी आहे एका जिद्दीची. भारतातील पहिली महिला पोलीस कर्मचारी जिने जगातील अत्यंत अवघड अशी मॅरेथॉन जिंकून मानाचा असा ‘आयर्नमॅन’ किताब जिंकला आहे अशा श्रीमती अश्विनी देवरे-शेवाळे यांची.

**शिक्षण आणि लग्नाबाबत ठामपणा :**

अश्विनी ह्या नाशिक जिल्ह्याच्या सटाणा तालुक्यातील जायखेडा गावच्या. त्यांचे पहिली ते बारावीपर्यंतचे शिक्षण त्यांच्या गावी झाले. गरिबीतून लहान वयातच आलेली कष्ट करण्याची जबाबदारी आणि परिस्थितीशी झुंज देण्याची तयारी त्यांची आयुष्यभराची शिदोरी झाली आहे. अगदी कमी वयात आईसोबत स्वतःच्या कोरडवाहू जमिनीत तर वेळप्रसंगी दुसऱ्याच्या शेतात जाऊन काम करणे त्यांना अंगवळणी पडले होते. त्यातही आनंद शोधत आयुष्याला आकार देणे सुरू होते. जेमतेम लोकसंख्येच्या गावात पारंपरिक विचारसरणी आणि लोकलाज अशा सामाजिक बंधनांमुळे दहावी नंतर लगेच अश्विनीच्या लग्नाबद्दल घरात आणि नातेवाईकांमध्ये चर्चा सुरू झाल्या.त्याची कुणकुण अश्विनीला लागली परंतु न घाबरता त्यांनी पालकांना लग्नासाठी नकार दिला. आपले ध्येय, शिक्षणाची ओढ त्यांच्यासमोर मांडली आणि जबाबदारीने यश संपादन करून आपल्यावरचा गरिबीचा डागही पुसेल असा विश्वास दिला आणि ‘चूल-मूल’ एवढ्यापुरती स्त्री मर्यादित नाही या विचारांची पहिली लढाई त्यांनी घरात जिंकली.

(... पुढील पानावर)

(... मागील पानावरुन)

**कबड्डी खेळली म्हणून भावाचा खाल्ला मार :**

खेळाविषयी आवड कशी निर्माण झाली याबद्दल अश्विनी सांगतात-" शाळेतील वर्गखोल्यांपेक्षा शाळेचे मैदान मला जास्त खुणावत असत परंतु एकशिक्षकी शाळेत क्रीडा विषयासाठी साहित्य आणि विशेष प्रशिक्षक कोठून असणार? पीटी आणि खेळाचा तास नावालाच असे, ह्या तासांना मुले मैदानावर पकडा पकडी, कबड्डी असे खेळ खेळत तर मुलींचा वेळ एकमेकांशी गप्पा मारण्यात जाई, मला मात्र मैदानाची ओढ लागत असे.मग वर्गशिक्षक श्री. बोरसे सर यांनी पाठिंबा दिला आणि मी मुलांसोबत कबड्डी खेळू लागले, 'एक मुलगी असून मुलांसोबत कबड्डी खेळते याची गावभर चर्चा झाली' आणि त्याचा परिणाम म्हणजे त्या संध्याकाळी मोठ्या भावाने मला चांगलेच झोडले, पण मी जिद्द सोडली नाही. बोरसे सरांचा आधार होताच. मी हट्टाने खेळत राहिले आणि आयुष्यात काहीतरी करून दाखवायचेच हा निर्धार रोज अधिक जोर पकडत राहिला.

**मॅरेथॉनच्या निमित्ताने आयुष्यात पहिल्यांदा पाहिले नाशिक शहर :**

अश्विनी यांना दहावीनंतर खैरनार सर क्रीडा प्रशिक्षक म्हणून लाभले, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विभागस्तरीय अनेक स्पर्धा त्यांनी खेळल्या. सरांकडून एकदा नाशिकमध्ये होणाऱ्या मॅरेथॉन विषयी समजले, तोपर्यन्त मॅरेथॉन म्हणजे धावणे एवढेच माहीत होते. पण सरांनी त्यातील बारकावे व शास्त्रशुद्ध तंत्र सांगितले. त्यापेक्षाही नाशिकला जायला मिळणार ही ओढ त्यांना जास्त होती. मॅरेथॉनमुळेच पहिल्यांदा नाशिक शहर त्यांना बघता आले, असं त्या अभिमानाने सांगतात.

**बनल्या गावातील पहिल्या महिला पोलीस, पुसला टपोरीपणाचा शिक्का :**

गावातील स्टेशनचे पोलीस कर्मचारी पाहून आपणही अशी वर्दी घालून देशसेवा- समाजसेवा करावी असे त्यांना वाटे. घरची परिस्थिती फारच नाजूक असल्याने हा कुटुंबासाठी मोठा आधार होईन आणि गावात एकही महिला पोलीस झाली नाही किंवा नोकरीस नाही. आपण पहिलीच महिला पोलीस होऊन गावातल्या मुलींसाठी आदर्श ठरू ही खुमखुमी त्यांच्यात निर्माण झाली आणि यासाठी किरण बेदींचे व्यक्तीचरित्र आदर्श ठरले असे त्या सांगतात. याच प्रेरणेतून आणि खैरनार सरांच्या मार्गदर्शनाने त्यांनी बारावीनंतर स्पोर्ट्स कोट्यातून पोलीस पदासाठी अर्ज केला आणि २००१ मध्ये मुंबई पोलीस मध्ये त्यांची पहिल्याच प्रयत्नात भरती झाली. मुलांसोबत कब्बडी खेळते म्हणून कधीकाळी टपोरी म्हणून हिणवली गेलेली मुलगी पोलीस बनून गावचा अभिमान झाली.

**मिळाला स्वप्नांना बळ देणारा जोडीदार :**

२००१ मध्ये दादर- नायगाव येथे पहिली पोस्टींग मिळाली आणि पोलिसांसाठी असलेल्या व्यायामशाळेत वेटलिफ्टिंगचे प्रशिक्षण घ्यायला संधी मिळाली. अवघ्या वर्षभरात संधीचे सोने करीत त्यांनी मीरा-भाईंदर येथे झालेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. दरम्यान लग्नासाठी स्थळं येण्यास सुरुवात झाली होती. परंतु हुंडा न घेणारा आणि आपल्या स्वप्नांचा मान ठेवणारा, पाठबळ देणारा नवरा हवा, यावर अश्विनी ठाम होत्या आणि अशाच समविचारी, सैन्यात कर्तव्य बजावणाऱ्या श्री. गोकूळ देवरे या सैनिकाचे स्थळ आले. त्यांना अश्विनी यांची खेळाची आवड आणि वधू दोन्ही आवडले आणि लवकरच विवाहसोहळा संपन्न झाला.

**नियतीची परीक्षा असते फार कठीण :**

सुखी संसारास सुरवातच झालेली होती आणि बाळाच्या चाहुलीने आनंद द्विगुणीत झालेला होता. एका गोंडस बाळाचा जन्म आणि त्याच्या बाललीला यात सर्व कुटुंब रममाण होते परंतु विधिलिखित फारच अनपेक्षित असते आणि धक्कादायक सुद्धा. अवघ्या पाच महिन्याच्या त्या बाळाला नियतीने कायमचे हिरावून घेतले आणि या क्रूर प्रसंगी अश्विनी यांचे पती जम्मूच्या सरहद्दीवर देशसेवा बजावत होते, या प्रसंगातून सावरणे खिलाडू वृत्तीच्या अश्विनी यांना फार कठीण गेले.

**धावण्याला आला वेग, मिळाली दिशा:**

या दुःखातून सावरण्यात बराच कालावधी सरला. कालांतराने वीर आणि शौर्य या दोन मुलांची त्या आई झाल्या.पती सरहद्दीवर कर्तव्य बजावण्यात व्यस्त त्यामुळे कुटुंब आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी एकट्या अश्विनी यांच्यावर आली. खेळाडू असलेल्या अश्विनी यांना मातृत्वानंतर वाढलेले वजन स्वस्थ बसू देईना आणि पुन्हा एकदा त्यांची पाऊले ट्रॅक वर उतरली. ड्युटी सांभाळून सुट्टीच्या दिवशी मुलांना सोबत घेऊन त्यांनी पुन्हा धावण्याचा सराव सुरू केला. या दरम्यान पोलीस दलातील अनेक धावण्याच्या आणि वेटलिफ्टिंगच्या स्पर्धा त्यांनी जिंकल्या. २०१६ मध्ये मलेशियात झालेल्या मास्टर इंटरनॅशनल स्पर्धेसाठी त्यांनी तयारी सुरू केली. अगदी पासपोर्ट बनवण्यापासून, विमानात बसण्यापर्यंत सर्व काही पहिल्यांदाच आणि नवीन होते त्यांच्यासाठी. यात त्यांच्या पतीने साथ दिली, सर्व कागदोपत्री सोपस्कार पूर्ण केले आणि १९९३ मध्ये पाहिलेले आंतरराष्ट्रीय स्पर्धा धावण्याचे स्वप्न २०१६ मध्ये पूर्णत्वास आले. या स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक खेचून आणले. यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही, पुढच्याच वर्षी श्रीलंकेत झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेतही त्यांनी सुवर्णपदक काबीज केले.

**आयर्नमॅन स्पर्धा : आव्हान, तयारी, भीती आणि आठ वर्षांच्या मुलाच्या वाक्याने मिळाला धीर.**

पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकल्यानंतर विविध जागतिक मास्टर ॲथलेटिक्स स्पर्धेतून सायकलिंग, पोहणे आणि धावणे अशा स्वरुपात तब्बल २१ सुवर्णपदके, चार रौप्य तर पाच कांस्य पदकांची त्यांनी कमाई केली. अशात माहिती मिळाली जगातल्या सगळ्यात खडतर आणि अवघड समजल्या जाणाऱ्या आयर्नमॅन स्पर्धेची. ०४ किलोमीटर पोहणे, १८० किलोमीटर सायकल चालवणे आणि त्यानंतर ४२ किलोमीटर धावणे हे सर्व न थांबता एका दमात आणि १७ तासांच्या आत जो करेल तो विजेता. बालपणापासूनच आव्हानांना खेळत-खेळत झेलणाऱ्या अश्विनी यांना या स्पर्धेचे आकर्षण न झाले असते तर नवल! आणि प्रवास सुरू झाला २०२२ मध्ये कझाकिस्तान येथे होणाऱ्या आयर्नमॅन स्पर्धेत सहभागी होण्याचा. परंतु प्रत्यक्ष तयारी करताना स्पर्धेची काठिण्य पातळी पाहून अनेकदा त्यांच्या मनात भीती दाटून यायची. त्यांची ही अवस्था ओळखून मुलगा वीर म्हणाला "आई तू घाबरलीस तर आयर्नमॅन कशी होशील?" आणि अश्विनी यांच्या तयारीला एक वेगळीच उर्जा मिळाली. करोनामुळे स्पर्धा दोन वर्ष लांबली पण ही दोन वर्षे त्यांनी कसून सराव केला. रोज भल्या पहाटे नाशिक ते मालेगाव आणि परतीचा असा प्रवास सायकलवर करणे नित्याचे झाले होते. स्पर्धेत आपल्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेचा संपूर्ण कस लावीत अत्यंत अवघड स्पर्धा त्यांनी १४ तास २४ मिनिटे आणि ४६ सेकंदात पूर्ण करीत विश्वविक्रम केला आणि अतिशय मानाचा आयर्नमॅन किताब भारतासाठी जिंकून आणला.

**पदकांची राणी, पोलीस दलाची पी. टी. उषा :**

आतापर्यंत किती मेडल्स मिळवलीत? या प्रश्नाला प्रामाणिक उत्तर देत त्या म्हणतात "मोजण्याची कधी सवड मिळाली नाही पण मी फक्त खेळत गेले."शंभरहून जास्त मॅरेथॉन, वेट लिफ्टिंग, सायकलिंग (पेलोटोन) सारख्या स्पर्धांतून आतापर्यंत ६०० च्या वर पदके त्यांनी कमविली आहेत. यात राज्यस्तरीय, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा समावेश आहे. पोलीस दलातील मानाचा डी. जी. आणि शौर्य पुरस्कार, हिरकणी, न्यूज १८ लोकमतचा 'मुक्तासन्मान', यासह वेगवेगळ्या १०० हून अधिक पुरस्कारांनी त्या सन्मानीत आहेत. पोलीस दलातील पी. टी. उषा असणाऱ्या अश्विनी यांना पदकांची राणी म्हणणे वावगे ठरणार नाही.

**'कॉम्रेड' स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय महिला :**

जगातील सर्वात जुनी आणि कठीण समजली जाणारी तब्बल ९० किलोमीटर अंतर धावण्याची दक्षिण आफ्रिकेतील 'कॉम्रेड' मॅरेथॉन केवळ ११ तास आणि ४८ सेकंदात पूर्ण करून पुन्हा एकदा अश्विनी अद्वितीय ठरल्या. ही स्पर्धा जिंकणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला आणि प्रथम सैन्य कर्मचारी आहेत.

**उम्मीदोके सुरज निकले चारो ओर - आता लक्ष्य अल्ट्रा मॅरेथॉन :**

आपल्या स्वप्नांच्या बाबतीत कधीही तडजोड न करणाऱ्या अश्विनी सर्वांना निर्णयक्षमता विकसित करण्याचा सल्ला देतात. एकदा निर्णय घेतला की कितीही संकटे आली तरी न डगमगता त्यावर ठाम राहायचं अस सांगतात. आपल्या क्षमतांना अधिक धार देऊन नवी क्षितिजे काबीज करण्यासाठी त्या नेहमीच सज्ज असतात, आता त्यांचे पुढील लक्ष्य अल्ट्रा मॅरेथॉन आहे. ज्यात १० किलोमीटर पोहणे, ४२१ किलोमीटर सायकलिंग आणि ८५ किलोमीटर धावणे ७२ तासांच्या आत पूर्ण करायचे असते. आयर्नमॅन अश्विनी ही स्पर्धाही सुवर्णपदकासह जिंकतील यात शंकाच नाही.

# आजीचं पुस्तकांचं हॉटेल






### पोटाची भूक भागवताना ज्ञानाची भूक भागवणारं अनोखं 'आजीचं पुस्तकांचं हॉटेल :

'आपली चूल आपल्यालाच पेटवायची आहे' या निकडीतून सुरू केलेले रिलॅक्स कॉर्नर त्यांच्या आगळ्या वेगळ्या पुस्तकांच्या अर्थात वाचन चळवळीमुळे आज 'आजीचं पुस्तकांचं हॉटेल' म्हणून ओळखले जाते. आमच्या जगण्याचं, उदरनिर्वाहाचं साधन जो पर्यंत 'रिलॅक्स कॉर्नर' नावाने होतं तोपर्यंत ते आमचं होतं पण आज त्याची ओळख पुस्तकांचं हॉटेल म्हणून झाली, ते जगाचं झालं आहे. खाद्य संस्कृतीत वाचनसंस्कृती रुजू शकते याचं उत्तम उदाहरण म्हणून 'आजीचं पुस्तकांचं हॉटेल' सर्वपरिचित आहे. प्रसार माध्यम आणि सोशल माध्यमांतून अनेकांपर्यंत पोहचल्यानंतर आता अनेकांची पावलं कुतूहलापोटी आणि पुस्तकप्रेमाने हॉटेलकडे वळू लागली आहे. पण इथपर्यंतचा प्रवास फार संघर्ष आणि वेदनेतून उभा राहिला आहे.

### संघर्षाचे दिवस :

माझे बालपण खतवड येथील चौधरी कुटुंबात गेले. बालवयातच शिक्षणाचे धडे सोडून कष्टाचे पाढे आयुष्यात आले. लहान वयातच लग्न झाले. जऊळके दिंडोरी माझं सासर. सासरी नवऱ्याच्या व्यसनामुळे भाऊबंदकीच्या संघर्षाचे वाण वाट्याला आले तरी कुठलीही तक्रार केली नाही. स्वत: माहेराहून बैल घेऊन यायची. आडजी-पडजीने कामाला जायची. दोन-दोन रोजाचं काम एका दिवसात करायची. पदरात जे पडले त्याला आव्हान मानून पुरुषांप्रमाणे शेतीची कामे केली. मुलांना दुसऱ्याच्या घरी ठेवून मार्केटमध्ये स्वतः माल विकायला जायची. गरिबीला आणि संघर्षाला प्रामाणिकपणे हरवण्याची जिद्द ठेवली.

### शिक्षणासाठी बाळगली जिद्द :

मुलगा प्रवीण आणि मुलगी सुनिता यांच्या भविष्यासाठी परिस्थितीशी दोन हात केले. मुलांना संस्कारी आणि शिक्षित बनवण्यासाठी संघर्ष केला. मुलीचे लहान वयातच लग्न झाले. मुलाला शिक्षणासाठी पैसे मिळायचे नाही, तेव्हा त्याला दहावीनंतर पेपर टाकायला सांगितले आणि शिक्षण पूर्ण केले. आईपणाची जबाबदारी पेलवून बाईपण जपले. नवऱ्याच्या व्यसनाधीनतेमुळे दहा एकराची शेती दोन एकरवर आली. कष्ट करता-करता तीनदा वेगवेगळे अपघात झाले. दोन हात आणि एक पायही फॅक्चर झाले होते. तरी मी हार मानली नाही.

### धनशक्ती विरुद्ध अयशस्वी लढा :

राहिलेल्या दोन एकर शेतीच्या बाजुला प्लास्टिकची कंपनी झाली. कंपनीच्या सांडपाण्यामुळे विहिरीत दुषित पाणी उतरले. शेती नापिक झाली. कंपनीच्या विरोधात लढा उभा केला मात्र गावाने साथ दिली नाही की नातेवाईकांनी साथ दिली नाही. गावगुंडीचा व धनशक्तीचा विजय झाला. पिण्याच्या पाण्याची भ्रांत झाली. कर्जबाजारी झाले. नाईलाजाने अर्धे आयुष्य जेथे गेले अनेक आठवणी जोडलेली शेती आणि घर विकायला लागले.

### संकटातून शोधली संधी...

शेती गेली तरी कष्ट करायची वृत्ती शांत बसू देईना. ज्या जागेवर आज पुस्तकांचे हॉटेल उभे आहे. ती जागाही नवऱ्याने विकली होती. पण 'पाटी उतरवायला जागा असू द्यावी' या विचाराने नवऱ्याशी संघर्ष केला, दारूसाठी आणेलेले पैसे कष्टाने जमवले आणि ती जागा पुन्हा मिळवली. वयाच्या ६० व्या वर्षी माणसं कामातून रिटायर होतात. पण मी ६० व्या वर्षी सुनेच्या मदतीने व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला चहाची टपरी सुरू केली. 'पाटलाची सून रस्त्यावर चहाविक्री करते' 'बाईच्या जातीने घर साभाळावं' असे टोमणेही लोक, नातेवाईक देत होते. सून सौ.प्रीतीच्या मदतीने पुढे हळूहळू नाश्ता आणि जेवण सुरू केले. टपरीचे शुद्ध शाकाहारी हॉटेलमध्ये रूपांतर केले.

### व्यवसायात जपला सेवाभाव :

व्यवसायात व्यवहाराला सर्वोच्च न मानता सेवाभाव जपला. कुणाकडे पैसे नसले तरी त्याची भूक भागवली. नोटबंदीच्या काळात सगळीकडे पैशांची चणचण असताना प्रवाशांना उपाशी जाऊ दिले नाही. 'जेवण करा आणि पैसे जमेल तेव्हा द्या' या आमच्या उपक्रमाची मोठी चर्चा झाली. समाज माध्यमांनीही दखल घेतली. कोरोनाकाळात लॉकडाऊनमध्ये सगळीकडे बंद असताना महामार्गावर परप्रांतीय कामगार घराच्या ओढीने जात असताना त्यांच्यासाठी अन्नदान सुरू केले. हॉटेलमधील हजारोंचा माल वाटून दिला.

### वाचन चळवळीची सुरुवात :

कष्टाने उभारलेल्या या व्यवसायात येणारा आज प्रत्येकजण मोबाईलमध्ये गुंग होऊन बसायचा. एकत्र कटुंब आले तरी डोकं मोबाईलमध्ये असायचे. घरी दोन कपाट पुस्तकांनी भरली होती. ती हॉटेलवर आणून ठेवली. सुरुवातीला शिक्षक,

**(... पुढील पानावर)**



**(... मागील पानावरुन)**

कवी अणि साहित्यिकच पुस्तकांजवळ जायचे. मग एक अभिनव कल्पना सुचली मुलाला सांगून प्रत्येक टेबलवर पुस्तके ठेवली. मेनूकार्ड काढून घेतली. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीला अनुसरून हॉटेलमध्ये पुस्तके ठेवली. ऑर्डर येईपर्यंत प्रत्येकजण पुस्तक वाचू लागला.

### नवनवीन संकल्पना रुजवल्या :

ही वाचन चळवळ कशी वाढवता येईल त्यासाठी अजून काय वेगळं करता येईल. लोकं पुस्तकं वाचतील याचा विचार करत गेलो. महाराष्ट्रातील गाजलेल्या कवींच्या चित्रकार विष्णू थोरे यांनी बनवलेल्या कवितांचे पोस्टर चित्ररूपात लावल्या. आज येणारा प्रत्येक ग्राहक फोटो काढल्याशिवाय जात नाही. 'पोटाची भूक भागवताना ज्ञानाचीही भूक' या ठिकाणी भागवली जाते. कुणाचा वाढदिवस असो की कुठलीही विशेष गोष्ट असेल तर त्या व्यक्तिला भेट म्हणून पुस्तक देत असते. भारतरत्न अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस हॉटेलमध्ये येणाऱ्या प्रत्येकाला पुस्तक भेट देऊन अभिनव पद्धतीने 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करते. पहाटे पाच पासून सुरू होणारा दिवस वयाच्या ७४ व्या वर्षीही अखंड सुरू आहे. वाचन चळवळ खऱ्या अर्थाने साहित्यिकांच्या वर्तुळातून सर्वसामान्य लोकांपर्यंत घेऊन जाण्याचं काम हाती घेतले आहे.

### मोबाईल झाला बाजूला :

टेबलावर सहज हातात येणारी पुस्तकं माणसांना वेगळ्या जगात घेऊन जातात. हॉटेलमध्ये येणारी सर्व ग्राहक मंडळी स्मार्ट फोनमध्ये गुंतून न राहता आता पुस्तकांशी मैत्री करतात. जेवणाची ऑर्डर येईपर्यंत पुस्तक वाचत असतात. जेवणानंतरही या पुस्तकांचा मनमुराद आनंद घेता येतो. पंचवीस पुस्तकांपासून सुरू केलेला प्रवास आज जवळपास पाच हजारांहून अधिक पुस्तके वाचनासाठी उपलब्ध आहेत. हॉटेलमध्ये आलेले ग्राहक जेवणाबरोबर आता मोबाईल सोडून टेबलवरील पुस्तकांविषयी भरभरून बोलतात. त्यावेळी वाचन चळवळीच्या यशस्वीतेची पावती मिळाली, असे वाटते. अनेक ग्राहक हॉटेलला भेट दिल्यानंतर त्यांच्याकडील वाचनीय पुस्तके पाठवत आहेत. यामुळे ही चळवळ पुढे नेण्यास ऊर्जा मिळत आहे.

### नव्याने वाचक घडविण्याचे होते काम :

आज ग्रंथालयाकडे पावलं वळत नाही. शाळा, महाविद्यालयात मुलं लायब्ररीकडे जात नाही अशा परिस्थितीत बहुतांश कुटुंबातील लोक हॉटेलात जात असतात. आणि तो वेळ वाचन संस्कारांनी समृद्ध व्हावा ही माझी इच्छा आहे. त्यामुळे पुस्तकांची चळवळ सुरू केली. आज हॉटेलमध्ये येणाऱ्या सरासरी शंभर ग्राहकांपैकी ऐंशी व्यक्तींचा कित्येक वर्षापासून पुस्तकांशी सहवास आला नाही. हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांमधून दररोज किमान दहा व्यक्ती वाचनाकडे आकृष्ट झाल्या तर महिन्याभरात तीनशे आणि वर्षभरात साडेतीन हजार असं गेल्या आठ-दहा वर्षांपासून अव्याहतपणे वाचन संस्कृतीचे काम उभे राहत आहे. नव्याने वाचक निर्माण होत आहे. साहित्य वर्तुळातून वाचन चळवळ सर्वसामान्याशी जोडली जावी यासाठी प्रयत्न करत आहे.

### वंचितांना पुस्तकांची ओढ :

एक दिवस मी आणि माझी सून पुस्तकांची धूळ पुसत असताना तिथे एक भिकाऱ्याची मुलगी आली. काही खायला मिळेल या उद्देशाने ती बराच वेळ दारात उभी होती पण आम्हाला पुस्तक पूसत असताना बघून ती डायरेक्ट मध्येच आली. पुस्तकांचे आकर्षक मुखपृष्ठ बघू लागली. तिची आस्थेने विचारपूस केल्यावर तिने शाळेत जाणाऱ्या तिच्या भावासाठी पुस्तक मागितले. मुळात हे पुस्तक अभ्यासासाठी गरजेचे आहे की नाही याचा विचारही तिच्या मनात आला नाही. पण तिला आपल्या भावासाठी पुस्तक मागावेसे वाटले ही भावनाच मनाला इतकी सूखावून गेली की, जगण्याच्या संघर्षात वंचितांनाही पुस्तकाची ओढ या निमित्ताने आपण निर्माण करू शकलो हे आजपर्यंत मिळणाऱ्या पुरस्कारापेक्षा अधिक आहे या भावनेने वाचन संस्कृतीचं काम करायला बळं मिळालं.



### वाचनाची गरज :

वाचनाने माणूस समृद्ध होतो. संयमी होतो. इतिहासात डोकावून पाहिल्यास अनेक महनीय व्यक्तींच्या आयुष्यात वाचनाचे महत्त्व अधोरेखित होते. माणूस आज घर सजवताना प्रत्येकासाठी स्वतंत्र रूम काढतो पण पुस्तकांसाठी स्वतंत्र जागाही त्याच्या गणतीत नसते. किंमती वस्तूंनी सजवलेल्या घरात विचारांची समृद्धता पुस्तकांच्या सहवासाने येते. यासाठी आपल्या घरात पुस्तकांसाठी प्रत्येकाने जागा निर्माण करावी. ज्या महापुरुषांच्या विचारांनी आपण घडतो अशा महापुरुषांचा सहवास आपल्याला लाभला नाही परंतु पुस्तकरूपात ते आपल्या सदैव सोबत असतात. त्यासाठी त्यांना अभिवादन म्हणून प्रत्येकाने किमान रोज पाच-दहा पानं वाचनाची सवय लावून घेतल्यास मुलंही आपलं अनुकरण करतील. कारण वाचन हा अभ्यास नाही तर संस्कार आहे. ही पुस्तकांच्या हॉटेलची तळमळ आहे.

### आगळ्या वेगळ्या प्रयोगावर काम सुरू :

पुस्तकांच्या हॉटेलच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम सुरू आहेत. वाचन चळवळ ही अधिक प्रभावी व्हावी यासाठी आता अक्षरबंध प्रतिष्ठानची स्थापना केली आहे. आज हॉटेल आणि हॉस्पिटल अशा दोन जागा आहेत जिथे तुम्हाला वेटिंग करायला लागते. हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या औषधांनी तुमचे शरीर बरे होते. पण मनाला बळ द्यायचे असेल तर ते चांगल्या विचारांतून देऊ शकतो, असे चांगले विचार पुस्तकातूनच मिळतात. त्यासाठी अक्षरबंधच्या माध्यमातून हॉस्पीटलमध्ये वाचन चळवळ रूजवण्याचे काम हाती घेतले आहे.

### शाळांच्या सहली देतात प्रेरणा :

जेव्हापासून माझ्या हॉटेलला शाळा-महाविद्यालयाच्या सहली येऊ लागल्या तेव्हापासून मनाला समाधान वाटू लागले. ज्या पिढीसाठी आपण काम करायला हवं. त्यांच्यासाठी इथे आल्यानंतर प्रेरेणेचा एक संस्कार देऊ शकतो. त्यामुळे अधिक बळ मिळतं. येथे आल्यानंतर मुलांना पुस्तकांच्या दुनियेची सफर घडवली जाते. त्यांच्याशी संवाद साधताना 'या वयात आजी करू शकते तर आपण का नाही' ही प्रेरणा मिळते. एखाद्या पर्यटन स्थळाला भेटी द्याव्या असं महाराष्ट्रातून लोक भेटायला, बघायला येतात तेव्हा नवी ऊर्जा मिळते. शेवटी एवढंच सांगावसं वाटतं... पुस्तकं नेहमी खरं बोलतात अशा पुस्तकांना आपल्या आयुष्यात स्थान द्या. माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात.एक- भेटलेली माणसं आणि दुसरं म्हणजे पुस्तक.

**- सौ. भिमाबाई जोंधळे**

(खाद्यसंस्कृतीत वाचन चळवळीच्या प्रणेत्या)




आजही महाराष्ट्रातील अनेक गावांत डोक्यावर आणि कंबरेवर पाण्याचे हंडे घेऊन फिरणाऱ्या महिलांचे दृश्य दिसते. हे दृश्य आपल्याला अंगवळणी पडले आहे. प्रत्यक्षात वास्तव किती भयानक आहे, याची कल्पनाही करू शकत नाही. पश्चिम महाराष्ट्रापासून गडचिरोलीपर्यंत अनेक महिलांना पाणी मिळवण्यासाठी दूरवर जावे लागत होते. पण, २०१६ पासून पाणी फाउंडेशनने पाण्यासाठी लोकचळवळ निर्माण करण्याचा मोठा प्रयत्न केला आहे. दुष्काळ आणि शेतीतील संकटांना तोंड देण्यासाठी महाराष्ट्रातील ग्रामीण समूदायांना सक्षम बनवणे हे आमचे ध्येय आहे.

पाण्यासाठी गावातील सर्व हात एकवटले. दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न उराशी बाळगून २०१६-२०१९ मध्ये आम्ही 'सत्यमेव जयते वॉटर कप'चे आयोजन केले. या ४५ दिवसांच्या स्पर्धेने दुष्काळग्रस्त गाव सामाजिक अडथळ्यांच्या पलीकडे काम करण्यासाठी आणि कोरड्या जमिनीत पाणी वाचवण्यासाठी एकत्र आले.

चार वर्षांच्या कालावधीत ७६ ब्लॉकमधील ६,००० हून अधिक गावांनी सहभाग घेतला. त्यांनी विकेंद्रित पाणलोट व्यवस्थापनाच्या विज्ञानाचे प्रशिक्षण 'पाणी फाउंडेशन' कडून घेतले आणि अंमलात आणले. जलसंचय संरचना तयार करण्यासाठी दररोज लाखो हातांनी 'श्रमदान' केले. एक सामाजिक प्रयोग म्हणून सुरू झालेली ही स्पर्धा बघता-बघता पाण्याची एक मोठी लोकचळवळ बनली. जलसंधारणाची ही चळवळ 'मनसंधारणा'ची बनली. या मोहिमेत सिंहाचा वाटा होता तो महिलांचा.

महाराष्ट्रातील अनेक गावांतील महिलांनी या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला. गावात जलक्रांतीची अनोखी बीजं रोवली. गावातील पुरुषांच्या विरोधाला न जुमानता त्या पाण्यासाठी पुढे आल्या. जत तालुक्यात श्रमदान करण्यासाठी गावकऱ्यांचा प्रतिसाद कमी होता. तिथे महिलांनी श्रमदानासाठी पुढाकार घेतला. घरचा उंबरठा ओलांडून फावडे व पाट्या घेऊन निघाल्या. गावाच्या श्रमदानाची महत्त्वाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्यांचे अनुकरण करून मग पुरुषही सहभागी झाले. फुलंब्री तालुक्यातील शिरोडी गावातील महिला तब्बल चार किलोमीटर पायपीट करून श्रमदानासाठी एकवटल्या. हा प्रवास त्यांच्यासाठी सोपा नव्हता. गावातल्या प्रचंड नकारात्मक प्रतिक्रियांना न जुमानता त्यांनी काम सुरू ठेवले. सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील कण्हेरखेड गावात महिलांनी वर्षानुवर्षे प्रथमच 'गोशा पद्धत' (कामासाठी घराबाहेर न पडण्याची परंपरा) प्रथा मोडली. त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठिंब्याने 'वॉटर कप २०१६' मध्ये महिला मोठ्या संख्येने श्रमदानात सामील झाल्या.

वाशिम जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील महिला या गेली अनेक वर्षे एका चौकटीत राहत होत्या. पण, पाण्यासाठी त्यांनी आपल्या चौकटी मोडल्या. इथल्या एकंबा गावातील विमलताई आणि सुशीलाताई या आदिवासी भागातील महिलांनी पाणी फाउंडेशनचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी एक धाडसी पाऊल उचलले. गावाला उत्पन्न मिळवून देणारा, पण विनाशाकडे नेणारा दारूचा धंदा बंद करून सर्वांना पाण्याच्या मार्गाला लावले.

बीड तालुक्यातील बऱ्हाणपूर गावातील ५० मुलींनी "या कामात आम्ही आमच्या माहेराला पाणीदार करू," असा संकल्प करत आर्थिक मदत केली आणि श्रमदानासाठी हातात कुदळ, फावडं घेतं दुष्काळाशी दोन हात करण्याची शपथ घेतली. यामुळे आता गावच्या सुनांसोबत, नांदायला गेलेल्या मुलीदेखील पुढे सरसावल्या. हळूहळू तीन तालुक्यांपासून सुरू झालेली स्पर्धा ही ७५ तालुक्यांपर्यंत पसरली. स्पर्धा केवळ पाणी मिळवण्यापुरती मर्यादित राहिली नाही, तर ती महिला सक्षमीकरण आणि समाज परिवर्तन या दिशेने एक मोठे पाऊल ठरली. महाराष्ट्रातील महिलांनी पाणी मिळवण्यासाठी केलेला संघर्ष आणि 'वॉटर कप' स्पर्धेमुळे त्यांना मिळालेले बळ, हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

२०१६ पासून एकजुटीच्या बळावर महाराष्ट्रातील शेकडो गावांनी स्वतःला पाणीदार केले.

यानंतर वेळ होती या पाण्याचे समृद्धीत रूपांतर करण्याची. भारतात जवळपास ९० टक्के पाणी हे शेतीसाठी वापरले जाते. पण, फक्त पाण्याची उपलब्धता वाढून शेती चांगली होईल असे नाही. शेती सुधारण्यासाठी पाणी व्यवस्थापन, बाजारपेठेचे ज्ञान, हवामान असे अनेक घटक कारणीभूत असतात. या सर्व समस्या या एकट्या शेतकऱ्याने सोडवणं शक्य नाही. त्यासाठी 'सह्याद्री फार्म्स' सारख्या यशस्वी शेतकरी मालकीच्या कंपन्यांचे उदाहरण घेऊन पाणी फाउंडेशनने गटशेतीवर आधारित स्पर्धा सुरू केली. गावातील शेतकऱ्यांनी गटाने एकत्र येऊन शेती करावी आणि शेतीतील संकटांवर मात करावी या उद्देशाने शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीसाठी एक नवीन पहल करण्यात आली, ती म्हणजे 'फार्मर कप'. २०२२च्या खरीप हंगामापासून ही स्पर्धा सुरू करण्यात आली. प्रशिक्षणाची साथ, ज्ञानाचा आधार आणि गटशेतीच्या एकजुटीच्या बळावर शेतकऱ्यांना समृद्ध करणाऱ्यासाठी ही स्पर्धा वेगाने पुढे गेली. २०२२ साली १५०० गटांपासून सुरू झालेल्या या स्पर्धेचा विस्तार आता ४६ तालुक्यांमध्ये ४३०० गटांपर्यंत झाला आहे.

या गटशेतीच्या स्पर्धेत महिला कशा मागे राहतील? वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देत महिलांचे गट तयार झाले. २०२२ साली जेव्हा 'फार्मर कप' स्पर्धा सुरू झाली तेव्हा महिलांचे फक्त ४२ गट होते आणि ती संख्या अवघ्या तीन वर्षांत आता १९४७ इतकी झाली आहे. 'फार्मर कप स्पर्धा २०२३' मध्ये अर्ध्यापेक्षाही जास्त विजेते गट हे महिला शेतकऱ्यांचे होते. यंदाच्या वर्षीही महिलांनी उत्तम पद्धतीने शेती करून भरघोस उत्पादन घेतले आहे. पण, हा प्रवास या शेतकरी महिलांसाठी सोपा नव्हता. या महिलांची लढाई शेतीला लागणाऱ्या जमिनीपासून सुरू होते.



**(... पुढील पानावर)**

**(... मागील पानावरुन)**

त्याला पार करत सामाजिक बंधने झुगारत शेतीतील एकेक काम त्या हिरीरीने व शास्त्रीय पद्धतीने करतात. घरातील जबाबदारी सांभाळत शेतीज्ञानासाठी आतुरलेल्या या महिला दररोज पाणी फाउंडेशनच्या डिजिटल शेतीशाळा जॉइन करतात. शेतीच्या कामात मदत ते संकटकाळी एकमेकींचा आधार बनल्या आहेत. गटशेतीच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन शेतीची जबाबदारी स्वतःच्या हाती घेतली आहे. यामुळे त्यांना न केवळ आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाले आहे, तर त्यांच्यात आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणही विकसित झाले आहेत. शेतीतील सर्व संकटांसोबत दुष्काळासारख्या कठीण परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी त्यांनी एकत्र येऊन नवीन मार्ग शोधला. यामुळे शेती उत्पादन वाढले आहे आणि त्यांच्या कुटुंबांचे जीवनमान सुधारले. याशिवाय, त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील समस्या सोडवण्याचे धाडसही त्यांच्यात निर्माण झाले आहे. याचे एक उदाहरण म्हणजे करमाळा तालुक्यातील फिसरे गावचा महिला शेतकरी गट. यांची प्रेरणादायी कहाणी आहे जी आपल्याला मानवी मूल्यांची, एकतेची आणि सहकार्याची जाणीव करून देते. करमाळा तालुक्यातील फिसरे गावच्या जिजाऊ महिला शेतकरी गटातील महिलांनी आपल्या शेतकरी बहिणींना पाणी देऊन एक अद्वितीय उदाहरण प्रस्थापित केले आहे. 'फार्मर कप' ट्रेनिंगमध्ये सहभागी झाल्यावर तूर पिकाची लागवड केली होती. पण, अपुऱ्या पावसामुळे पिकांवर संकट कोसळले. पाण्याच्या अभावी महिलांच्या शेतातली पिके जळून जाण्याची भीती होती. पण, या महिलांनी हार मानली नाही. त्यांनी एकत्र येऊन परिस्थितीवर मात करण्याचा निर्णय घेतला.

गावात प्रचलित असलेल्या 'आपल्या शेताचं पाणी दुसऱ्याला देऊ नये' या मान्यतेला झुगारून या महिलांनी आपल्या शेतातील पाणी इतर महिलांना देण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी आपल्या कुटुंबीयांना समजावून सांगितले आणि त्यांची परवानगी घेतली. मनीषा रोकडे या महिलांमध्ये अग्रेसर होत्या. त्यांनी आपल्या शेतातून पाइप लाइनच्या माध्यमात दूरवर असलेल्या मैत्रिणीच्या शेतापर्यंत पाणी पोहोचवले. यासाठी गटातील महिलांनी पैसे जमा करून मोठे पाइप आणले. त्यांच्या या कृतीमुळे पिकांना जीवदान मिळाले.

या घटनेने स्पष्ट होते की, एकता आणि सहकार्य यांच्या सामर्थ्याने आपण कोणत्याही संकटावर मात करू शकतो. या महिलांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले की, आपल्याला एकमेकांना मदत करायला शिकले पाहिजे. त्यांची ही कहाणी आजच्या काळात प्रेरणादायी आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बानेगावच्या श्री राम समर्थ महिला शेतकरी गटाने एका नवीन अध्यायाला सुरुवात केली आहे. स्वतःच्या नावावर एक गुंठाही जमीन नसताना या महिलांनी कराराच्या शेतीत सोयाबीन लावून उत्तम शेती करण्याचा निर्णय घेतला आहे. या गटातील शेतकरी उज्ज्वला सांगतात, "आम्ही शासनाच्या 'उमेद' अभियानात काम करत असल्याने गटबांधणी करणे आमच्या कामाचा भाग आहे. 'फार्मर कप २०२३' स्पर्धेसाठी गावातल्या लोकांना प्रोत्साहन देत असताना आम्हालाही स्वतः शेती करण्याची इच्छा जागृत झाली. पण, जमीन नसल्याने आम्हाला अडचण आली. त्यानंतर आम्ही निश्चय केला की, कोणत्याही परिस्थितीत आम्ही भाडेकरारावर जमीन मिळवायची आणि गटशेती करायची. माझ्यासारख्याच शेतजमीन नसणाऱ्या १० महिलांना जमवून आम्ही गावातल्या अनेकांकडे जमिनीसाठी संपर्क केला. शेवटी, एका माजी सरपंचांनी खर्च आणि उत्पन्नात बरोबरीची भागीदारी करायची, या अटीवर आम्हाला जमीन दिली. एकत्रितपणे आम्ही १५ एकर जमिनीवर सोयाबीनची पेरणी केली."

या गटशेतीच्या माध्यमातून फक्त शेती नाही, तर महिलांनी आपल्याला संकटकाळी मदत करणारी एक सपोर्ट सिस्टिमच तयार केली आहे. जेव्हा शेतात जायला रस्ता नव्हता. हाती कुदळ-फावडे घेत गटाने रस्तादुरुस्तीचे काम केले.

वर्धा तालुक्यातील महाकाळ गावातील 'फार्मर कप'च्या भूसुधारक महिला शेतकरी गटाच्या सोयाबीनची काढणी सध्या जोरात सुरू होती. अशातच गटातील रंजनाताई ढवणे यांच्यासमोर मोठी समस्या उभा राहिली. त्यांच्या शेताकडे जाण्याचा रस्ता पूर्णपणे धसला आणि पडला. तिथून जाणे-येणे अशक्य होते. सोयाबीन वेळेवर काढणे गरजेचे होते. त्यामुळे रंजनाताईंची काळजी वाढली. त्यांनी ही गोष्ट गटातील महिलांना सांगितली आणि गावात एका भलत्याच कामाची सुरुवात झाली. गटातील सर्व महिला कुदळ-फावडे घेऊन थेट रस्तादुरुस्तीच्या कामाला लागल्या. अन् चक्क ३ दिवसांत शेतात जाण्याचा मार्ग मोकळा केला. आता रंजनाताईंच्या शेतात सोयाबीन भरण्यासाठी ट्रॅक्टरही सुरक्षित जाऊ शकतो. सोयाबीन काढणीचा मार्ग महिलांनी मोकळा केला. इतकेच नाही, तर ग्रामीण भागातील महिला या आर्थिक सक्षम बनल्या आहेत.एव्हढेच नव्हे तर शेतीतील सर्व व्यवहार त्यांनी हातात घेतला आहे. एकत्र निविष्ठा खरेदी करून बचत करण्यापलीकडे जाऊन कोरेगाव तालुक्यातील बोरगाव गावातील महिलांनी एकत्र येऊन 'महालक्ष्मी महिला शेतकरी गट' बनवला. या गटाने सोयाबीनची उत्तम दर्जाची शेती केली आहे. 'फार्मर कप' स्पर्धेत शेती करताना कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेता येईल, याचा विचार या महिलांनी केला. आपला खर्च वाचवण्यासोबतच अधिक उत्पन्न मिळवण्यासाठीही त्या प्रयत्न करत होत्या. त्यावेळी गावात मळणी करणे हे अधिक खर्चिक असल्याने गटातील सर्व महिलांनी एकत्र येऊन स्वतःचे मळणी यंत्र खरेदी करण्याचा निर्णय घेतला व नियोजन करून मळणी यंत्र खरेदी केले. काही आठवड्यातच एका लाखाचे अतिरिक्त उत्पन्न कमवले.

'बायकांना शेतीतलं काय कळतं?' अनेकदा असा समज ग्रामीण भागात असतो. पण, याचं चोख उत्तर द्यायला 'फार्मर कप'च्या महिला तयार झाल्या आहेत. कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा गावातील पल्लवी थोरात आणि त्यांच्या आकांक्षा शेतकरी गटाने नुकत्याच एका अशा मोठ्या संकटाशी सामना केला आहे. डौलदार फुललेल्या त्यांच्या सोयाबीनवर 'पिवळ्या मोजॅकने' हल्ला केला होता. याचा प्रादुर्भाव झाल्यास पूर्ण झाड पिवळे पडते. अशा झाडांना कालांतराने फुले आणि शेंगा कमी लागतात आणि पर्यायाने उत्पन्नात मोठी घट येते.

सर्व शेतकऱ्यांना या पीकरोगांशी सामना करण्याचे मार्गदर्शन हे पाणी फाउंडेशनच्या डिजिटल शेतीशाळेत मिळाले. त्यानंतर सर्व महिलांनी मिळून प्रत्येकाच्या शेतात एक सर्वेक्षण मोहीम सुरू केली.

त्यांनी तातडीने शेतीशाळेत सांगितलेल्या उपाययोजनांचा प्रभावीपणे वापर केला. या रोपांना उपटून जमिनीत गाडले आणि प्रत्येकाच्या शेतात रस शोषणाऱ्या किडींसाठी चिकट सापळे लावले. पल्लवीताईंच्या सतर्कतेमुळे हा रोग पसरू शकला नाही आणि त्यांचे सोयाबीनचे पीक वाचले.

बीड, अंबाजोगाई, नगर अशा अनेक तालुक्यांतील महिलांनी स्वतः ट्रॅक्टरचे स्टेअरिंग हातात घेऊन ट्रॅक्टरधारी शेतकरी बनल्या आहेत. गावखेड्यातील बंधने झुगारून महिलांनी आपल्या घरचा उंबरठा ओलांडला आहे आणि वेगवेगळ्या पातळ्यांवर संघर्ष करून शेती आपल्या हातात घेतली. 'फार्मर कप' स्पर्धेत सहभागी होऊन शेती करताना शेतीत तर भरभराट झालीच आहे. पण, सोबतच महिलांना मुक्तीचा अवकाश मिळाला आहे. या अवकाशात त्या स्वतः शेतीसोबतच वैयक्तिक आयुष्याचे निर्णयही घेण्यास सक्षम झाल्या आहेत.

अशा महिलांच्या अनेक सक्षमी करणाच्या, धाडसाच्या आणि प्रेरणेच्या हजारो कहाण्या आहेत. आम्हाला आनंद आहे की, ग्रामीण भागात महिला पाणी आणि शेती या दोन्ही क्षेत्रांत क्रांतिकारी बदल घडवून आणत आहेत. त्यांची जिद्द, मेहनत आणि एकता यामुळे अनेक गावांमध्ये पाणी व्यवस्थापन आणि शेती पद्धतीत सुधारणा झाली आहे. गटशेतीच्या माध्यमातून महिलांना एक नवीन अवकाश मिळाले आहे. त्या आता शांत राहत नाहीत, तर त्यांनी आपल्या समस्या आणि मागण्या व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीची उत्पादकता वाढवण्याचे मार्ग शोधले आहेत.

'वॉटर कप' आणि 'फार्मर कप' स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांनी दाखवून दिले आहे की, महिलांना कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यापासून रोखणे शक्य नाही. त्यांनी मिळवलेले यश हे इतर महिलांसाठीही प्रेरणादायी ठरेल. इतर महिलाही त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरित होतील.

**- मिनाज लाटकर**
पाणी फाउंडेशन, सोशल मीडिया टीम

# रिओ ऑलम्पिक व्हाया सावरपाडा

**'जितना ज्यादा संघर्ष होगा, जीत उतनी शानदार होगी.' हे वाक्य त्या प्रत्येक भारतीयासाठी चपखल बसते, ज्याचा खेड्यापाड्यात जन्म झाला पण तो परिस्थितीपुढे वाकला नाही. उलट पाय घट्ट रोवून मैदानात उभा राहिला आणि आपापल्या क्षेत्रांत देदीप्यमान यश संपादन करून जगाला हेवा वाटेल असं आयुष्य घडवलं. 'द सावरपाडा एक्स्प्रेस' नावाने ओळखल्या जाणाऱ्या कविता राऊत यांनी वेगवान धावण्यामुळे जगात नाव कमावले आहे. वरील उक्तीनुसार त्यांच्या आजच्या यश आणि प्रतिष्ठेच्या मागे त्यांचा अहर्निश संघर्ष,जिद्द, परिस्थितीशी झुंज आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची वृत्ती आहे.**

नाशिकच्या सावरपाडा या दुर्गम, डोंगरांनी वेढलेल्या आदिवासी खेड्यातील गरीब कुटुंबात जन्मलेल्या कविता ताईंची घरची परिस्थिती बेताचीच पण स्वप्ने महत्त्वाकांक्षी होती. रोजच्या जीवनातील अन्न-पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठीही डोंगर पायाखाली तुडवीत पायपीट करावी लागे. या कष्टप्रद बालपणामुळे आपसूकच पाय कणखर बनले. एकदा नाशिकच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळाली आणि पूर्वतयारीचा अभाव, पायात शूज नसताना अनवाणी पायाने धावून सुद्धा उत्तम कामगिरी केली आणि हीच जिद्द ॲथलिट प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांनी हेरली आणि कविता यांच्याकडून नाशिकच्या भोसला मिलिटरी स्कूलच्या मैदानावर धावण्याचे धडे गिरवून घेण्यास सुरुवात केली. सावरपाडा या नाशिकमधील छोट्याशा खेड्यातून आलेल्या कविताताई यांनी तंत्रशुद्ध शिक्षण घेतले. स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत त्यांनी चांगली कामगिरी केली. गुजरातमध्ये झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील शालेय स्पर्धेमध्ये त्यांनी रौप्यपदक पटकावले. त्यांच्या याच विजयासह त्यांचा धावपटू म्हणून प्रवास सुरू झाला. पुढे नाशिक येथे सराव आणि तिथून ५० किलोमीटर अंतरावर असलेले हरसूल येथे शिक्षण अशी त्यांची कसरत सुरू होती. पुढे त्यांनी भोसला मिलिटरी स्कूलमध्येच महाविद्यालयीन शिक्षण घेतले.



### ...आणि बनली सावरपाडा एक्सप्रेस :

प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांचे मार्गदर्शन आणि कविता यांची यशासाठी लढण्याची जिद्द यामुळे त्यांनी अनेक स्पर्धांत यश प्राप्त केले. त्यांची गती आणि यश पाहता, कविता यांना पंचक्रोशीत 'सावरपाडा एक्सप्रेस' म्हणून संबोधले जाऊ लागले. कॉमनवेल्थ स्पर्धेमध्ये भारतासाठी पदक मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला ॲथलिट ठरल्या. त्यांनी या स्पर्धेमध्ये कांस्यपदक मिळवून नवा विक्रम रचला होता. २०१० मध्ये १० हजार मीटरच्या स्पर्धेत कांस्यपदकाचीही त्यांनी कमाई केली होती. त्याच वर्षी आशियाई स्पर्धेमध्ये १० हजार मीटरमध्ये कविता यांनी रौप्यपदक पटकावले होते. पुढे केनियामध्ये आयोजित ऑलिम्पिक स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र, अवघ्या काही सेकंदाच्या फरकाने त्यांना प्रवेश मिळाला नाही. २०१३ मध्ये झालेल्या सतराव्या 'फेडरेशन कप सिनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप' स्पर्धेत त्यांनी १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्यांची कामगिरी पाहता पुढे त्यांना बाराव्या दक्षिण आशियाई स्पर्धेतून रिओ स्पर्धेचे तिकीटही मिळाले. अर्धमॅरेथॉनमध्ये १ तास, १२ मिनिटे, ५० सेकंदाची वेळ नोंदवत राष्ट्रीय विक्रम केला आहे. त्यासोबतच त्यांनी १० हजार मीटर अंतराच्या स्पर्धेत ३४ मिनिटे ३२ सेकंदांची विक्रमी वेळ नोंदवली.

### ...मेहनत रंग लायी :

कॉमन वेल्थ स्पर्धेत भारतासाठी पदक मिळवणाऱ्या पहिल्या ॲथलिट तसेच विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांतील चमकदार कामगिरी या मेहनतीची पावती म्हणून २०१२ मध्ये त्यांना 'अर्जुन पुरस्कारा'ने गौरविण्यात आले.

### ...कोरोनात झाल्या सेवेकरी :

२०२० मध्ये आलेल्या करोना महामारीने संपूर्ण जगाला वेठीस धरले होते. राजा काय, भिकारी काय, गरीब, श्रीमंत कोणालाही सोडले नाही परंतु यात गरीब, कष्टकरी वर्गाचे अतोनात हाल झाले. जीवनावश्यक वस्तू आणि रोजचे अन्न मिळवताना देखील जिकिरीचे झाले होते. अशा वेळी समाजातील ज्यांच्यात माणूस जिवंत आहे असे असंख्य ज्ञात-अज्ञात चेहरे मदतीसाठी पुढे आले होते. त्यात कविता राऊतही मागे नव्हत्या. त्यांनी 'कविता राऊत फाऊंडेशन' आणि 'यशोदीप' च्या माध्यमातून अनेक मजुरांना दैनंदिन आयुष्यात लागणाऱ्या वस्तू आणि किराणामालाचे वाटप केले होते.

### ..मविप्रने उभारला कविता राऊत यांचा पूर्णाकृती पुतळा :

कविता राऊत सामान्य परिस्थितीतून पुढे येऊन असामान्य कामगिरी करणाऱ्या आणि देशाचे नाव जागतिक पटलावर कोरणाऱ्या हुन्नरी खेळाडू आहेत. सन २०२३ मध्ये, महाराष्ट्राची शान असलेल्या कविता राऊत यांचा धावतानाचा पूर्णाकृती कांस्य पुतळा गंगापूर रोड, नाशिक येथील मॅरेथॉन चौकात उभारून मराठा विद्या प्रसारक समाजाने या खेळाडूप्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. खेळाडूंना प्रेरणा देण्यासाठी सामाजिक बांधिलकीचा वस्तुपाठ म्हणून या पुतळ्याचे मोल मोठे आहे.

### प्रवास ऑलम्पिकचा :

कविता यांचा रिओ ऑलम्पिक व्हाया सावरपाडा व सावरपाडा एक्सप्रेस बनण्याचा प्रवास खडतर होता. बिकट आर्थिक परिस्थितीवर मात करीत आलेल्या संधीचे सोने करीत, विजेंद्र सिंह सारख्या प्रशिक्षकाचे योग्य प्रशिक्षण आणि सर्वतोपरी मदत, हजारो तासांचा सराव, जिद्द या सर्वांचा तो परिपाक आहे. आज पती महेश तुंगार (अभियंता, महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळ) यांचेसमवेत त्या सुखाने संसार करीत आहेत. मात्र त्यांचे खेळाप्रति समर्पण यत्किंचितही कमी झालेले नाही. भविष्यात त्यांच्या हातून क्रीडा क्षेत्राची सेवा घडो आणि त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अशा आणखी सावरपाडा एक्स्प्रेस तयार होवोत ह्या शुभेच्छा.

# फिल्ड हॉकीची राजकुमारी रेणुकादेवी यादव

खेड्या-पाड्यावरचं स्वच्छंदी वातावरण आणि अवखळ बालपण बहुतेकांना संघर्षविरुद्ध झुंजण्याची शक्ती निसर्गतःच प्रदान करतात.कठीण परिस्थितीही आनंद शोधत, जबाबदारीचं ओझं वाटू न देता जे जीजिगीषा करतात. त्यांच्या यशोगाथा लिहिल्या जातात आणि त्यातीलच काही अगदी जगाच्या पटलावरही पोहचतात. ही कहाणी अशाच एका तरुणीची जिने बालपणातच कुटुंबाला आर्थिक हातभार म्हणून सायकलवरून दूध वाटण्याचे काम केले आणि या चाकांनीच तिच्या पायात बळ भरीत भारतीय हॉकी संघात तिची जागा पक्की केली. ही आहे रेणुका यादव 'रिओ ऑलम्पिक २०१६' स्पर्धेत भारतीय हॉकी संघात स्थान मिळवलेली सर्वात तरुण आणि छत्तीसगढची सर्वांत पहिली खेळाडू.

**बालपण :** छत्तीसगड मधल्या राजनांदगाव या महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या जिल्ह्यात शेतकरी यादवांच्या सामान्य कुटुंबात १८ जुलै १९९४ रोजी रेणुकाचा जन्म झाला. रेणुकाचे बालपण गरिबीच्या कारणास्तव अत्यन्त खडतर आणि सुविधारहित गेले. कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा म्हणून प्रसंगी शालेय शिक्षण अर्धवट सोडून तिने काही घरांमध्ये आई सोबत धुणीभांडी करण्याचे काम केले. तर कधी वडिलांसोबत सायकलवरून दूध वाटपाचे काम केले. हा संघर्ष करीत असताना हॉकी विषयी माहिती मिळाली आणि एक सुप्त आकर्षण या खेळा विषयी तयार झाले. पारंपरिक विचारसरणी आणि गरिबीमुळे सुविधांची वाणवा याचा परिणाम साहजिकच रेणुकाच्या हॉकी खेळावर झाला.हॉकी खेळण्यास कुटुंबाकडून विरोध सुरु झाला परंतु घराला आर्थिक पाठबळ देत जमेल तसे प्रसंगी चोरून-लपून रेणुका हॉकीची साधना करीत राहिली.





**ग्वाल्हेरच्या सिंधिया अकॅडमीने दिले पाठबळ :**

ग्वाह्लेरची सिंधिया अकॅडमी मुख्यमंत्री सहायता निधीतून होतकरू आणि कष्टाळू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि खेळाविषयीच्या जडणघडणीला पाठबळ देते याची माहिति रेणुकाला मिळाली. अर्धवट राहिलेल्या शिक्षणासोबतच हॉकीचे प्रशिक्षण घेण्यासाठी तिने ग्वाल्हेर गाठले आणि हॉकीच्या प्रशिक्षणातला आर्थिक अडथळा दूर झाला. तीन वर्षे तिथे प्रशिक्षण घेतल्यानंतर नशिबाने साथ देत बारावीत असतानाच तिला रेल्वेत टी . सी. ची नोकरी मिळाली. तिच्या हक्काचा शाश्वत असा आर्थिक स्रोत सुरू झाला.

**कष्टाने कमतरतेवर केली मात :**

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात कुठल्याही क्षेत्रात स्पर्धात्मक आव्हाने पुष्कळ आहेत. अशात देशासाठी खेळणाऱ्या संघात आपले स्थानं व्हावे आणि राष्ट्रकुल, आशियाई आणि सरतेशेवटी ऑलिम्पिक सारख्या जगप्रसिद्ध स्पर्धांमध्ये आपला ठसा उमटावा ही प्रत्येक खेळाडूची स्वप्ने असतात. तशीच स्वप्ने रेणुकाचीही होती. स्पर्धात्मक चढाओढीत त्या वेळच्या राष्ट्रकुल स्पर्धेत रेणुकाची वर्णी काही लागली नाही. त्यांनतर रेल्वे टी. सी. प्रशिक्षण आणि खेळाचा सराव अशी तारेवरची कसरत सांभाळताना आशियाई स्पर्धेतील सहभागाचीही तिची संधी हुकली. स्वतःला मिळालेल्या या रिजेक्शनला पॉजिटीव्हली घेत तिने प्रशिक्षकांना स्वतःच्या कमतरतांविषयी विचारले आणि त्यावर मेहनत घेत मात केली. भारत वरिष्ठ संघात आल्यानंतर दोनच वर्षांत तिने जवळपास १२ जागतिक स्पर्धा खेळत आपला खेळ बहरवला. एक दिवस अचानक रिओ ऑलीम्पिक २०१६ च्या स्पर्धेत भारतीय संघातर्फे खेळण्यासाठी ती पात्र झाल्याचा निरोप आला तेव्हा तिची स्वप्नपूर्ती तिच्या डोळ्यांतून ओघळत होती.

**रेणुका उवाच :**

"आपण कोण म्हणून आणि कोणत्या आर्थिक-सामाजिक परिक्षेत्रात जन्माला आलो या गोष्टी आपल्या प्रतिभेपासून वंचित ठेऊ शकत नाही, सुरुवातीला थोडा त्रास होतो परंतु आपण आपल्या ध्येयाप्रति ठाम असलो तर कोणत्याही परिस्थितीत आपण विजयी होऊ शकतो "अशी वाक्ये रेणुकाच्या तोंडून ऐकताना तिने संघर्षावर कोरलेली यशोगाथा ठामपणे झळकते.

स्वतःला आणखी सक्षम करण्याबरोबरच राजनांदगावातून पर्यायाने छत्तीसगढमधून आणखी रेणुका वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकाव्यात यासाठी रेणुका सुविधायुक्त परिपूर्ण अकॅडमी उभारण्यासाठी प्रयत्नशील आहे.

( मा. रेणुका यादव ह्या २०२५ च्या ८ व्या राष्ट्रीय व १४ व्या राज्यस्तरीय नाशिक मविप्र मॅरेथॉन स्पर्धेच्या प्रमुख अतिथी होत्या. )

## अभिनयाचा सोज्वळ चेहरा

# मृणाल दुसानीस

ज्याला टिपिकल सास-बहू-कटकारस्थान पठडीत बसवून हिणवलं जातं अशा काही हिंदी-मराठी मालिकांच्या त्याच-त्याच रटाळपणाला फाटा देत सन २००७-०८ पासून काही उत्कृष्ट मालिका मराठी सिनेक्षेत्रात गाजल्या. संध्याकाळी सात नंतर संपूर्ण कुटुंबाला एकत्रित बसून निखळ-निखालस आस्वाद या मालिकांनी दिला. यातील अनेक नायक-नायिका कित्येक प्रेक्षकांना आपल्या घरातील सदस्य वाटाव्यात इतक्या तन्मयतेने त्यांचा अभिनय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला होता. या मालिकांनी अनेक नवोदित कलाकारांना स्वतःची ओळख मिळाली. त्यांचे करीअर सेट झाले. प्रेक्षकांना भावलेल्या नवं कलाकारांपैकी अल्पावधीतच महाराष्ट्राचा लाडका बनलेला चेहरा म्हणजे 'मृणाल दुसानीस.' नावाला साजेसा सोज्वळ चेहरा, तरल अभिनय, निसर्गदत्त निखालस सौंदर्य आणि आवाज या संपत्तीच्या जोरावर मृणालने नाट्य-मालिका क्षेत्रात कसदार काम करीत आपली छाप पाडली आहे. तिच्या व्यक्तित्वाविषयी हा लेखप्रपंच.

**बालपणीच ठरवले अभिनय क्षेत्रात नाव कमवायचे :**

म.वि.प्र.समाज नाशिकच्या मराठा हायस्कूलची विद्यार्थिनी असलेली मृणाल वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच कथ्थक नृत्य आणि गायनाचे धडे घेत होती.पुढे जाणत्या वयात अभिनयकलेत जास्त विविधता जाणवल्याने, बालनाट्य, अभिनयाच्या विविध स्पर्धांतून भाग घेत तिने स्वतःला घडवायला सुरुवात केली. पुढे 'जिनिअस' संस्था आणि 'ललित कला महाविद्यालयाच्या' माध्यमातून प्रायोगिक रंगभूमीवर नाट्यस्पर्धा, एकांकिका यातून मृणालचा अभिनय जास्त बहरला. नाशिकच्या एच.पी.टी. महाविद्यालयात पत्रकारितेचे शिक्षण घेत असताना एका मालिकेसाठी निवड चाचणीची जाहिरात मृणालने पाहिली आणि सहजच तिथे अर्ज केला. मृणाल गंमतीने सांगते, "ज्या मालिकेसाठी निवड चाचणी झाली होती, ती मालिका कधी पडद्यावर आलीच नाही परंतु मुंबईच्या मालिका, टीव्ही क्षेत्रात ते माझं पहिलं पाऊल होतं."



**दुसानीसांची पहिलीच पिढी या क्षेत्रात :**

मृणालचे वडील कृषी खात्यात तर आई खाजगी कंपनीत नोकरीस होती. आई-वडलांच्या कुटुंबात कोणीही आधी टीव्ही, सिनेमा क्षेत्रात नव्हते त्यामुळे "माझिया प्रियाला प्रीत कळेना" मालिकेत नायिकेचं पात्र करण्याची संधी मिळाल्यानंतर घरात सर्वजण आनंदित झाले. पण मृणाल पहिल्यांदा मुंबईसारख्या मोठ्या शहरात एकटी राहणार म्हटल्यावर आईचं मन जरा खट्टू झालं. मृणालचे बाबा नेहमीच तिच्यासाठी ढाल बनून राहिलेत. प्रसंगी मृणालसाठी 'मित्र, तत्त्वज्ञ, वाटाड्या' सर्वकाही तिचे बाबाच आहेत.

**"माझिया प्रियाला प्रीत कळेनां" या पहिल्याच मालिकेतून केलं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य :**

एकता कपूरच्या बालाजी फिल्म्स प्रॉडक्शनच्या 'माझिया प्रियाला प्रीत कळेना' या मालिकेच्या माध्यमातून मृणाल पहिल्यांदाच व्यावसायिक रित्या कॅमेरासमोर उभी राहिली, "शमिका राजे" असे मुख्य पात्र असलेल्या एका एन.आर.आय व्यक्तिरेखेतून मृणालला महाराष्ट्राच्या घराघरांत ओळख मिळाली. या मालिकेसाठी तिला 'झी टीव्हीचा-सर्वोत्कृष्ट नवोदित नायिका २०१०' चा पुरस्कार मिळाला.

नाशिकच्या सुखवस्तू कुटुंबात आणि पालकांच्या सुरक्षाकड्यात वाढलेली मृणाल मुंबईच्या धकाधकीत धक्के खात स्वतःला तिथे स्थिर करण्यासाठी संघर्ष करीत होती. ती सांगते, "मुंबईत पहिल्यांदा गेल्यावर इतर मुलींसोबत भाडेतत्त्वावर खोली घेऊन राहण्याचा आयुष्यातला पहिला-वहिला अनुभव घेतला. एका वन बी.एच.के फ्लॅट मध्ये तब्बल बारा जणी एकत्र राहत होतो. १२-१२ तास शूटिंग, लोकलचा प्रवास आणि मेसचा डब्बा, करिअरला आकार देताना सुरवातीच्या काळातील हा संघर्ष माणसाला कणखर बनवतो आणि मुख्य म्हणजे एकमेकांप्रति सहयोगाची भावनाही वृद्धिंगत होते. मुंबई सर्वांना सामावून घेणारी आई आहे." या नंतर मृणालने मागे वळून पाहिले नाही. एकापेक्षा एक सरस मालिकांमधून ती कधी मुख्य तर कधी सहयोगी भूमिकेत दिसली यात 'मधू इथे आणि चन्द्र तिथे', 'असं सासर सुरेख बाई' , 'तू तिथे मी', 'हफ्ता बंद', 'सुखाच्या सरींनी हे मन बावरे' सारख्या मालिका तर 'एका पेक्षा एक' या नृत्याच्या रिॲलिटी शोमधून ती स्पर्धक म्हणून पुढे आली 'आम्ही सारे खवय्ये' आणि 'रिमोट माझा' सारख्या कार्यक्रमांसाठी तिने सूत्रसंचालन केले. बहुचर्चित आणि प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला चित्रपट "श्रीमंत दामोदर पंत" यात तिने सुमनची भूमिका साकारलेली आहे. अल्पावधीतच मृणाल मराठी टीव्ही जगतातील अग्रगण्य चेहरा बनली आहे.

**लग्नानंतर सिनेक्षेत्रापासून अलिप्तता :**

करिअरच्या शिखरावर असताना अमेरिका स्थित नीरज मोरे या सॉफ्टवेअर इंजिनिअरसोबत २०१६ मध्ये विवाहबद्ध झाल्यानंतर मृणाल अमेरिकेत स्थिरावली. ती म्हणते, "कोणतंही काम करताना आपण आपलं १००% योगदान द्यावं, अगदी गृहिणी बनतानाही त्यात स्वतःला झोकून द्यावं" अमेरिकेत मृणाल तिच्या कलाक्षेत्रापासून पूर्णतः विभक्त झाली. घर, कुटुंब आणि एका चिमुकलीचं संगोपन यात तिने स्वतःला व्यस्त करून घेतलं होतं.

**भारतात जोरदार पुनरागमन :**

जवळपास चार-पाच वर्षे कलाक्षेत्र आणि भारतापासून दूर असलेली मृणाल २०२४ च्या मार्च महिन्यात मायदेशी सहकुटुंब परतली आहे. या दाम्पत्याने ठाण्यात 'बेली लाफ' नावाचे एक छानसे हॉटेल नुकतेच सुरू केले आहे. नावीन्यपूर्ण कलाकृती, मनाला थंडावा देणारे विरंगुळ्याचे ठिकाण म्हणून हे हॉटेल तिच्या मालिकेतील अभिनयासारखेच रसिकांना भावले आहे.

**पुरस्कार :**

मृणालच्या बहुतेक सर्वच मालिकांसाठी तिला पुरस्कार मिळालेले आहेत. सन २०१०, २०१२ आणि २०१३ मध्ये 'झी मराठी उत्सव नात्यांचा' तर २०१९ मध्ये कलर्स मराठीचा 'उत्कृष्ट कलाकार पुरस्कार' तिच्या नावावर आहे.

# चंदेरी दुनियेची लखलखती तारका संयामी खेर

दादासाहेब फाळकेंसारख्या ध्येयवेड्या मराठी माणसामुळे भारतात चित्रपट सृष्टी जन्मास आली, वाढली आणि बॉलीवूड नावाने आज कलाविष्कार, मनोरंजन, रोजगार निर्मिती अशा अनेक आघाड्यांवर भारतीय भारतीय अर्थकारणातील अविभाज्य  भाग बनली आहे. या बॉलीवूड मध्ये गेल्या अनेक दशकांत विविध महिला तारकांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आणि रसिक प्रेक्षकांच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले आहे. सुंदरता, बहुविध अभिनय क्षमता, बुद्धिमत्ता आणि क्रीडाक्षेत्राशी असलेली आत्मीयता अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची अर्थात नाशिकची कलाकार संयामी खेर हिच्या प्रगतीचा घेतलेला मागोवा. हा लेख लिहित असतानाच नुकत्याच बर्लिन येथे झालेल्या जगातील सर्वात अवघड अशी आयर्नमॅन-ट्रायअथोलोन स्पर्धा ८ तासांत पूर्ण करीत संयामी ही स्पर्धा जिंकणारी भारतातील प्रथम कलाकार ठरली आहे.

### चंदेरी दुनिया सोडून मुलींसाठी आई झाली गृहिणी :

सत्तर-ऐंशीच्या दशकात बॉलीवूड, मॉडेलींग सारख्या चमकोगिरीच्या जगात अपवादानेच मराठी माणसे दिसत. त्यातही एखाद्या मुलीने या क्षेत्रात येणे हे तिच्या पालकांपासून आजूबाजूच्या समाजासाठी कपाळावर आठ्या आणणारे असे.जेव्हा उत्तरा यांनी मॉडेलींग क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांच्या आईंनी उत्तराकडून चित्रपटात काम करणार नाही असे वचन घेतले. १९८२ मध्ये आपल्या सौंदर्य आणि बुद्धिचातुर्याने उत्तरा यांनी 'मिस इंडिया वर्ल्ड' स्पर्धेचा मुकुट पटकावला परंतु आईला दिलेल्या वचनाप्रमाणे चित्रपट क्षेत्रात न येता आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करणे पसंत केले.

श्री. अद्वैत खेर (संयामीचे वडील) आणि सौ. उत्तरा खेर (आई) यांची मुंबईच्या हॉटेल ताज मध्ये एकत्रित काम करीत असताना ओळख झाली आणि पुढे विचार, आवडीनिवडी जुळल्याने मैत्रीचे रूपांतर विवाहबंधनात झाले. विवाहानंतर दोघांनी संसारावर लक्ष केंद्रित करीत मॉडेलिंगच्या आवडीस फाटा दिला व संयामी आणि संस्कृती या आपल्या मुलींच्या चांगल्या संगोपनासाठी नाशिक सारख्या सर्वोत्तम शहरात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. नाशिकमध्ये हॉटेल व्यवसायात खेर दाम्पत्यांनी आपली ओळख निर्माण करीत पर्यावरणपूरक आदर्श वास्तुकलेची सांगड या व्यवसायाशी जोडली आहे.

### क्रिकेट- बॅडमिंटन ते चित्रपट :

१९९२ मध्ये नाशकात संयामीचा जन्म झाला, लहानपणापासूनच खेळाविषयी तिची विशेष ओढ राहिली आहे. आधी शाळा, महाविद्यालय आणि मग महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात तिने उत्तम कामगिरी केली आहे या सोबतच बॅडमिंटन खेळातही राष्ट्रीय कनिष्ठ स्तरावर संयामीने सायना नेहवाल सोबत स्पर्धा खेळल्या आहेत. मुंबईच्या सेंट झेविअर्स महाविद्यालयात शिक्षण घेतल्या नंतर तिची पाऊले चित्रपट क्षेत्राकडे वळली.

### आजी उषाकिरणच्या अभिनयाचा लाभला वारसा :

संयामीच्या आजी उषाकिरण ह्या सत्तरीच्या दशकातील ख्यातनाम नायिका होत्या, देव आनंद, किशोर कुमार, राज कपूर, अमिताभ बच्चन अशा दिग्गज कलाकारांसोबत काम करणाऱ्या अभिनय संपन्न नायिका. ज्यांच्या दर्जेदार अभिनयचा वारसा संयामी-संस्कृती मध्ये उतरला नसता तर नवल. मावशी तन्वी आझमीच्या प्रेरणेने संयामीने आधी मॉडेलिंग मग चित्रपट क्षेत्रात पदार्पण केले.

### आजोबा ग. ज. म्हात्रे आहेत नाशिक नगरीचे शिल्पकार :

संयामीचे आजोबा प्रख्यात वास्तुविशारद आणि अभियंता ग. ज. म्हात्रे यांचा आधुनिक नाशिकच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. नाशकातील प्रसिद्ध असे परशुराम सायखेडकर नाट्यगृह, सार्वजनिक वाचनालय, नाशिक रोडच्या सेंट झेव्हिअर चर्चमधील बाळयेशूचे समाधीस्थळ, कालिका देवी मंदिर, क्रॉम्प्टन, गरवारे आणि मायको सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची नाशिकमधील उद्योगकेंद्रे आदींचे बांधकाम म्हात्रेंच्या हस्ते झालेले आहे.

कुसुमाग्रजांच्या घनिष्ठ मित्रांपैकी एक असलेले म्हात्रे हे 'कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे' पहिले अध्यक्ष होते. रोटरी क्लब आणि सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून त्यांनी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम घेत त्यावेळी सांस्कृतिक नाशिकच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलला होता.

### पदार्पणातच ठरली पुरस्कारांची मानकरी, तेलुगू, हिंदी मराठी चित्रपटांत अभिनयाची छाप :

'मिर्झिया' या राकेश मेहरा दिग्दर्शित चित्रपटातून हिंदी सिनेमांत मुख्य नायिकेच्या भूमिकेत पदार्पण करणाऱ्या संयामीने आपल्या पहिल्याच चित्रपटासाठी स्टारडस्टचा 'भविष्यातील चमकता तारा' 'किताब जिंकला. या सोबतच तेलुगू चित्रपटांत नागार्जुन सोबत 'वाईल्ड डॉग' मध्ये 'एन. आय. ए.' अधिकाऱ्याची भूमिका, मराठीत 'माउली' चित्रपटात रितेश देशमुखची नायिका अशा सशक्त भूमिका तिने आजवर साकारल्या आहेत. दर्जेदार आणि नेहमीच्या धोपट मार्गापेक्षा वेगळ्या धाटणीच्या पटकथा निवडण्यासाठी संयामी आग्रही असते. 'फाडू' सारख्या सिनेमात मुंबईच्या झोपडपट्टीतून उठून करोडपती होणाऱ्या एक महत्त्वाकांक्षी नायकाला खंबीर साथ देणारी नायिका असो किंवा 'स्पेशल ऑप्स' मधील

**(... पुढील पानावर)**



# चेतना सिन्हा आणि माणदेशी फाऊंडेशन

## एक प्रेरणादायी प्रवास

चेतना सिन्हा या माणदेशी बँक आणि माणदेशी फाउंडेशनच्या संस्थापक व अध्यक्षा आहेत. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण आणि सर्वांगीण समुदाय विकासाला चालना देणे हा त्यांच्या कार्याचा ध्यास राहिला आहे. भारतातील पहिली ग्रामीण महिलांची आणि ग्रामीण महिलांसाठी असलेली माणदेशी महिला सहकारी बँक त्यांनी १९९७ मध्ये सुरू केली. अल्पावधीतच ही संस्था देशातील अग्रणी वित्तीय संस्था बनली. या बँकेने तेव्हापासून ग्रामीण महिलांना ७८० दशलक्ष रुपयांहून अधिक कर्ज वाटप केले आहे.

महिला सूक्ष्म-उद्योजकांच्या विकसित गरजा लक्षात घेऊन नवीन आर्थिक पर्याय समोर आणले आहेत. माणदेशी बँकेने महिलांसाठी पहिली पेन्शन योजना सुरू केली आहे. यातून चेतन सिन्हा यांची ग्रामीण भागातील उद्यमशील महिलांविषयीची अतूट बांधिलकी दिसून येते.

ग्रामीण भागातील जिद्दी महिलांना केवळ भांडवल पुरवणे पुरेसे नाही तर त्यांच्यातील उद्योजकीय गुणांचीही वाढ झाली पाहिजे हा दृष्टिकोन त्यांनी समोर ठेवला आहे. त्यातूनच २००६ मध्ये त्यांनी ग्रामीण महिलांसाठी बिझनेस स्कूलची स्थापना केली. हे बिझनेस स्कूलही देशातील अशाप्रकारचे एकमेव म्हणून ओळखले जात



आहे. बिझनेस स्कूलच्या माध्यमातून त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला आहे. २०१३ मध्ये एक टोल-फ्री हेल्पलाइन सुरू केली आणि देशातील महिला उद्योजकांसाठी प्रथम चेंबर्स ऑफ कॉमर्सची स्थापना केली.

सामुदायिक विकासाचे महत्त्व ओळखून माणदेशी फाउंडेशन, चेतना यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे कार्यक्रम चालवते. यामध्ये सामुदायिक रेडिओ स्टेशन, सर्व उपक्रमांसाठी आरोग्यसेवा, विकास कार्यक्रमासाठी खेळ आणि हवामान -स्मार्ट कृषी कार्यक्रम यांचा समावेश आहे. त्या सेवा देत असलेल्या समुदायांमध्ये सर्वसमावेशक विकासासाठी हे सर्व उपक्रम होत आहेत. त्यांनी महिलांच्या नेतृत्वाखाली शेतकरी उत्पादक कंपन्या आणि संघटनाही स्थापन केलेल्या आहेत.चेतना सिन्हा यांच्या या कार्याची उचित दखल घेत त्यांना जागतिक तसेच देशपातळीवरील- येल फेलो, अशोका फेलो आणि श्वाब फेलो आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

२०१८ मध्ये त्यांनी दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम आणि अर्जेंटिना मधील W20 समिटमध्ये आर्थिक समावेशन विभागाचे सह-अध्यक्ष म्हणून भूमिका पार पाडली. त्याच वर्षी त्यांना राष्ट्रपतींकडून भारतातील महिलांसाठीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार, प्रतिष्ठित नारी शक्ती पुरस्कार मिळाला. चेतना या २०२२ पासून महिला व्यवसाय आघाडी (BRICS) आणि लिंग समानता सल्लागार परिषदेच्या सक्रिय सदस्य आहेत. ही संस्था जर्मनीच्या G7 अध्यक्षपदाच्या काळात नियुक्त करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी G20 EMPOWER च्या आर्थिक समावेशन आणि व्यवसायावरील कार्यगटाचे अध्यक्षपद भूषवले आहे.

**पाऊल पडते पुढे :**

११ मार्च २०२४ मध्ये त्यांना न्यूयॉर्क शहरातील युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली (UNGA) येथे ६८ व्या कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वुमन (CSW) च्या उद्घाटन सत्रात बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी 'असामान्य धैर्य दाखवणाऱ्या सामान्य महिलांच्या शक्तिशाली कथा' या विषयावर केलेल्या हृदयस्पर्शी भाषणाने सर्वांची मने जिंकली. महिलांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी यापेक्षा चांगली वेळ कधीच आली नसल्याचा संदेश त्यांनी या भाषणातून दिला. माणदेशी फाऊंडेशनचे मुख्यालय म्हसवड (सातारा, महाराष्ट्र) येथे असून भारतातील महाराष्ट्र, कर्नाटक व सिल्वासा या राज्यांतील ९ लाख ५० हजार महिला या कार्याशी थेट जोडल्या गेलेल्या आहेत. महिलांची ही संख्या लवकरच १० लाखाचा आकडा ओलांडणार आहे.

उपेक्षित समाज घटकांचे जीवन बदलावे व त्यांचा शाश्वत विकास व्हावा या उद्देशाने सुरू केलेल्या माणदेशी फाऊंडेशनच्या रोपट्याचा आता महावृक्ष झाला आहे. यामागे चेतना सिन्हा यांचे आपल्या कार्याप्रति असलेले समर्पण व ध्यास आहे.

---

**(... मागील पानावरुन)**

अधिकारी. अनुराग कश्यप सारख्या हटके सिनेमा बनवणाऱ्या दिग्दर्शकासोबतही तिने काम केले आहे.

‘घुमर’ हा क्रिकेटवर आधारित चित्रपट मागील वर्षी चांगलाच गाजला. अनिना दीक्षित एक चांगली फलन्दाज एका अपघातात आपला हात गमावते आणि मग सुरू होतो तिचा एका हाताने गोलंदाज बनण्याचा प्रवास, यात अभिषेक बच्चन, शबाना आझमी यांसह संयामीने काम केले आहे. यातल्या तिच्या उत्कृष्ट अभिनयासाठी तिला फिल्मफेयर पुरस्काराने गौरवीत करण्यात आले आहे.

**खडतर ‘आयर्नमॅन’ स्पर्धा पूर्ण करणारी पहिली भारतीय कलाकार :**

‘आयर्नमॅन’ स्पर्धा संपूर्ण जगातील खडतर अशा मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक आहे. यात भल्याभल्यांचा शारीरिक क्षमतेचा कस लागतो. लहानपणापासूनच खेळाची भक्त असलेल्या संयामीने सप्टेंबर २०२४ मध्ये बर्लिन येथे झालेल्या १.९ कि.मी. पोहणे, ९० कि.मी. सायकल चालवणे आणि २१.१ कि.मी धावणे अशी ट्रायअथलॉन स्पर्धा ८ तासांत पूर्ण केली आणि ती भारतीय कलाकारांमधील पहिलीच ‘आयर्नमॅन’ बनली आणि एक नवा विक्रम तिच्या नावे नोंदविला गेला. यासाठी ती गेल्या ६ महिन्यांपासून आपले शुटिंगचे व्यस्त वेळापत्रक सांभाळत सराव करीत होती.

**पर्यावरण प्रेमी आणि निर्व्यसनी :**

संपूर्ण खेर कुटुंब हे संवेदनशील आणि पर्यावरण प्रेमी आहे. वडील अद्वैत खेर यांनी आपल्या नाशकातील हॉटेल्सच्या भिंती ह्या टाकाऊ पाण्याच्या बाटल्यांपासून बनविलेल्या आहेत तर संयामी अनेक वर्षांपासून मुंबईतल्या सामाजिक संस्थांसोबत समुद्र किनारे स्वच्छ ठेवण्याच्या मोहिमेत सक्रिय सहभागी असते. ग्लॅमरच्या दुनियेत प्रवाही राहून सुद्धा संयामी आणि संस्कृती सगळ्या व्यसनांपासून दूर आहेत ही अभिमानाची बाब ठळकपणे त्या नमूद करतात.

खेळ, निर्व्यसनी- स्पष्टवक्ता स्वभाव, सशक्त अभिनय आणि दर्जेदार पटकथा निवडण्याच्या व्यक्ती स्वातंत्र्याची जाणीव यामुळे संयामी इतर अभिनेत्रींपेक्षा वेगळी भासते आणि या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी आदर्श ठरू शकते.

# ज्योती देशमुख
# दारूबंदीची ढाल

कोरडवाहू शेतीत राबत जगण्याची लढाई लढणे भारतातील शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पूजले आहे. त्यातही कुटुंब मोठे असेल तर परिस्थिती आणखी बिकट होते. ही परिस्थिती बघत, झेलत भारतातल्या अनेक पिढ्या मोठ्या झाल्यात, काहींनी तग धरून आयुष्य काढले, काही व्यसनी होऊन रसातळाला गेली,काही मात्र परिस्थितीवर मात करीत सुधारली. क्वचितच मात्र फक्त स्वत:पुरतीच यशस्वी नाही झाली तर अख्ख्या गावाला या व्यसनाधीनतेच्या शापातून मुक्त करू शकली. ही कहाणी आहे अशाच एका रणरागिणीची, लखमापूरच्या 'ज्योती विजय देशमुख' यांची. अस्मानी संकटांना तोंड देत अर्ध्यावरती कुटुंबाचा डाव जेव्हा वडिलांनी सोडला तेव्हा ज्योतीताई अवघ्या ८-९ वर्षांच्या होत्या. आधीच असलेल्या संकटात आणखी भर पडली आणि ज्योतीताईंची आई कुटुंबाचा गाडा ओढू लागल्या. ज्योतीताई अभ्यासात हुशार होत्या ही परिस्थिती बदलायचीच ह्या महत्त्वाकांक्षेने त्या झटत होत्या परंतु भविष्यात काही वेगळेच वाढून ठेवले होते. पुढच्या चारच वर्षांत त्यांची आईही वारली आणि एका क्षणात कुटुंब उघड्यावर पडले. भविष्यातला अंधार अजून गडद झाला. त्या आठवी इयत्तेत असताना एक जबाबदारी पूर्ण करायची म्हणून चुलत्याने त्यांचे लग्न उरकून टाकले आणि पेन-पेन्सिल च्या जागी कोवळ्या वयात हातात नव्या संसाराची जबाबदारी येऊन पडली.लखमापूर येथे पती विजय देशमुख यांचा टेलरिंगचा व्यवसाय होता, लग्न आणि मुलींची जबाबदारी सांभाळण्याचा प्रयत्न करीत असतानाच, नवऱ्याची व्यसनाधीनता दारात दत्त म्हणून उभी राहत असे. माहेरी चुलते, भावांची व्यसनाधीनता पाहिलेल्या ज्योतीताईना या दारूमुळे होणाऱ्या कुटुंबाच्या वाताहतीचा वीट आला होता. पण संकटांना घाबरून पळून जाणे त्यांना रुचले नाही आणि 'ही दारूच नाही राहिली तर सगळे प्रश्नच सुटतील' हा आशेचा किरण डोकावून गेला. ठाम निश्चय करून दारूविरुध्द एल्गार पुकारण्याच्या मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**स्वच्छतेची सुरुवात घरापासूनच :** बाहेर दारूबंदीची कितीही भाषणे झोडली तरी संध्याकाळी आपलाच नवरा पिऊन आला तर आपल्या मोहिमेला शून्य अर्थ उरेल या भावनेतून ताईंनी पतीचे उद्बोधन करण्याचा अतोनात प्रयत्न केला. एकीकडे गावातील समदुःखी महिलांना एकत्रित करीत त्यांना दारूबंदीविषयीच्या मोहिमेत सहभागी करून जनजागृती करण्यास सुरुवात केली. कुटुंब नासवणाऱ्या या दारूविरुद्ध लढा देण्यासाठी संघटित होण्यासाठी त्या रोज या महिलांना गळ घालीत. आपण हाती घेतलेल्या या कामाचे पुढे काय होईल? ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांचीच दारूची दुकाने, गावचं राजकारण, गुंडगिरी आणि स्वत:च्याच घरातील व्यसनाधीनता अशा अनेक गोष्टींना ताई समर्थ प्रतिकार करीत बदलण्याचा प्रयत्न करीत होत्या. कालांतराने गावातील महिलांचं बळ मिळालं, गावातील दारूविक्री केंद्रावर पहिला मोर्चा काढला तेव्हा समाजकंटकांकडून चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न झाला पण लढ्याची ज्योत अखंड तेवत होती. गावातील ६ दारूचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात त्यांना यश आले.यावर आनंदाची बाब आणि पंखांना बळ तेव्हा मिळालं जेव्हा पती विजय यांनी दारू सोडून दिली आणि ज्योतीताईंच्या मोहिमेला पाठिंबा दिला.

**प्रत्येक पावलावर करावा लागला संघर्ष :** गावातील हातभट्ट्या आणि सहा दारूचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात यश मिळाले परंतु लखमापूर फाट्यावरच एक सरकारमान्य दारू विक्री केंद्र होते त्यास बंद करणे अत्यावश्यक पण अवघड होते. यासाठी तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी, गृहमंत्री अगदी मुख्यमंत्री यांनाही निवेदने गेली परंतु परिणाम शून्य होता. मग, ग्रामसभेत विचारविनिमय आणि ठराव करून सर्व महिलांनी या दुकानावर १५ ऑगस्ट २००६ रोजी मोर्चा काढण्याची तयारी केली, त्यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविली. महिलांच्या या निर्णयामुळे अट्टल तळीराम आणि आर्थिक संबंध असलेल्यांत चलबिचल झाली. साम-दाम-दंड-भेद नीती वापरून समाजकंटकांनी हा मोर्चा हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. आपल्या निर्णयावर ठाम असलेल्या शेकडो महिला स्वातंत्र्यदिनी लखमापूर फाट्यावर धडकल्या आणि दुकानासमोर आंदोलन सुरू केले, यावेळी त्यांनी तहसीलदारांना ठणकावून सांगितले की, "दुकान बंद करण्यासाठी मतदानाची प्रक्रिया ताबडतोब घेऊन आताच्या आता दुकान बंद झाले पाहिजे नाहीतर आम्ही आत्मदहन करू." मग जिल्हाधिकाऱ्यांनी तीन दिवसानंतर मतदानाचा दिवस ठरवला. या तीन दिवसात गावातील राजकारणी, उत्पादन शुल्क अधिकारी, पोलीस यातील काही उलट्या काळजाच्या लोकांनी येऊन या महिलांनाच धमकी देण्याचा प्रयत्न केला , पैशांचे आमिष दाखवले परंतु महिलांच्या ठाम निर्णयापुढे त्यांचे काही चालले नाही. गावात ९८८ पैकी ४९४ महिलांनी आडव्या बाटलीस मतदान करून दुकान बंद करण्यास पाठिंबा दिला, पुढे दारुविक्रेता उच्च न्यायालयात गेला. तब्बल दोन वर्षे महिलांनी न्यायालय, मंत्रालय येथे झुंज दिली आणि शेवटी १८ जुलै २००७ ला या दुकानाचा परवाना रद्द करण्यात आल्याचे पत्र आले.



हा फक्त दारुविरुद्ध विजय नव्हता तर दारूतून होणाऱ्या अनेक कौटुंबिक वाताहतीना थांबवण्याचा, प्रस्थापित आर्थिक-राजकीय-सामाजिक गुंडगिरी विरुद्ध सामान्य माणसांच्या लढ्याच्या विजय होता. यानंतर त्यांनी पंचक्रोशीतील अनेक दारू दुकाने बंद करण्यास त्या-त्या गावातील महिलांना तयार केले, मार्गदर्शन केले आणि शेकडो कुटुंबे दारूच्या विळख्यातून वाचवली.

(... पान क्रमांक १८ वर)

# अशी बनले सायबर सुरक्षा अम्बॅसेडर

कृत्रीम बुद्धिमत्ता आणि हातातल्या मोबाईलमध्ये जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात क्षणात संपर्क साधणाऱ्या आणि व्यवहार करणाऱ्या तंत्रज्ञानाच्या या युगात, सायबर जागरूकता आणि सायबर सुरक्षा हा अतिशय महत्त्वाचा आणि आवश्यक विषय झाला आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्याने लोकांमध्ये या विषयाची जाणीवजागृती निर्माण करणे, त्यांना सायबर सुरक्षा आणि त्याच्या धोरणांबद्दल शिकवणे, हे अत्यावश्यक आहे. माझे सायबर जागरूकतेचे योगदान हा एक जीवनप्रवासच आहे, ज्यामध्ये माझ्या शिक्षणाचा आणि अनुभवांचा मोठा वाटा आहे.

### सायबर सुरक्षितता हेच क्षेत्र का ?

ज्या समाजात आपण वावरतो त्याचे आपल्यावर आपसूकच संस्कार होत असतात आणि त्याची कृतज्ञता म्हणून आपणही त्या समाजाचे काही देणे लागतो या प्रेरणेतून मी सामाजिक क्षेत्रात २०११ पासून काम करत आहे. महाविद्यालयीन जीवनात वसतिगृहात राहण्याचा अनुभव पाठीशी होता त्यामुळेच मुलींचे शिक्षण आणि सक्षमीकरण यावर काम करायला सुरुवात केली. हे काम करत असताना नाशिक शहर पोलिसांसोबत मनपाच्या शाळेतील मुलींसाठी मी कराटे प्रशिक्षण उपक्रम घेतले. त्यावेळेस तत्कालीन पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल सर यांच्यासोबत विद्यार्थिनींच्या शारीरिक सक्षमीकरणा सोबतच त्यांनी तांत्रिक दृष्ट्या सुरक्षित राहणे गरजेचे आहे अशा विषयांवर चर्चा होत. त्यापुढे मी ' पोलीस सामाजिक उपक्रम समन्वयक ' म्हणून काम सुरू केले.सायबर अवेअरनेस एक काळाची गरज आहे असे काम करत असताना जाणवले. अनेक सायबर गुन्हे समोर येऊ लागले आणि आम्ही पोलीस जनता सहभागाने नाशिक मधील ५० हून अधिक शाळा आणि कॉलेज मधील मुलामुलींसाठी सायबर सुरक्षा जाणीव हा उपक्रम हाती घेतला. मी सायबर गुन्ह्यांबद्दल आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या परिणामांबद्दल अधिक अभ्यास केला आणि माहिती एकत्रित करीत राहिले. अनेक तरुण-तरुणी सायबर फ्रॉड सारख्या गुन्ह्यामध्ये अडकतात किंवा त्यास बळी पडतात. सायबर गुन्हेगारांनी सामान्य व्यक्तींपासून ते मोठ्या संस्थांपर्यंत सर्वांवर प्रभाव टाकला आहे. सायबर फसवणुकीपासून ते ओळख चोरीपर्यंत, विविध प्रकारच्या गुन्ह्यांनी सामान्य नागरिकांना वेठीस धरले आहे. यात गुन्हेगार अगदी तुमच्या शेजारीही असू शकतो किंवा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात अशा फसवणुकीतून गुन्हा सिद्ध होऊन गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. त्यामुळे खबरदारी पूर्वक उपाय करणे आणि त्यासाठी जाणीवजागृती करणे हे आपल्याला शक्य आहे, या सर्व गोष्टींतून माझा सायबर सुरक्षा मोहिमेकडे अधिक कल वाढला व मी त्यात नाशिक पोलिसांच्या मदतीने समुपदेशनाचे काम करायला सुरुवात केली. आजवर शेकडो शाळा- महाविद्यालये, सरकारी-खाजगी कार्यालये येथे सायबर सुरक्षा व जाणीवजागृती मोहिमेद्वारे समुपदेशन आणि कार्यशाळा घेतल्या गेल्या. या कामाची दखल घेत नाशिक पोलीस आयुक्तालयातर्फे माझा विशेष सत्कार करून मला 'सायबर ब्रँड अम्बॅसेडर' म्हणून गौरविण्यात आले आहे.



### सायबर ब्रँड अम्बॅसेडर म्हणून काम करताना :

झपाट्याने प्रगत होणारे तंत्रज्ञान हे मोबाईलच्या माध्यमातून घराघरांत पोहचले आहे. ज्याचा एक तोटा म्हणजे कोणाचेही वैयक्तिक आयुष्य सुरक्षित राहिलेले नाही. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून कोणाच्याही खासगी आयुष्यात डोकावून त्याची लुबाडणूक करण्याचा विकृतपणा सायबर गुन्हेगार करतात. सायबर जनजागृती मोहिमेद्वारे काम करताना 'सायबर ब्रँड अम्बॅसेडर' या किताबाने माझी जबाबदारी आणखी वाढवली. मी विविध सायबर सुरक्षा प्रकल्पांमध्ये सहभाग घेतला आणि लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने अनेक कार्यशाळा आणि कार्यक्रमांचे आयोजन केले. हे करत असताना, लोकांसमोर अभ्यासपूर्ण माहिती सोप्या भाषेत विश्लेषित करणे, तांत्रिक शब्द आणि सायबर क्षेत्रातील क्लिष्टता त्यांना समजेल अशा प्रकारे मांडणे अशा पद्धतीने मी कामाचा आडाखा बांधला, यादरम्यान मला अनेक प्रकारच्या गुन्हेगारी प्रकारांबद्दल अधिक माहिती मिळत गेली, ज्यामुळे सायबर सुरक्षा आणि संरक्षणाचे महत्त्व आणखीच अधोरेखित झाले.

सायबर जागरूकतेच्या दिशेने माझे महत्त्वाचे काम म्हणजे पोलीस विभागाच्या सायबर सेल बरोबर केलेले सहकार्य. सायबर अम्बॅसेडर म्हणून काम करत असताना लोकांना सायबर फसवणूक, डेटा चोरी, फिशिंग यासारख्या गुन्ह्यांपासून कसे सुरक्षित राहायचे हे शिकवणे होय. या शाखेच्या सोबत काम करताना, आम्ही अनेकदा जनजागृतीपर कार्यक्रम, सायबर सुरक्षा कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे आणि व्याख्याने घेऊन शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक संघटना आणि सामान्य नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत माहिती देतोय. या कार्यक्रमांमधून नागरिकांना त्यांच्या ऑनलाइन व्यवहारांमध्ये, समाज माध्यमे वापरताना जास्तीत जास्त सुरक्षा कशी बाळगायची, सायबर गुन्ह्यांना बळी न पडण्यासाठी बाळगावयाची सावधानता याबद्दल मार्गदर्शन केले जाते.

पोलीस विभागासोबत काम करताना मला हे जाणवले की, नागरिकांमध्ये सायबर जागरूकता निर्माण करणे हे एक प्रभावी साधन आहे, ज्यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमी होऊ शकते. अनेकदा लोक अनावधानाने किंवा अनभिज्ञतेमुळे सायबर गुन्ह्यांचे बळी ठरतात, आणि हे टाळण्यासाठी योग्य मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे असते.या क्षेत्रात केलेल्या कामामुळे अनेकांना सायबर सुरक्षिततेचे महत्त्व पटले आहे. सायबर फसवणुकीपासून ते खाजगी माहिती सुरक्षित ठेवण्यापर्यंत, सायबर सुरक्षेबद्दलची जनजागृती वाढली आहे. पोलीस विभागासोबतचे माझे सहकार्य नागरिकांमध्ये विश्वासार्हता आणि सुरक्षा यांची जाणीव निर्माण करत आहे.

(... पुढील पानावर)

(... मागील पानावरुन)

**माझा जीवन परिचय :**

मी नाशिक जिल्ह्यातील भरवीर सारख्या एका छोट्याशा गावातून एकत्रित शेतकरी कुटुंबातील जन्म घेतलेली मुलगी. माझे बालपण इगतपुरी आणि सिन्नर तालुक्यात गेलं. शेतकरी एकत्रित कुटुंब आणि कुटुंबनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून असल्यामुळे लहानपणापासूनच काटकसरीची शिदोरी मिळाली. घरात शिक्षणाचा अभाव होता परंतु माझ्या शिक्षणासाठी मामांनी सहकार्य केलं. प्राथमिक शिक्षण इगतपुरी येथून घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आईवडिलांपासून दूर राहून शिक्षण घेणं भाग होत. सिन्नरला मामांच्या मदतीने आणि मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतले. पुढे अकरावी ते एम एम पर्यंतचे शिक्षण मराठा विद्या प्रसारक समाजाच्या के. टी. एच. एम. महाविद्यालय,नाशिक येथून पूर्ण केले. कष्टपूर्वक मिळालेल्या गोष्टींचा आपल्याला फार हेवा असतो तेच माझ्या बाबतीत शिक्षणाविषयी झाले. मला अभ्यासाची फार गोडी लागली. त्या बळावर मी बारावीच्या बोर्ड परीक्षेत उत्तर महाराष्ट्रातून दुसरा क्रमांक मिळवू शकले. एम. ए. झाल्यानंतर गव्हर्नमेंट गर्ल्स कॉलेजमधून डी.एड. विशेष प्राविण्यासह पूर्ण केले. या दरम्यान वसतिगृहात राहून शिक्षण घ्यावे लागले ज्याचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर खूप सकारात्मक परिणाम झाला. माझ्यातून जबाबदार नागरिक साकारण्यास, निर्णय क्षमता विकसित होण्यास आणि 'नाही रे' वर्गासाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही लहानापासून जी भावना होती त्यास दिशा मिळण्यास वसतिगृहातील दोन वर्षाचा काळ एकप्रकारे 'टर्निंग पॉईंट' ठरला.

शिक्षण पूर्ण करत असतानाच मी काही एन.जी.ओ. सोबत अर्धवेळ काम करीत होते. त्यातीलच एका एन.जी.ओ. मध्ये मुलींचे शिक्षण आणि सक्षमीकरण यासाठी शाळेतील मुलींसाठी काही उपक्रमांद्वारे काम सुरू केले. याद्वारे वस्ती पाड्यावरील लोकांच्या विशेषतः मुलींच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक समस्या जवळून जाणून घेता आल्या. ज्याद्वारे मला आणखी जोरकसपणे काम करण्याची प्रेरणा मिळत गेली. यादरम्यान, मी मनपा नाशिक आणि जिल्हा परिषद, त्र्यंबकेश्वर या शाळांतील मुलींसाठी अनेक उपक्रम करू लागले. त्यातील एक इथे नमूद करावासा वाटतो तो म्हणजे कराटे प्रशिक्षण वर्ग. यात मला नाशिक शहर पोलिसांची मोलाची साथ मिळाली. पोलिसांविषयी प्रत्येकाच्या मनात एक अनामिक भीती असते. अनेकजण त्यांच्याशी साधे बोलणेही टाळतात परंतु पोलिसांमधील कर्तव्यदक्षता आणि वर्दीपलीकडचा माणूस मी त्यांच्यासोबत काम करताना अनुभवू शकले. कोणत्याही मोठ्या अधिकारी किंवा प्रतिष्ठित व्यक्तीची ओळख, पाठबळ नसताना फक्त माझ्या उपक्रमांत खरेपणा आणि काम करण्याची तळमळ ओळखून खुद्द तत्कालीन पोलीस आयुक्त नाशिक श्री. रवींद्र सिंघल सर यांनी मला मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यानंतर माझ्या कामाला अधिक वेग मिळाला. पोलीस कल्याण योजनेअंतर्गत मी अनेक उपक्रम घेतले. ज्यामध्ये सायबर अवेअरनेस, ट्रॅफिक अवेअरनेस, महिला सक्षमीकरण, मॅरेथॉन, पर्यावरणपूरक उपक्रम यांचा समावेश आहे.

**'नन्ही कली' च्या माध्यमातून बनली चिमुकल्यांची दीदी :**

२०११ पासून 'नन्ही कली' उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थिनींना शारीरिक दृष्ट्या सक्षम करण्यासोबतच बहुविध अंगाने सज्ञान करण्याचे प्रयत्न अव्याहतपणे सुरू आहेत. आतापर्यंत नाशिक परिसरातील सत्तरहून अधिक शाळांमधून दहा हजारांहून अधिक विद्यार्थिनींना या उपक्रमाचा फायदा मिळवून दिला आहे.

**अभी तो नापी है सिर्फ मुठ्ठीभर जमीन :**

सायबर सुरक्षा मोहीम ही सर्वांनी मिळून सर्वांसाठी करायची आहे. या मोहिमेतल्या माझ्या खारीच्या वाट्याने मला जेव्हा कुणाचे जीवन सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित करता आले, ती माझ्यासाठी अत्यंत समाधानाची बाब असते. हेच समाधान मला सतत पुढे जाण्यासाठी प्रेरित करते, आणि सायबर जागरूकतेच्या दिशेने अजूनही काम करण्याची उमेद देते. हे काम करत असताना अनेक लोकांना मदत करता आली. अनेक विद्यार्थी त्यांच्या अजाणत्या वयात समाजमाध्यमाकडे सहज ओढले जातात आणि अत्यंत खासगी गोष्टीही या माध्यमांवर पोस्ट करत असतात. यामध्ये फॅमिली बद्दल माहिती, अनेक प्रकारचे फोटो असतात. समाजकंटकांकडून असे अकाउंटस हॅक होतात. असे कोणासोबत होत असेल तर नक्की काय करावे याची माहिती अनेकांना नसते. यावेळी मला अनेकांची मदतीसाठी विचारणा होते. ऑनलाईन लॉटरी, लकी ड्रॉ,फसव्या लिंक संदर्भात फसवणूक होते.अशा वेळी काय करावे यासाठी मार्गदर्शन केले जाते. एक केस मी नक्की सांगेल, दहावीच्या एका मुलीची एका समाज माध्यमाद्वारे एका मुलाशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि संपर्क क्रमांक, खासगी फोटो शेअर झाले. त्यानंतर त्यांनी भेटायचं ठरवले पण जेव्हा ती भेटायला गेली तेव्हा तो मुलगा नव्हे तर ३५ वर्षीय विवाहीत व्यक्ती निघाली. त्यातून त्याने त्या मुलीला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. त्या मुलीचे समुपदेशन करून तिला धीर देण्यात आला व सायबर गुन्ह्याअंतर्गत त्या व्यक्तीविरुद्ध तक्रार नोंदवून घेतली आणि पुढे काही भयंकर होण्याआधीच प्रकरण थांबले. अशी अनेक प्रकरणे आहेत. कोवळ्या वयातील मुले- मुली पालक रागावतील म्हणून त्यांच्यासोबत घडणाऱ्या गोष्टी सांगत नाहीत अशावेळी पालकांनाही विश्वासात घेऊन मुलांना खुलेपणाने मन मोकळे करण्यासाठी समुपदेशन करावे लागते. पालकांनी मुलांवर विश्वास ठेऊन धैर्याने प्रसंगाचा सामना करीत तक्रार नोंदवणे गरजेचे असते.

कोणतेही काम एकट्याने होत नाही 'एकला चलो रे' पेक्षा समूहाने काम करण्यात जी मजा आहे ती अनोखी असते.आणि म्हणूनच मी नाशिक मधील अनेक छोट्या मोठ्या संस्थांना एकत्र करून नाशिक एन. जी. ओ. नावाने गट स्थापन केला. यात मला तीन हजार पेक्षा जास्त सहकाऱ्यांनी एकत्र येऊन मदत केली. नाशिक - मधील धुरिणांचा मला घडविण्यात मोलाचा वाटा आहे. या छोट्याशा कामाची दखल घेत कामास प्रोत्साहन आणि शाबासकी म्हणून आजवर ३९ विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यातून मला काम करण्यास आणखीनच प्रेरणा मिळत आहे. या कामातून अनेक ज्योती तयार होऊन त्या त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात देदीप्यमान यशासाठी सदैव तेवत राहोत हीच देवीचरणी प्रार्थना.

**- ज्योती वाकचौरे**

(सायबर सुरक्षा अम्बॅसेडर)

---

(... पान क्रमांक १६ वरून)

**बचतगटांच्या प्रेरणास्थान, शेकडो कुटुंबांच्या सल्लागार :** दारूबंदीतून वाचलेला पैसा लोकांच्या घरात जमा होऊ लागला याचे योग्य नियोजन व्हावे म्हणून ताईंनी अनेक महिलांना बचतगट उभे करून त्यातून आर्थिक स्थिती मजबूत करण्याचे मार्गदर्शन केले, छोट्या-मोठ्या कलहाचे रूपांतर कुटुंब विभक्त होण्यात होत होते. या सर्वांच्या घरी जाऊन त्यांच्यात सुसंवाद घडवून आणणे आणि संसार तुटण्यापासून वाचवणे यासाठी ताईंचा हातखंडा आहे. अगदी आपुलकीने त्या अशा कुटुंबांतील तणाव दूर करतात.

**पुरस्कारांचे पाठबळ :** आयुष्यातील पहिला आणि महत्त्वाचा पुरस्कार म्हणजे माझ्या पतीने दारू सोडणे, असे ताई सांगतात. लखमापूरचे सरपंच पद भूषवून ताईंनी गावाला एक विधायक दिशा दिली त्यांच्या कार्यकाळात तंटामुक्ती, ग्रामस्वच्छता, दारूबंदी अशा अनेक विषयांत विधायक कामे करून ताईंनी गावास पुरस्कार मिळवून दिले, महाराष्ट्राच्या विविध गावांत दारूबंदी अभियानासाठी त्यांना आमंत्रित केले जाते. २०१९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे दिला जाणारा 'राष्ट्रपिता म. गांधी व्यसनमुक्ती सेवा' पुरस्कार ताईंना देण्यात आला. आज त्यांच्या दोन्ही मुली उच्च शिक्षण घेत आहेत याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहते. कधीकाळी स्वतःचे कौटुंबिक छत हरवलेली १०-१२ वर्षांची निरागस मुलगी पुढे जाऊन शेकडो कुटुंबांचा भक्कम आधार होते ही बाब सर्वार्थाने प्रेरणादायी आहे.

# ...आणि मी अधिकारी झाले!

**‘ क्यो डरे जिंदगी में क्या होगा,**

**कुछ न होगा तो तजुर्बा होगा’**

भारतीय सेवेत किंवा राज्यसेवेत अधिकारी होऊन देशसेवा करणे हे असंख्य विद्यार्थ्यांचे स्वप्न असते.या स्पर्धेत काही यशस्वी होतात काही मागे पडतात, हरतात, पुन्हा संघर्ष करून यशस्वी होतात. बहुतांश विद्यार्थी गरीब, शेतकरी, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करून पुढे आलेले असतात आणि त्यांच्या संघर्षकहाण्या तयार होतात. स्पर्धापरीक्षा म्हणजे पाठीशी पद, पैसे वा प्रतिष्ठेचा आधार असो अथवा नसो सर्वांना समान संधी देत स्वतःला सिद्ध करण्याचे हक्काचे व्यासपीठ. मात्र माझा स्पर्धा परीक्षेचा प्रवास हा इतरांपेक्षा खूप वेगळा आहे. सरकारी नोकरीत असलेल्या वडिलांनी कधी कशाची कमी भासू दिली नाही. मी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेड येथून बी.ए.एम.एस.ची पदवी घेतली. त्यानंतर मी वैजापूर, जि.औरंगाबाद या ठिकाणी वैद्यकीय प्रॅक्टिस सुरू केली. काळाच्या ओघात काही स्वप्नं अपूर्ण राहून जातात मग कालांतराने आपल्याला रुखरुख राहते की आपण हे करू शकलो असतो. तसेच काहीसे माझ्या बाबतीत झाले. वर्तमानपत्रात एम.पी.एस.सी तील यशस्वी झालेल्या आणि अधिकारी बनलेल्या विद्यार्थ्यांची मनोगते वाचून मला वयाच्या पस्तीशीत आल्यावर वाटलं की आपणही अधिकारी होऊ शकलो असतो. पण मनात द्वंद्वं सुरू असायचे की आता असे वाटून काय फायदा? डॉक्टरकीची प्रॅक्टिस सुरू आहे, मुलांचा अभ्यास घ्यायच्या वयात आपण अभ्यास करायला लागलो तर घरचे तसेच समाज काय म्हणेल ? त्यामुळे पुन्हा अधिकारी होण्याचा विचार सोडून द्यायचे. परंतु एकदा नवऱ्याजवळ मन मोकळे केले. त्यावर माझ्या नवऱ्याने मला सांगितले की," अग,तू आताही परीक्षा देऊ शकतेस. प्रयत्न करायला काय हरकत आहे? पोस्ट नाही मिळाली तर ज्ञान तर मिळेल. आणि जिथे सर्व संपलं असं वाटतं तीच खरी वेळ असते नवीन काहीतरी सुरू करण्याची...तेव्हा चल आपण तुझा परीक्षा फॉर्म भरू." त्यांच्या या धीर देणाऱ्या वाक्यांनी मनाने पुन्हा एकदा उभारी घेतली. मग आवश्यक ती कागदपत्रे जमा करून मी जळगाव जिल्हा - तलाठी या परीक्षेचा फॉर्म भरला. एक महिना प्रचंड मेहनत केली. लहानपणी मी अभ्यासात चांगली होते त्यामुळे बेसिक सर्व आठवले व पटकन समजले देखील. स्वामींची कृपा व कुटुंबीयांच्या सहकार्यामुळे मी जळगाव जिल्ह्यात तलाठी परीक्षेत मुलींमध्ये पहिली आली. माझा मामेभाऊ परेश मला म्हणाला," ताई, तू एक महिन्यात तलाठी परीक्षा पास होऊ शकते तर एक वर्षात तू अधिकारी होऊ शकशील. तू एम.पी.एस.सी ची परीक्षा दे." तोपर्यंत मला ना एम.पी.एस.सी चा अभ्यासक्रम माहिती होता, ना परीक्षा पद्धती, त्या बाबतीत मी पूर्णतः अनभिज्ञ होते. मग भावाकडून मी परीक्षेची संपूर्ण माहिती घेतली. अभ्यासासाठी कोणती पुस्तके निवडावीत त्याची यादी घेतली व वैजापूरला परत आली. मी पतीसोबत औरंगाबादला जाऊन सर्व आवश्यक पुस्तके घेऊन आली. पुस्तके निवडताना छोटी व सुटसुटीत अशी पुस्तके प्रत्येक विषयासाठी निवडली आणि अभ्यासाला सुरुवात केली. एम.पी.एस.सी. द्वारे २०१५ साली नायब तहसीलदार या पदावर माझी निवड झाली. स्पर्धा परीक्षेची गोडी लागल्यासारखी झाली. या दरम्यान समाज कल्याण निरीक्षक, महिला बालकल्याण अधिकारी, विक्रीकर निरीक्षक याही परीक्षा मी उत्तीर्ण झाले. पावलागणिक यश मिळत गेल्याने माझा आत्मविश्वास वाढला, मग वर्ग एक अधिकारी झाल्याशिवाय हा प्रवास थांबवायचा नाही असे मी ठरविले. २०१७ च्या राज्यसेवा परीक्षेत उत्तम गुण मिळवून सहाय्यक राज्य कर आयुक्त या पदावर माझी निवड झाली. केलेल्या कष्टाचे फळ मिळाले. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या माझ्या कुटुंबाला मी आनंद देऊ शकले आणि नवऱ्याने माझ्या क्षमतेवर दाखविलेल्या विश्वासाला सार्थ ठरवू शकले, याचे समाधान वाटले.



**" तक्लीफो को बताओ आपका हौसला कितना उंचा है "**

या प्रवासात अनेक अडचणी आल्या. प्रॅक्टिस, कुटुंब, मुलांचे संगोपन अशी तारेवरची कसरत करताना अभ्यास सोडून द्यावा असेही विचार मनात आले.परंतु अशावेळी कुटुंबीयांची साथ व आपले श्रद्धास्थान यामुळे मी न डगमगता प्रयत्न चालू ठेवले व यश संपादन केले. माझे सर्व विद्यार्थ्यांना हेच सांगणे आहे की," क्षेत्र कुठलेही असो कठोर परिश्रमांना पर्याय नाही. प्रयत्न प्रामाणिक असतील तर यशालाही पर्याय नाही. प्रामाणिक प्रयत्न म्हणजे काय तर आपल्या क्षमतेच्या शंभर टक्के प्रयत्न करणे. एखादे मोठे ध्येय गाठायचे असेल तर त्या ध्येयापर्यंत नेणारी छोटी छोटी उद्दिष्टे तयार करा आणि रोजच्या रोज ही छोटी छोटी उद्दिष्टे पूर्ण करायचीच. त्यात स्वतःच्या क्षमतेचा कस लावायचा. दिवसागणिक ही क्षमता वाढवत न्यायची. यश म्हणजे दुसरे काही नसून स्वतःच्या क्षमता गाठणे होय. स्वतःतील उत्तम शोधणे होय. यश म्हणजे मनाचे समाधान. यश हे तुलनात्मक असते तर समाधान हे व्यक्तीसापेक्ष असते. त्यामुळे तुम्ही ज्या क्षेत्रात काम करत असाल तेथे सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करा. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सर्वात प्रथम बेसिक पुस्तके, पाठ्यपुस्तके मनापासून वाचावीत. त्यानंतर संदर्भ पुस्तकांचा अभ्यास करावा. काही गोष्टी पाठ कराव्या लागतात त्यांच्या शॉर्ट नोट्स काढाव्या. प्रत्येक गोष्ट समजून घ्यावी म्हणजे ती दीर्घकाळ लक्षात राहते.वर सांगितल्याप्रमाणे अभ्यासाची छोटी छोटी उद्दिष्टे तयार करावीत की रोजच्या रोज अमुक एक प्रकरण, अमुक एक धडा तयार झालाच पाहिजे. त्यावर वाचन, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकेत त्या मुद्द्यावर कोणत्या स्वरूपाचे प्रश्न आलेत, त्याचे आकलन, वाचलेल्या गोष्टींच्या सारांश नोंदी आणि तुम्हाला समजतील अशा पद्धतीने तुम्हीच वाचलेल्या गोष्टीचे बुलेट पॉईंट्स, हे छोटे मुद्दे एखादी पॉकेट डायरी करून त्यात लिहून सतत जवळ ठेवायची. अभ्यासाव्यतिरिक्त जेव्हाही वेळ मिळेल तेव्हा तुम्ही ती डायरी काढून वाचू शकाल. अभ्यासाच्या काळात अनेक अडचणी येतात, त्यावर मात करून आपल्याला वाटचाल करायची असते. कोणत्याही परिस्थितीत आपला आत्मविश्वास कमी होऊ द्यायचा नाही.यासाठी अंत:प्रेरणा महत्त्वाची असते." आपल्या आई वडिलांच्या, जवळच्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर आनंद असावा व त्या आनंदाचे कारण आपण असावे यासारखे दुसरे समाधान नाही. या मार्गात वाटचाल सुरू असलेल्या सर्वांना भविष्यातील यशासाठी खूप खूप शुभेच्छा.

**- डॉ.वंदना चौधरी**

सहाय्यक आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र शासन

# कथा माझी धावण्याची

एशियन मेडलिस्ट जागतिक विद्यापीठ स्पर्धा व अनेक आंतरराष्ट्रीय पदके मिळविण्याचे भाग्य लाभलेली मी संजीवनी बाबुराव जाधव माझी यशोगाथा आपणासमोर ठेवीत आहे.

माझ्या खेळाची सुरुवात ही म.वि.प्र. संस्थेच्या जनता विद्यालय, वडाळीभोई या शाळेपासून झाली आहे. शाळेत असताना मी कुस्ती आणि धावणे या दोन्हीही खेळांमध्ये भाग घ्यायची. माझे वडील माध्यमिक शाळेत शिक्षक असले तरी ते एक उत्तम कुस्तीपटू होते. शाळेत असताना त्यांच्या मार्गदर्शनानेच मी कुस्ती- शालेय स्पर्धा (पायका) मध्ये नॅशनल झालेली आहे. तसेच मी पाचवीला गेल्यानंतर म.वि.प्र. मॅरेथॉन मध्ये सहभागी झाले. त्यात माझा मुलींमध्ये प्रथम क्रमांक आला होता. माझ्या आयुष्यातील पहिले बक्षीस मला मिळाले होते. त्यानंतर मी धावण्याचा रोज सराव करू लागली. त्या मिळालेल्या बक्षिसाची प्रेरणा इतकी मोठी होती की मी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत सलग सहा वर्षे म.वि.प्र. मॅरेथॉन मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. त्या शालेय जीवनात मला माझे गुरु म्हणजे माझे वडील, माझे क्रीडाशिक्षक श्री. ए.एस. जाधव व श्री. झुटे सर यांचे लाभलेले मार्गदर्शन, प्रेरणा व मिळालेले प्रोत्साहन लाखमोलाचे ठरले. त्यामुळेच मी कुस्ती व धावणे या दोन्हीही खेळ प्रकारांमध्ये



राष्ट्रीय स्तरापर्यंत जाऊन पदके मिळवू शकली.

एक उत्तम मार्गदर्शक आपले आयुष्य बदलू शकतो याची प्रचिती याकाळात मला आली. मुलगी असल्याने कुस्ती करताना काही दुखापत वगैरे होऊ शकते असे वाटल्याने वडिलांनी माझ्या धावण्याला प्रोत्साहन दिले. त्यामुळेच मी इथवर मजल मारू शकले. आमच्या घरात आईसुद्धा धावायला प्रोत्साहन द्यायची. माझ्यासाठी भाऊ तर अगदी आजही मोठा आधारस्तंभच आहे.त्यामुळे मी आज ठामपणे म्हणू शकते की, "आज मी जी कुणी आहे ती माझ्या कुटुंबीयांमुळेच आहे." लहानपणी माझे वडील मला सायकल किंवा मोटार सायकलवरून सोबत करीत असत आणि मी अनवाणी पळत असे. मी ग्रामीण भागातील, गावाकडची असल्याने आणि त्यातही मुलगी असल्याने लोक वडिलांना काहीबाही बोलत ! " मुलीला बघावं तेव्हा पळवीत असता ! ती अशी पळून काय होणार आहे ?" गावात पळत असल्याने मला पूर्ण कपड्यांत पळायला लागायचं. परंतु वडिलांचं एक तत्त्व होतं. सकाळ संध्याकाळ पळताना मला सोबत केल्यानंतर मी अभ्यासात पाठीमागे नाही ना? हे देखील ते पाहायचे. माझा ते रोज अभ्यास करून घ्यायचे. त्यामुळेच मी दहावीला सेमी घेऊनही ८२ टक्के मिळवून उत्तीर्ण झाले.

मी शाळेत असताना राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी व्हायचे. तेव्हा श्री. विजेंद्रसिंग सर (एस.ए.आय.कोच) त्या स्पर्धांना त्यांची स्पर्धक मुले-मुली घेऊन यायचे. मी त्या स्पर्धांमध्ये ग्रामीण भागात सराव करूनही पदके प्राप्त करायची. त्यामुळेच माझे सर्व मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय स्तरांवरील माझ्या कामगिरीला पैलू पाडणारे श्री. विजेंद्रसिंग सर मला भेटले असे म्हणता येईल. सुरुवातीला वडील मला स्पर्धांना घेऊन जायचे. तेव्हा विजेंद्रसिंग सरांनी माझ्यातील धावण्याचा गुण हेरला. त्यांनी "हिला जर अजून चांगल्या पध्दतीचे मार्गदर्शन केले तर ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठी धावपटू होईल." असे एका स्पर्धेदरम्यान वडिलांना सांगितले.

त्यानुसार माझ्या उज्ज्वल भविष्याचा विचार करून वडिलांनी सरावासाठी व शिक्षणासाठी नाशिक येथील भोसला मिलीटरी कॉलेज येथे पाठविले. नाशिकला आल्यानंतर मी सरांच्या मार्गदर्शनाखाली सराव करू लागली. येथेच मला कविता राऊत व मोनिका आथरे या धावपटू भेटल्या. त्यामध्ये कविता दिदीकडून मला खेळातील बारकावे समजले. त्यानंतर मी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळविली. २०१७ साली भुवनेश्वर, ओडीशा येथे आयोजित Asian Athletics Championships 2017 मध्ये पदक मिळविले. तसेच World University Games 2017 तैपई (चीन) येथे आयोजित स्पर्धेत रौप्य पदक मिळविले. सन २०१९ मध्ये दोहा (कतार) या देशामध्ये आयोजित Asian Athletics Championships 2019 मध्ये पदक प्राप्त केले. दिल्ली मॅरेथॉन, मुंबई मॅरेथॉन, कोलकता मॅरेथॉन अशा अनेक मॅरेथॉनमध्ये मी प्रथम क्रमांक पटकाविला.

सन २०१४ मध्ये जकार्ता, इंडोनेशिया येथे आयोजित Asian Games 2018 स्पर्धेमध्ये मला थोडी दुखापत झाल्यामुळे ४ थ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. परंतु त्यानंतर २०१९ मध्ये मी परत एकदा उभारी घेऊन Asian Championship मध्ये मेडल प्राप्त केले होते.

करोना काळामध्येही माझा सराव अखंडीतपणे सुरुच होता. थोडी बंधने मात्र आली होती. स्पर्धा मात्र बंद होत्या. अशातच घरातील आम्ही सर्वच जण करोनाने बाधीत झालो. दुर्दैवाने माझे वडील करोनामुळे वारले. खूप मोठा घाला काळाने आमच्या कुटुंबावर घातला होता. त्यातून आम्ही कसेबसे सावरलो व वडिलांची इच्छाच आमची जीवनाची दिशा बनविली. त्यानंतर २०२१ पासून मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पदके मिळवून वडिलांना आदरांजली वाहते आहे. सन २०२४ या वर्षी पॅरिस येथे आयोजित Olympic स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी मी जीवतोड मेहनत केली होती. परंतु Ranking मध्ये बसण्यासाठी अगदी थोडे केवळ ३८ पॉईंटस कमी पडल्यामुळे माझी Olympic मध्ये जाण्याची संधी हुकली. परंतु आजही मी त्याबाबतीत आशावादी आहे.

या वाटचालीत मला माझ्या कुटुंबीयांनी, म.वि.प्र.संस्थेने, मार्गदर्शक सिंग सर यांनी विशेष पाठिंबा दिला. महाराष्ट्र शासनाने तसेच भारत सरकारच्या क्रीडा विभागाने मला वेळोवेळी विशेष मदत केली आहे. मी त्यासाठी सर्वांची ऋणी राहीन.

**- संजीवनी बाबुराव जाधव**
आंतरराष्ट्रीय धावपटू

# मी धावतेय... तुम्हीसुद्धा...?

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील पिंपळगाव केतकी हे माझं गाव. लहानपणापासून माझं सर्व शिक्षण नाशिकमध्येच झालं. माझ्या अथलेटिक्सच्या करिअरची सुरुवातच मराठा विद्या प्रसारक समाजाच्या मराठा हायस्कूल मध्ये झाली आणि संस्थेशी माझी नाळ घट्ट जोडली गेली. पिंपळगाव केतकी येथे आमचे एकत्र कुटुंब, वडलांसह चारही भावांना शिक्षणाची आवड. त्यामुळे आम्हा मुलांना शिक्षण मिळावं म्हणून माझे काका आम्हा मुलांना घेऊन नाशिक येथे वास्तव्यास आले.वडील आजही गावी शेती करतात. पण शिक्षणाबरोबरच खेळातही आम्ही प्रगती करावी असं सर्व कुटुंबीयांना वाटत होते.

मराठा हायस्कूल मध्ये मी सातवीमध्ये शिकत असताना माजी आ. नानासाहेब बोरस्ते यांच्यावतीने घेण्यात आलेल्या दोन कि.मी. मॅरॅथॉन स्पर्धेत मला प्रथम क्रमांक मिळाला. यानंतरही मराठा हायस्कूल मधून शाळांतर्गत व शाळाबाह्य अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये मी यशस्वी सहभाग घेतला.माझ्यातील क्रीडा गुण व चमकदार कामगिरी बघून माझे क्रीडाशिक्षक हेमंत पाटील सर,चौधरी मॅडम, आथरे सर यांनी मला खेळामध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहन दिले. पाटील सरांनी मला भोसला मिलिटरी स्कूल येथे विजेंद्रसिंग सरांकडे ॲथलेटिक्स सरावासाठी पाठवण्याचा आग्रह घरच्यांकडे धरला. त्यासाठी माझ्या काकांनीही मोठी मेहनत घेतली.मला शाळेत सोडण्यापासून ते पहाटे आणि संध्याकाळी मैदानावर ने-आण करण्यापर्यंत सारं काही काकांनी केलं.



सातवीत असताना २००३ मध्ये मी विजेंद्रसिंग सरांकडे आली. भोसलाच्या मैदानावर मिनी सुवर्णा, कविता राऊत अशा नॅशनल स्तरावरील खेळाडूंचा बराच मोठा ग्रुप होता. माझी प्रगती व्हायला मग वेळ लागला नाही. सराव, जिद्द आणि चिकाटीमुळे पुढच्याच वर्षी म्हणजे २००४ पासून माझ्याकडे नॅशनल मेडल्स यायला सुरुवात झाली.

काकांच्या छोट्याशा फ्लॅटमध्ये काका, काकूसह आम्ही सतरा जण एकत्र राहात होतो. त्यात सहा मुली आणि सात मुले होती. सगळ्याचं अगदी प्रेमानं करणाऱ्या काका काकूंनी सगळ्यांना शिस्त घालून दिली होती. जेवणापूर्वी झाडूकाम, जेवणानंतर आपली ताटे धुवून ठेवणे ही कामे अनिवार्य होती. या सर्वांचा त्यावेळी कंटाळा यायचा, पण कुठल्याही खेळात सर्वात जास्त महत्त्वाची असते ती शिस्त, त्या काळातील शिस्तीनंच मी आंतरराष्ट्रीय पातळीवर येऊ शकले.

मी शाळेत क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेत असताना एक सुवर्णसंधी माझ्यासाठी चालून आली. २००७ साली पय्योली एक्सप्रेस, सुवर्णकन्या पी. टी. उषा नाशिकमध्ये आल्या होत्या. 'फेअर ॲण्ड लव्हली' ग्रुप आणि पी. टी. उषा स्कूल ॲथलेटिक्सतर्फे खेळाडूंसाठी एक राष्ट्रस्तरीय योजना तयार केली गेली. या योजनेद्वारे राज्याराज्यांत जाऊन ॲथलेटिक्सचे सात चांगले खेळाडू निवडून , त्यांची कसून चाचणी घेऊन त्यांना पी. टी. उषा या केरळला आपल्या स्कूलमध्ये प्रशिक्षण देणार होत्या. त्यांनी नाशिकला सर्व खेळाडूंच्या घेतलेल्या सर्व प्रकारच्या चाचण्यात एकमेव माझी निवड झाली याचा आनंद अलौकिक होता.

ऑलम्पिकचे पदक एक शतांश सेकंदानं हुकलेली सुवर्णकन्या मला सांगत होती, ''चल माझ्याकडे, माझ्या शाळेत, मी तुला घडवते, तयार करते." एकतर मी लहान होती व मराठी माध्यमाच्या शाळेत शिकत होते! त्यामुळे मी स्पष्ट नकार दिला. माझ्या घरची मंडळी आणि माझ्या प्रशिक्षकांचंही तेच मत होतं. मी जर केरळला गेली असती, तर तिथे केरळी वा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घ्यावा लागला असता आणि आतापर्यंतचं शिक्षण फुकट गेलं असतं हे नक्की.

आजही मला अनेक जण विचारतात, पी. टी. उषाबरोबर न जाण्याचा तुझा निर्णय चुकीचा की बरोबर होता? तुझा परफॉर्मन्स आणखी बेटर झाला असता?खूप आधीच तू आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली असतीस ?..' त्यावर मी क्षणार्धात सांगते, '' त्या निर्णयाचा मला आजही पश्चाताप वाटत नाही. कारण खेळाइतकंच शिक्षणही माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. थेट सुवर्णकन्येकडूनच प्रशिक्षण मिळणं ही अभूतपूर्व अशीच गोष्ट होती. पण ती माझ्या भाग्यात नव्हती, एवढंच मी म्हणेन."

२००८ मध्ये मदुराईला ज्युनिअर युथ

(... पुढील पानावर)

(... मागील पानावरुन)

नॅशनल स्पर्धेत तीन हजार मीटर आणि १५०० मीटर स्पर्धेत मी गोल्ड मेडल पटकावलं. या स्पर्धेतील त्यावेळच्या नॅशनल रेकॉर्ड ने माझ्या प्रोफेशनल करिअरची सुरुवात झाली होती. मला दिल्ली नॅशनल ४२ किलोमीटरच्या मॅरेथॉनसाठी जायचे होते. कॉमनवेल्थ आणि एशियन गेम्ससाठीचं सिलेक्शन याच स्पर्धेच्या कामगिरीतून होणार होतं. पण काही दिवसांपूर्वीच माझी जुनी इंज्युरी पुन्हा उफाळून आली होती आणि दुसऱ्याच दिवशी मला दिल्लीला जायचं होतं. असे कठीण प्रसंग अनेकदा आले. त्या मागील वर्षीही मला या स्पर्धेत गोल्ड मेडल मिळालं होतं. त्यामुळे लंडनला झालेल्या सिनिअर वर्ल्ड चॅम्पियशन शिपसाठी माझं सिलेक्शन झालं होतं.

खेळाबरोबर शिक्षणही महत्त्वाचं म्हणून मी एम.ए. (डिफेन्स) केलं. हे शिक्षण व खेळातील उत्तम कामगिरीमुळे मला नाशकात एलआयसी ऑफिस मध्ये नोकरी मिळाली. याचवेळी माझ्या आयुष्याला कलाटणी देणारी आणखी एक घटना घडली. भारत सरकारतर्फे खेळाडूंची प्रगती, त्यांची कामगिरी पाहून अर्थात देशातील उत्तम खेळाडू निवडून उच्च दर्जाच्या प्रशिक्षणासाठी नॅशनल कॅम्पमध्ये त्यांना पाठवलं जातं. त्यावेळी झालेल्या निवड चाचणीतून माझी बंगळुरुच्या सिनिअर नॅशनल कॅम्पसाठी निवड झाली. खरंतर मी ज्युनिअर खेळाडू, पण सिनिअर खेळाडूंच्या कॅम्पसाठी माझी निवड झाली.भारतात हे प्रथमच घडत होतं.नॅशनल कॅम्पमध्ये सिलेक्शन होणं ही कोणत्याही खेळाडूसाठी तशी खूपच मोठी गोष्ट असते. कविता राऊत, ललिता बाबर सारख्या देशातल्या सर्वोत्तम खेळाडू तिथे होत्या. कविता तर माझी रुम पार्टनरच होती. भारताचे खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर जावेत यासाठी भारत सरकारनं त्यावेळी रशियन कोचची नियुक्ती केली होती.

खेळाडूंची उत्तम बडदास्त, सर्वोत्तम दर्जाचं प्रशिक्षण व देशातील सर्वोत्तम खेळाडूंची साथसोबत हे या कॅम्पचे खास वेगळेपण होते.पण येथे माझी म्हणावी तशी कामगिरी होत नव्हती. पदकं तर येत होती, पण परफॉर्मन्स वाढत नव्हता. कॅम्पमध्ये दाखल झाल्यावर लहान-मोठ्या काही इंज्युरीजही झाल्या. माझ्या गुडघ्यात पाणी झालं होतं. ही इंज्युरी बरी व्हायला सहा महिने लागले.

दोन वर्षं मी या कॅम्पमध्ये होते, पण मनासारखं चांगलं घडत नव्हतं. माझी तब्येत बरीच कमी झाली होती. 'रगडा' (खडतर सराव) प्रॅक्टीसचाही हा परिणाम असावा. मी 'ज्युनिअर' होते आणि सिनिअर खेळाडूंचा सराव करीत होते. मसाला-तिखटाचा कण नसलेलं, नुसतं उकडलेलं डाएट माझं शरीर ॲक्सेप्ट करीत नव्हतं.'

नॅशनल कॅम्प सोडून मी परत नाशिकला, आपले नियमित कोच विजेंद्रसिंग यांच्याकडे परतायचा निर्णय घेतला. त्यानंतर २०१३ मध्येही माझं नॅशनल कॅम्पमध्ये सिलेक्शन झालं, पण त्यावेळीही याच कारणानं मला कॅम्प सोडावा लागला. मी माझ्या कारकीर्दीत पदकांची भरपूर लयलूट केली, पण हा प्रवास सोपा नव्हता. अनेक अडथळ्यांवर मात करत आणि प्रत्येक वेळी स्वतःला तासत मला पुढे जावं लागलं.एक दिवस जरी सरावात खंड पडला. एकदोन दिवस गावी जावं लागलं तरी मन कासावीस होऊन डोळ्यांसमोर स्पर्धा दिसायला लागतात. स्वतःलाच उत्तर द्यावं लागतं. हे स्वतःलाच उत्तर देणं फार फार कठीण असतं.'

२००८ची गोष्ट, नॅशनल चॅम्पियन शिपसाठी मला पुण्याला जायचं होतं. बस पकडायची घाई होती. झटपट रिक्षा पकडून मी बसस्टॅण्डवर आली. पुण्याच्या बसमध्ये चढणार तोच लक्षात आलं, की सर्व ओरिजिनल सर्टिफिकेट्सची फाईल मी रिक्षातच विसरली आहे. त्यातच पासपोर्टही होता. या सर्टिफिकेट्सवरच स्पर्धेतील माझी कामगिरी ग्राह्य धरली जाणार होती, स्पर्धेनंतर काही दिवसांत ही कागदपत्रं मला सादर करायची होती. मी फारच टेन्शनमध्ये आली. विचार करायलाही वेळ नव्हता. तशीच स्पर्धेला गेले. तिथून परतल्यानंतर पुन्हा फाईलची शोध मोहीम सुरू केली. आठवडाभर आम्ही कुटुंबीय प्रत्येक रिक्षावाल्याच्या घरी जाऊन चौकशी करीत होतो. सुदैवाने शेवटी हवा तो रिक्षावाला सापडला. जीव भांड्यात पडला.फाईल पूर्णतः सुरक्षित होती.

६ ऑगस्ट २०१७ रोजी लंडन येथे झालेली वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धा ही माझ्यासाठी सर्वात मोठी घटना होती. ४२ किलोमीटरची फूल मॅरेथॉन. वर्ल्ड चॅम्पियनशिप. ही स्पर्धा ऑलिम्पिकपेक्षाही खूप कठीण असते. ऑलिम्पिकवर ज्यानं अधिराज्य गाजवलं, तो उसान बोल्टही या स्पर्धेत तिसरा आला, यावरुन या स्पर्धेचं काठिण्य लक्षात यावं! पण यावेळीही माझं दुर्दैव आडवं आलं. लंडनमधलं वातावरण, डाएट मला मानवलं नाही. स्पर्धेच्या सुरुवातीलाच अचानक पोटात भयानक कळा यायला लागल्या. डोळ्यांसमोर अंधारी यायला लागली. स्पर्धा सुरू झाली आणि पहिल्या आठ किलोमीटरमध्येच माझं पोट प्रचंड दुखायला लागलं. एकेक पाऊल टाकणं मुश्कील होत होतं. स्पर्धेच्या वेळी खूप ऊन होतं. खूपदा वाटलं रेस सोडून द्यावी, पण प्रत्येक वेळी आठवला तो आपला देश, आजवर घेतलेले कष्ट, मेहनत, लोकांच्या अपेक्षा. या स्पर्धेसाठी भारतातून माझं एकटीचंच सिलेक्शन झालेलं. अर्ध्यावरच मी स्पर्धा कशी सोडू शकत होते ? जीवाची पर्वा न करता हिंमत एकवटून मी पळत राहिले, पळत राहिले. जिद्दीने स्पर्धा पूर्ण केली आणि जवळपास कोसळलीच. मैदानावरच मग माझ्यावर उपचार करण्यात आले. पण याही अवस्थेत स्पर्धा पूर्ण केल्याचं मोठं समाधान माझ्या डोळ्यांत झळकत होतं.

लहानपणापासून मी घराबाहेर आहे. स्पर्धांमध्ये सारखी धावतेय. नाशिकच्या भोसला कॉलेजमध्ये पुढचं शिक्षण घेतलं. तिथल्या स्थानिक मैदानावर सराव केला. नोकरी सांभाळत स्वतःसाठी, साऱ्यांच्या अपेक्षांसाठी, देशासाठी मी धावतेय. २०२० चे टोकिओ ऑलिम्पिक हे माझं ध्येय होते पण ते राहिले.

मोहाडीचे श्री रोहन जाधव यांच्याबरोबर माझा विवाह झाला. सासरकडील मंडळी माझ्या खेळातील कामगिरीसाठी कायम प्रोत्साहन देतात. लग्नानंतरही दोन-तीन इव्हेंट्स मध्ये मला चांगले यश प्राप्त झाले. आनंदाची बातमी म्हणजे सहा महिन्यापूर्वीच मला कन्यारत्न प्राप्त झाले आहे आणि मी अतिशय आनंदात आहे. सर्वांना आशा होती की मला मुलगा होईल. पण मला मनातून वाटत होतं मुलगीच व्हावी आणि तसंच झालं. ऑलिंपिक मध्ये खेळण्याचं माझे स्वप्न होते ते माझी मुलगी नक्कीच पूर्ण करेल. तिची कोच म्हणून मला पुढे काम करायचं आहे. माझ्या मुलीला चांगली खेळाडू म्हणून घडवायचं आहे.

खेडेगावातील मुलांमध्ये सुद्धा खूप टॅलेंट आहे. गरज आहे फक्त त्यांना योग्य मार्गदर्शनाची. खेळात करिअर करणं ही खूप अवघड गोष्ट आहे. अनेक अडथळे येत असतात. परिचित, नातेवाईक मंडळीतून अनेकदा विरोधाचा सूर ऐकायला येतो. पण त्याकडे दुर्लक्ष करून मी पुढे जात राहिले. आई-वडिलांचा संपूर्ण सपोर्ट होता. आणि हो, मुलींसाठी मला सांगावसं वाटतं की " स्पोर्ट्स मध्ये खूप पुढे जाणं कठीण आहे परंतु जिद्दीच्या बळावर नक्की जाता येते. आपल्याला कुणाचा आधार मिळेल याची वाट बघत न बसता, बाहेरून आधार न शोधता स्वतःमध्ये स्वतःसाठी आधार शोधा. तेव्हा नक्कीच आपल्याला यश प्राप्त होते!"

**- मोनिका रोहन आथरे-जाधव**

आंतरराष्ट्रीय धावपटू

# खुरपणं ते प्रकाशन

प्रकाशन क्षेत्रात कशा आलात ? आजवर भेटलेल्या प्रत्येकाने हा प्रश्न विचारला असेल, त्याचे उत्तर देण्याचा हा प्रयत्न. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील सातारा - पंढरपूर आणि फलटण - वडूज रस्ते जिथे एकमेकांना छेदतात ते माझ गाव पुसेगाव. तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण, आसपासच्या पाचपंचवीस गावांना आपलंसं करणारं, गावाच्या पूर्वेला महात्मा फुल्यांचं मूळगाव कटगूण दोनच मैलावर आहे. तिथून पुढे गोंदवलेकर महाराजांचे गोंदवले, पश्चिमेला जरंडेश्वर, दक्षिणेला पंत प्रतिनिधींचे औंध, तर उत्तरेला तुकाराम महाराजांच्या गुरूपरंपरेतील राघवचैतन्य महाराजांची समाधी आहे. खुद्द पुसेगाव श्री सेवागिरी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं. ही सुवर्णनगरी होईल हा महाराजांचा गावाला लाभलेला आशीर्वाद सार्थ ठरलाय, हे पाहण्यासाठी मार्गशीर्ष महिन्यातील यात्रा बघायला हवी. लाखो भाविकांच्या साक्षीने भरणारी यात्रा, रथावर बांधलेल्या लाखो रुपयांच्या नोटांचे हार पाहून डोळ्याचे पारणे फिटते. अशा आध्यात्मिक वातावरणाने भारलेलं पुसेगाव !

सगळं गाव जाधवांचं. तिथून जवळच असलेली फडतरवाडी आमचं मूळ गाव. वाडीत मोठा वाडा, भरपूर माणसं, चुलते शिस्तप्रिय आणि संस्कारी. मला 'पाच सख्खे भाऊ' सख्ख्या चुलत १४-१५ भावांमध्ये मी एकटी मुलगी होते. अर्थातच सर्वांची लाडकी! बालपण प्रेमात गेलं. मोफत भरपूर मिळणारी तेवढीच गोष्ट होती. आम्ही पुसेगावमध्ये असलो तरी कुटुंब एकत्र होतं आणि मायेच्या बंधनात बांधलेलं होतं. त्यामुळे दुष्काळी भागातील येणारी अस्मानी संकटं या मायाजाळात कधी मोठी वाटली नाहीत.



माझे बाबा राष्ट्रसेवा दलात होते, नंतर सैन्यात गेले, ते निवृत्त झाले, तेव्हा माझ्या मामांनी त्यांची जमीन, घर माझ्या बाबांवर सोपवले. मोठे मामा माधवराव वाघ इंजिनीअर होते, तर धाकटे मामा वसंतराव पुढे फर्ग्युसनचे प्राचार्य झाले. बाबांनी बाहेरचं जग पाहिले होते त्यामुळे शिक्षणाचं महत्त्व ते जाणून होते, शिवाय मामांचा आदर्श होताच. त्यामुळे माझे पाचही भाऊ पुणे, सातारा, कराड येथे शिकत होते. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या भावांना वाचनाची आवड होती. पुण्यात असलेला भाऊ सुट्टीत आला की, कादंबऱ्या घेऊन यायचा. मी त्या चोरून वाचायची. ययाती मी पाचवीत असताना वाचली. बऱ्याचदा अर्धवट वाचन व्हायचं. शेवटची किंवा सुरुवातीची पानं नसायची. डाळीच्या पुड्यांचे कागदही वाचन पुरवायचे. गावात वाचनालय नव्हतंच. रद्दी वगैरे काहीतरी मिळायचं.

मी हायस्कूलला गेले, तेव्हा सगळे भाऊ शिकत होते. वडिलांना १०० रुपये पेन्शन, शेतीचे तुटपुंजे उत्पन्न यामुळे आर्थिक चणचण असायचीच. घराची, शेतीची जबाबदारी मी लवकर उचलली. शेतीत अगदी तरबेज झाले. शाळेला कायम दांड्या, पण पहिला-दुसरा नंबर सोडला नाही. शाळेत शिक्षक सर्वांना प्रश्न विचारायचे, मोठेपणी तू कोण होणार? एखाददुसरी सोडून सगळ्या मुली उत्तर द्यायच्या गृहिणी. मीसुद्धा तेच उत्तर द्यायची. मला माझं बालपण आठवतं जिथे शिक्षणापेक्षा मुलींना सर्व काम येणं हे जास्त महत्त्वाचं मानलं जायचं. घरकाम यायचंच, पण शेतातील सर्व काम खुरपणं, काढणी, उफणणं, गवत कापणं सहजपणे करीत असे. त्यावेळच्या शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे आपुलकीचे नाते असायचं. दहावीमध्ये माझे दोन-चार शिक्षक घरी आले. आईला म्हणाले, पाय धरू का तुमचे ? मुलगी स्कॉलर आहे तिला नेऊ नका शेतात.

दहावी झाल्यावर गावातच अकरावी सायन्सला प्रवेश घेतला. लग्न ठरेपर्यंत शिकेल एवढाच उद्देश ! त्यामुळे जमेल तेव्हा कॉलेज करून अकरावी पास झाले; पण बारावीत मात्र नापास झाले. आता शिकायचेच नाही असं मनाशी पक्कं ठरवलं होतं. पण लग्न ठरलं तेच मुळी पुढचं शिक्षण पूर्ण करण्याच्या अटीवर! माझा शिकण्याचा होकार मोठ्या भावाने परस्परच देऊन टाकला.

रहिमतपूर शेजारी पिंपरी हे माझं सासर. रहिमतपूर कवी गिरीशांचं गाव. सातारला मोठ्या दिराकडे राहून बारावी आर्ट्सला प्रवेश घेतला. तारेवरची कसरत करत बारावीत कॉलेजमध्ये पहिली आले. सर्वसाधारण मराठा समाजामध्ये लग्नानंतर शिक्षणासाठी येणारे अडथळे मलाही आले. आता काय कलेक्टर व्हायचंय का ? हा टोमणा तर मी अनेकदा ऐकला. बाकीचं शिक्षण बाहेरून पूर्ण केलं. राज्यशास्त्राची पदवी घेतली. पदवी घेतल्यानंतर जरा हुश्श झालं. कारण दोन मुलं, संसार हे सगळं सांभाळून शिकण्याचा कंटाळा आला होता. कायमच काम आणि अभ्यास मी कंटाळले होते. कधी मुलांशी निवांत खेळता आलं नाही. माझा राज्यसेवा परीक्षेचा फॉर्म भरला.

पुन्हा अभ्यास, पूर्व परीक्षा पास झाले आणि आत्मविश्वास वाढला. मुख्य परीक्षेचा अभ्यास जोमाने केला. पास झाले. पण हवी ती पोस्ट मिळाली तर नोकरी करायची नाहीतर नाही, उपजिल्हाधिकारी होण्याचं स्वप्न भंगलं, तेव्हा आम्ही सिंधूदुर्गला होतो. खूप निराशा आली होती. स्वतःचाच राग येत होता. सगळं शिक्षण घेताना किती धावपळ केली होती! आता आयुष्यभर भांडीच घासा. मी मलाच दूषणं देत होते. एक दिवस माझा मुलगा तन्मय घरी आला. त्याला लगेच लोकमान्य

**(... पुढील पानावर)**

**(... मागील पानावरुन)**

टिळकांवर भाषण लिहून हवं होतं. तो मला म्हणाला, 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत. मी टरफलं उचलणार नाही. असलं भाषण मला नको. सगळे तेच सांगतात. वेगळं दे.' मी त्याला भाषण सांगितलं. पण माझ्या लक्षात आलं. आपण का निराश झालोय. अभ्यासादरम्यान मिळविलेलं ज्ञान किती मोलाचं आहे. त्यामुळेच आज आपण तोंडी भाषण सांगू शकलो.

आपलं वाचनवेड जपलं जाईल असं काहीतरी करूया. चर्चा करताना हा प्रकाशनसंस्थेचा निर्णय झाला. नंतर मात्र अशा काही घडामोडी घडल्या की, नोकरी किंवा व्यवसाय हा हौसेखातर नाही तर ती आवश्यक बाब आहे हे लक्षात आले. त्या अडचणीच्या काळात आर्थिक दमछाक अनुभवली. लोकांचे बरेवाईट अनुभव घेतले. काही मदतीचे हात पुढे आले; पण तेही फाटकेच. मी आर्ट्स पदवीधर, कुठे नोकरी करणार? व्यवसायासाठी पैसे हवेत. बँका, पतसंस्था, फायनान्स कंपन्या धुंडाळल्या, प्रत्येकजण एकच म्हणायचा. पगारपत्रक तरी द्या किंवा प्रॉपर्टी तारण ठेवा. माझ्याकडे यातलं काहीच नव्हतं. तो काळ मन:स्तापाचा, अडचणीचा होता. पण माझी पत मला कळली. स्वत्वाची जाणीव झाली. जितक्या अडचणी वाढत होत्या, तितकी मी ठाम होत होते. मनाचा निर्धार वाढत होता. व्यवसाय सुरू केला 'संस्कृती टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स' खरं तर हे नाव प्रकाशनासाठी शोधलं होतं. मग संस्कृती मंगल केंद्र, संस्कृती एन्टरप्रायझेस असे व्यवसाय सुरू झाले. आता व्यवसाय वाढू लागला. इथून पुढे अशी परिस्थिती निर्माण करेन की वेळ आलीच, तर मदतीचे हजारो हात पुढे येतील. हा निर्धार प्रत्यक्षात येऊ लागला होता; पण या सगळ्यात मन रमत नव्हतं. 'संस्कृती प्रकाशन' हे नाव सारखं खुणावत होतं.

२००१ मध्ये प्रा. व. बा. बोधे यांच्या रानपालखी या पुस्तकाने प्रकाशनाची सुरुवात झाली. अर्थात बोधेसर म्हणतील ती पूर्वदिशा! डीटीपी, मुखपृष्ठ, मांडणी, प्रिंटिंग, बाईंडिंग यातलं काहीच माहीत नव्हतं. सरांच्या मार्गदर्शनाखाली पुस्तक तयार झाले. प्रकाशन समारंभ नेहरू मेमोरियल हॉलमध्ये घेतला. अनेकांच्या भुवया उंचावल्या, प्रकाशन समारंभ कॅम्पमध्ये ? समारंभाला प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रा. द. मा. मिरासदार, उद्योगपती बी. जी. शिर्के, डॉ. यशवंत पाटणे अनेक मान्यवर होते. मी बोलायला उभी राहिले. घरातले सगळे टेन्शनमध्ये आले. कधी चार माणसांत न बोललेली मी, भाषण करणार ? खुद्द प्राचार्यांनी भाषणाचे कौतुक केलं.

संस्कृती प्रकाशनाची सुरुवात आणि पुस्तकाचे प्रकाशन अशी सुरुवात झाली. त्यानंतर पुस्तके विक्रीसाठी दुकानात ठेवण्यासाठी खूप धडपड केली. अप्पा बळवंत चौकातील प्रत्येक दुकानात पुस्तके घेऊन फिरलो. त्या वेळी लक्षात आले की, प्रकाशन समारंभ कितीही मोठ्या प्रमाणात केला आणि कोणाच्या हातून केला याला फार महत्त्व नाही. कोणी प्रती ठेवून घेतल्या, तर कोणी ठेवून घेतल्या नाहीत. जी पुस्तके विकली त्याची बिलेही मिळाली नाहीत. पुस्तकाचे गठ्ठे घरात पडून होते. त्यांचे काय करायचे. तेव्हा विचार आला की, लेखकांचे विचार आपण घरात बंदिस्त करीत आहोत. हे चित्र मला बदलायचे होते. यातून मार्ग काय काढावा हे मात्र समजत नव्हते. अशा परिस्थितीत पुस्तक प्रदर्शनात भाग घेतला. ते प्रदर्शन विचाराला दिशा देणारे ठरले. प्रदर्शनात कुठल्या प्रकारची पुस्तके असतात. विक्री कशी केली जाते. बॅनर म्हणजे काय?, पुस्तकांची सूची कशी असते. अशा अनेक गोष्टी या प्रदर्शनातून कळल्या. त्या नऊ दिवसांत आम्ही १७०० रुपयांची पुस्तके विकली. विक्री कमी झाली, तरी आनंद मात्र प्रचंड झाला होता. या क्षेत्रात येण्यासाठी जे मला शिकायला मिळाले नव्हते. ते प्रदर्शनात शिकायला मिळाले होते. मग मला आत्मविश्वास आला, नंतर अनेक पुस्तके प्रकाशित केली. इतर प्रकाशन कार्यालयात गेल्यास पुस्तकांचे गठ्ठे दिसायचे. तसे गठ्ठे आपल्याकडे असावेत असे वाटायचे. त्यादृष्टीने विचार करण्यास सुरुवात केली.

आव्हाने, संकटे होतीच. त्यात विक्री हा सर्वांत मोठा भाग होता. या क्षेत्रातली माहिती नसणे हा दुसरा मोठा भाग होता. तिसरा भाग म्हणजे ज्या घरात मुली बाजार किंवा पिठाची गिरणी या ठिकाणीही कधी गेल्या नाहीत. अशा वातावरणातून आलेल्या महिलेला ज्या वेळेस घराबाहेर काम करावे लागते, तेव्हा बाहेर वावरणे, आत्मविश्वासाने बोलणे हेच मोठे आव्हान ठरते. त्यामध्ये भाषेची, पोशाखाची अडचण होतीच. मी घरेलू साडीत वावरणारी महिला. पुण्यातला वर्ग फॅशनेबल आधुनिकतेचा ध्यास असलेला. भाषा ग्रामीण ढंगाची. व्यासपीठावरून भाषण करायची वेळ आली, तरी कुणीतरी आपल्या भाषेला हसत असल्याचा आवाज यायचा. स्वत:मध्ये बदल करणे माझ्यासमोरील मोठे आव्हान होते. मी व्यवसायातील संघर्षाला फार संघर्ष मानत नाही. कारण एखाद्या पुरुषाने किंवा महिलेने व्यवसाय सुरू केला, तरी संघर्ष हा असतोच. त्याला तुम्ही टाळू शकत नाही. जे काही मोठे व्यवसाय उभे राहिले आहेत, त्यांच्याही संघर्षगाथा आहेतच. त्यामुळे व्यवसायाची संघर्षगाथा मला फार महत्त्वाची वाटत नाही; पण माझा सर्वांत मोठा संघर्ष होता, तो स्वत:शी. कारण मी स्वत: घराबाहेर पडल्यावर प्रचंड अपराधित्व मनात असायचे. आपण मुलांना घरी ठेवले. आपण घराकडे दुर्लक्ष करतो आहोत का? नीट बोलता येईल का? अशा अनेक बाबी होत्या. त्यामुळे मला स्वत:ला बदलत त्या सर्व गोष्टी जाणून घेऊन प्रभावीपणे पुढे जाणे हा जो काही माझा संघर्ष होता, तो मला पहिल्यांदा पार पाडायचा होता. तो माझ्यादृष्टीने जास्त महत्त्वाचा होता.

प्रदर्शनात मी इतर पुस्तक ठेवू लागले. विक्री हजारांत व्हायला लागली. कुणाकडून पुस्तक आणताना त्यांच्या दुकानातील लगबग, पार्सल, पुस्तकांचे गठ्ठे बघून मनातल्या मनात मलाही वाटायचं. हे दृश्य माझ्याकडे दिसेल कधी ? नव्या उमेदीने मी पुन्हा कामाला लागायची. त्यानंतर मी सातारचे प्राचार्य यशवंत पाटणे यांचे चैतन्याचे चांदणे हे पुस्तक प्रकाशित केलं. त्या समारंभाला नुकतेच उपमुख्यमंत्री झालेले आर. आर. पाटील प्रमुख पाहुणे होते. त्या कार्यक्रमात त्यांच्या 'सहृदय योद्धा' या पुस्तकाची मी घोषणा केली. वर्षभर पुस्तकाचे काम चालले.बालगंधर्वमध्ये पुस्तक प्रकाशन झाले. बालगंधर्व रंगमंदिराने प्रथमच प्रकाशनाच्या कार्यक्रमाला अलोट गर्दी अनुभवली. पुस्तक आबांचे असले, तरी हा सांस्कृतिक कार्यक्रम आहे. त्यामुळे व्यासपीठावर केवळ साहित्यिक बसतील, अशी भूमिका घेतली. चंद्रशेखर धर्माधिकारी, प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रा.द.ता. भोसले, इंद्रजित भालेराव अशी मोठी साहित्यिक मंडळी उपस्थित होती. शासकीय यंत्रणेचे फोन येत होते. आम्हाला कोठे बसविणार याची चौकशी करत होते. त्यामुळे दडपण आले होते. कार्यक्रम राजकीय होऊ नये, अशी माझी मनापासून इच्छा होती. या चिंतेत असताना आबांचा फोन आला. " कार्यक्रम पाच वाजता आहे. मी बरोबर पावणेपाच वाजता येणार आहे; मात्र मी व्यासपीठावर बसणार नाही. माझ्यासाठी बालगंधर्वच्या मागच्या रांगेतील चार खुर्च्या राखून ठेवा. मी तिथे बसेन." हे ऐकून मी सुटकेचा नि:श्वास सोडला. पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम झाल्यानंतर मुलाखतीच्या कार्यक्रमाला व्यासपीठावर येईन, असे आबांनी सांगितले. आबाच व्यासपीठावर आले नाहीत, तर इतर राजकीय मंडळी आपोआपच व्यासपीठावर येणार नाही, हे समीकरण पक्के होते.

आबांची एन्ट्री झाली. प्रकाशन सभारंभ उत्तम झाला. अगदी राजकीय मोठी मंडळी आली होती, ती सगळी सभागृहात बसली. सभागृहात खुर्च्या भरल्या. दोन्ही बाजूने तसेच गॅलरीत लोक उभे होते. बाहेर स्क्रीन लावलेला होता. तो हाऊसफुल्ल झालेला होता. बाहेर सर्व गाड्याच गाड्या उभ्या होत्या. भरलेल्या सभागृहातून नजर फिरवताना मला मात्र शेतात काम करणारी माझ्यातली परकरी पोर आठवत होती. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांत भरभरून बातम्या आल्या. आबांचे पुस्तक संस्कृतीने काढले याची राज्यभर चर्चा झाली. तो कार्यक्रम उंचीवर गेला. संस्कृती प्रकाशनाचे नाव झाले. निर्मळ मनाचे आबा आणि त्यांच्या पुस्तकामुळे माझ्या प्रकाशनला नवी दिशा मिळाली. त्यानंतर आबांचे 'मी कसा घडलो' आत्मचरित्र प्रकाशित केले. त्याला खूप प्रतिसाद मिळाला. दुर्दैवाने आबा आज आपल्यात नाहीत.

त्या तुफान गर्दीने संस्कृती प्रकाशनाला नवी

ओळख दिली. संस्कृती परिवार वाढू लागला. दरम्यान, अप्पा बळवंत चौकात एक जुन्या इमारतीत जागा मिळाली. तिचं छान नव्या रूपात ग्रंथदालन तयार झालं आणि प्रकाशनाबरोबरच वितरणसंस्था उदयाला आली. प्रदर्शनात एकाचे आता दहा स्टॉल झाले. आपल्या आवडीच्या क्षेत्रात वाढणारं काम दिवसेंदिवस मला जगण्यातला आनंद पुरवत होते. संस्कृती प्रकाशन याशिवाय मला काहीच सुचत नव्हतं. संस्कृती दिवाळी अंक सुरू केला. फिरत्या ग्रंथरथाच्या माध्यमातून ग्रामीण भागापर्यंत पोहचता आले. पुसेगावच्या यात्रेत दरवर्षी भव्य ग्रंथप्रदर्शन भरवू लागले. जिथे पुस्तक मिळण्याची शक्यता नाही, तिथे आम्ही पोहचू लागलो. ऊन, श्रम, जागरण याची कधीही तमा बाळगली नाही. ग्रामीण भागात वाढल्याची, कष्टाची सवय इथे उपयोगाला पडली.अनेक मान्यवर लेखकांची पुस्तके प्रकाशित केली. प्रसिद्ध गीतकार जगदीश खेबूडकरांनी एकदा बोलविले. आपली सगळी हस्तलिखिते माझ्याकडे सुपूर्द केली. मात्र इतकी एकदम काढणं मला शक्य होणार नाही म्हणून मीच काही दुसरीकडे द्यायला लावली. त्यांची १५ पुस्तके मी प्रकाशित केली आहेत. त्यांचा माझ्यावर फार विश्वास होता. मी एम्.ए. चा अभ्यास करताना र.वा. दिघे या लेखकाचा वारंवार उल्लेख व्हायचा. ती पुस्तके मिळत नव्हती. मी शोध घेतला. त्यांच्या मुलाचा पत्ता शोधला. त्यांच्याशी पत्रव्यवहार करून त्यांच्याकडून बरीच दिवस न मिळणारी पुस्तके प्रकाशित केली. पड रे पाण्या, पाणकळा, सराई वगैरे दहा पुस्तके काढल्याबद्दल सदानंद मोरे, विश्वास पाटील अशा मान्यवरांनीही अभिनंदन केले. बराक ओबामांवरील पुस्तक ते निवडून आल्यानंतर अवघ्या २१ दिवसांत केले. मधू कांबीकरांचे आत्मचरित्र ' 'मधुरंग' हेही अगदी कमी वेळात केले. वैशिष्ट्यपूर्ण प्रकाशन समारंभ ही संस्कृती प्रकाशनची ओळख झाली. अनेक सिने-नाट्य क्षेत्रातल्या लोकांच्या ओळखी झाल्या. राजकीय व्यक्तींचा परिचय झाला. प्रकाशक म्हणून स्वत:ची ओळख निर्माण झाली. महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांचा पदस्पर्श कार्यालयाला झाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत निवडून आले. मोठ्या संस्थेत काम करण्याची संधी मिळाली. राजमाता जिजाऊ पतसंस्थेची अध्यक्ष, संस्कृती दिवाळी अंकाची संपादक, मराठी प्रकाशक परिषदेची पदाधिकारी अशा अनेक पदांवर काम करू लागले.

पण हे सगळं सहज घडलं नव्हतं. यासाठी सर्वच पातळीवरील संघर्षाला तोंड द्यावं लागलं होतं. पहिला संघर्ष स्वत:च्या मनाशी करावा लागला होता. माझ्या माहेरी भावाचं व्हिडीओ सेंटर होतं. लग्नाआधी मला चित्रपट बघायचा असेल तर सहाचा शो भाऊ बंद ठेवायचा. फक्त मी आणि माझ्या मैत्रिणी तो चित्रपट पाहायचो. अशा वातावरणात वाढलेली मी, बाहेरच्या जगाशी सामना करताना अडखळत होते. अनेक अडचणी, अपमान, फसवणूक वाट्याला आली. प्रत्येक क्षण काहीतरी शिकवून गेला. मन खंबीर झाले. निर्णयक्षमता वाढली. स्त्री म्हणून स्वतःला फार गौरविले नाही आणि खंतही वाटून घेतली नाही. आधी स्वत:च्या मनातील बाईपणाची भावना काढली. स्त्री असण्याचा अभिमान बाळगला. पण प्रथम स्वत:ला माणूस समजायला सुरुवात केली. स्वतःला स्त्री न समजता उद्योजक समजा हा एका स्नेह्याचा सल्ला मोलाचा मानला.

एखादी महिला कुठल्याही क्षेत्रात नव्याने उभी राहते. तिला काही व्यावसायिक वारसा नसतो. त्यावेळी काम करणे अत्यंत संघर्षाचे असते. करिअर करण्याची परंपरा घरात किंवा गावात नसलेल्या अशा मुलीने शहरात येऊन एखाद्या नव्या व्यवसायात उतरणे हे मोठे धाडस होते. कारण माझ्या घरातली १० वी १२ वी, पदवी घेणारी मी पहिली मुलगी. लग्नानंतर घरच्या तसेच पुरुषी पातळीवरच्या ज्या काही अडचणी असतात, या सगळ्या गोष्टींचा समन्वय साधत राहिले. घर प्रत्येकाला प्रिय असते. त्यामुळे घर मोडून अथवा बंडखोरी करून मला व्यवसाय उभा करायचा नव्हता. त्यामुळे मुले, कुटुंबाला न्याय देत व्यवसाय केला. त्यामध्ये जर फरफट झाली असेल, ती फक्त माझी झाली. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये जे सहप्रवासी भेटतात. त्यांच्या सोबतचा विविध पातळींवरील संघर्ष पुन्हा वेगळाच असतो. महिला म्हणून कितीही काम करत असला, तरी सहप्रवासी समान पातळीवर बघायला तयार नसतात. प्रत्येक क्षणाला प्रत्येक वेळी अडथळे आणण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे व्यवसाय आणि महिला म्हणून संघर्ष वाट्याला येतोच. मातीचा जो चिवटपणाचा आणि चिकाटीचा गुण आहे, तो माझ्यात उपजतच होता. मी लगेचच पेटून उठत नाही किंवा कोणाला मन दुखेल असे बोलत नाही. पण जितक्या प्रमाणात अडचणी निर्माण केल्या, तितक्याच प्रमाणात मी उसळी घेऊन वरती आले. एका गोष्टीचा मात्र आनंद होतो. मी जिथे जाते तेथील महिला 'तुम्ही आमचा आदर्श आहात.' असे म्हणतात, तेव्हा खूप समाधान वाटते. माझा व्यवसाय आणि पॅशन दोन्ही एकच आहेत. म्हणून मी स्वत:ला भाग्यवान समजते. याला मी पैसा मिळविण्याचा व्यवसाय समजत नाही. ही एक सामाजिक बांधिलकी आहे. संस्कृती प्रकाशनाच्या पुस्तकांना अनेक पुरस्कार मिळाले. पुस्तकांची संख्या ६०० च्या वर गेली. भव्य वितरणसंस्था उभी राहिली. खूप कमी महिला प्रकाशन क्षेत्रात आहेत. स्वतः प्रकाशन सुरू केलेल्या, तर त्याहूनही कमी आणि वितरणात तर जवळपास नाहीत. प्रदर्शनात १० स्टॉल घेणारी मी महाराष्ट्रातील एकमेव महिला वितरक आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेत २०११ पासून काम करीत आहे. सलग आठ वर्षे कोषाध्यक्ष म्हणून काम पाहिले. २०२३ पासून मसापची प्रमुख कार्यवाह झाले. मराठी साहित्य महामंडळावर सदस्य म्हणूनही काम करतेय. अखिल भारतीय साहित्य संमेलन, संमेलनाध्यक्ष निवड, संमेलन स्थळ निवड या सगळ्या प्रक्रियांचा हिस्सा झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून पाच वर्षे काम केले. सध्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सदस्य म्हणून काम करीत आहे. अनेक पुरस्कार मिळाले. माझ्या 'कांडा' या कादंबरीला आठ पुरस्कार मिळाले. स्वत:चे लेखन झाले. पुस्तकं प्रकाशित झाली. शब्दांशी प्रामाणिक राहिले. संस्कृती प्रकाशनाच्या वतीने कै. आनंदराव फडतरे वाचनसंस्कार पुरस्कार सुरू केला. त्याच वेळी संस्कृती सन्मान पुरस्कारही सुरू केला. 'डोन्ट जज्ज मी फ्रॉम व्हेअर आय स्टॅण्ड, जज्ज मी फ्रॉम व्हेअर आय कम फ्रॉम' रेव्ह. जेसी जॅक्सनचे हे वाक्य ! माझे वडील चौथी पास, आई अडाणी! ग्रामीण भागातून येऊन केवळ गृहिणी असणारी मी प्रकाशक झाले. म्हणून हा प्रवास मला मोलाचा वाटतो.

आजही माती मला खुणावते. गेली बारा वर्षे मी शेतीत नवे प्रयोग करतेय. ते यशस्वी होताना प्रचंड समाधान मिळते. मातीतून उगवणारे कोवळे कोंब आणि हातात येणारे नवे पुस्तक दोन्हीही मला तितकाच आनंद देतात. शेतात राबून मोत्याचे दाणे पिकवणे आणि शब्दांच्या माळा जोडून पुस्तक काढणे या दोन्हीही सृजनशक्तीच ! एक शरीराची भूक भागवते, तर दुसरी मनाची! आजही दोन्ही गोष्टी मला तितक्याच प्रिय आहेत. भाषा हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नाही किंवा शब्दांच्या देवघेवीचा व्यवहार नाही, त्या भाषेशी आपलं मन, आपलं संचित, आपले संस्कार आणि आपली संस्कृती जुळलेली असतात. त्या भाषेचं सर्वांत प्रभावी माध्यम म्हणजे पुस्तक! म्हणून पुस्तकाचं स्थान अढळ आहे. पुस्तक वाचताना वाचक एकटा वाचत नाही तर त्याचे डोळे, कान, मेंदू, हात त्या पुस्तकातील शब्दांशी एकरूप होतात. जसा मृदगंध कुपीत साठवता येत नाही. तसाच नव्या कोऱ्या पुस्तकाचा वास संगणकावर येत नाही. पुस्तकांची निर्मिती करणं हे काम प्रकाशक करतो म्हणून कोणत्याही शब्दापेक्षा प्रकाशक हा शब्द मला वंदनीय आहे. प्रकाशनसारखं आव्हानात्मक क्षेत्र निवडताना मला तरी कुठं माहीत होते, ही वाट कुठपर्यंत जाईल? श्रम, सातत्य, अक्षरनिष्ठा कुठेही कमी होऊ दिली नाही. अडचणी आल्या, थकले, नव्याने जागी झाले. चालत राहिले. प्रत्येक वेळी नवी ऊर्जा घेऊन... प्रकाशन क्षेत्राने मनभरून दिले. संस्कृती प्रकाशनाला यावर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहे. खुरपण ते प्रकाशन हा प्रवास खूप आनंददायी आहे.

**- सुनिताराजे पवार**
प्रकाशक, संस्कृती प्रकाशन
प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

# मविप्रच्या सभासद झाल्या खासदार



प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिक नगरीच्या प्रथम महिला महापौर, राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री अशी महत्त्वाची पदे भूषविणाऱ्या प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. सौ. शोभाताई दिनेश बच्छाव यांनी २०२४ च्या निवडणुकीत १८ व्या लोकसभेच्या सदस्या होण्याचा मान मिळविला. राज्यातील रयत शिक्षण संस्थेपाठोपाठ ज्या संस्थेचा अग्रक्रम लागतो, त्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. शोभाताई बच्छाव ह्या सभासद असल्याचा संस्थेला अभिमान आहे. त्यामुळेच कर्मभूमी असलेल्या नाशिकमधील यशस्वी राजकीय कारकिर्दीनंतर आता जन्मभूमी असलेल्या धुळ्यातून राजकीय कारकीर्द सुरू करणाऱ्या आणि 'गल्ली ते दिल्ली' असा प्रवास करणाऱ्या डॉ. शोभाताई बच्छाव यांच्या कार्याचा थोडक्यात घेतलेला धांडोळा...

डॉ. शोभाताई यांचे संपूर्ण कुटुंब वैद्यकीय क्षेत्रात आहे. त्यांना दोन कन्या आणि एक चिरंजीव असून, चिरंजीव डॉ. गौरव बच्छाव हे प्रख्यात गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट आहे. स्नुषा डॉ. प्रियंका बच्छाव यादेखील प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. कन्या डॉ. वृषाली अभिजीत बोटे-पाटील अमेरिकेत स्थायिक असून, दुसरी कन्या डॉ. मयुरी बच्छाव या नवी मुंबईतील डी. वाय. पाटील युनिवर्सिटीमध्ये प्रशासकीय अधिकारी आहेत. पती डॉ. दिनेश बच्छाव यांचेदेखील त्यांच्या सामाजिक कार्यात मोठे योगदान राहिले आहे. "कुटुंबाच्या भक्कम साथीच्या जोरावरच मला राजकीय क्षेत्रात यश मिळविता आले."असे डॉ. शोभाताई आवर्जून सांगतात.

धुळे हे शोभाताई यांचे जन्मगाव. भविष्यात याच लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल, असे त्यावेळी कुणाला वाटलेही नसेल. पण तशी संधी त्यांना मिळाली. नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील पिंपळगाव वाखारी हे त्यांचे माहेर आणि मालेगाव तालुक्यातील सोनज हे त्यांचे सासर. त्यांचे प्राथमिक शिक्षण धुळे व फागने येथील जिल्हा परिषद शाळेत, माध्यमिक शिक्षण मालेगाव येथील आर.बी.एच. कन्या विद्यालयात तर महाविद्यालयीन शिक्षण एम.एस.जी.महाविद्यालयातून पूर्ण केले. पुढे वैद्यकीय शिक्षण त्यांनी पुणे येथील डी.एस.एच. वैद्यकीय महाविद्यालयातून घेतले. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांनी मालेगाव तालुक्यातील सोनज येथील डॉ. दिनेश मोतीराम बच्छाव यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. एका छोट्याशा रुग्णालयापासून या दाम्पत्याने आरोग्यसेवेला सुरुवात केली. पंचवटीतील पेठरोड परिसरात त्यांनी 'धन्वंतरी हॉस्पिटल' सुरू केले. आजूबाजूला झोपडपट्टी परिसर आणि कामगार वर्ग जास्त असल्याने या दाम्पत्याला आरोग्य सेवा करण्याची चांगली संधी मिळाली. सुरुवातीपासूनच त्यांच्या रुग्णालयाला चांगला प्रतिसाद मिळाला. रुग्णांशी आपुलकीने आणि मायेने होणारा संवाद आणि तात्काळ आजार बरा होत असल्याने अल्पावधीतच डॉ. बच्छाव दाम्पत्याची लोकप्रियता वाढली. अशातच नाशिक महानगरपालिकेची सन १९९२ ची निवडणूक जाहीर झाली. लोकाग्रहास्तव डॉ. शोभाताई बच्छाव या राष्ट्रीय काँग्रेसकडून निवडणूक रिंगणात उतरल्या आणि पहिल्याच प्रयत्नात त्या यशस्वी झाल्या. येथूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा झाला. त्यानंतर राजकारणात त्यांनी मागे पहिलेच नाही. सन १९९२, १९९७, २०२२ आणि २००७ अशा सलग चार टर्म त्या नगरसेविका राहिल्या. सन १९९९ ते २००२ या काळात त्यांनी नाशिकच्या प्रथम महापौर होण्याचाही मान मिळविला. तसेच, त्यांनी मनपा महिला व बालकल्याण सभापती, आरोग्य समिती सभापती म्हणूनही पदभार सांभाळला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या जनरल सेक्रेटरी, २००५ ते २०१० या काळात नाशिक शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या शहराध्यक्षा, १९९७ ते २०२० असे सलग २३ वर्षे नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक, २००१ ते २००२ दरम्यान नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्षा अशी महत्त्वपूर्ण पदेही त्यांनी भूषविली आहेत. म्हणूनच पक्षाने त्यांना सन २००४ च्या विधानसभा निवडणुकीत नाशिकमधून तिकीट दिले. यात त्यांनी विजयश्री खेचून आणत आमदार होण्याचा मान मिळविला. येथून त्यांचा राज्याच्या राजकारणात प्रवेश झाला. याच कालखंडात (२००८ ते २००९) त्यांच्याकडे आरोग्य राज्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. सोबतच धुळ्याच्या पालकमंत्रीपदाचीही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली. आमदार आणि मंत्री असताना त्यांनी अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, चीन, श्रीलंका, सिंगापूर, मलेशिया, थायलंड, मालदिव या देशांमध्ये अभ्यासदौरे केल्याने राज्यात विविध प्रकल्प राबविताना आणि विकासकामे करताना त्याचा चांगला लाभ झाल्याचे त्या सांगतात. सन २००७ ते २००९ या कालखंडात आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सिनेट मेंबर म्हणूनही त्यांनी उत्तमप्रकारे कामकाज केले आहे.

२००४ ते २००८ अशी चार वर्षे विधी मंडळाच्या महिला हक्क व कल्याण समितीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. सन २०१६ पासून नाशिक जिल्हा कृषी औद्योगिक संघावर त्या संचालक आहेत. शोभाताई यांचे सामाजिक व राजकीय कार्य, तीन दशकांपासून राष्ट्रीय काँग्रेसशी असलेली एकनिष्ठता यामुळे पक्षाने १८ व्या लोकसभा निवडणुकीसाठी धुळे जिल्हा प्रभारी म्हणून त्यांच्यावर जबाबदारी सोपविली. पक्षाचे प्रदेश सरचिटणीसपद देखील त्यांच्याकडे होते. त्यांनी धुळे जिल्ह्यासमवेत असलेली आपली राजकीय नाळ कधीच तुटू दिली नाही. या जिल्ह्यातील राफेलचे आंदोलन असो वा दुष्काळाच्या विरोधात निघणारे मोर्चे असोत, यात त्यांनी काँग्रेस पक्षाची बाजू भक्कमपणे मांडण्याचे व पक्षाचे विचार कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरूच ठेवले होते. त्यामुळेच काँग्रेसने त्यांच्या या निष्ठेची दखल घेऊन त्यांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत धुळे लोकसभेची उमेदवारी जाहीर केली. धुळ्याचे पालकमंत्रीपद असताना त्यांनी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समविचारी पक्षाच्या नेत्यांबरोबर जोडलेले संबंध व धुळे मतदारसंघात असलेले नातेसंबंध त्यांना लोकसभेच्या प्रचारात कामी आले. त्यांचे कर्तृत्व, सामाजिक बांधिलकी, जनहिताची तळमळ, प्रेमळ स्वभाव, व सेवावृत्ती या गुणांमुळे जनतेने त्यांना खासदार होण्याचा बहुमान बहाल केला. एकूणच, गल्ली ते दिल्ली अर्थात, नगरसेवक ते खासदार असा प्रवास करणाऱ्या उच्चशिक्षित डॉ. शोभाताई यांची जनतेच्या हक्कांसाठी, अपेक्षापूर्तीसाठी आता संसदीय राजकारणात एन्ट्री झाली आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना २००१ चा गिरणा गौरव पुरस्कार, २०२० मध्ये लोकमत सखी मंचचा वूमन अॅचिव्हर्स अॅवॉर्ड, सकाळ वृत्तपत्र समूहाचा आदर्श महिला पुरस्कार, सावित्रीबाई फुले आदर्श महिला पुरस्कार असे विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीस मविप्र परिवाराकडून लाख लाख शुभेच्छा..!

## कृषी क्षेत्रातील आयकॉन

# श्रीमती लीलाबाई भास्कर पवार

भाजीपाला विक्रेत्या लीलाबाई या वडनेर भैरव ता. चांदवड जि. नाशिक येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील एक ध्येयवादी व्यक्तिमत्त्व. ६५ वर्षांपूर्वी त्यांनी शेती करण्याबरोबरच नाशिक जिल्ह्यातील आठवडे बाजार आणि एच. ए. एल. (HAL) टाऊनशिप, ओझर येथे गेटवर शेतकऱ्यांकडून भाजीपाला खरेदी करून तो विकण्याचा व्यवसाय केला. त्यांचे माहेर आणि सासर हे वडनेर गावातीलच पण कोणीही त्यांना मदत केली नाही. उलट त्या बाजारात भाजीपाला विकतात, आमचे नाव खराब होते. इज्जत जाते, बदनामी होते म्हणून कोणीच त्यांना मदतीसाठी पुढे आले नाही.

त्यांचे पती हे काहीसे मनोरुग्ण होते. त्यामुळे ते गावात गल्लोगल्ली फिरायचे. त्यामुळे दुःखात अजूनच भर पडलेली होती. परिणामी सर्व नातेवाईकांनी लग्नादी कार्यात त्यांना नेहमीच आमंत्रण देणे देखील टाळले. बहिष्काराचा हा घाव अत्यंत वेदनादायी होता. ना कुणाची खंबीर साथ,ना कुणाचा भक्कम आधार. अशा अत्यंत विकल व विरोधी परिस्थितीत कोणीच बरोबर नसताना चिवटपणे त्यांना सासरकडून एक बिघा जमीन कोर्टात भांडून मिळवावी लागली. ६० वर्षांपूर्वी त्या शेतकऱ्यांकडून भाजीपाला घेऊन बसने विकायला जायच्या. बसमध्ये कॉलेजची मुले त्यांची टिंगलटवाळी करीत. भाजीपाल्याचे नुकसान करीत असत. वाहतुकीची अन्य फारशी साधने नव्हती. कधी कधी गर्दीत लोक मुद्दामहून मालाचे नुकसान करायचे. मुले लहान होती. नवऱ्याची अजिबात साथ नाही. लोक व नातेवाईक मदत कारायची सोडून नको ते आरोप करण्यात आणि मजा बघण्यात आनंद मानायचे. अशा विपरीत परिस्थितीत त्या लढल्या पण रडल्या नाही. कधी कधी त्यांना वाटायचे,"आपण जे करतो ते एकदम नरक यातना भोगीत करतो आहे." पण परिस्थितीला दोन हात करीत सहन करण्याप लीकडे त्यांच्या हातात काही च नव्हते.त्या म्हणतात की, "मुले लहान लहान होती. मदतीला दुसरे कोणीच नाही. आई म्हणून मुलांना



वेळेवर जेवण खाणं नाही की आरोग्याबाबत अजिबात लक्ष नाही . कधी कधी तर मुले पाणी पिऊन उपाशी झोपी जायची.मी रात्री बाजाराहून आली की त्यांना जे असेल ते करून खाऊ घालायची. ज्या दिवशी बाजारात माल विकला नाही त्या दिवशी उपवास हा ठरलेलाच असायचा."

अशाही अवस्थेत त्या संयतपणे लढत राहिल्या. मुलांना सत्य आणि असत्य याचा फरक कृतीतून सांगत राहिल्या. पाप आणि पुण्य याबरोबरच कर्तव्य आणि प्रयत्न हेच यश देतात हे तत्त्वज्ञान मुलांच्या मनावर बिंबवित राहिल्या. मुले हळूहळू मोठी होऊ लागली. हाताशी येऊ लागली बाजारात बसू लागली आणि शाळाही शिकू लागली. दिवस हळूहळू पालटू लागले. मोठा मुलगा पदवीपर्यंत शिकला. कमवा आणि शिका ही योजना प्रत्यक्ष जगूनच तो शिकला. त्याचे लग्न जमले पण काहींनी मुलीच्या वडिलांना वास्तव स्थितीपेक्षा नको ती माहिती देवून लग्न मोडण्याचे कामही केले. त्यामुळे बदनामी पाठ सोडत नव्हती. लीलाबाई या कामात स्वत:ला झोकून देत. त्या या असंतुष्ट, कारस्थानी लोकांकडे लक्ष देत नव्हत्या. एक बिघा जमिनीतून उत्पन्न हे कमीच होते. खाणारी तोंडे जास्त होती. नियतीचा खेळ सुरू होता. कशाचाच कशाला मेळ बसत नव्हता.

त्यांनी आहे ती जमीन विकून दुसरीकडे २ बिघे जमीन घेतली. मुलं आता हाताशी आली होती. मुलांना योग्य तेच काम करायला लावायचे हे मुलांच्या मनात त्यांनी पक्के बिंबवले. कामाची लाज बाळगायची नाही ही शिकवण त्यांनी दिली. आईच्या शिस्तीत मुले कामे करू लागली. मोठा मुलगा शेतीत, दुसरा स्वत:बरोबर बाजारात असायचा. तिसऱ्याला टेलरिंग कामासाठी गावातच टपरी टाकून दिली. चौथा मुलगा हा शिक्षण घेत होता. पुढे तो सैनिक झाला. सर्वांची कामाची घडी बसत गेली. हळूहळू दिवस अनुकूल होऊ लागले. मग पैसा साचू लागला. जमिनी घेत गेल्या. आता त्यावेळी समाजातले विरोध करणारे नातेवाईक मुलांना स्थळ घेऊन येऊ लागली. विचार, संस्कार, कष्ट आणि स्वकर्तृत्त्व यांच्या बळावर दोन बिघ्याची आज त्यांची ५० बिघे हक्काची जमीन झाली. त्या शेतात विहीर व शेततळे बनवले. ५० बिघे द्राक्ष बागेला ठिबक सिंचनाद्वारे पाण्याचे योग्य नियोजन करून बारा महिने शेतीसाठी पाणीपुरवठा केला. ट्रॅक्टर आणि इतर आधुनिक यंत्रांचा अवलंब करून शेतीमध्ये भरघोस, उत्तम दर्जाचे द्राक्ष उत्पादन घेऊन ते देशात तसेच परदेशात निर्यातदारांमार्फत निर्यात केले.

नातेवाईक, वडनेर भैरव गावातील तसेच नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतमालाची प्रतवारी, पॅकिंग आणि मार्केटिंग याबद्दल मार्गदर्शन केले. शेतकरी महिलांसाठी बचत गटांची माहिती देऊन बचत गट स्थापन केले.हे करीत असताना आपण ज्या यातना भोगल्या, त्या इतर महिलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्यांनी समाजात अशा महिलांना कृषी व इतर व्यवसायांसाठी आर्थिक मदत करून याच बचतगटांच्या माध्यमातून स्वावलंबी केले आहे. स्वत:च्या मुलांचे संगोपन करताना अडचणी अनुभवल्या म्हणून त्यांनी मुलांना सांगून "ज्या महिला शेतात मजूर म्हणून येतात त्यांना पाळणाघर योजना सुरू केली.अनेकांना मदतीचा हात देत त्यांना उभे केले. आजमितीला त्या कमीत कमी एक कोटीची द्राक्ष विक्री करतात. आर्थिक परिस्थिती सुधारू लागली असली तरी हालाखीचे दिवस त्या विसरल्या नव्हत्या. समाजाप्रति आपण काहीतरी देणं लागतो याची जाणीव त्यांना होती. त्यांनी वडनेर भैरवचे कुलदैवत असलेल्या 'श्री भैरवनाथ महाराज' देवस्थानाला स्वागत कमान बनवली. अनेक गरजू शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नाला आर्थिक मदत, अन्नदान केले. दुग्ध व्यवसाय आणि बेदाणे व्यवसाय करण्यासाठी महिलांना मार्गदर्शन करून आर्थिक मदत करुन, प्रोत्साहन दिले. त्यांनी 'लोधाई' माता या देवस्थानाच्या परिसरात 'झाडे लावा, झाडे जगवा' ही कृतियुक्त मोहीम राबवून निसर्गावर प्रेम केले. ठीकठिकाणी मोफत पाणपोईची सुविधा, आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन, महिलांसाठी 'हळदीकुंकू' कार्यक्रम, अन्नदान, वस्त्रदान आणि शालेय विद्यार्थ्यांना मदत करुन समाजसेवेचे व्रत अविरतपणे चालू ठेवले.

त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना सलादेबाबा मंडळ पुरस्कृत राज्यस्तरीय 'जिजामाता गौरव सन्मान' 'बळीराजा सन्मान', 'महिला संघर्ष यात्री सन्मान', 'आदर्श कृषी कार्य महिला सन्मान', 'ज्येष्ठ नागरिक सन्मान' आणि 'आमची माती आमची माणसं' इत्यादी पुरस्कार मिळालेले आहेत. 'मातोश्री' हे त्यांचे चरित्रही प्रकाशित झालेले आहे.अशा या लीलाबाई प्रमाणिकपणा, विश्वास आणि प्रयत्न यांच्या बळावर रोडपती ते करोडपती बनल्या.

# सौ.शालन अरुण सोनवणे

## आदर्श गृहिणी ते महिला संचालिका

शालनताई यांचा जन्म चांदवड तालुक्यातील शेलू या खेडेगावी १ जून १९५८ रोजी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील पोलीस खात्यात नोकरीला होते.परंतु घरी शेतीकाम करण्यासाठी कोणी नसल्यामुळे त्यांच्या आजोबांनी वडिलांना पुन्हा गावी बोलावून घेतले. त्यांच्या या कुटुंबात एकूण ११ भावंडे आहेत. त्यात ६ भाऊ व शालनताई मिळून ५ बहिणी. शालनताई यांचे ४ थी पर्यंतचे शिक्षण शेलू येथेच प्राथमिक शाळेत झाले. पुढील शिक्षणासाठी त्या नाशिकला काकांकडे (चुलते) आल्या. तेथे त्यांनी १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पूर्वीच्या काळी लग्न लवकर होत असत. त्यांची १० वी झाल्यानंतर लगेच त्यांचे आजोबा माजी खासदार कै.माधवराव लक्ष्मणराव जाधव यांनी सटाणा येथील कै. बाजीराव मन्साराम सोनवणे (बी.डी.ओ. चांदवड) यांचे चिरंजीव श्री. अरुण बाजीराव सोनवणे यांच्याशी त्यांचे लग्न ठरविले. तत्कालीन रीतिरिवाजाप्रमाणे दि. १३/०५/१९७५ रोजी पिंपळगाव येथे लग्नसोहळा संपन्न झाला. शालनताईंचे चुलतसासरे माजी आमदार कै.नारायण मन्साराम सोनवणे हे त्यावेळी बागलाणचे आमदार होते. सुदैवाने ताईंना माहेरी व सासरी दोन्ही ठिकाणी राजकीय वारसा लाभला. त्यांच्या सासऱ्यांचा स्वभाव अत्यंत कडक होता.घरात अत्यंत शिस्तीचे वातावरण होते. ताईंचा स्वभाव अत्यंत कष्टाळू, संयमी आणि मितभाषी असल्यामुळे या वातावरणात त्यांनी स्वतःला सामावून घेतले.त्यात दोन नंबरच्या सासऱ्यांना मुलगा नव्हता. त्यामुळे त्यांचा सांभाळही याच कुटुंबाला पर्यायाने ताईंनाच करावा लागला. त्यांचे सर्वात लहान सासरे कै.लक्ष्मण मन्साराम सोनवणे (माजी चिटणीस, म. वि. प्र.समाज) यांनी शालनताई यांना मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभासद करून घेतले. सासर माहेर दोन्हीकडे राजकारण, समाजकारण यात कर्ती माणसे व्यस्त असायची.त्यामुळे माहेरचे वातावरण सासरीही त्यांना या राजकीय वारशामुळे स्वीकारावे लागले. समाजात सोनवणे परिवाराला एक वलय आणि प्रतिष्ठा आहे. त्यांचे चुलत दीर कै.प्रतापराव नारायणराव सोनवणे हे दोनदा आमदार व एकदा खासदार (धुळे लोकसभा मतदार संघ) म्हणून निवडून आलेले होते. तसेच त्यांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत अध्यक्ष, चिटणीस, सभापती इ. पदे वेळोवेळी भूषविली होती. त्यामुळे ताईंना त्यांच्या प्रचारासाठी बऱ्याचदा जाण्याचा योग आला होता.परिणामी म.वि.प्र. संस्था आणि राजकारणातील अनेक बाबी समजायला मदत होत होती. शिवाय माजी आरोग्यमंत्री कै.डॉ. दौलतराव आहेर (नणंदेचे पती) व भाचे आ.डॉ. राहुल आहेर यांचेही कौटुंबिक व राजकीय नातेबंध या परिवाराशी घट्ट आहेत. या सामाजिक सेवा आणि कार्याची धुरा माहेरकडे त्यांचे कनिष्ठ बंधू यशस्वी उद्योजक व शुभम वॉटर पार्क चे मालक श्री. शशिकांत हरिभाऊ जाधव हे सांभाळत आहेत. श्री. जाधव यांनी नाशिक महानगरपालिकेत सलग तीन पंचवार्षिक नगरसेवक म्हणून निवडून येत सामाजिक बांधिलकी जपलेली आहे तसेच निमाचे अध्यक्षपद देखील भूषविले आहे. सासरी शालनताईंचे पती श्री. अरुण बाजीराव सोनवणे हे सटाणा येथील दक्षिण भाग सोसायटी मध्ये सलग २० वर्षे निवडून आलेले आहेत. तेथे त्यांनी चेअरमन, व्हा.चेअरमन ही पदे भूषविली. त्यांच्याच नात्यातील कै. आण्णासाहेब मोरे (वकील) हे सटाणा येथे दोनदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत.



नात्यांतील असा मोठा राजकीय व सामाजिक वारसा असल्यामुळे व मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सभासदांच्या आशीर्वादामुळे शालनताई यांना मविप्रच्या महिला संचालिका होण्याचा मान मिळाला. मात्र या यशात त्यांचे बंधू श्री शशिकांत जाधव यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती असे त्या सांगतात. सौ.शालनताई सोनवणे या अत्यंत निष्ठेने शिक्षण सेवेचा वसा आणि वारसा जपत मविप्र समाज संस्थेत कार्यमग्न आहेत.

# कृषी व ज्ञानमळा फुलविणाऱ्या शोभाताई

नांदगाव तालुक्यातील बोलठाण हे शोभाताईंचे माहेर. त्यांचे वडील कै.बाजीराव माधवराव म्हस्के हे ग्रामसेवक पदावर कार्यरत होते तर आई जनाबाई या गृहिणी आहेत. उच्च शिक्षण घेतलेले भाऊ आणि बहिणी हे नोकरी करून सुखवस्तू जीवन जगत आहेत. म्हटलं तर म्हस्के कुटुंब अगदी पांढरपेशी.शोभाताई यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले.तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बोलठाणच्या छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूलमध्ये झाले. पुढे जीवनानुभवाच्या शाळेत झालेले शिक्षण त्यांच्या जगण्याला एक दिशा देऊन गेले.

साकोरे मिग हे निफाड तालुक्यातील द्राक्ष बागायतीसाठी प्रसिद्ध असलेले गाव.या गावात प्रतिष्ठित शेतकरी कै. लक्ष्मण भागूजी बोरस्ते यांच्या मुलाशी म्हणजे श्री.भागवतराव लक्ष्मण बोरस्ते यांच्याशी सन १९८६ मध्ये शोभाताईंचा विवाह झाला. बोलठाण मधून त्या साकोऱ्याला शेतकरी, सामाजिक आणि राजकीय कार्यात अतिशय सक्रिय असणाऱ्या बोरस्ते कुटुंबात आल्या. मोठ्या एकत्रित कुटुंबात आल्यामुळे घरच्या अनेक जबाबदा-या त्यांच्यावर पडल्या. सात भाऊ आणि पाच बहिणीमध्ये अत्यंत स्नेहभाव असलेल्या बोरस्ते कुटुंबात नात्यांची संपन्नता होती. कुटुंबामध्ये सासू, सासरे, भाया (जेठ), दीर, जावा, भाचे-भाच्या, पुतणे- पुतण्या असा मोठा गोतावळा. असे कुटुंब सांभाळून घेताना त्यांची कसोटी लागायची. घरातील कर्ती पुरुष मंडळी समाजकारण आणि राजकारणात कायम गुंतलेली असायची. त्यामुळे ताईंना शेतीकडे लक्ष द्यावे लागे. यातूनच त्यांची शेतीशी घट्ट नाळ जोडली गेली. निर्यातक्षम द्राक्ष तयार करण्याला त्यांचे कुटुंबीय प्राधान्य देतात. द्राक्ष, कांदा, गहू, टोमॅटो अशी अनेक पिके शेतीमध्ये घेतली जातात. शेती व्यवस्थापन करण्याचं कसब त्यांना सरावाने चांगले प्राप्त झाले आहे. उत्तम शेती करण्याबरोबरच उत्तम कुटुंब व्यवस्थापन करण्याचा आनंद काही वेगळाच आहे. 'शेतीची आणि कुटुंबाची संपन्नता जगण्याला उभारी देते' असे त्या म्हणतात.

त्यांच्या कुटुंबाला समाजकारण, राजकारणाप्रमाणेच अध्यात्माचीही आवड आहे. संपूर्ण कुटुंब हरिभक्त परायण आहे. वारकरी पंथाची परंपरा घरामध्ये आहे.त्यांचे पती श्री भागवतराव बोरस्ते हे उत्तम प्रवचनकार आहेत. त्या माध्यमातून ते चांगल्या विचारांची पेरणी समाजात करीत असतात. ते उत्तम शेतकरी तर आहेच. परंतु आजवर त्यांनी गावचे उपसरपंच, सरपंच, सोसायटीचे उपाध्यक्ष पद तसेच निफाड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि प्रशासक अशा पदांवर यशस्वी काम केलेले आहे. शोभाताईंना देखील अध्यात्म, संस्कृती, लोकसंप्रदाय, लोकसेवेची आवड आहे. त्यांना उच्चशिक्षित दोन मुले आणि एक कन्या आहे. एक बी.ई. मेकॅनिकल झाला असून दुसरा एम.फार्म. करतो आहे तर मुलगी बी.ई. कॉम्प्युटर पदवीधारक आहे. उच्च शिक्षणाबरोबरच कुटुंबाचा सामाजिक आणि राजकीय सेवेचा वारसा ते पुढे चालवतील असा ताईंना विश्वास वाटतो.

त्यांचे मोठे भाया (जेठ) कै.भास्करराव लक्ष्मण बोरस्ते हे माजी नगरसेवक होते. तसेच नाशिक महानगरपालिकेत माजी उपनगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपली कारकीर्द चांगली गाजवली होती. त्यांचे पुतणे श्री.अजय बोरस्ते यांनीही नाशिकचे उपमहापौर भूषवत चांगले कार्य केलेले आहे. घरातील पुरुष मंडळी समाजकार्यात व्यस्त असल्यामुळे घरात शेती संबंधी कामे आणि येणाऱ्या जाणाऱ्यांचा संपूर्ण राबता बऱ्यापैकी ताईंनाच सांभाळावा लागे.त्यातून अनेक माणसं जोडली गेली. त्यांना समाजकारणाची आवड निर्माण झाली. लोकसेवेच्या कामांचा परिचय झाला. लग्न झाल्याबरोबर दोनच वर्षात त्या पंचायत समिती सदस्या म्हणून निवडून आल्या. सामाजिक कामांचा व प्रश्नांचा आवाका लक्षात घेता आला. ध्येयवाद आणि सेवा यांची त्यांना जाणीव झाली. बोरस्ते कुटुंब स्त्रियांनाही सन्मान, समानता देण्यासंबंधी आग्रही आहे हे यातून जाणवते.

सन २०२० ते २०२२ दरम्यान मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या घटनेत दुरुस्ती होऊन उपाध्यक्ष आणि दोन महिला सदस्य या स्वतंत्र पदांची नव्याने निर्मिती करण्यात आली. या संस्थेच्या २०२२ च्या निवडणुकीत त्यांना उमेदवारीची संधी मिळाली. आज संस्थेत 'महिला संचालिका' म्हणून त्या कार्यरत आहे. संस्थेमध्ये कार्य करताना सर्वच सेवकांच्या, महिलांच्या अडचणी जाणून घेऊन सोडवण्याचा प्रयत्न त्या करत असतात. बहुजन हित व मुलींच्या शिक्षण व सर्वांगीण विकासासाठी अजून कोणत्या चांगल्या योजना राबवता येतील यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.



# संघर्षशील माउली: संगीताताई

"पतीचे अकाली निधन झालेले... तीन मुली आणि एक मुलगा...अशा परिस्थितीत शेती आणि कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर येऊन पडते... शेतीकामाचा अजिबात अनुभव नसतानाही 'त्या' मोठ्या हिमतीने हे आव्हान स्वीकारतात...शेतीत वेगवेगळे प्रयोग राबवून यशस्वी होण्याचा प्रयत्न करतात...अनेकदा प्रचंड कटू अनुभव येतात...व्यापारी आणि मजूर पैसे घेऊन पळून जातात...पण तरीही त्यांनी कधी हार मानली नाही... त्या लढतच राहिल्या...आणि अखेर अनेक संकटांशी सामना करीत निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनात त्यांनी भरारी घेतली. गेल्या दहा वर्षांच्या काळात आज त्यांनी एक यशस्वी आणि उद्यमशील शेतकरी म्हणून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या अशा या संघर्षशील मायमाऊलीचे नाव आहे संगीताताई बोरस्ते...!"

नाशिकच्या निफाड तालुक्यातील साकोरे (मिग) येथील अरुण बोरस्ते यांच्याशी संगीताताई या वयाच्या १६ व्या वर्षी विवाहबद्ध झाल्या. अरुण हे शेतीबरोबरच एका बँकेत नोकरी करत होते. या दाम्पत्यास तीन मुली आणि एक मुलगा. कौटुंबिक जबाबदाऱ्या, वाढता खर्च यामुळे बँकेची नोकरी सोडून अरुण यांनी पूर्णवेळ शेतीकडेच लक्ष देण्याचे ठरविले. वाट्याला आलेल्या आठ एकर शेतीत ते राबू लागले. शेतीचा फारसा अनुभव नसल्याने परिसरातील शेतकरी, मित्र यांच्या सल्ल्याने त्यांनी द्राक्ष पीक घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला शेतामध्ये विहीर खोदली.



त्यासाठी कर्ज घेतले, कर्जाचे हप्ते फेडत असताना पहिल्या वर्षी दोन लाख रुपयांचे उत्पन्न आले. संगीताताई त्या वेळी पूर्णवेळ गृहिणी असल्याने कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये व्यग्र होत्या.

सारे काही सुरळीत असताना सन २०१४ मध्ये ऐन द्राक्ष हंगाम सुरू असताना पती अरुण यांचे अकस्मात निधन झाले आणि कुटुंबीयांची, शेतीची संपूर्ण जबाबदारी संगीताताईंच्या खांद्यावर येऊन पडली. या डोंगराएवढ्या दु:खातून कसेबसे सावरत त्यांनी मुलांच्या भविष्याचा विचार करून शेतीकामात लक्ष घालण्याचे ठरवले. अर्थात, त्याशिवाय पर्याय नव्हताच. २५ लाख रुपयांचे कर्ज फेडण्याचे आव्हान त्यांच्यापुढे होते, पण मुळात शेती करायची कशी, हा सर्वांत मोठा प्रश्न त्यांच्यापुढे होता. पण न डगमगता त्यांनी द्राक्ष शेतीतील बारकावे समजून घेण्यास सुरुवात केली. पुतण्या सचिन आणि परिसरातील अन्य शेतकऱ्यांनी मदतीचा हात दिला, पण कसोटीचे क्षण स्वत:च पार पाडायचे होते. शेती करताना त्यांना निसर्गाच्या लहरीपणाने बाजारात वेळोवेळी बदलत जाणाऱ्या द्राक्षभावाचा आर्थिक फटकाही बसला. काही लोकांकडून लहानमोठ्या गोष्टीसाठी होणाऱ्या अडवणुकीचाही त्यांना खूप त्रास सहन करावा लागला.

पती अरुण यांच्या निधनानंतर विम्याचा १८ लाख रुपयांचा परतावा त्यांना मिळाला. ही रक्कम मुलांचे शिक्षण आणि अन्य कौटुंबिक जबाबदाऱ्यांसाठी त्या वापरू शकल्या असत्या, मात्र त्यांनी संपूर्ण रक्कम शेतीसाठी भांडवल म्हणून गुंतवली. गरजेनुसार द्राक्षतज्ज्ञ आणि सल्लागारांची मदत घेत पहिल्या वर्षी 'थॉमसन', 'तास-ई- गणेश' या वाणांचे त्यांनी यशस्वी उत्पादन घेतले. आता त्यांना द्राक्ष उत्पादनातल्या कळीच्या गोष्टी समजल्या. बागेतील कात खरड, छाटणी, फवारणी, गोडी बहर छाटणी, काढणी ते विक्री अशी सर्व कामे करत त्या आता यशस्वी शेतकरी म्हणून ठामपणे उभ्या आहेत. अर्थात, संगीताताईंचा हा प्रवास सोपा नक्कीच नव्हता. काही वेळा काढणीला आलेले द्राक्ष पीक अर्ध्या तासाच्या पावसात जमीनदोस्त झालेले त्यांनी अनुभवले आहे. बाहेर पावसाचे आणि घरात डोळ्यांतील पाणी थांबायचे नाव घेत नसायचे. निसर्गाच्या लहरीपणाने त्यांना एकेका वेळी पाच ते सात लाख रुपयांचा फटका सहन करावा लागला आहे.

शेतीशिवाय दुसरे कुठलेच उत्पन्नाचे साधन नसल्याने शेती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे आर्थिक गणित जुळवताना अनेकदा नाकीनऊ आले. त्यात करोना महामारीच्या काळाने त्यांची खरी परीक्षा घेतली. टाळेबंदीमुळे परदेशात जाणारा आणि स्थानिक पातळीवर विकला जाणारा माल शेतातच पडून राहिला. त्यावेळी स्थानिक मजूर, कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने द्राक्षांचे घड उतरवत बेदाणे बनविणाऱ्या उत्पादकाला मिळेल त्या भावात विकणे भाग पडले. नंतरच्या काळात संगीताताई यांना करोनाने ग्रासले. दवाखान्यात दाखल असताना वरवरच्या ओळखीतून एका व्यापाऱ्याशी त्यांचा द्राक्ष विक्रीचा व्यवहार ठरला. व्यापारी द्राक्ष घेऊन पैसे न देताच फरार झाला. त्यावर कडी म्हणजे मजूरही ठरलेली मजुरीची रक्कम आगाऊ घेऊन पसार झाले. अशा वेगवेगळ्या अडचणींना तोंड देत संगीताताई आजच्या मुक्कामी पोहोचल्या आहेत. अशी आर्थिक झळ बसत असतानाच बऱ्याचदा अडचण आली ती अल्प शिक्षणाची. खत फवारणी किंवा अन्य कागदपत्रांच्या बाबतीत इंग्रजी येत नसल्याने इतरांकडून ते समजून घ्यावे लागते आणि कामाच्या व्यापात आजवर शिकायला सवड मिळाली नाही, ही खंत आजही त्यांना बोचते आहे. म्हणून आपल्या मुलींनी, सुनेने शिक्षण घ्यावे, स्वत:च्या पायावर उभे राहावे, असा सल्ला त्या देतात. विशेष म्हणजे 'सहयाद्री फार्म' च्या त्या भागधारक असून फार्मच्यावतीने आयोजित प्रशिक्षण शिबिरात आज त्या तरुण शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताहेत.

अडचणी आल्या की त्यातून मार्ग काढत जाणे यशस्वी माणसाचे लक्षण असते. मजुरांकडून सातत्याने होणाऱ्या अडवणुकीवर कायमचा मार्ग म्हणून संगीताताईंनी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. फवारणी यंत्र, ट्रॅक्टर, जैविक पद्धतीचा अवलंब यासह नवनवीन प्रयोग करत दर्जेदार द्राक्षाचे उत्पादन घेण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्न करत असतात. या प्रयत्नांमुळे एकूण उत्पादनाच्या ७० टक्के निर्यात तर ३० टक्के देशांतर्गत विक्री त्या करू शकतात, तीन वर्षांत त्यांचे उत्पन्न २० लाखांहून अधिकपर्यंत पोहोचले आहे.

संगीताताई यांच्या कामाची दखल घेत राज्य शासनाने त्यांना 'वसंतराव नाईक पुरस्कार', सरस्वती बँकेच्या वतीने प्रयोगशील शेतकरी, सुविचार मंचचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. परिस्थिती कितीही बिकट असली तरी न डगमगता त्याला तोंड देत खंबीरपणे उभे राहावे. प्रामाणिकपणे मेहनत घेतली तर एक ना एक दिवस यश मिळतेच. भविष्यात द्राक्ष शेतीबरोबरच कुक्कुट पालनाचा व्यवसाय करण्याचा विचार असून, द्राक्ष पिकातील नवीन वाणाची लागवड करण्याचाही मानस आहे.

मतिप्र पत्रिका

# तन्वी इंग्लिश खाडी पार करणारी पहिली भारतीय माता

नाशिकच्या ३३ वर्षीय तन्वीची कहाणी आपल्या समोर येत असताना एक मैत्रीण, एक पत्नी, आणि एक आई म्हणून तिच्या जीवनाच्या अनेक पैलू हे इतरांसारखेच. ती एक सामान्य स्त्री आहे, जी जुळ्या मुलांची आई आहे, पण तिच्यातील असामान्यतेचा स्पष्ट ठसा उमटला आहे तो इंग्लिश खाडी पार करणाऱ्या तिच्या धाडसाद्वारे. ३० जून २०२४ रोजी तिने या विश्वविख्यात जलमार्गाच्या ३४ किलोमीटर लांबीची इंग्लिश खाडी, समुद्री लाटांच्या प्रहारांमुळे एकूण ४२ किलोमीटर पेक्षा अधिक अंतर कष्ट घेत पार केली. तिचा हा अनोखा प्रवास लहानपणापासूनच तिची पाण्याविषयी असणाऱ्या आवडीतून सुरू झाला, आणि आज तो एक प्रेणादायक उदाहरण बनला आहे.

लहानपणापासूनच असणारं पाण्याचं आकर्षण तन्वीच्या मौजमजा आणि खेळांच्या निवडक क्षणांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. जलतरणाची तिला नेहमीच गोडी होती, मात्र शिक्षण, व्यवसाय इत्यादी कारणांमुळे जवळजवळ १८ वर्षे तिला पाण्यापासून लांब राहावं लागलं. या कालावधीत तन्वीचं कार्यक्षेत्र विस्तृत झालं. परंतु, तिच्या मनात इंग्लिश खाडी पार करण्याचं स्वप्न कायम रुंजी घालीत राहिलं. साधारण २०२२ मध्ये, तन्वीच्या मनात या स्वप्नांने पुन्हा घर केलं. तिने इंग्लिश खाडी पार करणाऱ्या इतर जलतरणपटूंच्या बातम्या नियमितपणे ऐकल्या, आणि या धाडसाला तिने वाव दिला. तिचे पती विप्लव यांना तिने कळवलं की, तिने इंग्लिश खाडी पार करण्याचे ठरवले आहे. विप्लवने तिच्या या स्वप्नांना बळ देण्याचा निर्धार केला. आव्हान खडतर होते परंतु सासर-




माहेर दोन्ही कुटुंबाचा समर्थ आधार तिला यशस्वी होण्यासाठी पुरेसा होता. चेहऱ्यावर हलकं हास्य असलेल्या तन्वीने आपल्या प्रशिक्षणासाठी कष्ट घेण्याचं ठरवलं. तिनं आपल्या शरीराची तयारी करण्यासाठी, पोहण्यासाठी, आणि समुद्राच्या लाटांशी जुळवून घेण्याची तयारी सुरू केली. तिनं छोटे छोटे लक्ष्य ठरवून त्यासाठी मेहनत घेण्यास सुरुवात केली. शरीराची स्थिती साधण्यासाठी तिने पोषणावर विशेष लक्ष केंद्रित केलं.

तन्वीचा प्रवास हा इंग्लिश खाडी पार करण्यापुरताच मर्यादीत नसून तिनं एक आदर्श निर्माण केला आहे. जलतरणात भल्याभल्याच्या शारीरिक, मानसिक क्षमतेचा लागणारा कस हा महिलांच्या शक्ती, समर्पण आणि धैर्य अधोरेखित करणारा आहे. एक जुळी संतती असलेल्या मातेसाठी अनेक वर्ष सरावापासून दूर राहूनही पुन्हा प्रयत्नपूर्वक पराक्रम साधणं म्हणजे एक प्रेरणादायी कहाणी आहे. तन्वीची कहाणी एक धाडसी महत्त्वाकांक्षा, कष्ट आणि आपल्या स्वप्नांच्या पुर्ततेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा दर्शवते. तिचा प्रवास हेच दर्शवतो की, स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी आपल्या साध्या गोष्टींमध्ये सुद्धा खूप सामर्थ्य लपलेलं असतं. आज तिने इंग्लिश खाडी पार करून सर्वांच्या मनात एक प्रेरणा भरली आहे आणि ती असेच धाडसी निर्णय घेणाऱ्या अनेक जणींसाठी एक आदर्श ठरली आहे. आपल्या स्वप्नांच्या मागे धावणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला तिच्या उदाहरणातून एक संदेश मिळतो तो म्हणजे " स्वप्नं जिवंत ठेवणं त्यांच्या हातात आहे, आणि ते पूर्ण करणे हीच आहे जीवनाची खरी श्रीमंती!"

### कुटुंबाचा भक्कम आधार :

तन्वीचे ध्येय खूप अवघड होते पण अशक्य नव्हते, यात कुटुंबीयांनी तन्वीला साथ देण्याचं ठरवलं. त्यात पती विप्लव, वडील किरण चव्हाण यांनी पुढाकार घेतला. घराची पूर्ण जबाबदारी तन्वीच्या सासूबाई मंगला ताईनी आपल्या खांद्यावर घेतली. तन्वीला घरी जी काही तयारी करावी लागणार होती, त्याची सर्व जबाबदारी तन्वीच्या आईने घेतली. तिथून पुढची दोन वर्ष तन्वीने पूर्णपणे आपल्या या इंग्लिश खाडी पोहून जाण्याच्या स्वप्नाला वाहिली.

### प्रशिक्षकांचं अतुलनीय योगदान :

श्री श्रीनाथ विश्वनाथन यांसारख्या अतिशय कठोर शिस्तीच्या आणि नावाजलेल्या प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली तिने पोहण्याच्या सरावाला सुरवात केली. तब्बल १८ वर्षांनंतर तिने पाण्यात सूर मारला तो इंग्लिश खाडी पोहून जाण्याच्या ध्येयपूर्तीसाठी. मनाची उभारी उत्तुंग होती पण शरीर तयार नव्हतं. सुरवातीच्या २० मिनिटातच शरीर थकून जायचं पण श्रीनाथ सरांच्या व कुटुंबियांच्या प्रोत्साहनात ती सराव करत राहिली. हळू हळू शरीर साथ देऊ लागलं. मिनिटांवरून तासांवर पोहणं शक्य होऊ लागलं. स्विमिंग पूल मध्ये पोहणे व समुद्रात पोहणे आणि इंग्लिश खाडी सारख्या अवघड जलस्रोतात पोहणे यात टोकाचा फरक होता. अर्थात हे तन्वीला चांगलेच ठाऊक होते. त्या समुद्रातलं खारट, बर्फासारखं थंडगार पाणी, उसळणाऱ्या लाटा, घोंगावणारा, थंडगार वारा, सारखं बदलणारं हवामान. काहीही पूर्वसूचना न देता, मधूनच उद्भवणारं समुद्री वादळ. हे सर्व कमी म्हणून त्या समुद्रातले जलचर यांच्यापासून बचाव करीत या सर्वांवर मात करून ३४ किलोमीटरच अंतर कापायचं होतं. त्यासाठी शारीरिक व मानसिक तयारी फारच भक्कम असली पाहिजे होती.

### निरंतर प्रयत्न आणि अखंड परिश्रमाला पर्याय नाही :

तन्वीने कालावधी वाढवत नेऊन सलग १२-१२ तास पोहण्याचा सराव सुरू केला. थंड पाण्याची सवय करण्यासाठी बाथटब मध्ये तासनतास बर्फात बसणं तिने सुरू केलं. नंतर तर सरळ नैनिताल गाठलं, तिथल्या ११ °C तापमान असलेल्या नैनी तलावाच्या पाण्यात पोहण्याचा सराव करण्यासाठी. त्या थंड

**(... पुढील पानावर)**

पाण्यामुळे शरीर आखडून जायला होई. हाताची बोटं, खांदे जाम होत. शरीर या सर्व वेदनांनी, थकव्याने नको नको म्हणे तेव्हा मानसिक ऊर्जा काम करी. नियमित ध्यान व योगा यांमुळे मानसिक स्वास्थ टिकून होतं.

ज्या दिवशी इंग्लिश खाडी पोहून जायचं होतं त्याच्या एक महिना अगोदर डॉवर, यु. के. च्या समुद्रकिनारी तन्वी व तिचे कुटुंबीय पोहोचले. डॉवरला जायच्या अगोदर सर्वात प्रथम तन्वीने तिरंगा सोबत घेतला होता. जिथे खरं पोहायचे आहे तिथल्या पाण्याशी, हवामानाशी, भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेणं जरुरी होतं. तिथल्या जून महिन्यात तापमान १४ ते २७ °C असतं म्हणूनच त्या दिवसांमध्ये इंग्लिश खाडी ओलांडण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातल्या त्यात थोडं कमी थंड पाणी स्पर्धेच्या दिवशी असू शकतं. स्पर्धेच्या दिवशी वातावरण ढगाळ असण्याची, गडगडाटाची व पावसाचीही शक्यता होती. तन्वी दररोज या समुद्रात सराव करत होती. त्या खाडीशी, तिथल्या पाण्याशी, हवेशी समरस होण्याचा प्रयत्न करत होती. एके दिवशी सराव करताना, समुद्रात एखादा किलोमीटर आत गेली असेल, या पूर्ण समुद्रात आपण एकटेच आहोत ही भावना क्षणभर दाटून आली. आजूबाजूला पाण्यावर धुक्याचा पडदा होता. तेव्हाच तिला जाणवलं की आपल्या पासून काही अंतरावर कुणीतरी पोहतंय, धुक्यामुळे नीट दिसत नव्हतं, बघूया कोण आहे ते. थोडं बोलूया त्याचाशी आणि परत फिरुया. तन्वी त्या आकाराकडे पोहत जाऊ लागली. ती काही अंतर पोहून त्या आकाराजवळ गेली. त्या वेळी तिला जे दिसलं त्याने ती हबकलीच. तिला जे दिसलं ते काहीतरी वेगळंच होतं. भल्या मोठ्या लिबलिबीत शरीराचा वरचा भाग निमुळता होत गेलेला. त्यावर तिला तीन काळे डाग दिसत होते, त्यातला मधला मोठा डाग म्हणजे त्याच तोंड होतं आणि वरचे दोन लहान डाग म्हणजे त्याचे डोळे होते. तेव्हढ्यात तो मोठा काळा डाग दोन भागात विभागला गेला, त्याने त्याच्या तोंडाचा आ वसला होता. तिथल्या धुक्याच्या पडद्या आडूनही त्याचे दोन भले मोठे अणकुचीदार सुळे दिसत होते, वरच्या जबड्यावरचे पांढरट लांब केस वाऱ्यावर थरथरत होते. तन्वी नखशिखांत घाबरली, तिचं सर्व शरीर बधिर झालं, त्या बर्फासारख्य पाण्यातही घाबरल्याने निर्माण झालेली उष्णता तिला जाणवली. सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता.

शक्य तितका पाण्याचा आवाज कमी होईल याची काळजी घेत तन्वी मागे फिरली, सावकाश किनाऱ्या कडे पोहू लागली, हळूच मान मागे वळवून तो जलचर प्राणी आपल्या मागे तर येत नाहीना हे बघत होती. मधूनच तो मान जोरजोराने हलवी पण तो जागचा हलला नव्हता. किनाऱ्यावर पोहोचल्यावर तन्वीला आपले पाय थरथरत असल्याचं जाणवलं. ५ ते ६ फुटांवरून बघितलेल्या त्या समुद्रीसिंहला तन्वी कधीही विसरू शकणार नव्हती. अशा पद्धतीने तिथल्या वातावरणाशी, पाण्याशी, पाण्यातल्या जीवांशी जुळवून घेत तन्वी जोमाने सराव करत होती.

### निसर्गाचे नवल म्हणजे इंग्लिश खाडी :

इंग्लिश खाडी, इंग्लंडची दक्षिण किनारपट्टी ते फ्रान्सची उत्तर किनारपट्टी दरम्यान आहे. याचा आकार साधारण नरसाळ्यासारखा. या दोन किनारपट्ट्यांमधलं सर्वात जवळचं अंतर ३४ किलोमीटर आहे, सर्वात जास्त अंतर २४० किलोमीटरच. तन्वी जर पोहोताना पश्चिमेकडे किंवा पूर्वेकडे ओढली जात राहिली तर तिचं अंतर वाढणार होतं. समुद्रातले प्रवाह हमखास तिला तसे ढकलणार होते, तेव्हा पायलटच मार्गदर्शन महत्वाचं ठरणार होतं. जर ती तिच्या मार्गातून भरकटली तर तिचं पोहण्याचं अंतर वाढणार होतं. साहजिकच वेळ जास्त लागणार होता, शरीर जास्त थकणार होतं, फ्रान्सचा किनारा गाठणं अजून अवघड होणार होतं . त्यात भर म्हणून त्या खाडी मधून होणारी जलवाहतूक. अतिशय व्यस्त असणारा हा जलमार्ग जो अटलांटिक महासागर आणि उत्तर समुद्राला जोडतो. प्रत्येक आडवं जाणारं जहाज समुद्रातल्या लाटांमधली नियमितता भंग करते जे तन्वीची कठोर परीक्षा घेणारे ठरणार होते. या खाडीला आत्तापर्यंत जगभरातल्या फक्त २००० लोकांनीच पार केलं. या मोहिमेसाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या परवानग्या, त्यासाठीच्या कागदपत्रांची जुळवाजुळव, जे खूप मोठे व कटकटीचं काम असतं , ती पूर्ण बाजू तन्वीच्या पती व वडिलांनी सांभाळली होती. त्यांना तन्वीचे प्रशिक्षक विश्वनाथन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले होते.

इंग्लिश खाडी पोहून जाण्यासाठी काही मानदंड होते जे अगोदर पूर्ण करणे गरजेचे होते. इंग्लिश खाडी पोहण्यासाठी तुम्ही शारीरिक दृष्ट्या सुदृढ आहात याचं प्रमाणपत्र, इंग्लिश खाडी पोहून जाण्यासाठी "द चॅनेल स्वीमिंग असोसिएशन" (CSA) मध्ये ३० एप्रिलच्या आत योग्य ती फी भरून नोंदणी करणे आवश्यक असते. स्पर्धेच्या दिवसाच्या कमीतकमी दोन ते अडीच वर्ष आधी तुमचा पायलट नियुक्त झालेला असला पाहिजे. तो CSA नियुक्त पायलट असला पाहिजे. सर्वात जास्त अनुभवी पायलट मिळणं अतिशय महत्वाचं. त्याच बरोबर तुमचा जन्म तारखेचा दाखला; तुमचं वय १६ ते ५५ वर्षे दरम्यान असलं पाहिजे आणि 15°c किंवा त्या पेक्षा कमी तापमानाच्या पाण्यात सलग ६ तास पोहण्याच प्रमाणपत्र. हे सर्व पती व वडिलांनी समर्थपणे सांभाळले.

### खाडी पार करण्याचा क्षण :

सरते शेवटी खाडी पार करण्याचा दिवस उगवला. दोन वर्षांच्या प्रदीर्घ तपश्चर्येने समुद्रदेवतेला प्रसन्न करण्याचा दिवस उगवला.आज तर समुद्र तिची कसून परीक्षा बघणार होता. २९ जून २०२४ च्या पहाटे ३.३० वाजता तन्वी इंग्लंडच्या समुद्रकिनाऱ्यातल्या पाण्यात शिरली. पाणी अतिशय थंड होतं. घोंघावणारा थंडगार वारा किनाऱ्यावर आणि तन्वीच्या शरीरावर आदळत होता. मनातल्या विचारांच्या काहुरासह ती पाण्यात उतरली. तन्वीचा सराव प्रामुख्याने धरणातल्या पाण्यात, भारतीय वातावरणात झालेला होता. स्पर्धेपूर्वी साधारण एक महिन्यापासून ती या खाडीला ओळखण्याचा, पारखण्याचा प्रयत्न करत होती. त्या जोरावर तिचा प्रत्येक स्ट्रोक पाण्यावर पडत होता. तन्वीचं इंग्लिश खाडीमधून पोहणं सुरू झाल्यानंतर पहिलं आव्हान तिच्या समोर आलं ते पोहण्याच्या प्रवासात अन्न पोटात घेण्याचे. एका दोरीने हे अन्न, पेय तिच्यापर्यंत पोहोचवलं जायचं कारण तिचा बोटीला वा बोटीवरच्या कुठल्याही व्यक्तीचा स्पर्श होऊन चालणार नव्हतं. दोरीने तिच्या पर्यंत पोहोचलेले अन्न, ज्यात प्रकर्षाने भारतीय पदार्थ होते जसे डिंकाचा लाडू, नागलीचा लाडू तिला खाणे अवघड जात होतं. सारखा उसळ्या मारणारा समुद्र, त्याचं खारट पाणी अगोदरच तोंडात जात होत, खाण्याच्या डब्यात शिरत होत. साधारण साडेपाच तास झाल्यानंतर थंडगार पाण्यामुळे तिची बोट आकसली होती त्या मुळे तिला अन्न पदार्थ ठेवलेल्या डब्याचं झाकण पटकन उघडता येईना. या आव्हानाची पूर्वतयारी तिला करता आली नव्हती. अशा परिस्थितीत तिला एका मिनिटात खाणं उरकायचं होतं. पुढे येऊ घातलेल्या आव्हानांचा जोर कमी करण्यासाठी वेळ अतिशय महत्वाचा होता.

प्रत्येक दोन तासांनी समुद्राचं रूप बदलत होतं. समुद्राच्या पाण्याचा रंग बदलत होता. खुल्या समुद्रात येणाऱ्या लाटांमध्ये सुसूत्रता असते. दर दोन मिनिटांनी किंवा चार मिनिटांनी एक मोठी लाट येणार, पाच मिनिटांनी लहान लाट येणार. हे सूत्र इथला समुद्र पाळायला तयार नव्हता. त्यामुळे तन्वीला अंदाज घेणं जाड जात होतं. त्यात जेव्हा तन्वी सेपरेशन झोन जवळ पोहोचली, जिथे इंग्लंडचं पाणी आणि फ्रान्सचं पाणी एकमेकांत मिसळते, त्या भागातून मोठमोठाली जहाज, ट्रेलर्स जातात त्या मुळे लाटांच्या स्वरूपात बदल होतो. या भागात पोहताना फ्रेंच किनाऱ्याकडे सरकण्याऐवजी ती इंग्लंडच्या किनाऱ्याकडे ढकलली जात होती. हे कमी म्हणून जेलीफिशच्या रूपाने अजून एक संकट उभं ठाकलं. या भागात जेलीफिशचे थवेच्याथवे दिसू लागले. कितीही प्रयत्न केला तरी त्यांना चुकवून पुढे जाणं जड जात होतं. त्यांच्या नुसत्या स्पर्शाने तन्वीच्या सर्वांगाचा दाह व्हायला सुरवात होई, असह्य वेदना होत. त्या सहन करण्या पलीकडे कुठलाही पर्याय तिच्याकडे नव्हता. वेदनांनी बेजार होऊन ती

प्रशिक्षकांना सांगत होती पण ते तिला फक्त एकच गोष्ट ठणकावून सांगत होते, " चाल पुढे जा, अजून तुझा वेग वाढव. यांच्यातून बाहेर पड." थांबणं हा पर्याय तिथे नक्कीच नव्हता. तन्वीने पोहायला सुरवात केल्या पासून १४ तास होऊन गेले होते, कुठेही विश्रांती न घेता. ती यांत्रिकपणे हात मारत होती. त्यात समुद्राचं रूप पूर्णपणे बदललेलं होतं, भयानक मोठ्या लाटा उसळायला लागल्या होत्या. त्यातल्या काही अर्धा ते एकमजली इमारतीएवढ्या एवढ्या उंच होत्या.

तन्वीला आता भास होऊ लागले होते. वेगवेगळे आवाज ऐकू येऊ लागले. मधूनच बोटीवरून तिच्या पतीने दिलेले आवाज ऐकू येत होते, वडिलांचेही शब्द ऐकू येत होते. "होईल बेटा, थोडंसच राहीलं, खरोखर थोडं राहीलं "वडिलांचा आवाज ऐकून जणू ती भासातून जागी झाली, "किनारा दिसतोय का तिथून?" तिने जिवाच्या आकांताने ओरडून विचारलं. शरीरातली ताकद संपली होती, तिचा प्रत्येक स्नायू वेदनेने आक्रोशत होता. तिच्या वडिलांनी बोटीवरून ओरडून सांगितलं, "हो खूप क्लिअर दिसतंय आम्हाला ते." त्या शब्दांनी तिच्या मनाने उचल घेतली. होती नव्हती ती शक्ती एकवटून ती फ्रान्सच्या किनाऱ्याकडे सरकू लागली. आत्तापर्यंत तिच्या बरोबर इंग्लिश खाडी पोहण्यासाठी उतरलेल्या तीन जणांनी माघार घेतली होती. ते त्यांचा मदरबोटीवर परतले होते. त्यातल्या दोन जणांना हायपोथर्मियाची ( Hypothermia ) लागण झाली होती. यात शरीराची उष्णता कमी होऊ लागते. शरीर जेवढी उष्णता निर्माण करते त्यापेक्षा जास्त उष्णता शरीरातून बाहेर पडते. साहजिकच शरीराचं तापमान कमी व्हायला लागतं. जेव्हा ते ३५°C ( ९५°F ) होत तेव्हा त्याला वैद्यकीय आणीबाणी म्हणून घोषित करण्यात येतं. त्या परिस्थितीत तात्काळ वैद्यकीय उपचार करण गरजेचं असतं. म्हणजेच स्पर्धेतून बाद होणं.

बोटीवरचा निरीक्षक सारखा स्पर्धा सोडून देण्यावर जोर देत होता, ती हे करू शकणार नाही, अशी नकार घंटा ठणठणा करत वाजवत होता. किरण चव्हाण द्विधा स्थितीत होते. आपण उगाच तन्वीला या स्पर्धेची परवानगी दिली असं त्यांना वाटू लागलं. आपण आपल्या मुलीला कायमचं दुरावणार तर नाही ना, हा विचार एका क्षणासाठी त्यांच्या मनात चमकून गेला. कारण ज्या भागातून तन्वी आत्ता पोहोत होती तो भाग "तरणपटूंची कबर" या कुप्रसिद्ध नावाने ओळखला जात होता, हे तिथल्या सर्वांनाच माहित होतं. आतापर्यंत कमीतकमी १० अतिउत्तम जलतरणपटूंनी आपला जीव याच ठिकाणी गमावला होता. शेवटचा बळी या खाडी ने २०१७ साली डग्लस वेमार्कचा घेतला होता.

तन्वीने स्पर्धा सुरू होण्याअगोदर आपल्या वडिलांना मिठी मारत सांगितलं होत, "पप्पा, काहीही झालं तरी मला पाण्याच्या बाहेर काढायचं नाही. मी पाण्यातून बाहेर येईल ते फ्रांसच्या किनाऱ्यावरच."

किरण चव्हाणांना तन्वीचे ते शब्द आठवत होते. तरी आपल्या मुलीची एकंदरीत स्थिती बघून तिला पाण्यातून बाहेर काढावं व परत जावं असं जवळजवळ त्यांनी ठरवलं होतं, त्यावर ते विप्लवशी बोलणार होते. इकडे मात्र विप्लव तन्वीला प्रोत्साहित करण्याचे सर्व प्रयत्न करत होता. इंस्टाग्राम वरच्या प्रतिक्रिया तिला जोरजोरात सांगत होता, “सर्व भारताच्या नजरा तुझ्यावर खिळल्या आहेत, सर्व तुला चिअर अप करत आहेत.”

बोटीवरून भारताचा तिरंगा दाखवत तो म्हणत होता " आपल्या भारतासाठी करायचंय तन्वी; कमॉन, यू कॅन डू." मधूनच तिला तिच्या दोन्ही तान्हुल्यांच्या आवाजाचा भास होत होता. "कमॉन मम्मी, यू कॅन डू." "कमॉन मम्मी, यू कॅन डू." "जलतरणपटूंची कबर" म्हणवल्या जाणाऱ्या भागात एक संग्राम सुरु झालेला होता राकटरुद्र समुद्र विरुद्ध तन्वीचे जीवन, ध्येय, शारीरिक-मानसिक खंबीरता आणि जिवाच्या आकांताने ध्येय जवळ करण्याची पराकाष्ठा.

विश्वनाथन सरांना पायलट सांगत होता, “तन्वी तिच्या मार्गातून भरकटतेय, समुद्री प्रवाह तिला बाजूला घेऊन चाललेत. अशाने आपण किनाऱ्यावर पोहोचणारच नाही. जर तिने पुढचे ३० मिनिट एका सरळ रेषेत पोहणं केलं नाही, तर आपण परत फिरणार. त्याला पर्याय नाही.” विश्वनाथन सरांनी तन्वीला परिस्थितीची जाणीव करून दिली, " तू साधारण ३० किलोमीटर पोहून आली आहेस, हे तुझं वॉर्मअप होतं. इथून खरी इंग्लिश खाडी सुरु झालेली आहे, तेव्हा अगदी सरळ रेषेत पोहोत राहा, नाहीतर ते तुला पाण्यातून बाहेर काढतील.” इथला समुद्र अजूनच खवळलेला होता. तापमान अजून खाली घसरलेले होतं. विश्वनाथन सर तिला सांगत होते, "नाऊ ऑर नेव्हर" तन्वी साठी तिच्या प्रशिक्षकांचे शब्द सर्व काही होतं. पुढचे ३० मिनिट तन्वी सरळ रेषेत पोहोत राहिली ! हे कसं झालं? त्याला कारण आपल्या प्रशिक्षक व गुरूवरचा विश्वास. त्यांची आज्ञा प्रमाण मानणं. या अर्ध्या तासानंतर पायलट त्याच्या केबिन मधून तीरासारखा धावत बाहेर आला, तन्वी कडे बोट करून मोठयाने तो म्हणाला, " तन्वी, यू आर गुड. नाऊ यु आर इन सेफ झोन." ‘तन्वी तू छान करतेस. तू आता सुरक्षित भागात आली आहेस.’ पायलटच्या या एका वाक्याने बोटीवरचं वातावरण क्षणार्धात बदललं. एक वेगळाच हुरूप विश्वनाथन सरांना, किरण चव्हाणांना आणि विप्लवला जाणवला. किरण चव्हाणांच्या मनातले सर्व नकारार्थी विचार विरघळून गेले. आता तिघंही तन्वीला या शेवटच्या तीन चार तासांच्या मार्गक्रमणासाठी प्रोत्साहीत करू लागले. भारताचा तिरंगा दाखवून तिला उत्साहित करू लागले. " स्विम फॉर इंडिया" म्हणून तिला बळ देऊ लागले.

तन्वी आता सर्व शारीरिक वेदनांच्या पलीकडे गेलेली होती. मन संभ्रमित होत होतं. "जलतरण पटूची कबर" म्हटल्या जाणाऱ्या भागातून तन्वी पुढे सरकली होती. तिचा उजवा हात बिलकुल हालत नव्हता, त्यात प्रचंड वेदना होत होत्या. ती बराच वेळ डावा हात आणि दोन्ही पायांनी पोहोत होती. तन्वीला इंग्लिश किनारा सोडून १६ तास होऊन गेले होते. तिला समोर फ्रेंच किनाऱ्यावरचे दिवे दिसत होते. पण ती एक हात मारून जेवढी पुढे जाई, त्याच्या चारपट ती मागे ढकलली जात होती. तिला थंडी वाजायला लागली होती पण ते ती बोटीवरच्याना सांगू शकत नव्हती. जर बोटीवरच्या निरीक्षकाला कळलं असत की तिला थंडी वाजतेय तर त्याने तिला लगेच पाण्याच्या बाहेर काढलं असतं. तिचं आता थोडंथोडं डोकंही दुखायला लागलं होतं. डोळे सुजलेले होते, शरीरातली प्रत्येक पेशी थकली होती. मन उबदार पांघरुणासाठी, मुलांच्या इवल्याशा कोवळ्या हातांच्या, गालांच्या स्पर्शासाठी व्याकुळ झालेले होतं. अर्धग्लानीत जणू हे सर्व ती अनुभवत होती.

१७ तास ४२ मिनिट झाली होती, किनाऱ्यावरचे दिवे तिला लुकलुकताना दिसत होते, त्याच वेळी तिला हवा असलेला फ्रेंच किनाऱ्यावरच्या वाळूचा स्पर्श तिच्या गुडघ्यांना झाला. तन्वी जिंकली होती. ३४ किलोमीटर ऐवजी तिला ४२ किलोमीटर अंतर कापावं लागलं होतं.त्याला कारण समुद्रातले प्रवाह. दोन वर्षांच्या घनघोर तपश्चर्येचं फळ मिळालं होतं. इंग्लिश खाडी पार करून जाणारी, भारतातली पहिली माता. तन्वी विप्लव चव्हाण देवरे, दोन मुलांची आई. तिने तिचं नाव या जगाच्या इतिहासात कायमचं कोरलं होतं. पहिली भारतीय माता होण्याचा मान तिने मिळवला होता. हा विक्रम कुणालाही तोडणं शक्य नव्हतं. तिने भारताची मान अभिमानाने उंचावली होती.

सुखी, समृद्ध आयुष्य सोडून, सेफ़झोन मधून बाहेर पडून तिने तिचं स्वप्नं साध्य केलं होतं. हे अविरत परिश्रम, स्वतःला मृत्यूच्या मुखापर्यंत घेऊन जाणं, शरीराच्या सहनशक्तीची अंतिम टोकापर्यंत परीक्षा घेणं. मनाला, भावनांना प्रत्येक वेळी आव्हान देणं. हे सर्व तन्वीने केलं नसतं तरी तिचं सुखी समृद्ध जीवन सर्वसामान्यांसारखं पुढे जात राहीलं असतं. पण, ती तन्वी होती. संस्कृत शब्द "तनु" ज्याचा अर्थ 'नाजूक' असा होतो, या वरून तन्वी हे नाव. तन्वी हे दुर्गादेवीचे विशेषण ही आहे!

“जर तुम्ही ठरवलं, तर काय करू शकता” याचं उदाहरण म्हणून "तन्वी विप्लव चव्हाण देवरे" इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय माता, या व्यतिरिक्त काय असू शकतं?

# ...आणि मी नगर रचनाकार झाले !

माझे बारावीपर्यंतचे शिक्षण नाशिक जिल्ह्यातील 'नांदगाव' या तालुक्याच्या पण छोट्या गावात झाले. वडील शिक्षक असल्याने शिक्षणाचे आणि आर्थिक स्वावलंबनाचे बाळकडू मिळाले होतेच. पण कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणे शिक्षक, डॉक्टर किंवा इंजिनिअर या धोपट मार्गांवर न जाता काहीतरी वेगळे करावे अशी जिद्द होती. अशातच 'आर्किटेक्चर' या नावातच एक डिग्री कोर्स असल्याचे समजले. त्यावेळी माझ्या गावातून अगदी दोघा तिघांनीच हा मार्ग निवडला असल्याचे देखील समजले. खरे तर घरच्या आर्थिक परिस्थितीच्या तुलनेत हे शिक्षण महागडे होते. मात्र त्याची तमा न बाळगता हट्टाने नाशिक येथील 'मराठा विद्या प्रसारक समाज' या संस्थेच्या आर्किटेक्चर कॉलेजला प्रवेश घेतला. इतर व्यावसायिक महाविद्यालयांच्या साचेबद्धपणाला तडा देणारी येथील शिक्षण पद्धती मला विशेष भावली. पाच वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करताना माणूस/ व्यक्ती म्हणून देखील घडत गेले.

आर्किटेक्चरच्या शेवटच्या सेमिस्टरला डेझर्टेशनचे (Dissertation) काम पूर्ण न झाल्याने मी अंतिम परीक्षा देऊ शकले नाही. मग एका खाजगी आर्किटेक्चरल फर्म (Architectural Firm) मध्ये जॉब करून डिग्री पूर्ण करायचे ठरवले. पण त्याच दरम्यान माझे लग्न झाले. पूर्ण वेळ जॉब मधून वेळच न मिळाल्याने डेझर्टेशन (Dissertation) मागे पडायला लागले आणि परीक्षा आणि कॉलेजबद्दल एक भीती माझ्या मनात निर्माण झाली. अशावेळी माझे कुटुंबीय आणि कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती बस्ते मॅडम व श्रीमती भट मॅडम यांनी माझे मनोधैर्य उंचावले. मला प्रोत्साहित केले व शेवटच्या टप्प्यावर अडकलेली माझी B. Arch ची डिग्री मला मिळाली.

लहानपणापासून अभ्यासाबरोबरच अभ्यासेतर उपक्रमांमध्ये (Extra Curricular Activities) देखील टॉपर्स मध्ये गणल्या जाणाऱ्या माझ्यासाठी हा मोठा धक्का होता. पण त्यातून बाहेर पडत पुन्हा एकदा जिद्दीने मी पदव्युत्तर पदवीचा (Post Graduation) ध्यास घेतला. मात्र पुढील शिक्षण घेताना माहेर किंवा सासरच्या लोकांवर आर्थिक भार पडू नये यासाठी स्कॉलरशिप द्वारे पी.जी.शिक्षण करायचे हा माझा हट्ट होता. नुकत्याच सुरू झालेल्या संसारातील जबाबदाऱ्या आणि स्वतःचा जॉब सांभाळत GATE परीक्षेची तयारी केली. त्यात एकीकडे मी पात्र (Qualify) देखील झाले पण दुसरीकडे मातृत्वाची चाहूल देखील लागली. कुटुंबाला प्राधान्य देत मी वर्षभर थांबले. पुढच्या वर्षी पुन्हा Gate परीक्षा उत्तीर्ण होत Qualify केली. माझ्या अवघ्या महिन्याच्या मुलीला कुशीत घेत पुण्याच्या सी.ओ. इ. पी. (COEP) या नामांकित शासकीय महाविद्यालयात नगर रचना (Town & Country Planning) या एम.टेक. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला.

काही दिवस मुलीला आई आणि सासुकडे सोपवत माझी पदवी पूर्ण करून मी पुन्हा कॉलेजमध्ये वेगळ्या भूमिकेत दाखल झाले. दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या नगररचना विभागात एम. पी. एस. सी. द्वारे उत्तीर्ण होऊन निवड झाल्याने मी शासकीय सेवेत सहायक नगररचनाकार या गट ब (class-II) पदावर रुजू झाले. त्यामुळे लागलीच महाविद्यालयाचा निरोप घ्यावा लागला. नगररचना विभागात कार्यरत असतानाच पुनश्च एकदा एम. पी. एस. सी. द्वारे मी 'नगररचनाकार' या गट- अ (Class I) पदावर निवडले गेले. त्यानंतर चारच वर्षांत माझी पदोन्नती झाली. सध्या 'सहायक संचालक' नगर रचना या पदावर कार्यरत आहे याचा खूप अभिमान वाटतो.

'काहीतरी वेगळे करावे' या ध्येयाने सुरू झालेला माझा प्रवास आर्किटेक्चर शाखेतून शासकीय सेवेपर्यंत येऊन पोहोचला. आर्किटेक्ट म्हणून इमारत किंवा संकुलाचे आराखडा करण्यापेक्षाही नियोजनकार (Planner) म्हणून शहर किंवा जिल्हा अशा व्यापक स्तरावर काम करण्याचा आनंद वेगळा आहे. समाज स्तरावर मोठ्या प्रमाणात (Larger Scale) योगदान देता येत असल्याचे मोठे समाधान मला माझ्या या कामातून मिळत आहे.

जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर अनेक महिला बहुविध क्षेत्रांत उत्तमोत्तम कामगिरी करत आदर्श निर्माण करीत आहेत. अशावेळी आपणही खारीचा वाटा उचलत आपल्या कुटुंबाच्या, शिक्षकांच्या, मित्रपरिवाराच्या पर्यायाने समाजाच्या नजरेत थोडेसे अभिमानाचे भाव उतरवू शकलो याहून मोठे बक्षीस ते काय !

**आर्कि. दिपाली सागर पाटील**
B. Arch, M. Tech (T&CP)
सहायक संचालक, नगर रचना ,
नगररचना व मूल्य निर्धारण विभाग महाराष्ट्र राज्य.



# फ्रॉम लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स

आपण कोणत्या घरात जन्म घेणार, आपल्याला आई-वडील कोण मिळणार, आपण कोणती जात-धर्म, लिंग, रंग घेऊन जन्माला येतो यातलं काहीच आपल्या हातात नसतं, असतं ते फक्त आहे ती परिस्थिती उत्तम घडवणे आणि यश प्राप्त करणे. साधारण प्रत्येक मनुष्य हे करतोच परंतु आपल्या वाट्याला जे दुःख आले, ज्या संकटांचा सामना आपण केला, त्यातून आदर्श परिस्थिती घडवून दुसऱ्यांसाठी मार्गदर्शक होणे, त्यांच्या आयुष्यातील छोट्या का होईना आनंदाच्या क्षणाचे आपण कारण व्हावे अशा पद्धतीने जगणारी माणसं निराळीच.

काजल बोरस्ते असंच एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व... कुटुंबाची गरिबी कधी तिच्या शिक्षणाच्या आड आली नाही अथवा साधे वॉचमन असलेल्या वडलांना कुटुंब सांभाळून दोन अपत्यांच्या शिक्षणाला पैसा पुरविणे किती तारेवरची कसरत होती याचे कधी तिने भांडवल केले नाही. घरातील पहिलीच मुलगी (अपत्य) जी अनेक पिढ्यानंतर प्राथमिक शिक्षणाच्या पुढे शिकणारी, एवढ्यावरच न थांबता सायन्स मध्ये पदवी आणि आता जागतिक स्तरावरील मानांकित अशा 'लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स' मध्ये शिवनिंग शिष्यवृत्ती मार्फत शिकणारी काजल बोरस्ते उलगडतेय आपला प्रवास...

### वक्तृत्व स्पर्धांनी दिली विधायक दृष्टी :

शासकीय कन्या विद्यालय नाशिक येथे शिकताना अभ्यासातील चुणूक तर तिने दाखवलीच त्याचबरोबर वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांत तिचा रस वाढला. सुरुवातीला अनेक स्पर्धांत बोलायची भीती, अपयश यातून ती शिकत गेली. इयत्ता आठवीतच तिने वक्तृत्व स्पर्धेत दिल्लीत राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. काजल सांगते, "महाविद्यालयात गेल्यानंतर मी प्रत्येक वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेत भाग घ्यायचे, मी बी. एस्सी फिजिक्सची विद्यार्थिनी. वक्तृत्वाच्या विषयांच्या तयारीसाठी मग वेगवेगळी पुस्तके, वर्तमानपत्रातील संपादकीय, वृत्तवाहिन्यांवरील चर्चा असा चौफेर अभ्यास करावा लागे. हा अभ्यास माझ्या वैचारिक अभिसरणास महत्त्वपूर्ण ठरला. या स्पर्धांनी संभाषण कौशल्ये वाढलीच पण महत्त्वाचे म्हणजे राज्यभर स्पर्धेच्या निमित्ताने समविचारी मित्रांशी गट्टी जमली. विविध महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक जे प्रसिद्धीच्या आड राहून सामाजिक विषयांत उत्तम काम करीत आहेत त्यांचे मार्गदर्शन मिळत गेले. महत्त्वाचे म्हणजे मला आयुष्यात काय करायचे आहे याची दिशा नक्की झाली."

### शासकीय कन्या विद्यालय ते L.S.E. :

छोट्याशा घरात अभ्यास करताना अनेक अडचणी येत, सुविधांची वानवा, मार्गदर्शनाचा अभाव यामुळे बालपण सर्वसाधारण होते. गरजेपुरता साक्षर असणाऱ्या आईवडिलांनी माझ्यावर विश्वास ठेवत शिक्षणास पाठिंबा दिला, मीही झटून अभ्यास करीत शिष्यवृत्ती, वक्तृत्व स्पर्धांतील बक्षिसांची रक्कम, समाजातील संवेदना जागृत असणाऱ्या लोकांची मदत अशा पद्धतीने सायन्स मध्ये पदवी घेतली. तोपर्यन्त मला पुढे काय करायचे आहे याची समज पक्की असल्याने मी 'वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन' विषयात पदव्युत्तर पदवी करण्याचा निर्णय घेतला, कारण कुठल्याही नोकरीत आर्थिक सक्षमता तर आपसूकच येते परंतु मी इतकी वर्ष वक्तृत्व-वादविवाद स्पर्धांतून मांडलेल्या समस्या आणि त्यावरचे उपाय यावर मला प्रत्यक्षरित्या काम करायचे होते आणि पत्रकारिता क्षेत्रात यास योग्य संधी आणि वाव मिळणार होता. त्यानंतर मी नाशिकच्याच 'अभिव्यक्ती मिडिया फॉर डेव्हल्पमेंट' या संस्थेत काम करण्यास सुरुवात केली. यात महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागातील 'दलित आणि आदिवासी मुलींची स्थिती आणि त्यांचे सक्षमीकरण' या विषयावर काम करण्यास सुरुवात केली. यात जवळपास ५-६ वर्षे काम करून सरकारी धोरणे, योजना, त्यांचे फायदे-तोटे आणि मुलींच्या अधिक सक्षमीकरणासाठी सुयोग्य धोरणात्मक बदल अशा स्वरूपात काम पाहिले. त्यानंतर मुंबईतील काही संस्थांसोबत अशाच पद्धतीने काम केले.' असं काजल सांगते.

हे काम करीत असताना यातील अजून बारकावे जाणावे, संशोधनात्मक शिक्षण घ्यावे आणि जागतिक पातळीवर स्त्री सक्षमीकरण विषयात काय प्रगती आहे ह्यासाठी पदव्युत्तर पदवी घ्यावी असा विचार काजलच्या मनात डोकावला. परंतु परदेशात शिक्षण घ्यावे तर लाखो रुपये खर्च येणार आणि तो आपल्याला झेपणार नाही यासाठी काजलने शिष्यवृत्तीचा शोध घेतला. 'ब्रिटीश सरकारच्या शिवनिंग शिष्यवृत्ती' विषयी तिला माहिती मिळाली. ही शिष्यवृत्ती मिळणे खरेतर एक अग्निपरीक्षाच आहे. जगभरातून हजारो विद्यार्थी यास अर्ज करतात परंतु हे शिक्षण घेण्यामागे तुमचा उद्देश, भविष्याच्या योजना, कामाचा अनुभव आणि तुमच्या शिक्षणाचा समाजाला काय उपयोग होणार अशा बारकाव्यांतून मुलाखत घेतली जाते. ही शिष्यवृत्ती मिळण्याचे प्रमाण हजारो विद्यार्थ्यांत अगदी १०-१२ जणांना आहे. काजलने ही स्पर्धाही जिंकली आणि सध्या अगदी प्रतिष्ठेच्या 'लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स' या शैक्षणिक संकुलात 'एम.एस्सी इन जेंडर डेव्हलेपमेंट ॲण्ड ग्लोबलायझेशन' या विषयात पदव्युत्तर पदवी घेतेय. ज्या संकुलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकले तिथे शिष्यवृत्ती मिळवून आपणही शिकावे ही बाब प्रेरणा देते. असं काजल अभिमानाने सांगते.

### स्व दुःखातून पर कणव :

शिक्षण मिळण्यासाठी झगडलेल्या काजलने मोठ्या पगाराच्या नोकरीचे स्वप्न न पाहता, आपल्या सारख्या हजारो मुलींची स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत पोहचल्यानंतरही काय स्थिती आहे, शहराबाहेरच्या अतिदुर्गम भागातील विशेषतः दलित, आदिवासी आणि वंचित घटकातील तरुण मुलींची रोजच्या जगण्याची लढाई, शैक्षणिक वाताहत, दृश्य-अदृश्य लैंगिक अत्याचार या सर्व विषयांवर तंत्रशुद्ध अभ्यास करण्याचा पर्याय निवडला, तिच्या आजवरच्या संस्थात्मक कामातून देश-विदेश पातळीवर महिलांची आर्थिक-सामाजिक - शैक्षणिक स्थिती आणि ती उत्तमोत्तम करण्यासाठी शासकीय-संस्थात्मक स्तरावर आणि विशेषतः तरुणांच्या माध्यमातून काय धोरणात्मक बदल करता येऊ शकतील यावर ती काम करते आहे.

आता 'लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स' मधून याच विषयावरील उत्तम ज्ञान आणि अनुभव घेऊन समृद्धतेने आणखी भरीव काम करता येईन असा विश्वास काजल व्यक्त करते.







# आंबई ते आय.आय.टी.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे पूर्ण झालीत पण आजही इथल्या काही दुर्गम भागात अगदी प्राथमिक सुख-सुविधाही पोहचल्या नाहीत. अशाच सोयीसुविधांचा अभाव असलेल्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आंबई या छोट्याशा गावात माझा जन्म झाला.माझ्या गावात चौथीपर्यंतच शाळा आहे .आता परत एका वर्गाची त्यात भर पडली एवढेच काय ते. पण पुढील शिक्षणासाठी पायपीट आलीच. जवळच्या अंबोली गावात ७ वी पर्यत शिक्षणाची सुविधा आहे. पण आंबईतील शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलांना दीड किलो मीटर पायी चालत जावे लागते. त्यापुढील ८ वी ते १० वी शिक्षणासाठी आंबोली आणि आंबई या दोन गावांच्या मध्यभागी असलेल्या कॉम्रेड नाना मालुसरे शाळेत जावे लागते. आजमितीला शिक्षणासाठी आमच्या गावातील मुलांना दीड ते दोन किलोमीटर पायी चालत जाणे अटळ असते. पावसाळ्यात मात्र आमचा हा दीड किलोमीटरचा प्रवास अधिकच खडतर असायचा.

पण शिक्षणाच्या ओढीने आम्ही चालत राहायचो. कारण अंधारावर मात करून आयुष्यात प्रकाश आणण्याचे हेच एकमेव दार आमच्यासमोर होते हे लक्षात आले होते. १० पर्यंत कॉम्रेड नाना मालुसरे या शाळेत शिकले आणि आता शिक्षणाचा ११ व १२ वीचा पुढचा टप्पा म.वि.प्र.समाज संचलित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय त्र्यंबकेश्वरमध्ये पूर्ण केला.

माझ्या घरची परिस्थिती तशी बेताचीच. वडील देवराम नवसू लचके व आई मीराबाई अडाणी, अशिक्षित. आम्ही साळू, मथुरा, शेवंता, फशा व द्रौपदा अशा पाच बहिणी. मी चार नंबरची मुलगी. मोठ्या दोन बहिणींची लग्नं झालेली. आम्ही तिघी शिक्षण घेत होतो. पण पोटाची भूक आणि शिक्षणाची भूक या दोन्हीसाठी आई-वडिलांचे कष्ट अपुरे पडत होते. कारण शेतीचा एक छोटासा तुकडाच काय तो आमच्याकडे, यामुळे हे सारं आई- वडिलांना झेपत नव्हते. यामुळे १० वी नंतरचं शिक्षण तीन नंबरची बहीण घेऊ शकली नाही. मला मात्र खूप शिकायचे होते आणि बहिणींनाही मला शिकवायचंच होतं.लहान पणापासूनच मला शाळा, अभ्यास हे सारं मनापासून आवडायचं. याची पावती म्हणजे शिक्षक घरी येऊन सांगायचे ,"मुलगी हुशार आहे तिला हवं तेवढं शिकू द्या बरं." त्यामुळे मला पुढे शिक्षणाचा हुरूप यायचा. पण समोर अनेकदा समस्यांचा डोंगर वाढलेला दिसायचा आणि वाटायचं संपलं आता सारं. माझी शिक्षणाची ओढ पाहून आई-वडिलांनाही वाटू लागले की फशाबाईचं शिक्षण पुढे सुरू राहायलाचं हवं. यासाठी आपण ढोर मेहनत करू पण तिला शिकवूच. त्यांचा हा आशावाद मला पुढे पुढे जाण्यासाठी सतत प्रेरणा देत गेला आणि मी ही पुढे शिकायचं ठरविलं. मग कितीही अडचणी आल्या तरी त्या साऱ्यांवर मात करून मी पुढे जाणार होते.

१० वीत पहिली आल्यामुळे गावातील सुशिक्षित लोकांनी पुढे सायन्स घेण्याचा सल्ला दिला. मीही सायन्स घेतलं.त्यामुळे माझा पुढचा शिक्षणाचा प्रवास त्र्यंबकेश्वर मधील कला,वाणिज्य व विज्ञान कॉलेजमध्येच सुरू होणार होता. पण यासाठी घरापासून दूर होस्टेलला राहायचे होते आणि मीही यासाठी सज्ज झाले. सुट्ट्यांत घरी गेले की आई-वडिलांसह मी आणि माझ्या बहिणी शेतात राबायचो पण यामुळे मी अधिक कणखर होत गेली. कारण शेतात जेव्हा तण यायचं ते पुन्हा पुन्हा उपटून टाकावं लागायचं पण जगातील कोणताच शेतकरी याला कधीच कंटाळला नाही. तो त्याची मेहनत करतच राहिला हा दृष्टिकोन मला माझ्या जगण्याकडे आणि शिक्षणाकडे पुढे जाण्यासाठी सतत प्रवृत्त करत राहिला. मला जेव्हा जेव्हा वाटायचं संपलं सारं तेव्हा शेतातील वाढणाऱ्या तणाला वारंवार काढून टाकणारा शेतकरी दिसायचा. मग मी ही तणासारखी डोक्यात येणाऱ्या निराशेवर मात करायची. आणि म्हणायचे "फशा 'अगं हे सारं सोपं नसलं तरी एवढंही अवघड नाही.आपण यावर मात करुच. आपल्याला चालावंच लागेल. न थकता,न थांबता."

ग्रामीण भागातील साऱ्याच मुलांचं इंग्रजी जेमतेम असतं आणि मी तर अगदी छोट्याशा गावातील. माझंही इंग्रजी अगदीच बेताचंच होतं. कधी घर सोडून मी एकटी राहिलेली नव्हती. यामुळे वर्गात गेले की मला बावरल्यासारखं व्हायचं. सुरुवातीला तर मी कार्बनचं स्पेलिंग लिहिताना 'के' ने सुरुवात केली. मी खूपच भांबावले होते. हे सांगण्याचं बळही माझ्यात नव्हतं. अशावेळी वाटायचं "फशा तुला हे जमेल ? तेव्हा आतून आवाज यायचा नक्कीच जमेल."मी परत जोमाने अभ्यासाला लागायची. हळूहळू माझी भीती कमी होत गेली. इथवर आलोत पुढेही करूच हा विश्वास वाढत गेला. मी त्याच बळावर, हिम्मतीवर माझं पदवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं.हे घडत असतानाच माझ्या प्राध्यापकांनी "आय.आय.टी.चे फॉर्म सुटले, तुम्हीही भरा. "असे सांगितले. मला आय.आय.टी.काय हेही माहीत नव्हतं त्यामुळे आमच्या शिक्षकांनीच फॉर्म भरला. आमच्या कॉलेजमधून माझ्यासह आणखी दोघींनी फॉर्म भरला. आम्हाला प्रा.मनोहर जोपळे, डॉ.अजित नगरकर, प्रा.हृषिकेश गोतरणे, प्राचार्य डॉ.दिलीप पवार आदींनी सातत्याने कार्यमग्न ठेवले, मार्गदर्शन केले, प्रेरणा दिली. आणि माझी जोधपूर आय.आय.टी.ला निवड झाली. सर्वांना खूप आनंद झाला. माझे शिक्षक, कॉलेजचे प्राचार्य, शिक्षणाधिकारी, संचालक, संस्था पदाधिकारी, ग्रामस्थ आणि वृत्तपत्रांनी माझं भरभरून कौतुक केलं. आय.आय.टी.ला नंबर लागला इथपर्यंत ठीक पण पुढचा प्रवास हा काही सोपा नाही हेही जाणवत होतं. कारण घरची परिस्थिती ही बेताचीच होती. हा खर्च आणि शिक्षण आपल्याला झेपेल का? शिक्षकांनी दाखविलेला विश्वास आपण सार्थ ठरवू का? असे एक ना अनेक प्रश्न डोक्यात गर्दी करायचे पण शेतातील उन्हा-तान्हात, थंडी- पावसात शेतात राबणारा बाप पाहिला की वाटायचं करू आपण. आता मला जोधपूरच्या आय.आय.टी. त आल्यावर कळले की हे जग फार वेगळं आहे. सारेजण हिंदी आणि इंग्रजीतच बोलतात. सुरुवातीला काही सुचेनाच, मनही लागेना. कधी घरी जाते असं वाटत होतं. घरी आले थोडं थांबले पण शिक्षणासाठी परत कॉलेजला परतले. येथे एका सेमिस्टरची फी ७० हजार रुपये आहे. ती माझ्या त्र्यंबकेश्वर कॉलेजमधील

**(... पुढील पानावर)**



# बेस्ट डिझायनर
# निधी गोपियानी

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या वास्तुकला महाविद्यालयात निधीचा डिझाईनमधील प्रवास सुरू झाला. जिथे तिला डिझाइनची आवड निर्माण झाली आणि 'बॅचलर ऑफ डिझाईन' ची पदवी घेऊन तिचे आयुष्यच बदलले. २०१४ मध्ये पदवी प्राप्त केल्यानंतर निधी गोपियानी हिने सोलापूर मधील कापड हस्तकला पुनरुज्जीवित करण्याच्या प्रकल्पावर काम केले. तसेच पुण्यातील सीगल ॲडव्हर्टायझिंग याठिकाणी व्हिज्युअलायझर म्हणून देखील एक वर्ष काम केले. या अनुभवांतून तिला काय करायचे नाही हे समजण्यास मदत झाली. या कामांनीच तिला डिझाइन स्ट्रॅटेजीच्या जगाशी ओळख करून दिली. अधिक कौशल्यांची गरज ओळखून तिने तिची नोकरी सोडली आणि ब्रँड स्ट्रॅटेजिस्ट म्हणून स्वतःचा व्यवसाय करण्यास सुरुवात केली. या काळात, तिने जागतिक स्तरावरील नामवंत विद्यापीठांमध्ये अर्ज केले. शेवटी न्यूयॉर्कमधील पार्सन्स स्कूल ऑफ डिझाइनमध्ये तिची निवड झाली. या विद्यापीठात तिला भारतीय हस्तकलेचे जागतिकीकरण करण्याच्या उद्देशाने तिच्या व्यावसायिक प्रकल्पाच्या सादरीकरणासाठी तिला ' डीन स्कॉलरशिप ' देण्यात आली.

पार्सन्समध्ये तिने 'हेल्थ प्लीज' ची भागीदारीत स्थापना केली. ही सर्वांना परवडणारी संस्था असून घरातील पॅथॉलॉजी आणि डायग्नोस्टिक लॅब व निदान करण्यासाठी काम करते. या उपक्रमामुळे तिचा पदव्युत्तर प्रकल्प - Nth Sense ने ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून आरोग्यसेवेत नैतिक डेटा मायनिंगवर लक्ष केंद्रित केले. Nth Sense ने CoverUS या कंपनीचे लक्ष वेधून घेतले. या कंपनीने निधीला 'उत्पादन डिझायनर आणि संशोधक' म्हणून त्यांच्या संघात सामील होण्यासाठी आमंत्रित केले. तेथे तिने नासाचे माजी शास्त्रज्ञ, उद्योजक आणि रणनीतिकारांसोबत काम केले. उत्पादन विकास आणि वापरकर्ता संशोधनाचे महत्त्व याविषयी सखोल माहिती मिळवली.

प्रदीर्घ आजारासोबतच्या तिच्या वैयक्तिक संघर्षामुळे तिला रुग्णसेवा सुधारण्यासाठी प्रेरणा मिळाली. हेल्थ प्लीज या संस्थेने Nth Sense लाँच केले आहे. जेणेकरून डॉक्टरांना चांगले डेटा संकलन आणि वितरणाद्वारे रुग्णांचे अनुभव समजण्यास मदत होईल. तसेच आरोग्यसेवा अधिक समावेशक होऊन सर्वांपर्यंत पोहोचेल. तथापि, २०२० मध्ये जेव्हा कोविड-19 चा प्रादुर्भाव झाला तेव्हा त्यांच्या या योजना विस्कळीत झाल्या. मात्र या अनुभवाने खचून न जाता तिने वैद्यकीय पद्धतींना अधिक सुलभ आणि कार्यक्षम बनवण्यासाठी त्वरीत डिजिटायझेशनकडे लक्ष दिले. ती अमेरिकेतील एक स्थलांतरित आणि भारतातील सह-संस्थापक होती. या साथीच्या रोगाने तिच्या आर्थिक आणि मानसिक आरोग्यावर खूप ताण आला. पण Nth Sense च्या प्रगतीसाठी तिने Optym येथे UX डिझायनर म्हणून नोकरी स्वीकारली. ही कंपनी लॉजिस्टिक्स ऑप्टिमाइझ करण्यासाठी A I चा फायदा घेते, ज्यामुळे संपूर्ण यूएस मध्ये अन्न आणि औषधांसारख्या आवश्यक वस्तूंची डिलिव्हरी सुनिश्चित होते.

Optym मध्ये ती आता लॉजिस्टिक ऑपरेशन्स ऑप्टिमाइझ करणाऱ्या तीन AI-उत्पादनांसाठी UX डिझाइन टीमचे नेतृत्व करते आहे. कोडिंगचे काहीही ज्ञान नसताना ती आता अतिशय गुंतागुंतीचे फ्लोचार्ट सराईतपणे करते. या टीममधील एकमेव महिला असल्याने आणि उत्तम कार्यकौशल्यामुळे ती सर्वांच्या कौतुकास पात्र ठरली आहे. तिच्या ध्येयाने तिला नेहमीच प्रेरित केले आहे. कृतिशील ठेवले आहे.तिचे कष्ट,विचार, चिकाटी आणि Optym मधील तिचे उत्तम काम या बाबी 'एक प्रभावी व्यक्तिमत्त्व ' अशी तिची ओळख निर्माण करू शकले ही अभिमानास्पद बाब आहे.

---

**(... मागील पानावरुन)**

डॉ. मनोहर जोपळे, डॉ. अजित नगरकर आदींनी भरली. आई-वडील "फशा तू फक्त शिक, इकडची काळजी करू नकोस" असं म्हणत माझ्या स्वप्नांना उभारी देत होते. त्यामुळे इथल्या वातावरणाशी, परिस्थितीशी जुळवून घेत मी शिक्षण घेत राहणार कारण हा प्रवास, ही ओढ याचसाठी आहे. एम.एस्सी. झाल्यावर मला केमिकल इंजिनिअरिंगमध्ये एम.टेक. करायचे आहे. यासाठीही पुढे प्रचंड अडचणी असणार आहेत कारण माझ्याकडे, माझ्या आई-वडिलांकडे पैसे नाहीत. मविप्र संस्था, कॉलेजचे प्राध्यापक, प्राचार्य डॉ. दिलीप पवार, मविप्र संचालक श्री. रमेशआबा पिंगळे, श्री. मुरलीधर पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्री पुरुषोत्तम कडलग, श्री वैभव ठाकूर यांसह मदतीचे अनेक हात पुढे येत आहेत. त्यामुळे मला बळ मिळते आहे. पुढे नोकरी करत पुढचा शिक्षणाचा टप्पा पार करायचा असा माझा मानस आहे. केवल आर्थिक परिस्थितीची सबब येथे चालणार नाही. यामुळे मीही आता मन लावून अभ्यास करते आहे. आता मागे फिरणे नाही. परिस्थितीवर मात करण्याचं बाळकडू मला गर्भात असतानाच मिळालेले आहे. तेव्हा मी चालतच राहणार. कारण चालणा-याच्या पायाला वाटा बांधलेल्या असतात असं म्हणतात. यावर माझा ठाम विश्वास आहे.

**- फशाबाई देवराम लचके**
आय.आय.टी.जोधपूर

# मी लेक गोदामाईची

अथांग आभाळाचे छत आणि धरणीमायचा आसरा. अभागी आईचा केवळ आधार.

घर म्हणजे नेमके काय असते? हे इयत्ता सातवीपर्यंत मला माहित नव्हते. माझे वडील दारू व इतर व्यसनांच्या आहारी गेलेले होते.मी आईच्या पोटात 2-3 महिन्यांची असतानाच वडिलांनी आईला विहिरीत ढकलून दिले. नशीब बलवत्तर म्हणून आई सुखरूप बाहेर निघाली. मग सुरू झाली तिच्या अस्तित्वाच्या संघर्षांची लढाई. तेथून माझी आई शेगाव येथील गजानन महाराज संस्थानात आली. तेथे लाडू बनवण्याचे काम करून तेथेचि तने आश्रय घेतला. ९ महिने झाले त्यावेळेस देवाला विटाळ चालत नाही म्हणून संस्थांनातून बाहेर पडावे लागले. त्यावेळेस पायी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या मदतीने त्यांच्यासोबत भीक मागत आई नांदेड येथे आली. आईला नांदेड येथील शासकीय रुग्णालयात बाळंतपणासाठी नेण्यात आले. तेथे माझा जन्म झाला. एका वारकरी दाम्पत्याच्या मदतीने महिनाभर बाळ (मी) आणि आई तेथेच राहिलो.त्यानंतर आई मला घेऊन नाशिकला रामतीर्थ गंगाघाटावर आली. गोदावरी नदीच्या किनारी मी लहानाची मोठी झाली म्हणून माझे नामकरण 'गोदावरी' असे झाले. आम्ही तेथेच भीक मागून पोटाची खळगी भरू लागलो. असेच एकदा गोदावरीला पूर येण्याची स्थिती निर्माण झाली. त्यामुळे काठावर असलेल्या लोकांना तेथून हलवण्यात येत असल्याने पोलिसांनी सांगितले.तेव्हा आम्ही नाशिकरोड रेल्वे स्थानकावर आश्रय घेतला. तेथे राहून काय काम करावे? हा प्रश्न आमच्यासमोर होता. खाण्याची पंचायत होऊ लागल्यावर, तेथील भीक मागणाऱ्या लोकांनी पैसे कसे मागायचे आणि भंगार कसे जमा करायचे याचे धडे आम्हाला दिले.आम्ही नाशिकरोड रेल्वे स्थानक, तेथील मंदिरांसमोर तसेच



नाशिकरोड, देवळाली, इगतपुरी, घोटी येथे भीक, भंगार गोळा करून व पैसे मिळवून पोट भरू लागलो. बुधवारी नाशिकचा बाजार असल्याने शाळेला सुट्टी घेऊन मी आईबरोबर गोदाघाटावर येऊन पैसे मागत असे. पैसे मागण्याबरोबरच अन्नदानाच्या ठिकाणांची माहिती घेत आम्ही पोटाची खळगी भरत होतो. दुर्गा मंदिरावर पोलिओ डोस देण्यासाठी आलेल्या आरोग्य विभागाच्या सेविकांनी आईकडे मला शाळेत घालण्यासाठी आग्रह धरला. आईला त्यांचे म्हणणे पटल्यावर गोसावी वाडीतील शाळा क्र. १२२ मध्ये माझा पहिलीत प्रवेश झाला. सकाळपासून शाळेचा वेळ होईपर्यंत पैसे मागून आणणे व मग शाळेत जाणे. पुन्हा शाळेतून आल्यावर आईबरोबर भीक मागणे किंवा रेल्वे स्थानकावरील मैत्रिणींबरोबर मी भंगार गोळा करण्यासाठी जायची. मला अभ्यासाची आवड होती. चौथीत असताना शिष्यवृत्तीची परीक्षा मी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. सर्वांना माझे कौतूक वाटत होते. याच दरम्यान दोन तरुण भाऊ मराठवाडयातून नाशिकरोड रेल्वे स्थानकावर उतरले होते. त्यांनी आईकडे "येथे कुठे काम मिळेल का?" म्हणून चौकशी केली. तेव्हा आईने त्या तरुणांना माणूसकीखातर कामाबद्दल मार्गदर्शन केले. आपल्याला मिळालेल्या भाकरीतून अर्धी भाकर त्यांना खाऊ घातली. दोन-तीन दिवसांमध्ये त्यांची चांगलीच ओळख झाली. त्यातील मोठ्या भावाने " मला कपडे इस्त्री करण्याचं दुकान तू दाखवू शकते का?" असे विचारले. दुकान दाखवल्यानंतर "वडापाव खाण्यासाठी येणार का?" म्हणून विचारले. ओळख असल्याने मी त्या तरुणासोबत वडापाव खाण्यासाठी गेली परंतु त्याने त्या वडापावमध्ये गुंगीचे औषध टाकून माझे अपहरण केले. दहा वर्षांच्या मला मनमाड रेल्वेस्थानकावर पोहचल्यावर शुध्द आली. त्या तरुणाला मी आईबद्दल विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मी जास्तच प्रश्न विचारल्याने मला मारहाण केली गेली. त्या तरुणाने एका हिंदी भाषिक तरुणाशी हिंदीत संवाद करून मला विकण्याचा व्यवहार केला होता. त्या दोघांमध्ये माझ्याबद्दल काहीतरी चुकीचे बोलणे चालू असल्याचे माझ्या लक्षात येताच, मी तिथून पळण्याचा प्रयत्न करू लागली. परंतु त्या दोघांनी माझ्यावर करडी नजर ठेवलेली होती. त्यांनी मला पकडून माझ्या पाठीवर पेटलेल्या सिगारेटचे चटके दिले. दोघांमधील व्यवहार न जमल्याने त्यांच्यात वाद झाला व हिंदी भाषक तरुण तेथून निघून गेला. पळवून नेणाऱ्या तरुणाने मला त्याच्या मूर्तीजापूरच्या घरी नेले ; परंतु त्याच्या वडिलांनी " मुलीला आणले त्या ठिकाणी सोडून दे " म्हणून फर्मावले. सहा दिवस मी अन्नाचा एक कणही खाल्ला नव्हता. माझी प्रकृती खालावू लागली होती. ओक्साबोक्शी रडून आईकडे जाण्यासाठी मी विनंती करू लागली. तो तरुण लघुशंकेला गेला होता. त्यावेळेस मी पुस्तकाच्या स्टॉल वर उभ्या असलेल्या व्यक्तीला स्टेशनवर उभी असलेली ट्रेन नाशिक रोड ला जाते का? अशी विचारणा केली आणि उभ्या असलेल्या ट्रेन मधे बसून नाशिक गाठलं. तिकडे आईने मला शोधण्यासाठी सारे नाशिक पायी पालथे घातले होते. रेल्वे स्थानकावर 'हरवली आहे' असे माझे पोस्टर लावले गेले होते. भिक्षा मागणारे इतर सहकारीही मला शोधत होते. मी परत आल्याची बातमी कळताच कासावीस झालेल्या आईने दुर्गा मंदिर, नाशिक रोड सोडून नाशिकरोड रेल्वे स्थानक गाठले. आम्ही मायलेकींनी एकमेकींना मिठी मारली. आनंदाश्रू वाहू लागले. मी सारा प्रसंग आईला सांगितला. मी मोठी होत असल्याने तसेच अपहरणाच्या प्रसंगाने आईचे डोळे खाडकन उघडले. परंतु जीवनातील संकटांची मालिका सुरूच होती. जास्त पैसा मागून, भंगार जमा करून पोट भरण्यासाठी आम्ही वणवण फिरत होतो. मी शाळेतून घरी येताच, निर्मला नावाच्या मैत्रिणीला बरोबर घेऊन जास्तीत जास्त भंगार जमा करण्यासाठी जात होती. स्टेशनवरील एका मुलीबरोबर तिच्याच मोठया भावाने अतिप्रसंग केला. त्यावेळचा त्या मुलीचा काळजाला चिरणारा आवाज ऐकून मी घाबरली. मी तिच्या आईला निरोप दिला की, त्यांच्या मुलीबरोबर काहीतरी चुकीचं घडत आहे. तेव्हा त्या मुलीच्या अडाणी, दारुच्या नशेत असलेल्या आईने उलट मलाच शिव्या दिल्या आणि माझ्यासोबत त्या मुलीला शाळेत पाठवणे बंद केले. मला त्या मुलीचे वाहवत जाणारे आयुष्य बघून खूप हळहळ वाटत होती. काही दिवसांतच त्या प्रसंगांची त्या मुलीला सवय झाली. आणि त्या मुलीकडे एक वेश्या म्हणून बघितले जाऊ लागले. ९ ऑक्टोबर २०१० रोजी दिवाळी च्या दिवशी स्टेशनवरील एका मद्यधुंद बाईने तिच्या मुलीला मी शाळेत घेऊन जाते म्हणून माझे सर्व सामान (अगदी शाळेचे दफ्तर व ६ वी पर्यंतची सर्व निकालपत्रके) जाळून टाकले. त्यावेळेस मुमताज या द्राक्ष विकणाऱ्या महिलेने आम्हाला आपल्या घरात आसरा दिला. दोन महिने मुमताज सोबत राहिल्यानंतर आम्ही मायलेकी स्वतंत्र खोली घेऊन राहू लागलो. लग्नात वाढपी म्हणून तसेच धुणी भांडी करून उदरनिर्वाह करू लागलो. त्या मुलीचे उद्धवस्त होत जाणारे आयुष्य आणि वडिलांनी आईवर केलेला अन्याय मला शांत बसू देत नव्हता. त्यांच्यावरील

**(... पुढील पानावर)**

# कचऱ्यातून फुले वेचणारी

आयुष्य प्रत्येकाला एक संधी देत असते. पण ती संधी हेरून तिचं सोनं करणारे मात्र फार थोडे असतात. कचऱ्याच्या ढिगाखाली दबलेल्या आयुष्याचं सोनं करणाऱ्या सुशीलाबाई साबळे यापैकीच एक. अशिक्षित असूनही सुशिक्षितांना लाजवेल, अशी स्वच्छताप्रियता अंगी असलेल्या सुशीलाबाई आज परिसर भगिनी विकास संघटनेच्या माध्यमातून काम करीत आहेत. पर्यावरणा विषयी जनजागृती करण्याच्या प्रक्रियेत तब्बल सात देशांमध्ये जाऊन भारताचे प्रतिनिधित्व केलेल्या सुशीलाबाईंचे 'कचऱ्यातून फुले वेचणारी..' हे वर्णन अगदी चपखल ठरेल.

एखादी ओळख आयुष्याला चिकटली की ती बदलण्याचा प्रयत्न सहसा केला जात नाही. त्यातही ती महिला असेल तर मग या ओळखीची चौकट ओलांडण्याचा विचारही करणं तिच्यासाठी अवघड होऊन बसतं. सुशीलाबाई साबळे यांनी मात्र हे धाडस केलं. 'कचरावेचक ते पर्यावरणरक्षक' हा त्यांचा प्रवास म्हणजे त्यांच्यासह अनेक महिलांचा जीवनस्तर उंचावणारी एक गोष्टच म्हणावी लागेल. १९७२ च्या दुष्काळात जालन्याहून मुंबईला विस्थापित झालेल्या सुशीलाबाई साबळे यांच्या कुटुंबाने पोट भरण्यासाठी कचरावेचक म्हणून काम करायला सुरुवात केली. शिक्षण नसल्यामुळे कचरा वेचूनच आपण पोट भरू शकतो, ही त्या भागातील जवळपास सर्वांचीच धारणा होती. अनेक अपमानाचे, मानहानीचे प्रसंगही या कामादरम्यान आले. पण ते मुकाट सहन करीत, आपलं काम त्यांनी सुरू ठेवलं. कारण, पोट भरायचं तर हे करणं भागच होतं. अपरिहार्यता



म्हणून सुरू केलेल्या कामातूनच आपलं भविष्य घडेल, याची पुसटशी कल्पनाही त्यांना नव्हती. वयाच्या पंधराव्या वर्षीच त्या लग्नाच्या बंधनात अडकल्या. पण तिथे सुशीलाबाईंचं आयुष्य नवऱ्याचा जाच आणि त्याच्या दारुच्या व्यसनात भरडलं जात होतं. हातचं काम सोडून दारूच्या आहारी गेलेल्या आणि रोज मारझोड करणाऱ्या नवऱ्याला कंटाळून, वयाच्या विसाव्या वर्षी त्या आईकडे परतल्या. पोटात वाढणारं मूल आणि खांद्यावर कचरा वेचायची झोळी असं करत एक-एक दिवस जात होता. मुलगा झाल्यानंतरही हे काम सुरुच होतं. पण याचदरम्यान एक घटना घडली, जी आपलं आयुष्य बदलेल याची कल्पनाही सुशीला बाईंना नव्हती. त्या राहात असलेल्या जागृती नगरमध्ये 'स्त्री मुक्ती संघटने'च्या कार्यकर्त्या येऊ लागल्या आणि त्यांनी या महिलांच्या संघटन बांधणीचे काम हाती घेतले. 'परिसर भगिनी विकास संघटने'त सुशीलाबाईंचा सहभाग वाढत होता. त्यांचा सभाधीटपणा पाहून त्यांच्यावर या संघटनेच्या अधिकाधिक जबाबदाऱ्या पडू लागल्या आणि तिथूनच सुशिलाबाईंनाही एक वेगळा मार्ग गवसला. दिवसेंदिवस त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पडत होते. हळूहळू कचरा वेचण्याचं काम मागे पडलं आणि या संघटनेच्या माध्यमातून सुरू झालेल्या बचतगटाच्या अध्यक्षा बनण्याची संधी त्यांना २००४ साली मिळाली. आज त्या मुंबईतील परिसर भगिनी विकास संस्थेतील ३५०० हून अधिक महिलांचं नेतृत्व करीत आहेत. कचरा वेचणं हेसुद्धा एकप्रकारे पर्यावरण रक्षणच. पण, त्याच्या पुढे जात कचरा व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाकडे वळलेल्या सुशीलाबाई त्यांच्यासारख्या अनेक कचरावेचक महिलांच्या आदर्श आहेत. नावापुढे मोठ-मोठ्या पदव्या लावत, स्वत:ला सुशिक्षित म्हणवत रस्त्यावर कचरा फेकणारे एकीकडे आणि अशिक्षित असूनही सुशिक्षितांचा कचरा उचलणाऱ्या, ओला आणि सुका कचरा वेगळा ठेवण्याबाबत, कचऱ्याच्या पुनर्वापराबाबत मार्गदर्शन करणाऱ्या सुशीलाबाई एकीकडे!

हे काम सुरू झाल्यानंतर सुशीलाबाईंना परदेशात भारताचं प्रतिनिधित्व करण्याची मिळालेली संधी त्यांच्यासाठी खूप महत्त्वाची ठरली. कोपनहेगनसारख्या शहरात जाऊन कचऱ्यासारख्या महत्त्वाच्या; पण आपल्या देशातील दुर्लक्षित विषयाबद्दल बोलण्याचं धाडस त्यांनी केलं. त्यानंतर चीन, दक्षिण आफ्रिका, ब्राझील, थायलंड, केनिया, नैरोबी या देशांमध्ये जाऊन, तिथेही पर्यावरणासंबंधी बोलण्याची संधी त्यांना मिळाली. 'ओल्या कचऱ्याचं खत करा आणि सुक्या कचऱ्याचा पुनर्वापर करा', हा महत्त्वाचा सल्ला त्या गेल्या अनेक वर्षांपासून आपल्यासारख्या सुशिक्षितांना देत आहेत. पण अजूनही ते फारसं मनावर घेतलं जात नसल्याची त्यांना खंत आहे. कचरावेचक आईची मुलगी म्हणून सुशीलाबाईंनाही कचरावेचक व्हावं लागलं. कारण त्यांच्यापुढे दुसरा पर्यायही नव्हता. पण आपल्या मुलाच्याबाबतीत मात्र त्यांनी असं होऊ दिलं नाही. बिझनेस मॅनेजमेंटचं शिक्षण घेतलेला त्यांचा मुलगा, आज एक व्यवसाय करीत आहे. केवळ आपल्या कुटुंबाची प्रगती, हे सुशीलाबाईंचे ध्येय कधीच नव्हते. म्हणूनच देश-विदेशात जाऊनही, अनेक संधी मिळूनही त्यांची या महिलांसोबत जोडली गेलेली नाळ तुटली नाही. त्यामुळेच हे काम करता करता सुशीलाबाईंना आपल्यासारख्या अनेक महिलांचे प्रश्नही दिसू लागले. एकल महिलांचे प्रश्न, मुलांमधील वाढती व्यसनाधीनता यात बदल व्हावा, यासाठी काहीतरी ठोस करण्याची त्यांची इच्छा आहे. 'कचरावेचक ते पर्यावरणरक्षक' हा आपला प्रवास केवळ आपल्याच उन्नतीसाठी नव्हे, तर आपल्या परिसरातील अन्य कचरावेचक भगिनींसाठीही उपयोगी ठरावा, यासाठीही त्यांची धडपड सुरू आहे. कचरा व्यवस्थापनाबद्दल समाजाला शहाणं करणाऱ्या सुशीलाबाई, आजही संधी मिळेल तिथे समाज प्रबोधन करीत आहेत. त्यांचं हे कचराविरहीत परिसराचं स्वप्न साकारण्याच्या प्रयत्नात आपलाही हातभार महत्त्वाचा ठरणार आहे.

**(... मागील पानावरुन)**

अन्यायाला न्याय देण्यासाठी मी कसून अभ्यास करू लागली. दहावीला मी केटरर्स ची कामे करूनही तब्बल ७०.४०% गुण मिळवले. 'आपलं महानगर' चे हेमंत भोसले यांनी माझा हा संघर्षमय प्रवास बातमीद्वारे प्रसिद्ध केला. तेथूनच माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली. ॲड. प्रभाकर वायचळे, छात्रभारती संघटना, रवी गांगोडे, विनायक येवले, रिंकू शर्मा आदींसह अनेकांनी मदतीचे हात पुढे केले. मी अकरावीला के.टी.एच.एम. महाविदयालयात प्रवेश घेतला. तिथे डॉ. दिलीप पवार व प्रा. प्रभावती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांमध्ये यश मिळवले. तसेच २०१५ मध्ये मी नेव्हल एन.एन.सी.च्या माध्यमातून अंदमान निकोबार येथे विमानाने गेले होते.

करोनाच्या महामारीत आम्ही वर्षभर घरपोच भाजीपाला व फळे विकण्याचा व्यवसाय करून जगण्याची धडपड सुरू ठेवली. ज्या महाविद्यालयाच्या बाहेर भाजीपाला व फळे विकली पुढे त्याच म.वि.प्र. विधी महाविद्यालयात प्रवेश मिळवत वकिलीचे शिक्षण पूर्ण करत, सनद मिळवली. आज मी नाशिक जिल्हा न्यायालयात वकिलीचा सराव करत आहे माझ्या उज्ज्वल उद्यासाठी.

**ॲड.गोदावरी राजाराम देवकाते**
जिल्हा न्यायालय, नाशिक

# दिव्यांगांची माऊली सौ.रेखा बागुल



गरिबीतून, कष्टातून वा लग्नानंतर शिक्षण पूर्ण करणे, बालपणी/ तरुणपणी अर्धवट राहिलेली स्वप्ने लग्नानंतर कौटुंबिक जबाबदारी सांभाळून पूर्ण करणे हे प्रेरणादायी असते. ऐंशी- नव्वदच्या दशकातील दहातील किमान पाच जणांची हीच परिस्थिती असेल. आपल्या मुलांचे संगोपन करणे तशी सामान्य बाब परंतु स्वतःची मुले गतिमंद असतील तर संगोपन करणे जरा कठीणच असते.परंतु तरीही आपण विशेष प्रेमाने त्यांचा सांभाळ करतो. पण स्वतःचे कुटुंब सांभाळत समाजातील दुर्लक्षित आणि विशेष गतिमंद मुलांची आई होऊन त्यांचा सांभाळ करणे महत्कठीण कार्य होय.

वाचक हो, ही कहाणी आहे 'सौ. रेखाताई बागूल' यांची...विशेष मुलांची आई होऊन सांभाळ करताना आलेल्या अनुभवांची..रेखाताईंच्या ७२ वर्षांच्या जीवन प्रवासात कार्याचीही बेचाळीशी पार पडली आहे आणि त्या अधिक डोळस होऊन नवीन उपयुक्त उपक्रम प्रस्थापित करण्यासाठी उत्साहाने वाटचाल करीत आहेत. वडील पोलीस अधिकारी असल्याने त्यांच्या सतत बदल्या होत असत. त्यामुळे त्यांना एस.एस.सी. (जुनी अकरावी) पर्यंतचे शिक्षण धुळे, नाशिक, ठाणे,अहमदनगर अशा विविध जिल्ह्यांतून पूर्ण करावे लागले. शालेय शिक्षणानंतर लगेच लग्न व त्यानंतर तीन अपत्यांचे संगोपन यात रेखाताईंचा बराचसा वेळ खर्ची होऊ लागला होता.मात्र पती प्रा. रवींद्र बागुल यांच्या प्रोत्साहनामुळे लग्नानंतर रेखाताईंनी पुढील शिक्षण पूर्ण करण्याचा निर्धार केला. एम.ए.बी.एड.व कर्णबधीर मुलांना शिकविण्यासाठी विशेष पदविका असे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. पुण्यातील रुईया महाविद्यालयात ही विशेष पदविका पूर्ण करीत असताना प्राचार्या सौ. मालतीबाई जोशी यांच्या प्रेरणेने अशा मुलांसाठी डोंबिवली येथे शाळा काढण्याचे ठरवले. रंजना गोगटे आणि सुलभा देशपांडे या मैत्रिणींबरोबर सर्वेक्षण करून १९८२ मध्ये शाळा सुरू केली. पुढे 'अस्तित्व' या संस्थेच्या अध्यक्षांनी सुचविल्या नुसार ती संस्था आणि शाळेचे विलीनीकरण करण्यात आले. त्यांनतर दहा वर्षे त्यांनी शाळेच्या प्राचार्या म्हणून काम पहिले.

जन्मतःच कर्णबधीर असलेल्या बालकांना लवकर जर स्पीच थेरपीची सुरुवात केली तर अशी मुले सामान्य मुलांसारखी बोलू शकतात असा अनुभव त्यांना आला.या अनुभव आणि प्रशिक्षणामुळे १९९२ मध्ये त्यांनी डोंबिवलीत राहत्या घरीच 'नचिकेत वाचा-श्रवण प्रशिक्षण' केंद्र सुरू केले. शहापूर, टिटवाळा, कल्याण, पनवेल अशा विविध शहरांतील मुलांना याचा विशेष लाभ झाला. इथे प्रशिक्षण घेतलेले असंख्य विद्यार्थी पुढे पदवीधर, द्विपदवीधर होऊन यशस्वी जीवन जगत आहेत. त्यातील विशेष उल्लेख करता येईल अशी या केंद्रातील पहिली विद्यार्थिनी मयुरी हिने रसायनशास्त्रात पदवी घेऊन पुढे फूड व ड्रग्ज ॲनेलीसीस विषयात पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. या यशाबद्दल तत्कालीन राष्ट्रपती आदरणीय डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते तिचा सत्कारही झाला आहे. रेखाताईंचे काही विद्यार्थी पुढे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स मध्ये प्रवेश घेऊन उत्कृष्ट कलाकार झाले आहेत. ताईंचे अनेक विद्यार्थी आपल्या अपंगत्वावर मात करून सामान्य विद्यार्थ्यांशी स्पर्धा करीत यशस्वी होत आहेत. जीवनात विविध क्षेत्रांत नावलौकिक मिळवीत आहेत. त्यांच्यापैकी मधुर पाटील सध्या महाड येथे महसूल खात्यात कार्यरत आहे. विशेष म्हणजे हे सर्व विद्यार्थी अजूनही रेखाताईंच्या संपर्कात आहेत.

सन २००७ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे कायम वास्तव्यासाठी आल्या नंतरही त्यांचे दिव्यांग प्रशिक्षणाचे कार्य सुरूच राहिले. सुरुवातीला दहा वर्षे दापोलीच्या कर्णबधीर मुलांच्या शाळेत मानद शिक्षिका म्हणून काम करताना विशेष मुलांसाठी चौथीपासून पुढे सातवीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास प्रोत्साहन देण्यात रेखाताईंचा मोठा हात होता, त्या विद्यार्थ्यांना पुढे सतरा नंबर फॉर्म भरून दहावीच्या बोर्ड परीक्षेची तयारी रेखाताईंनी करवून घेतली. पुढे त्या संस्थेत सचिव पदापर्यंत पोहोचल्या आणि सध्या कार्यकारिणी सदस्य म्हणून काम बघत आहेत.

१९९० नंतरच्या दशकात विशेष विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाचे काम त्या करीत असत. त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीत हुंडाबळी ठरलेल्या आणि कौटुंबिक छळातून नेसल्या वस्त्रानिशी घरातून हाकलून दिलेल्या महिलांना आसरा देण्याचे काम केले. अशा महिलांना स्वावलंबी बनविण्याचे क्रांतिकारी काम त्यांनी केले. एका वाईट प्रसंगात दापोली परिसरात मतीमंद मुलींवर झालेल्या अत्याचारा संदर्भात त्या मुलींचा जबाब लिहून घेण्याप्रसंगी त्यांना बोलते करावे या कामी रेखाताईंची पोलिसांनी मदत घेतली. त्या प्रसंगानंतर ताईंच्या लक्षात आले की मूक-बधिरांसाठी अनेक सेवाभावी, स्वयंसेवी संस्था काम करीत आहेत. मात्र मतिमंद/बहुविकलांग व्यक्तींसाठी म्हणाव्या तितक्या प्रभावी संस्था नाहीत किवा ज्या आहेत त्यांच्याकडे अशा व्यक्तींची व्यवस्थित सोय होत नाही. अशा व्यक्तींसाठी काहीतरी ठोस करावे, त्यांना हक्काचे सुरक्षित स्थान द्यावे हा विचार ताईना स्वस्थ बसू देईना. अशातच त्यांना कु. माहेश्वरी विचारे या एम. एस्सी. एम. एस.डब्लू झालेल्या तरुणीची साथ मिळाली. श्री.दिनेश जैन, सौ.शीतल देवरुखकर, सौ. शुभांगी गांधी अशा समविचारी व्यक्तींनी एकत्र येत दापोलीत १५ ऑगस्ट २०२१ या दिवशी आनंद फौंडेशन संचलित 'बहुविकलांग गतिमंद' मुलांसाठी पुनर्वसन केंद्र सुरू केले. या केंद्रात २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून पैकी १८ रहिवासी विद्यार्थी आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील आहेत. दापोलीत अशा दिव्यांगांची संख्या खूप मोठी आहे परंतु जागेअभावी त्यांना इच्छा असूनही प्रवेश देता येत नाहीत. सध्या हे केंद्र भाडेतत्त्वावर घेतलेल्या जागेत सुरू आहे. केंद्रात पुढे मुलामुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, उद्योग प्रशिक्षण वर्ग, भौतिक उपचार केंद्र असे उपक्रम सुरू करण्याचा ताईंचा मानस आहे. हा सर्व व्याप सांभाळून ताईंच्या 'नचिकेत श्रवण प्रशिक्षण' केंद्राचा कारभार दिवसागणिक वाढतो आहे. या भागातील रुग्णांना आधुनिक चिकित्सेनुसार 'कोक्लीअर ट्रान्सप्लांट' शस्त्रक्रिया झाल्यानंतर पोस्ट ऑपरेटीव स्पीच ट्रेनिंग साठी रेखाताईंचे नाव मुंबईतील प्रतिष्ठित रुग्णालये सुचवितात. 'दिव्यांग पुनर्वसन' या विषयावर मार्गदर्शनासाठी भारतभरातून त्यांच्याशी संपर्क साधला जातो.

आजवरच्या सेवाभावी कामासाठी कौतकाची थाप म्हणून पुढील संस्थांकडून रेखा बागुल यांना गौरविण्यात आले आहे .

- 'सौदामिनी पुरस्कार'- ब्राह्मण सभा, डोंबिवली,
- यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक सन्मान पुरस्कार- यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई
- 'नवदुर्गा पुरस्कार'- दैनिक लोकसत्ता,
- 'शारदा सन्मान'-अग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती
- 'आदर्श महिला पुरस्कार'- अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक संघ,, रत्नागिरी
- 'जलस्वराज सन्मानपत्र'- ग्रामपंचायत जालगाव

या सोबतच जीवनव्रती, हिरकणी, शेरो अशा पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित करण्यात आले आहेत.

दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या सौ. रेखा बागुल यांची कहाणी म्हणजे एक प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या जीवनातील संघर्ष, शिक्षणाची महत्ता आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम त्यांच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येतो. गरिबी आणि कष्टातून शिक्षण घेऊन, विवाहानंतर शिक्षण पूर्ण करण्याच्या त्यांच्या प्रवासाने अनेकांना प्रेरणा दिली आहे.

# शब्दमालती

शाळा - महाविद्यालयीन शिक्षण माणसाला शिक्षित करते पण रोजच्या जगण्यातले अनुभव त्यास सुजाण करते आणि हेच अनुभव डोळसपणे अनुभवले असतील तर जगणं समृद्ध करतात. 'जिंदगी जिंदादिली का नाम है, मुर्दा दिल क्या खाक जिया करते है' या उक्तीप्रमाणे आयुष्यातल्या संघर्षासही संधी मानून जीवन उन्नत करतात काही विजिगीषी माणसं.

ही कहाणी आहे सौ. मालती सुनील आव्हाड यांची. लहानपणापासून उतारवयापर्यंत अनुभवलेली गरिबी, रूढीवादी माहेर आणि त्याहूनही कर्मठ असे सासर यामुळे उच्चशिक्षणाची पूर्ण 'न' झालेली महत्त्वाकांक्षा आणि चांगल्या नोकरीची अर्धवट राहिलेली स्वप्नं. या सर्वांना मनाच्या कोनाड्यात कुलूपबंद न करता आजवर पाहिलेलं, वाचलेलं, भोगलेलं आणि अनुभवलेलं त्या कागदावर उतरवत गेल्या आणि त्यातून तयार झाली 'कवितेची वही.' जी मालतीताईंचं भावविश्व अभिव्यक्त करते. बालपण, निसर्ग, शेती, स्त्री- जीवन, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू-फुले-आंबेडकर, सावित्रीमाई, दिवाळी, चैतन्य, लाडकी लेक, सासुरवाशीणपणा, बाळासाहेब ठाकरे, नोकरीचा पहिला दिवस, जिथे स्वच्छता सेवक म्हणून काम सुरू केले ते माहेश्वरी हॉस्टेल, मविप्र समाज, ॲड. बाबुराव ठाकरे, शकुंतला अक्का, ग्रंथ, वाचन संस्कार अशा सर्वच विषयांवर कवितेत एक तरी पान सापडतं...

नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरीतील माळेदुमाल्यातल्या सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात मालतीताईंचा जन्म झाला. भारताचं स्वातंत्र्य तेव्हा ऐन तारुण्यात आलेलं होतं.पण बालविवाह, मुलींच्या शिक्षणाबाबत एकूणच सामाजिक अनास्था होती. शिक्षण दिलंच तर जेमतेम साक्षर होण्याइतपत. शिक्षणाची गोडी लागते न लागते तोवर अर्ध्यावर अभ्यास थांबवून मुलींच्या लग्नाची बांधली जाणारी गाठ अशा सामाजिक परिस्थितीत भारतातल्या असंख्य मालतींची स्वप्नं, ध्येय अपुरे राहून जातात. त्यामुळे हा एक मोठा वर्ग उन्नतीपासून अनेक वर्षे मागे पडला आहे.



अशाच परिस्थितीत सातवीची केंद्र परीक्षा पास झाल्यानंतर आपसूकच मालतीताईंच्या पुढील शिक्षणाला घरच्यांकडून खो मिळाला. त्यांचे दोनाचे चार हात होत त्या आशेवाडीच्या सौ. मालती सुनील आव्हाड झाल्या. इथेही गरिबी पाचवीलाच पूजलेली त्यामुळे कामधंदा शोधण्यासाठी संपूर्ण कुटुंब नाशिकला आलेले होते.

शिक्षण अर्ध्यावर सुटले तरी वाचनाची आवड मालतीताईंनी मनापासून जोपासली होती.पेपर वाचत असताना कोर्टात शिपाई पदासाठी भरतीची जाहिरात पाहिली आणि अर्ज भरून मालती ताईंनी मुलाखत दिली. त्यासोबतच जिल्हा परिषदेतल्या शिपाई भरतीत मुलाखत दिली. दोन्ही मुलाखती अपेक्षेप्रमाणे व्यवस्थित पार पडल्याचा आनंद त्यांना होता पण तो काही फार काळ टिकला नाही. कारण फायनल यादीत त्यांचे नाव नव्हते. कदाचित तत्कालीन व्यवस्थेची देवाण-घेवाण पद्धत त्यांच्या पचनी पडली नाही. या निराशेतून बाहेर पडण्यासाठी त्यांच्या कवितेच्या ओळीच पाठीवर हात फिरवतात.

"काळ काही थांबत नाही,  
वेळ अजून गेली नाही ,  
नव्या उमेदीनं जगायचं आहे,  
जीवनगाणं लिहायचं आहे."

कुलूपबंद कपाटात किराणामाल ठेवणाऱ्या, उंबरठा ओलांडू न देणाऱ्या सासूच्या स्वभावाकडे दुर्लक्ष करीत काम मिळवण्यासाठी त्या फिरत राहिल्या. एकदा मुलांना शाळेत सोडायला जातांना त्याच शाळेत सेविका म्हणून काम करता येईल का म्हणून विनवणी केली . शाळेच्या मुख्याध्यापिकांनी त्यांची कैफियत मविप्रचे तत्कालीन सरचिटणीस कै. मालोजीराव मोगल यांच्याकडे मांडली. पंधरा दिवसात हातात पडलेली कामाची पहिली ऑर्डर एक लढाई जिंकल्याचा आनंद त्यांना देऊन गेली. तेव्हापासून नोकरीतून निवृत्त होईपर्यंत त्या अभिनव बाल विकास मंदिर, आदर्श शिशू विहार, आणि मविप्रच्या शाळांतून विद्यार्थ्यांच्या लाडक्या आवडत्या मालती मावशी बनल्या. शाळेतल्या लोकांचे स्वभाव, वेगवेगळ्या ठिकाणचे अनुभव, समाजधुरीणांनी केलेली मदत त्या शब्दबद्ध करीत राहिल्या.

" जमीन तापली, भुई भेगाळली,  
मन माझे कासावीस, नाही येत टिपूस,  
विहीर तळी आटली,  
सूर्याची उष्णता भडकली"

असो , किंवा

" स्त्री जन्माचा आहे मला अभिमान ,  
तिच्याच हाती कर्तृत्वाची जाण,  
सुखी संसाराची पेलून धुरा,  
तिच्या अंतरी वाहतो सदा मायेचा झरा"

यात त्यांनी बालपणी अनुभवलेले स्त्री जीवन त्या उलगडतात.तर,

" माय बसायची जुन्या काळी,  
दळीत दळण जात्या पाळी  
सुंदर ते शब्द, भक्ती रसाचे ते सार,  
पडायचे कानी भल्या सकाळी"

"कुंभाराच्या चाकी गोल माती फिरते, तशी मराठी भारतात नांदते" या शब्दात त्या मराठी भाषेचा गौरव करतात तर, "किती वर्णू या नाशिक नगरीला,पूर्ण कुसुमाग्रजांचा गौरव घरोघरी दुमदुमला." म्हणत कविवर्य कुसुमाग्रजांबद्दल कृतज्ञता अर्पण करतात. "भरल्या डोळ्यांत पाणी, भिजविते मेहनतीचं कणीक" या शब्दात आपला संघर्ष मालतीताई अधोरेखित करतात.

संसाराची घडी बसवतांना शब्दश: मोठ्या कष्टाने आणि हिमतीने मालती ताईंनी मुलांना शिक्षित केले. त्यांचा संसार उभा केला. व्यसनांपासून नेहमी त्यांना दूर ठेवले. त्यासाठी घरातल्या आध्यात्मिक वातावरणाची जोड लाभली. शाळेतले बालगोपाल म्हणजे मालतीताईंचा आनंदाचा ठेवा आहे.

"आला आला महिना जून,  
आहे शाळेचा पहिला दिन,  
आज करूया मुलांचे स्वागत,  
मुले ही राष्ट्राचं दैवत"

या ओळींतून दरवर्षीचा शाळेचा पहिला दिवस किती उत्सवाचा असतो याचे त्या वर्णन करतात. 'करूनी शिक्षणाची क्रांती, ज्ञानाची ज्योत दिली समाजाच्या हाती' या त्यांच्या 'क्रांतिज्योत' कवितेतल्या काही ओळी आहेत. सभोवतालच्या हरेक गोष्टींना त्यांनी कवितेत बसविण्याचा प्रयत्न केला आहे. भाषालंकार, व्याकरण यात जरी निपुण नसल्या तरी संत बहिणाबाईंसारखं त्यांच्या कविता जगणं उलगडून दाखवतात. मुलगा दिल्लीत यु.पी.एस.सी ची तयारी करीत असताना आयुष्यात पहिल्यांदा पाहिलेली दिल्ली आणि त्यासाठी केलेला पहिलाच प्रवासाबद्दल व्यक्त होताना त्यांच्या डोळ्यात समाधानाचे भाव तरळतात.

गरिबीतही भरभरून आयुष्य जगलेल्या माणसांची आणि शब्दांची श्रीमंती मालतीताईंनी कमावलेली आहे. त्यांनी आजवर लिहिलेल्या सर्व कवितांचा सार पुढील चार ओळींत सामावतो-

"खूप काही लिहिलं,  
कागदावर काळीज उतरविलं,  
अक्षरच झाले बोलके,  
काळजातून आले हुंदके"

# स्नेहा द बॉडी बिल्डर...

## (...काम करो ऐसा की दुनिया हो जाए दंग)



घराच्या चार भिंतींचा पिंजरा तोडून अनेक स्त्रियांनी विविध क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत हे सत्य असले तरी अनेक क्षेत्रांत आजही पुरुषी मक्तेदारी ठळकपणे दिसून येते. फिटनेस ॲथलेटिक्स अर्थात शरीर सौष्ठव हा क्रीडाप्रकारही त्यापैकी एक. गल्लीतील व्यायामशाळा आयोजित असो की आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कृत शरीर सौष्ठव स्पर्धा असो, नेहमीच तिथे पुरुषांची भाऊगर्दी आढळते. जागतिक स्तरावर अगदी बोटावर मोजता येतील इतक्याच महिला या खेळात सहभागी होतात आणि त्याहूनही कमी यात टिकाव धरीत यश संपादन करतात. मात्र न्यूनगंड, संकोच आणि 'लोक काय म्हणतील?' ही भीती कायम असते. या सर्वांवर मात करीत शरीरसौष्ठव या क्रीडाप्रकारात पुरुषी मक्तेदारीला आव्हान देत एक नाव आंतरराष्ट्रीय पटलावर ठळक अक्षरांत आहे ते म्हणजे **स्नेहा सचिन कोकणेपाटील.**



मोहाडी ता.दिंडोरी (नाशिक) च्या स्नेहाला मातुल आजोबांच्या कुस्ती खेळाचा वारसा लाभलेला आहे. शेतकरी कुटुंबातील स्नेहा शाळेसोबतच घरच्या शेतातही रमत असे. शालेय शिक्षण नाशिकला पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षण त्यांनी मुंबईमध्ये पूर्ण केले. महाविद्यालयीन काळात कराटे-स्व संरक्षण क्रीडा प्रकारात अनेक स्पर्धा जिंकत त्यांनी या क्रीडा प्रकारातील 'ब्लॅक बेल्ट' ही सर्वोत्कृष्टता संपादन केली. पुढे घोटीच्या, (जि. नाशिक) सचिन कोकणेपाटील यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. सचिन कोकणे हे सुद्धा कराटे प्रकारात एक नावाजलेले नाव आहे. त्यांना 'शिहान' (मार्शल आर्ट्स महागुरू) ही पदवी बहाल करण्यात आली आहे. ते एन. आय. एस. प्रमाणित कराटे प्रशिक्षक आहेत.

### ती आली, तिने पाहिले, तिने जिंकून घेतले सारे :

'स्नेहा' नाव मृदु असलं तरीही रुबाबदारपणा, भारदस्त आवाज, अंगात लढवय्या बाण्याची जिगर आणि खटकणारी गोष्ट भीड न बाळगता बोलून दाखवण्याचा स्वभाव हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे खास पैलू आहेत. अशी स्नेहा आठ वर्षांपूर्वी गोरेगावात आयोजित आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेस प्रेक्षक म्हणून आपल्या पतीसोबत हजेरी लावते आणि स्पर्धकांची कामगिरी बघून भान हरपते परंतु एक गोष्ट तिला खटकली 'इतकी मोठी नावाजलेली स्पर्धा, आजच्या पुरोगामी काळातही या स्पर्धेत केवळ बोटांवर मोजता येतील इतकाच स्त्री सहभाग आणि स्त्री-स्पर्धक फक्त विदेशी, भारतीय का नाही.' ही खंत स्नेहाने नवऱ्याजवळ व्यक्त केली आणि स्वतःच या प्रश्नाचा शोध घेतला, उत्तर गवसले आणि त्यावर मात करण्याची दिशाही...

### बिकिनी, भारतीय स्त्री आणि बरंच काही :

बहुतांश भारतीय स्त्रियांची करीअर आजही परंपरा-पुरोगामित्त्व या तारेवरच्या कसरतीवर अडकलेले आहे. शरीराकडे विशेषतः स्त्री-शरीराकडे नैसर्गिकरित्या न पाहता त्यासोबत संस्कृती, शिकवण आणि 'घर की इज्जत' जोडली जाते. मग आपसूकच अंगप्रदर्शन टीकेचे लक्ष्य होते. तिथे शरीरसौष्ठव या क्रीडाप्रकारात तर केवळ 'बिकिनी' घालून खेळावे लागते. तिथे अनेक भारतीय स्त्रिया घरातूनच विरोधाला बळी पडतात. हा पहिला पाडाव काहींनी जिंकला तरी प्रश्न उरतो 'डाएट' चा. शरीरसौष्ठवपटूंना आवश्यक असणारा विशेष आहार महिन्याला काही हजारांत असतो. तो बहुसंख्य सर्वसामान्य भारतीयांना न परवडणाराच असतो. अनेक पुरुष शरीरसौष्ठवपटूंना देखील डाएटसाठी कोणी प्रायोजक मिळतो का म्हणून शोध घ्यावा लागतो.

या क्रीडा प्रकारात स्त्रिया का कमी आहेत? याचे उत्तर तर स्नेहाला मिळाले परन्तु शाहरुख खान म्हणतो तसं **'किसी चीज को तुम दिल से चाहो तो पूरी कायनात तुम्हें उससे मिलाने में लग जाती है,'** स्नेहाला या शरीरसौष्ठव स्पर्धेत स्वतः उतरावे अशी स्वप्नं पडू लागली, तिने आपल्या बेटर हाफ सचिनजींना विचारले "मी करू शकेल का?" आणि

**(... पुढील पानावर)**

# कथा एका शिक्षिकेची



- सौ. सविता भास्कर पवार
प्रशिक्षिका, जन शिक्षण संस्थान, नाशिक

टेहेरे, ता.मालेगाव जि.नासिक हे माझे जन्मगाव. माझे प्राथमिक शिक्षण टेहेरे व त्यापुढील शिक्षण मालेगाव येथे झाले.माझे शिक्षिका होण्याचे स्वप्न होते. मी एस.वाय. बी.ए.पर्यंन्त शिक्षण घेतले पण लवकर लग्न झाल्यामुळे ते काही पूर्ण झाले नाही कारण ग्रामीण भागामध्ये मुलींच्या शिक्षणाला दुय्यम आणि लग्नाला प्रथम स्थान दिले जाते. त्यामुळे घरच्यांनी चांगले स्थळ आल्यावर लवकर लग्न करून दिले. लग्नानंतर मी नासिक येथे रहायला आली. संसार प्रपंच मागे लागला. घरातील आर्थिक स्थिती सांभाळावी, कुटुंबाची जबाबदारी घ्यावी अशी इच्छा होती. मुलांच्या शिक्षणाचा खर्च व घराची संपूर्ण जबाबदारी माझ्या पतीवरच होती. माझे कर्तव्य म्हणून कुठेतरी मीही त्यांना आर्थिक हातभार लावावा अशी इच्छा होती. माझ्यात उपजतच कलागुण असल्यामुळे मी हॅन्डमेड ज्वेलरी तयार करीत असे. तसेच शिलाई काम देखील करत असे.

एके दिवशी माझी मुलगी आणि मी म.वि.प्र.समाज संचलित जनशिक्षण संस्थान, नासिक या संस्थेत गेलो व तेथील कोर्सेसची माहिती करून घेतली. घरी जाऊन माझ्या पतीला त्यासंबंधी सर्व माहिती सांगितली. त्यांनी "तू तुझ्यातील कलागुणांना वाव दे." असे सांगून मला कोर्स जॉईन करायला प्रोत्साहन दिले. त्यानंतर मी ब्युटीपार्लरचा बेसिक ॲडव्हान्स कोर्स केला. कोर्स पूर्ण झाल्यावर त्यातील मेकअप कॉम्पीटीशन मध्ये मी प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर जन शिक्षण संस्थानमधे स्किलहब टेलरिंगचा कोर्स पूर्ण केला. शिकण्याची आवड असल्यामुळे मी ॲप्लीकवर्क जूटवर्क, टेक्सटाईल प्रिंटिंग, बेकिंग, एम्ब्रॉयडरी वर्क हेही कोर्स केले. मला आधीपासूनच शिवणकलेची खूप आवड होती. त्यामध्ये मी नक्कीच काहीतरी करू शकते असे मला सतत वाटायचे. कोर्स करताना मात्र जनशिक्षण संस्थान, नासिकच्या संचालिका सौ. ज्योती लांडगे मॅडम यांनी खऱ्या अर्थाने आत्मविश्वासाची ज्योत लावली. त्यांना माझे काम आधीपासूनच आवडत होते. त्यांनी माझ्यामध्ये एका शिक्षिकेचे गुण आहेत हे हेरले. शिक्षिकेचे काम करण्यासाठी त्यांनी मला सतत प्रेरित केले." तू ते करू शकशील." असा आत्मविश्वास दिला. मला आधीपासूनच शिक्षिका होण्याची प्रबळ इच्छा असल्यामुळे मीही त्यांना 'हो' बोलले. मग मी जनशिक्षण संस्थानद्वारा चालविल्या जाणाऱ्या असिस्टन्ट ड्रेसमेकर, फॅशन ड्रेसेस, मोतीवर्क, ज्वेलरी मेकिंग या कोर्सेससाठी अध्यापन करू लागली. जन शिक्षण संस्थानमध्ये परिपूर्ण शिक्षण घेऊन शिक्षिका बनण्याचा हा प्रवास प्रेरणादायी असून त्यामधून मला खूप फायदा झाला.मी सद्या महिन्याला त्यातून पंधरा-वीस हजार रु. कमावते. यामुळे माझी प्रतिष्ठा व आत्मसन्मान वाढला आहे.

मी स्वतः एक उद्योजिका देखील आहे. मी डिझायनर ड्रेसेस, ब्लाऊज, नऊवारी साडी, हॅन्डमेड महाराष्ट्रीय ज्वेलरी, नथ मेकिंग, नॅपकीन, बुके तयार करण्याचा व्यवसाय करत आहे. त्यातून अनेक महिलांना रोजगार निर्माण करून देत आहे. शिक्षिका या नात्याने मी माझ्या विदयार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहून सक्षम बनण्यासाठी प्रेरित करीत आहे.परिणामी त्याही आज स्वतःचा व्यवसाय करीत आहेत. हे करत असताना आपण समाजाचे काही देणे लागतो ही जाणीव सतत असते. समाजकार्य म्हणून माझा काही वेळ दुर्गम भागातील गरजूंना ज्ञानदान करण्यात घालवते.आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत हातून समाजकार्य घडावे ही इच्छा आहे.

---

**(... मागील पानावरुन)**

एका क्षणात उत्तर आले "का नाही?" 'बिकिनी, परंपरा, प्रतिष्ठा, आहार खर्च' या सर्वांना सांभाळण्यासाठी सचिन हा आधार होता. मग स्नेहाने तयारीला सुरुवात केली. पहिल्याच वर्षी **'नाशिक श्री'** हा किताब मिळाला. त्यावर मनोगतात " जिजाऊच्या लेकी कोणत्याच क्षेत्रात आज मागे नाहीत" असं व्यक्त होताना करारी स्नेहाच्या मनातील हळवेपणा डोळ्यांतून तरळला. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलं नाही. अनेक जिल्ह्यांच्या शरीरसौष्ठव स्पर्धा, राज्यस्तरीय खुल्या स्पर्धा त्यांनी जिंकल्या. 'भारत श्री', 'राष्ट्रीय सुवर्ण पदक', 'आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक', 'युनिवर्स सुवर्ण पदक' आंतरराष्ट्रीय स्तरावरील नावाजलेली 'आशिया श्री' अशी त्यांची भरारी वाखाणण्याजोगी आहे.

**महाराष्ट्रीय पहिली महिला शरीरसौष्ठवपटू :**

स्नेहाचा प्रवास कौतुकास्पद आहे. अवघ्या तीन वर्षांच्या काळात शरीरावर अखंड आणि खडतर मेहनत घेऊन त्या आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठित अशा 'डायमंड कप' स्पर्धेत सहभागी झाल्या आणि भारतासाठी रजत पदक खेचून आणले. संपूर्ण देशासाठी ही अभिमानाची गोष्ट होती. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ़ बॉडी बिल्डिंग (आय.एफ. बी. बी.) प्रो-कार्ड मिळालेल्या त्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला खेळाडू ठरल्या आहेत.

**पणती होऊनी तेवत राहीन, उजेड पेरित राहीन:**

स्वकर्तृत्व, मेहनत हे यशात परिवर्तीत होतातच पण या यशाच्या शिखरावर अनेक जण एकटे पडतात नाहीतर हारतुऱ्यांच्या दाबाखाली कर्तव्यच विसरतात. पण मोहाडीचे माहेर आणि घोटीचे सासर, समाजकार्याचा वसा या गावांच्या मातीतच असल्याने स्नेहा सुद्धा समाजकार्यात मागे राहतील कशा? आपल्या अंगीभूत असलेले कौशल्य इतरही सामान्य महिला-मुलींना आत्मसात करता यावे म्हणून त्या अव्याहतपणे जागृती अभियान राबवित असतात. स्वसंरक्षण ही मुलींसाठी निकडीची गोष्ट आहे. त्यासाठी शाळा, महाविद्यालये यातून हजारो विद्यार्थिनींना त्या मार्शल आर्ट्सचे मोफत प्रशिक्षण देत आहेत. फिटनेस कॅम्पच्या माध्यमातून गावखेड्यांतील सामान्य महिलामध्ये आजवर दुर्लक्षिल्या गेलेल्या 'आहार आणि स्त्री' या विषयावर जागृती करीत आहेत.या आव्हानात्मक क्षेत्रात इथून पुढे अनेक स्नेहा घडाव्या यासाठी त्या कसोशीने प्रयत्न करीत आहेत.



# श्रद्धा काम से रखो, सफलता मुठ्ठी में होगी

मविप्र पत्रिकेच्या 'स्त्री विशेषांकांतून' व्यक्त होण्याची संधी मिळाली याचा विशेष आनंद होतोय. संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कुटुंबातून पुढे येत एक वकील ते विशेष आरोग्य सल्लागार म्हणून जीवनप्रवासात जुन्या आठवणींना उजाळा देताना माझे मन भरून येत आहे. डोळ्यातून अश्रू तरळल्याशिवाय राहत नाहीत.

नाशिक जिल्ह्यातील शिवडी ता. निफाड या छोट्या खेड्यात एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. त्यामुळे शिक्षण घेताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परिस्थितीशी दोन हात करावे लागले. निफाडच्या वैनतेय विद्यालयात माध्यमिक शिक्षण घेतले. घरच्या आर्थिक परिस्थितीचा शिक्षणावर परिणाम होऊ न देता मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या शिक्षणसंस्थेत बारावी सायन्सपर्यंत शिकले आणि म्हणूनच सातत्याने वर्गात पहिल्या तीन क्रमांकात येत राहिले. त्यानंतर एल. एल. एम पर्यन्त मोठ्या जिद्दीने शिक्षण पूर्ण केले. सोबतच ट्रॅव्हल्स टुरिझम डिप्लोमा केला.उच्च शिक्षण घेतले तरी घरची परिस्थिति आहे तीच होती, कारण सर्वसामान्यपणे शेतकऱ्यांच्या अडचणी या कधी संपतच नाही. कधी अवकाळी पावसामुळे तर कधी गारपिटीमुळे पिकांचे नुकसान होते आणि कर्मधर्म संयोगाने वातावरण चांगले राहून पीक आलेच तर त्याला बाजारभाव मिळत नाही हे माझ्या लक्षात येत होते. पण आई-वडिलांचा वसा आणि वारसा एकच होता की रडण्यापेक्षा लढत राहणे, संघर्ष करत राहणे आणि म्हणून मी ठरवलं की शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे कामगारांचे अश्रू पुसून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करायचा. त्यासाठी मी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे वळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वीसेक देश फिरून आलेल्या शेतीच्या ज्ञानाचा मला फायदा झाला. शेतीसाठी बचत गटाद्वारे केलेल्या कामासाठी विविध पुरस्कारांतून मला प्रेरणा मिळाली.



पुढे मुंबई उच्च न्यायालयात मी वकिली व्यवसायास सुरुवात केली. अनेक केसेस यशस्वीपणे हाताळल्या.आजही मी ते काम प्रामाणिकपणाने करते आहे. चांगला पैसाही कमवत आहे पण त्यातून खरंच आनंद मिळतो का याचा मी मागोवा घेतला असता लक्षात आलं की पैसा मिळतो पण मानसिक आनंद मिळत नाही. म्हणून माझ्या आयुष्यात मी पुन्हा नवीन वाट शोधण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी संघर्ष करण्याचं ठरवलं, ते काम म्हणजे विशेष आरोग्य सल्लागार. आपल्याकडे लोकांच्या मध्ये जागरूकता नाही. शारीरिक व मानसिक व्याधींवरती उपचार करण्यासाठी लागणारा भरमसाठ पैसा नाही पण आजारीच होऊ नये म्हणून प्रयत्न करताना देखील समाज दिसत नाही. त्या समाजाला शारीरिक व मानसिक समस्या (जसे की, स्थूलपणा, लठ्ठपणा, मानसिक आजार) या सगळ्यांतून बाहेर काढून त्यांच्या जीवनात आनंद फुलवण्याचं काम करण्याचं ठरवलं. त्यासाठी मला माझ्या घरच्या सर्व मंडळींनी व जवळचे मित्र मैत्रिणी यांनी मदत केली आणि म्हणूनच या कामासाठी रुंग्ठा फ्युचरएक्स सिटी सेंटर मॉल जवळ वेलनेस सेंटर सुरू केले.महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सन्माननीय भुजबळ साहेब तसेच मविप्रचे सरचिटणीस ॲड. श्री. नितीन ठाकरे साहेब यांच्या हस्ते वेलनेस सेंटरचे उदघाटन केले. हे काम मी माझा छंद म्हणून करते आहे. सर्वसामान्य लोकांना आजारापासून दूर राहण्याचा मूलमंत्र देऊन त्यांना योग्य ते डाएट, योग्य ते प्रोटीन न्यूट्रिशन देण्याचा मोफत सल्ला देऊन त्यांच्याकडून व्यायाम करून घेऊन त्यांना तंदुरुस्त ठेवण्याचं काम मी करते आहे. भविष्यात याच कामात स्वतःला वाहून घेत अतिशय मोठ्या प्रमाणात हे काम करण्याचा माझा मानस आहे. मी या निमित्ताने सर्वसामान्य जनतेला आवाहन करते की,"आपण आपली काळजी घेऊन कुटुंबाचे शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्यासाठी आमच्या वेलनेस सेंटरशी संपर्क केला तर आम्ही आपणास मोफत सल्ला देऊ." मी ज्या परिस्थितीतून आले गरिबीतून आले अतिशय हतबल परिस्थिती असताना देखील त्याच परिस्थितीला मी माझे शस्त्र बनवले आणि परिस्थितीवर मात केली कारण मला माहित आहे, **मंज़िल उन्हीं को मिलती है, जिनके सपनों मे जान होती है, पंखो से कुछ नही होता, दोस्तों उडान तो हौसलों से होती है** हे ब्रीदवाक्य मनाशी बाळगून मी प्रामाणिक प्रयत्न करते आहे. परिस्थितीवर न रडता लढण्याचा माझा निर्धार निभावताना अनेकांची मदतही होते आहे. कधी कधी मन अतिशय खिन्न होते. पण न थकता न थांबता मी पुन्हा जोमाने कामाला लागते आणि मी माझं काम अव्याहतपणे करत आहे, करत राहील. मी माझ्या महिला भगिनींना एकच निरोप देऊ इच्छिते की या जगाची निर्मिती स्त्रीपासून होते आणि म्हणून या जगाला न्याय देण्याचे व आनंद देण्याचे काम देखील आपणच केलं पाहिजे. आपण चांगलं काम करत असताना निश्चितपणाने आपल्याला मदत करणारे अनेक हात मिळत असतात. पण पहिलं पाऊल हे आपल्यालाच टाकावं लागतं आणि म्हणून आरोग्याशी संबंधित गोष्टीत मी शेवटपर्यंत काम करण्याचं ठरवलं आहे. आपणही आपली काळजी घेऊन आपल्या कुटुंबाचा शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्याचा प्रयत्न करावा. एवढीच विनंती या लेखातून करते.

**- ॲड. श्रद्धा कासुर्डे**
(मुंबई उच्च न्यायालय)



उत्तरार्ध :

# स्त्रीशक्ती

स्त्री जीवन जाणिवा

आणि सन्मानाच्या दिशा

# मुक्ताई



माझी मुक्ताई मुक्ताई
दहा वर्सांचं लेकरू
चांगदेव योगियानं
तिले मानला रे गुरू

"अरे संन्याश्याची पोरं"
कुनी बोलती हिनई
टाकी देयेलं पोराचं
तोंड कधी पाहू नई"

अरे असं माझं तोंड
कसं दावू मी लोकाले?
"ताटीलायी ग्यानदेव
घरामदी रे दडले

उबगले ग्यानदेव
घडे असंगाशी संग
कयवयली मुक्ताई
बोले ताटीचे अभंग

घेती हिरिदाचा ठाव
ऐका ताटीचे अभंग
एकाएका अभंगात
उभा केला पांडुरंग

गह्यरले ग्यानदेव
डोये गेले भरीसनं
असा भाग्यवंत भाऊ
त्याची मुक्ताई बहीन



**- कवयित्री बहिणाबाई चौधरी**

# मातृसत्ताक पध्दतीचा प्रभाव



डॉ.प्रतिमा इंगोले
सुप्रसिद्ध लेखिका

महाराष्ट्रात पूर्वी मातृसत्ताक पध्दती अस्तित्वात होती. ह्या मातृसत्ताक पध्दतीचे वैशिष्ट्ये हे की, त्यावेळी प्राकृतिक धर्म अस्तित्वात होता. प्राकृत भाषा बोलली जात होती. मातृसत्ताक व्यवस्था ही प्राकृतिक व्यवस्था ! प्राकृतिक व्यवस्थेमध्ये सर्व काही प्रकृतीचे! सत्ता प्रकृतीची ! त्या प्रकृतीचा तिच्यातील जीवनोपयोगी साधनांचा फक्त लाभ घ्यायचा. स्वतःच्या गरजेपुरते प्रकृतीतून घ्यायचे पण तिची नासधूस करायची नाही. सर्वच प्रकृतीचे असल्यामुळे सर्वच स्वतःला प्रकृतीची लेकरं मानायची. साहजिकच सर्वांचा धर्म एकच होता प्राकृतिक धर्म आणि भाषाही एकच होती प्राकृत! त्यामुळे कोणाचेच स्वतःच्या मालकीचे काहीच नव्हते. सर्वच भूमातेचे त्यामुळे कसलाही भेद नव्हता. सर्व समसमान होते. भेद होता तो फक्त लहान वयाचा व मोठ्या वयाचा असा ! स्त्री पुरुष असाही भेद नव्हता. कारण स्त्रियांच्या हाती सत्ता होती आणि स्त्रिया पुरुषांना समानच मानत होत्या. त्या काळात लैगिंक संबंधही मुक्त होते ! त्यामुळे कोणीही कोणावर जबरदस्ती करीत नव्हते. सर्वच स्वतंत्रवृत्तीने वावरत होते. त्यामुळे वैयक्तिक स्वार्थ, लोभ, हव्यास हे विकारच अस्तित्वात नव्हते. पशुपक्ष्यांप्रमाणे निसर्गशरण सर्व जगत होते. शेतीचा शोध लागला होता. पण शेतीवर मालकी नव्हती. सर्वच भूमातेचे होते आणि सत्ता गणराज्यांची होती. पण नवाश्म युगातील ही परिस्थिती बदलली कारण आर्यांचे आगमन झाले. आर्य परकीय होते की इथले हा प्रश्न नव्हता. ते महाराष्ट्रात विंध्य पर्वत ओलांडून आले. तत्पूर्वी इथे गणराज्ये अस्तित्वात होती हे नक्की. पहिला येणारा आर्य म्हणून अगस्तीची नोंद' वऱ्हाडचा इतिहास' ह्या या. मा. काळे यांच्या पुस्तकात आहे. त्याच्या पाऊलखुणा आजही सालबर्डीच्या परिसरात आढळतात. म्हणजेच महाराष्ट्रापुरते. आर्य उत्तरेकडून आले असा प्राचीन इतिहास आहे. आर्यांच्या आगमनानंतर इथे संस्कृती संघर्ष सुरू झाला. कारण आर्यांचा समूह मालकी या संकल्पनेचे प्रतिनिधित्व करणारा होताच. त्यांच्या दृष्टीने स्त्रिया, जनावरे, घोडे, जमीन, झाडे अशा सगळ्या स्वामित्व गाजविण्याच्या गोष्टी ! पण असे सरळ सरळ स्वामित्व स्वीकारणे मातृसत्ताक पध्दतीत कोणी स्वीकारणार नाही ,हे आर्यांनी ओळखले . मातृसत्ताक पध्दतीत अपत्य फक्त मातेचेच असते हे त्या काळातील वैश्विक सत्य होते. आकाशातील सूर्य जसा पृथ्वीवरील निर्मितीवर हक्क सांगत नाही तसाच कोणताही पुरुष अपत्यावर हक्क सांगत नव्हता. आर्य आल्यावर मालकी आणि स्वामित्व शब्द रुढ झाले. आर्यांजवळ त्यांनी पाशवी रीतीने लुटलेल्या मुली दासी म्हणून बाळगलेल्या होत्याच. पुरुषांना त्यांचे प्रलोभन आणि स्त्रियांना सुखविलासाची व ऐषारामाची लालूच दाखवीत ते पुरुष स्वामित्वाचे मोहक तत्त्वज्ञान सर्वांच्या गळी उतरवितात. तेव्हापासून जीवनशैली बदलली. अहंकार, इर्षा,असूया, असत्य, नरसंहार, या सर्वच मानवी दुर्गुणांचा उगम स्वामित्वात आहे. तेव्हापासूनच प्राकृतिक जीवनशैलीचा -हास होऊन आजच्या मानवीसृष्टीचा ऱ्हास करणाऱ्या जीवन शैलीपर्यंतचा प्रवास आपण अनुभवतोच आहोत. मालकी येताच स्वार्थ आलाच. त्यातूनच हव्यास आला. आणि त्यातूनच आसक्तीपायी नीतिमत्तेचा गळा घोटला गेला आणि सृष्टीचा ह्रास झाला.

भूमीवर मालकी आली. झाडांवर मालकी आणि मग विनाश सुरू झाला. जास्तीत जास्त भूमी माझी व्हावी हे तर होतेच पण ती भूमी जास्तीत जास्त पिकावी त्यासाठी निरनिराळे प्रयोग सुरू झाले. मग संकरित बियाणे आली. कीटकनाशके आलीत. ह्या सर्वांचा अमर्यादित वापर सुरू झाला आणि तो इतका वाढला की, संकरित बियाणे आरोग्याला घातक ठरू लागली. कीटकनाशकेच ती, ती फवारणाऱ्याचाच जीव घेऊ लागली. झाडे माझ्या मालकीची करता करता माणूस जी झाडे त्याच्या मालकीची नाहीत ती जंगलातील झाडे तोडू लागला. त्यामुळे पर्यावरणाचा तोल ढासळला. पशुपक्षांवरील मालकी हव्यासापोटी, निरनिराळे घातक संप्रेरके वापरुन पशुंचा उपयोग जास्तीत जास्त दूध देण्यासाठी आणि पक्षांचा जास्तीत जास्त अंडी देण्यासाठी होऊ लागला. माणसं स्वतः यंत्रे बनता बनता इतरांनाही त्यांची नैसर्गिक जीवनशैली मारुन, यंत्रे बनवू लागली. आणि त्यांच्यासारखाच स्त्रीचा उपयोग तर वस्तू म्हणून केव्हाच सुरू झाला. आपल्या हव्यासासाठी, स्त्रियांनी ऑक्सीटॉक्सीन सारखी जीवघेणी औषधे घेण्यासाठी प्रेरित व्हावे, इतकी जीवनशैली विकृत झाली. आता तर सर्वच क्षेत्रात ह्या विकृतीचा बजबजाट दिसून येतो आहे. शहरी जीवनात तो जास्तच फोफावला आहे. आणि शहरांचे अनुकरण खेड्यातून झपाट्याने होऊ लागले आहे. ह्याचाच विळखा आदिवासींच्या नैसर्गिक जगण्यालाही बसला.

त्यातूनच वन जमिनींवरचा त्यांचा हक्क निकालात निघाला आणि जंगलांवरचा नैसर्गिक हक्क हिरावला गेला. त्यामुळे त्यांचे जगणे एक दाहक समस्या बनत गेले आणि त्याच दाहकतेमुळे जंगलही पोळले गेले. ग्रामीण जीवन प्राकृतिक आणि नैसर्गिक अशा दोन्ही जीवनशैलीचा समतोल साधणारे होते. अजूनही अगदीच आडवळणाच्या गावातून ते थोड्याफार प्रमाणात टिकून आहे. त्याला आपण ग्राम जीवनशैली जरी म्हटले तरी ती खरी लोकांच्याच जगण्याची शैली असते. अगदीच लहान खेड्यांतून अद्यापही निसर्गाधिष्ठित घरे आढळतात. निसर्गनिर्मित साधनांचा त्यासाठी उपयोग होतो. माती, मातीपासून बनवणाऱ्या विटा, कवेलू, छप्परासाठी बांबू, बांबूपासून बनणारे तट्टे, ताट्या, लाकडांपासून बनणाऱ्या खिडक्या दारे इत्यादि. ही घरे दरवर्षी शाकारावी लागतात. त्यासाठी तुराट्या, पह्याट्या वापरतात. त्यांच्या अंगणात तुळस, एखादे फुलझाड हे तर असतेच पण त्याच बरोबर एखादे फळझाड आणि एखादा तरी वेल असतोच.जो त्यांच्या आरोग्याला पूरक ठरतो. दारातली वेलभाजी आणि फळे अर्थातच विषमुक्त असतात. शिवाय ती हवाही शुध्द ठेवतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आपण बाकी कशाचा अंगीकार करू शकत नाही. पण किमान ग्रामीण जीवनशैलीपैकी आपल्या घरातून, फ्लॅटमधून असे एखादे किमान भाजीचे झाड तर लावू शकतो. ज्याची आपल्याला नैसर्गिक व ताजी भाजी मिळू शकेल. उलट पूर्वीच्या मातृसत्ताकपध्दतीतील शेतीचे स्मरण म्हणून एक दिवस (कृषीपंचमी खरे नाव) ऋषीपंचमी पाळून त्या दिवशी बैलांच्या साहाय्याने

**(... पान क्रमांक ५० वर)**

# संस्कृती, परंपरा आणि स्त्रिया



- प्रा. डॉ. कमल आहेर -कुंवर
मराठी विभागप्रमुख (सेवानिवृत्त)
कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा

समाजाच्या समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी ' संस्कृती ' हा शब्द वापरला जातो. सर्वसमावेशक कृती म्हणजे संस्कृती. प्रकृती म्हणजे निसर्ग आणि विकृती म्हणजे निसर्गात विकार. संस्कृतीतून प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून संस्कार केले जातात. डोळ्यांना दिसणाऱ्या आणि न दिसणाऱ्या घटकांच्या आधारे भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती असे प्रमुख प्रकार सांगता येतात. भारतीय संस्कृती प्राचीन आहे. वैदिक काळात संस्कृतीची मुळे रुजवली गेली. सुसंस्कृत संवाद, शिष्टाचार, श्रद्धा, मूल्ये, विधी ही भारतीय संस्कृतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. आपल्या देशात विविध धार्मिक गट राहतात, त्यामुळे भारतीय संस्कृती वैविध्यशील आहे. चैतन्यदायी आहे. अतिथ्यशीलता, वृद्धांविषयी आदर, नम्रता, अहिंसा ही भारतीय संस्कृतीतील सार्वत्रिक मूल्ये आहेत. विविधतेत एकता हे भारतीय संस्कृतीचे मुख्य उद्दिष्ट आहे. सामाजीकरण हे अनेकदा उस्फूर्त असते.

स्त्रीने राजकारण आणि युद्धभूमी गाजवल्याची पुराणकाळापासूनची अनेक उदाहरणे आपणास सांगता येतात. जो रक्ताच्या प्रत्येक थेंबातून पुन्हा पुन्हा जिवंत होत होता त्या रक्तबीज राक्षसाला सामोरी गेलेली चंडिका एक स्त्रीच होती. चंडिका म्हणजे पार्वती. असूरसंहारासाठी पार्वतीनेच चण्डिकेचे रूप धारण केल्याचा उल्लेख आढळतो. पुराणे बाजूला सारली तरी आपल्या इतिहासातही स्त्रीशौर्याच्या गाथा आहेतच. राणी लक्ष्मीबाई इंग्रजांशी जीवात जीव असेपर्यंत लढली. कॅप्टन लक्ष्मीने सुभाषचंद्र बोसांबरोबर स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. चितोडच्या राणी पदमावतीने आपल्या शीलाचे रक्षण करण्यासाठी किल्ल्यातील सर्व स्त्रियांबरोबर जोहार केला. कल्पना चावलाने अंतराळात भरारी घेतली. स्त्रीला मानसिक दृष्ट्या दुर्बल समजले जाते. परंतु इंदिरा गांधी, मार्गारेट थॅचर, बंदरनायके, गोल्डामायर या स्त्रियांनी देशाचे नेतृत्व करून मानसिक सबलतेचा नमुनाच जगाला दाखवून दिला.

भारतात स्त्रीजागृतीकरिता राजाराम मोहन रॉय, म.गांधी, म.ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. म .गांधी, विनोबा भावे यांना स्त्रीसाठी 'अबला' शब्द उपयोगात आणणे मान्य नव्हते. महिला म्हणजे ' महान ' असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता. आधुनिक काळात विविध क्रीडाप्रकारांत (उदा .वजन उचलणे, धावणे, पोहणे, भालाफेक इ.) स्त्रियांनी प्रावीण्य संपादन केल्याची अनेक उदाहरणे आहेत. विमान, बस, ऑटोरिक्षा, कार, मोटरसायकल इ. वाहने स्त्रिया चालवू शकतात. लष्करात भरती होतात. हे स्त्री दुर्बल नाही हे सिद्ध करणारे आहे. पुराण, इतिहासकाळात स्त्री बरीच मुक्त होती असे दिसते. मात्र संस्कृतीविकासाबरोबर ती चूल आणि मूल यात गुंतून पडली. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री पुरुष विषमता निर्माण झाली.मनुस्मृतीत स्त्रीने घराबाहेर पडू नये .पुरुषाच्या आज्ञेत रहावे असे सांगितले गेले. मुलींवर गुलामगिरीचे संस्कार झाले. सतीची चाल, हुंडापद्धती इ .दुष्ट रुढींचे प्राबल्य वाढले. स्त्री म्हणजे भोग्य वस्तू. तिचे कोणासही दान करावे, तिला विकून टाकावे अशी समजूत रूढ झाली. तिला शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. मुले उत्पन्न करणारे मशिन एवढीच तिची किंमत उरली.

सुरुवातीला माणूस रानटी अवस्थेत होता. कुटुंबव्यवस्था नव्हती. नीतिसंस्कार नव्हते. कोण श्रेष्ठ, कोण कनिष्ठ असे काही नव्हतेच. प्रत्येकाने आपले भक्ष्य मिळवून पोट भरावे आणि हिंडावे हीच संस्कृती होती. त्यामुळे सगळेच मुक्त होते. परंतु पुढे असे एकटे राहण्याची माणसाला भीती वाटू लागली आणि तो टोळी करून राहू लागला कारण हिंस्त्र श्वापदांपासून तो एकटा आपला रक्षण करू शकत नव्हता. असे करताना त्याच्यावर काही बंधने आली. पुढे तो पशुपालन करू लागला. त्या काळात वंशवृद्धीसाठी स्त्रीचे स्थान महत्त्वाचे राहिले. पशुपालनाबरोबर माणसाने शेतीचा शोध लावला. पुराणकाळात समाज बराच स्थिर झाला. राजघराणी उदयाला आली. स्त्रीच्या स्थितीत हळूहळू बदल घडू लागला. उच्च जातीच्या मुलींना शिक्षण मिळू लागले पण ते घरात. लग्नाचे वय नऊ झाले. स्त्रियांना स्वतःची अशी मतं नव्हती. बंधने वाढत गेली. पुढे पुढे तर स्त्री चूल आणि मूल यातच गुरफटली आणि आपला सर्व भार पुरुषावर टाकून त्याची गुलाम झाली. त्याच्याच डोळ्यांनी जग पाहू लागली. आर्य भारतात आले. त्यांनी अनार्य मुलींशी विवाह केले असावेत. या मुली बहुधा युद्धात जिंकलेल्या असत. विवाहित स्त्री मातृत्वाच्या जबाबदारीमुळे अभ्यासासाठी वेळ देऊ शकत नव्हती. आपल्या देशात जी परकीय आक्रमणे झाली त्यामुळेही तिला घरात बंद करण्यात आले अथवा पडद्यात ठेवले गेले असावे. संरक्षण करणारा पुरुष तिच्यावर मालकी हक्क गाजवू लागला.शिक्षण नव्हते ,बाह्य जगाशी संबंध राहिला नाही. ती गुलामगिरीत अधिक रुतू लागली.

आज स्त्रिया जागृत झाल्या आहेत. आपल्या हक्कांसाठी झगडत आहेत. कायद्याने तिला संरक्षण दिले आहे. देवतापूजेची संस्कृती भारतात आहे परंतु स्त्रियांना सांस्कृतिकदृष्ट्या मान देण्यात मात्र आपण बेदखल केले आहे. तिच्या ठायी वात्सल्यभाव आहे. मातृत्वशक्तीचे अपार सामर्थ्य आहे. पाश्चात्यांच्या अंधानुकरणापेक्षा स्वतःमधील क्षमतांचा शोध घ्यावा. स्त्रीकडे विकृत दृष्टीने पाहणाऱ्या प्रवृत्तींचा नाश करण्याचे मोठे आव्हान समाजापुढे आहे .

# स्त्री आणि सृजन



- डॉ. वर्षा तोडमल
मराठी विभागप्रमुख
आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे

स्त्रीप्रधान समाज रचनेमागे एक आधारभूत तत्त्व आहे ते निर्मिती व पोषणाचे ! शेती करण्याचा पहिला मान स्त्रीकडेच जातो. तिनेच प्रथम शेतीचा शोध लावल्याचे समाजशास्त्रज्ञ सांगतात. नांगरताना जनकाला सीता प्राप्त झाली. 'सीता' या संस्कृत शब्दाचा अर्थच 'नांगराचा फाळ' असा होतो हे येथे लक्षात घ्यावे लागते. सीता भूमीतून निघाली व भूमीतच अदृश्य झाली. ती भूमिकन्या मानली गेली हे सर्व संदर्भ स्त्री आणि भूमी यांच्या नात्यावर प्रकाश टाकतात. आदिबंधात्मक दृष्टीने या सर्वांकडे पाहता येते.

स्त्रीचे सर्जनाशी असलेले आदिम आणि अतूट नाते लक्षात घेता वाङ्मयनिर्मितीतील स्त्रीचे महत्त्व आणि स्थान अनन्यसाधारण असल्याचे दिसून येईल. सर्व कला-साहित्य यांच्या निर्मितीच्या मुळाशी स्त्रीशक्तीच दिसत असल्याने संत ज्ञानदेवांनी सरस्वती वंदनात 'चातुर्यार्थ कला कामिनी । ते शारदाविश्वमोहिनी' म्हणून तिला नमन केले आहे. ब्रह्मदेव जसा सृष्टीकर्ता तसेच वाग्देवी ही साहित्यजननी मानली जाते. ती सर्व विद्यांची अधिष्ठात्री देवता मानली जाते.

स्त्री ही आदिम काळापासून एक शक्ती मानण्यात येते. याज्ञवल्क्याची मैत्रेयी वादविवादात अनेकांना जिंकणारी दिसते, गार्गी ब्रह्मवादिनी होती. अरुंधती ही नावाप्रमाणेच गतिमान होती. आजच्या स्त्रीवादी विचारांच्या काळात उद्दालकाची पत्नी आपणास प्रेरक ठरू शकते. रुद्राध्यायात ११ रुद्रांना तर्पण करतानाच त्यांच्या पत्नींनाही तर्पण करण्यात येते. रुद्र, भीम, महतोदेव, शर्व इ.च्या व त्यांच्या पत्नींच्या नावाने तर्पण आहे. रामायणातील कैकेयी युध्दविद्येत निपुण होती. असे अनेक संदर्भ स्त्रियांच्या संदर्भातील श्रेष्ठत्व, पुरुषाच्या बरोबरीचे स्थान असल्याचे सिध्द करण्यास पुरेसे आहेत.

मध्ययुगात मराठी संत कवयित्रींची कविता हा महाराष्ट्रीय जीवनाचा एक श्रेष्ठ सांस्कृतिक वसा आणि वारसा आहे. त्याची नाळ एकीकडे स्त्रीगीतांशी जुळते, तर दुसरीकडे आजच्या स्त्रीवादी साहित्य परंपरेशीही त्याचा अनुबंध जुळवता येतो. भौतिकाचे बंधन झुगारून आत्मप्रत्ययाचे बोल ह्या कवितेने जनसामान्यांप्रत नेले, स्त्रियांना संसारातील जबाबदाऱ्या, कष्ट, दारिद्र्य हे सुटले नाही; पण त्यांनी वास्तवावर आणि वर्तमानावर मात केली आणि भविष्याची सुंदर स्वप्ने जोपासली. त्यात विठोबा हा नायक होता. त्याच्या भावबंधात संतकवयित्रींनी अनेक पातळ्यांवर स्वतःला बांधून घेतले आणि अभंगरूपी गोफ विणलेला आहे. जनाबाई आपले स्त्रीपण जपते. अन्यायाविरुद्धच्या संघर्षात जास्त परखड होते. तिच्या मनातील दबलेल्या रागाचा स्फोट होतो आणि थेट संत तुकारामांची परखड कठोर भाषा ती वापरू लागते.

"डोईचा पदर आला खांद्यावरी,
भरल्या बाजारी जाईन मी,
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा,
आता मज मना कोण करी"

इथे जनाबाईंचे अभंगातून प्रकटणारे व्यक्तिमत्त्व संतत्वाच्या खडतर प्रवासाचा प्रत्यय देणारे आहेत.'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदास' असे ती म्हणते.

संतकवींनीही संतकवयित्रींचा मोठेपणा जोखला होता व त्यांनाही संप्रदायात आदराची वागणूक मिळालेली आहे. यावरून स्त्रीपुरुष समानतेचे स्वरूप संतांच्या अभंगातून दिसून येते. ज्ञानदेव-नामदेव-एकनाथ-तुकाराम हे जसे संतकवी म्हणून सुप्रतिष्ठित झालेत त्याचप्रमाणे जनाबाई-मुक्ताबाई - बहिणाबाई - वेणाबाई -कान्होपात्रा- निर्मळा - सोयराबाई- भागूबाई या स्त्रियाही विविध जातिजमातीं मधील असूनही 'संत' पदवीला पोहोचल्या आहेत.

स्वतंत्र भारताच्या जडणघडणीतही महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरते. स्वातंत्र्य लढ्यात पुरुषांबरोबर महिलांचा सहभाग होता. त्यानंतर स्वतंत्र भारतात पंतप्रधान राष्ट्रपती, परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, मुख्यमंत्री, खासदार, आमदार असा सर्व पदभार महिलांनी यशस्वीपणे सांभाळला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाची सूत्रे हाती घेतली आहेत. डॉ. कलाईसेलवी नल्लाथंबी या वैज्ञानिक औद्योगिक संशोधन परिषदेच्या महिला संचालक आहेत. क्षेपणास्त्र विकसित करणाऱ्या डिआरडिओच्या डॉ. टेस्सी थॉमस यांना लोकमान्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारतीय नौदलाच्या महिला पथकाने अरबी समुद्रात डार्निअर विमानाने पहिली गस्त घातली. भारताच्या पहिल्या रक्षा मंत्री निर्मला सीतारामन, पहिली कॉम्बॅट पायलट अवनी चतुर्वेदी इतिहासाची पुनरावृत्ती करत आहेत.

आजच्या काळात स्त्रीसंत साहित्याच्या अभ्यासाचे औचित्य काय हा प्रश्न उरतोच. आजची स्त्री मध्ययुगातल्या स्त्रीपेक्षा खूप शिक्षित, स्वतंत्र, आणि सक्षम आहे. स्वतःच्या अंगभूत गुणांना तिने इतके ओळखले आहे की, स्त्री दाक्षिण्याची अपेक्षाच ती करत नाही. शिक्षणाला ती वंचित नाही. अर्थार्जनाची साधने तिला उपलब्ध आहेत. विधवेला पुनर्विवाहाचे दरवाजे खुले आहेत. म्हणजे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक प्रतिष्ठा तिला प्राप्त झाली आहे हे निश्चित ! असे असताना असुरक्षित, अशिक्षित अशा मध्ययुगीन स्त्रीची गाथा आज का अभ्यासावी? असा प्रश्न विचारला जातोच. या प्रश्नाचे उत्तर असे असावे की, भारतीय परंपरेत ज्या वंदनीय स्त्री परंपरेचा विचार आपण केला, आजची स्त्री त्याच परंपरेचा अविभाज्य भाग आहे... आणि ही परंपरा तिला सहनशीलता शिकवते. विचारस्वातंत्र्यासोबत विवेक शिकवते. कणखरपणासोबत मर्यादा शिकवते. भारतीय कुटुंबसंस्थेचा आदर करण्यास शिकवते. भारतीय परंपरा ही मूल्यांची परंपरा आहे आणि मूल्ये सार्वकालिक असतात. शाखाविस्तार कितीही झाला तरी झाड मुळापासून विलग झाले तर नष्ट होईल, तसे होऊ नये म्हणून जागतिकीकरणाच्या स्वाभाविक विस्तार प्रक्रियेत असूनही आजच्या स्त्रीने मूलभूत भारतीय परंपरेचा आदर आणि आचरण करणे आवश्यकच आहे. म्हणून या अलौकिक संतस्त्रिया, आणि त्यांचे साहित्य सार्वकालिक मार्गदर्शक असेच आहे.

# महिला सबलीकरणाच्या निमित्ताने



**डॉ. स्नेहल तावरे**

माजी अध्यक्षा, मराठी अभ्यास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

'महिला' या शब्दामधील 'महि' म्हणजे पृथ्वी. पण ती कशी, तर मोठी, महान आणि ‘लालित्य' मधील 'ला' यांच्या संयोगाने 'महिला' या शब्दाची उत्पत्ती झाली असे मला नेहमीच वाटते. लालित्याची खाण असलेली अशी ‘महिला’ मानवी संस्कृतीच्या आदिम काळापासून चालत आलेल्या परंपरेची एक पाईक आहे. लालित्य हे जिवंत आणि रसरशीतपणाचे एक द्योतक आहे. जीवनामध्ये सप्तरंगांची पखरण करण्याचे काम महिला करू शकते ती या लालित्याच्या तिला प्राप्त झालेल्या शक्तीच्या जोरावर. म्हणूनच संस्कृती संवर्धनाचे कार्य महिला करीत असते.

ईश्वरदत्त असलेल्या निर्मितिक्षमतेचा वापर करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. 'स्त्री' आणि 'पुरुष' या शब्दांच्या वापरामध्येही 'स्त्री' हा शब्द प्रथम येतो हे आपण लक्षात घेतले पाहिजे. स्त्री नसेल तर पुरुषांचे पुरुषत्व लोप पावेल. या दोघांच्या भूमिका महत्त्वाच्या असल्याने त्या नाकारून चालत नाही. पण ईश्वरदत्त काही चांगले आणि काही मर्यादा घालणारे गुण तिच्यात असल्याने आधुनिक काळात सबलीकरणाचे प्रयोग स्त्रीबाबत अधिकाधिक झालेले दृष्टोत्पत्तीस येतात. संवेदनशील, भावनाशील, परोपकारी, धर्मरक्षक, संस्कृती संवर्धक, वात्सल्य, प्रेम अशा गुणांबरोबरच निसर्गतः शारीरिकदृष्ट्या तिच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे स्वसंरक्षण करण्यात ती काहीशी कमी पडते. पूर्वीच्या काळी गार्गी, मैत्रेयी या विदुषी पुरुषांच्या बरोबरीने वादविवादात भाग घेत होत्या. त्यांच्या बौद्धिक क्षमतेची जाण तत्कालीन समाजाला होती. परंतु काळाच्या ओघात स्त्री आणि पुरुष यांच्या कार्यक्षेत्रांची विभागणी होत गेली. संसाराच्या रथाची दोन चाके म्हणजे स्त्री आणि पुरुष असे मानले तरी शारीरिक क्षमतेनुसार तिच्यावर गृहखात्याची जबाबदारी सोपविण्यात आली. साहजिकच 'चूल आणि मूल' हे तिचे कार्यक्षेत्र मानण्यात आले. पुरुषाने बाहेरच्या जगात जाऊन कमवून आणायचे आणि स्त्रीने घरात राहून सर्वांच्या उदरनिर्वाहाची सोय करायची हे अनेक वर्षांचे चक्र काळाच्या ओघात मागे पडू लागले. कारण स्त्रीला आपल्या बौद्धिक संपदेची जाणीव होऊ लागली.

बौद्धिक संपदेचा विचार केल्यास पुराण, रामायण, महाभारत अशा ग्रंथांतून स्त्रीच्या विविध क्षमतांची ओळख आपणास होत राहते. सल्ला देण्यापासून राज्यकारभार करण्यापर्यंत स्त्रीच्या सामर्थ्याचा उपयोग जागतिक स्तरावर झालेला दिसून येतो. केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशाच्या इतिहासात स्त्रीसामर्थ्य अधोरेखित झालेले दिसून येते. राजकारणात स्त्रीचा सहभाग पौराणिक, ऐतिहासिक काळात होता याचे अनेक दाखले देता येतात. अशा पार्श्वभूमीवर केवळ भारताचा विचार केला तर ही परंपरा मधल्या काळात कुंठित झालेली दिसून येते. भारतात चातुर्वर्ण्याची चौकट निर्माण झाली त्यात स्त्रीचे स्थान हे शूद्रांसारखेच होते. म्हणजे 'असून अडचण आणि नसूनही 'सोय' अशा भूमिकेतून पुरुषांनी तिच्याकडे पाहिल्यामुळे तिच्या बौद्धिक क्षमतेवर मर्यादा पडल्या. किंबहुना अनेक मर्यादा पुरुषोत्तमांनी तिच्यासाठी घराची एक लक्ष्मणरेषा आखून दिली आणि त्या रेषेचे उल्लंघन करायचे नाही असा काहीसा संकेत सुरू केला गेला. या संकेताला शह देण्याचे महनीय कार्य प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कृति-उक्तींतून केले. स्त्रियांना सन्मानाची वागणूक त्यांनी दिली. याचे कारण शिवरायांची आई जिजाबाई यांनी त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग पेटविले आणि मातृआज्ञा शिरसावंद्य मानून शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे सुराज्य स्थापन केले. स्वातंत्र्य मिळविले, राज्याचा विस्तार केला, हिंदू धर्माचे रक्षण केले, हिंदुधर्म वृद्धिंगत करताना सर्व जातिधर्मांना एकत्रित केले, भेदभावाचे राजकारण केले नाही आणि एक आदर्श राजा म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला. या सर्व अतुलनीय कामगिरीच्या मागे राजमाता जिजाबाई होत्या. हे लक्षात घेतल्यास स्त्रीशक्तीचा आदर करण्याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केली.

म्हणजे ऐतिहासिक काळात महिला सबलीकरणाचे पहिले उद्गाते छत्रपती शिवाजी महाराज ठरतात. असे जरी राजकीय पटलावर दिसत असले तरी सर्वसामान्य स्त्रियांना बौद्धिक परावलंबित्व आलेले होते. घर शिक्षित झाले तर समाज सुधारेल आणि नंतर देश हे ओळखून महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या घरातच शैक्षणिक प्रयोग सुरू केले. 'महिला शिक्षित तर घर सुरक्षित' या न्यायाने त्यांनी आपल्या पत्नीला - सावित्रीबाई फुले यांना विद्यादानाचे धडे प्रथमतः दिले. इतकेच नव्हे तर पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची ऊर्जा सावित्रीबाईंच्या मनात प्रथम त्यांनी निर्माण केली. सावित्रीबाई शिकल्या म्हणून आधुनिक काळात महिलांनी अनेक क्षेत्रे लीलया काबीज केली आणि त्यावर स्वतःची स्वतंत्र अशी एक मोहोर उमटविली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने समाजाने केलेली अवहेलना स्वीकारत आपले शैक्षणिक, सामाजिक कार्य चालूच ठेवले; म्हणून आज लाखो सावित्रीच्या लेकी सन्मानाने जगत आहेत, अभिमानाने आणि सामर्थ्याने विविध क्षेत्रांत स्पृहणीय कामगिरी करीत आहेत.

वस्तुतः आधुनिक काळात महिला सबलीकरणावर लेख लिहिण्याचे प्रयोजन काय? असाही अनेकांना प्रश्न पडू शकतो. आपला समाज हा अनेक विचारांच्या प्रवृत्तींतून निर्माण झालेला आहे. भारताचा भौगोलिक पट विस्तृत आहे. यामध्ये अनेक धर्मांची माणसे अनेक वर्षांपासून एकत्रित राहत आहेत. केवळ धर्मच विभिन्न आहेत असे नव्हे तर त्यांच्या जातींमधील विविधता लक्षणीय आहे. एखादी जात घेतली तर त्यामध्ये अनेक पोटजाती दिसून येतात आणि या सगळ्यातून कमी-अधिक, श्रेष्ठ-कनिष्ठ असे स्तर झालेले दृष्टोत्पत्तीस येतात. तरीही स्त्री आणि पुरुष या दोन जाती लक्षात घेतल्या तर पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला सातत्याने दुय्यम लेखलेले आहे. एकीकडे मातृत्वाचा आदर करायचा पण मातृसत्ताक संस्कृती रुजवायची नाही; त्यातून पुरुष हाच वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी अशा गैरसमजुतीतून स्त्री ही अधिकच गौण झाली. मुलगी नकोच ही भावना सार्वत्रिक झाली. त्याचा अतिरेक होत गेला. सती जाणे, उपवास करणे, देहदंड स्वीकारणे अशा काहीशा आततायी आणि अतिरेकी टोकाच्या पुरुष मनाच्या भूमिकेबाबत सरकारला कठोर पावले उचलावी लागली आणि समाजमनात 'बेटी बचाओ ' ची जागृती करावी लागली, हे कशाचे द्योतक? अशा अतिरेकी भूमिकेमुळे पुरुषांचे प्रमाण वाढले आणि जन्मत:च स्त्रीभ्रूणहत्या होऊ लागल्यामुळे मुलींची संख्या कमी होत गेली. इतकी कमी झाली की लग्नाच्या बाजारात मुलगी मिळेना. मग धर्म-पंथ-जात यांच्या पलीकडे जाऊन दुसऱ्या राज्यातील मुलींशी विवाह होऊ लागले. यात गंमत अशी की कित्येक ठिकाणी एकमेकांची भाषाही त्यांना समजत नव्हती. अशावेळी केवळ वंशसातत्य हेच एकमेव कारण यामागचे दिसून येते. अशा पार्श्वभूमीवर आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रांत स्त्रीसबलीकरणाबाबत अनेकांनी योगदान दिलेले आहे, त्याचे पडसाद दूरगामी पडलेले दिसून येतात. तरीही समाजमनात काही कमतरताही जाणवतात. महिलांबरोबरच पुरुषांनी महिला सबलीकरणाचा केलेला विचार त्यांच्या सुदृढ मानसिकतेचे द्योतक आहे. हा भेदाभेद नष्ट करायचा असेल तर स्त्रीशक्तीला सबलीकरणाची जोड देऊन कुटुंबाबरोबरच राष्ट्राची प्रगती करणे आवश्यक आहे.

# महिलांचे सक्षमीकरण



- डॉ. वेदश्री विजय थिगळे
सेवानिवृत्त प्राचार्या,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दिंडोरी

भारतच काय पण चीनसुध्दा पुरुषांची सत्ता असलेला देश आहे. चीनचा तत्त्वज्ञ कन्फ्युशियस यानेही स्त्रियांविषयी पक्षपात केला. निसर्ग नियमाप्रमाणेच तिला स्वतंत्रता आणि स्वतंत्र इच्छा असता कामा नये असे त्याला वाटत होते. खरं तर चिनीत एक म्हण प्रचलित आहे आणि तिचा अर्थ आहे की, 'अज्ञान हाच स्त्रीचा अलंकार आहे.' असे असले तरी स्त्रीविषयक आत्मीयता असलेली इतरही माणसे होतीच की? भगवान श्रीकृष्ण, भगवान गौतम बुध्दांनी स्त्रीला प्रतिष्ठा दिली. त्यांनाही विरोध झालाच. तरीही त्यांनी आपल्या संघात तिचा समावेश करून घेतला. रोमन राज्यातही स्त्रीला प्रतिष्ठा होती. तिला पुरुषांची मैत्रीण मानले जात होते आणि " स्त्री पुरुषांच्या स्वभावात फारसा फरक नसतो." असे प्लेटोही म्हणाला होता. ॲरिस्टॉटलनेही स्त्रीला नाकारले नव्हते. महमंद पैंगबरही पुरुषांना म्हणाले होते की, 'तुमचा स्त्रियांवर अधिकार आहे तसाच त्यांचा सुध्दा पुरुषांवर अधिकार आहे.' भारतीय पितृसत्ताक सामाजिक रचनेत स्त्री ही परावलंबी असून ती जन्मतः वडील, विवाहानंतर पती व वृद्धापकाळात मुलांवर अवलंबून राहील अशी व्यवस्था केली होती. ' महिलांनी शिक्षण घेऊ नये, त्यांच्यात वैचारिक आविष्कार निर्माण होणार नाही ' अशी दक्षता घेतली गेली होती. या आणि अशा मतप्रणाली तर अस्तित्वात होत्याच पण हादरा बसला तो फ्रेंच राज्यकांतीच्या मागणीने. कारण या क्रांतीच्या मागणीत तिथल्या विचारवंतांनी स्त्रियांच्या शिक्षणाविषयी व समान नागरी हक्कांविषयी आग्रह धरला होता. त्याला विरोध झाला ही काही वेगळी गोष्ट नाही. पण मनस्वी लोक आपल्या ध्येयापासून परावृत्त न होता ध्येयाशी आणखीच चिकटून राहतात. पराभवाचे बुरूज ढासळून टाकण्याची त्यांची उमेद कायम जिवंत राहते. म्हणून स्त्रीजीवन संदर्भात प्रत्येक देशात चळवळींचा, क्रांतीचा जन्म झाला. त्याला भारतही अपवाद ठरला नाही.

### महिलांच्या सक्षमीकरणाची पार्श्वभूमी :

'प्रथम मेरी वूलस्टोन क्राफ्ट नंतर शंभर वर्षांनी जॉन स्टुअर्ट मिल, हॅरिएट टेलर यांनी घरात अडकलेल्या स्त्रियांकडे लक्ष वेधले. यानंतर सफ्रेजेट चळवळींनी स्त्रियांना मताधिकार मिळवून दिला. फ्रेंच लेखिका सिमॉन द बोव्हाने 'द सेकंड सेक्स' (१९४९) या ग्रंथात 'बाई म्हणून कोणी जन्म घेत नसतो तर तिला बाई बनवले जाते,' असा विचार मांडला. या पुस्तकाने तर सत्ताधीशांची, शोषकांची झोपच उडवली. ही पुरुषप्रधान संस्कृती स्त्रीची जडणघडण आपल्या स्वार्थापोटी' स्त्रीपणाच्या साच्यात बसवून कशी करते आहे आणि तेच तिच्या विकासाला कसे घातक आहे ते या ग्रंथात मांडले आहे. हा स्त्रीवादाचा 'पहिला पाश्चात्य उद्गार' म्हणता येईल. नंतर स्त्रीमुक्ती चळवळीची पावले गतिशील होऊन तिचे विविध आविष्कार समाजासमोर आले. या सगळयाला रेडस्टाकिंग्ज, न्यूयार्क रॅडिकल फेमिनिस्ट या संस्थांनीही हातभारच लावला व लिंगभेदजन्य विषमतेविरुध्दचा लढाही दिला. सगळयात वरचा कळस म्हणजे केट मिलेट यांचा 'सेक्स्युअल पॉलिटिक्स' या नावाचा ग्रंथ म्हणजे 'जहाल स्त्रीवाद' होय. स्त्रीच्या ठिकाणी जननक्षमता आहे हेच तिला सांभाळण्याचे आणि दडपून ठेवण्याचे मुख्य कारण होते. हा विचार आपल्याकडे उशिरा आला. यापूर्वी भारतात प्रयत्न झाले पण ते सारे सामाजिक आणि संस्कृतीच्या मांडवाखाली घडले. भारतातील सर्व जातीधर्मातील स्त्रियांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'हिंदू कोड बिल' संसदेत मांडले परंतु भारतीय कुटुंबव्यवस्था कोलमडून पडेल या भीतीने ते नाकारले गेले. पुढे ह्याच बिलात मांडलेले एकत्रित स्त्रियांच्या हक्काचे कायदे तुकड्या तुकड्याने संसदेत पास झाले. 'हिंदू कोड बिला'तील महिलाविषयक सुरक्षांचे अधिकार (हुंडाबंदी, घटस्फोट, राजकीय आरक्षण, पोटगी इ. तिचे मूलभूत अधिकार) २००६ सालच्या वारसा हक्क कायद्याने पूर्ण दिले. भारतीय संविधानाने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क दिले.

१९६० नंतर आपण साहित्यातून बोलू लागलो नंतर अभ्यासातून मांडू लागलो. १९७५ नंतर कायदेशीर कांडू लागलो. महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले,२००१ मध्ये दुसरे आणि २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण जाहीर केले. २०२० नंतर करोना मुळे आणखी काही योजना यात समाविष्ट झाल्या. शिक्षणात, नोकरीत, राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात स्त्रियांना आरक्षण दिले. कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान केला गेला. विकासासाठी संधी उपलब्ध करून देऊन स्त्री पुरुष असमानता नष्ट करण्याची म्हणजे महिला सबलीकरणाची म्हणजेच लाडकीकरणाची सुरुवात झाली, असे म्हणता येईल . केंद्र व राज्य शासनाने त्यांचे मागासलेपण संपावे, विकासाच्या संधी मिळाव्यात, अन्याय, अत्याचारांपासून बचाव व्हावा म्हणून विशेष कायदेशीर तरतुदी करून कडक शिक्षेची तरतूद केली. स्त्रीसुधारणेसाठी सामाजिक, शैक्षणिक, शासकीय, आर्थिक योजना, धोरणे आखलीत. सवलती जाहीर केल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांच्यासाठी राखीव जागांची सोय केली. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर महिला आयोग स्थापन केले. उद्योग व्यवसायात शासकीय स्तरावर महिलांना खास सवलती जाहीर करण्यात आल्या. स्त्री-शिक्षण म्हणजे समाज आणि देशाचा विकास होईल असा आग्रह धरला गेला. एकशे चाळीस कोटींच्या भारतामध्ये निम्म्या पर्यंत स्त्रियांची संख्या पोहोचते आहे. त्यांच्यासाठी जागतिक स्तरावर अर्थव्यवस्थेची ही उधळलेली दौड त्यांचे आर्थिक, आरोग्य, शिक्षण, बाळंतपण, रोजगार, आहार, भविष्य, सुरक्षा, त्यांची ध्येये, त्यांचे सुख समाधान यांच्या बाबतीत धुमाकूळ घालीत आहे. ही व्यवस्था सगळ्याच गोष्टींकडे संसाधने व उत्पादन घटक म्हणून बघते आहे.

### महिला सक्षमीकरणासाठी प्रत्यक्ष वाटचाल :

स्त्रीने स्त्रीविकासासाठी केलेली मागणी ही तिच्या आधुनिक विचारसरणीचेच अपत्य आहे. हा स्त्रीवाद म्हणजे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि लैंगिक पातळीवर स्त्रियांच्या शोषणाविरुध्द लढा देणारी ही एक वैचारिक चळवळ आहे. पुरुष आणि स्त्री क्षमता एकत्र येऊन ही चळवळ

(... पुढील पानावर)

(... मागील पानावरून)

राबविली तर विकास फार दूर नाही. स्त्रीची विशिष्ट मानसिकता, निग्रहधारण क्षमता,आत्म व लोकप्रबोधन आणि सामजिक प्रदूषण कमी करणारी प्रतिमा अधोरेखित करता करता स्त्रियांना जगण्यात संभ्रम निर्माण होतो आहे. आपण जगतो आहे ते आयुष्य आहे की जे आपल्याला मिळत नाही ते आयुष्य आहे हा तो संभ्रम आहे. या संभ्रमांची आवर्तने ही अभिव्यक्तीचा भाग असल्याचे त्यांच्या वर्तनातून जाणवतो. त्या एका बाजूला समाजाच्या, शासनाच्या लाडक्या होत असतानाच आत्मसंतुष्ट होणार नाहीत ना याची भीती जाणवू लागली आहे.

काळानुरूप सुशिक्षित स्त्रीचा तिच्या मनाशी, परंपरेशी आणि समाजाशी संघर्ष होत असतो. त्यामुळे तिची मानसिक आणि वैचारिक कोंडी झालेली दिसते. खरं तर माणूस म्हणून तिने आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हावे. मिळालेल्या स्वातंत्र्याचा स्वतःच्या विकासासाठी वापर करावा. स्वतःच्या जीविताच्या नियंत्रणाचे सामर्थ्य निर्माण करावे. स्वतःला आत्मप्रतिष्ठा व स्वयंसिध्दता मिळावी म्हणून प्रयत्न करावे. स्त्री विषमतेचे आणि शोषणाचे उच्चाटन व्हावे, तिला लैगिंक व अपत्य निर्मिती संबंधीचे स्वातंत्र्य मिळावे, तिच्या वयाच्या सर्वच अवस्थांमध्ये तिला संरक्षण उपलब्ध व्हावे. राष्ट्रीय विकासात तिच्यासाठी आरक्षण देवून तिच्या योगदानाच्या प्रमाणात तिच्यासाठी तिने योजना आखाव्यात. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जावे आणि तिला विकासाच्या संधी प्राप्त व्हाव्यात तेव्हाच स्त्रीशक्तीच्या रूपात देशातील मनुष्यबळ विकसित होईल.

अलीकडे स्त्री शक्तीसाठी आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, संस्कार याकडे लक्ष देऊन कागदोपत्री कायदे केलेले आहेत. त्यामुळे महिलांना त्यांच्यातील क्षमतांचे आणि कौशल्यांचे प्रत्यक्षात उपयोजन करण्याचे प्रयत्न गतिशील करणे शक्य झाले आहे. आपल्या कुटुंबाच्या उन्नतीसाठी महिला सक्षम होण्यासाठी देशातली अनेक मंडळे, सामाजिक, राजकीय, शासकीय, धार्मिक संस्था महिला सबलीकरणाकडे वळल्या आहेत. तिची तिच्या क्षमतांशीच सतत चाललेली स्पर्धा तिने जिंकली आहे. पण खंत आहे की, भारताला आर्थिक समृद्धीच्या प्रवासात टिकवून ठेवायचे असेल तर आपल्या देशातील 20 टक्के स्त्री सहभाग किंवा त्यांचे योगदान परदेशांसाठी खपत आहे. यावर विचार आणि उपाययोजना हव्यात. महिलांच्या सर्वांगीण प्रतिभा आणि बुद्धीचा उपयोग आपल्या देशासाठी व्हायला हवा. महिला सक्षमीकरणाची गती वाढवली तर अजूनही ज्या महिलांची सामाजिक असमानता, कौटुंबिक हिंसा, अत्याचार आणि परावलंबित्व यातून सुटका झालेली नाही त्यांच्यापर्यंत पोहोचणे शक्य होईल.

आपण सक्षम आहोत याची खात्री स्त्रियांनी बाळगावी. आपण स्त्री, अबला आहोत या आलेल्या आत्मग्लानीचा मनाला स्पर्श होऊ देऊ नये. नाहीतर तुम्ही स्वतःतली उर्जा, उत्साह आणि क्षमता गमावून बसाल. स्वतःवर विश्वास ठेवा तसेच आत्मग्लानी आणि अपराधीपणाच्या भावनेवर मात करा. स्वतःला दोषी मानू नका. आपली, आपल्या कार्याची स्तुती आणि कौतुक करायला शिका. आपल्या अधिकार आणि गरजा प्राप्तीसाठी सतत दुस-यावर अवलंबून राहू नका. सर्वच बाबतीत स्वावलंबी व्हा. त्यासाठी स्वतःहून प्रयत्न करा. आपली गुलामी आपणच संपवायला हवी. त्यासाठी कोणी देवदूत आकाशातून उतरणार नाही. तुम्हीच स्वतःसाठी हा चमत्कार करा. तुमचा आत्मविश्वास गळून पडेल असे निर्णय घेऊ नका. अहो पोटांत अनेक ज्वालामुखी घेऊन सुद्धा पृथ्वीवर अनेक हिरवीगार झाडे आहेतच की ! तुम्ही ही व्हा एखादे हिरवेगार झाड इतर स्त्रियांसाठी. व्हाल ना? त्यासाठी मनपूर्वक शुभेच्छा !

---

(... पान क्रमांक ४५ वरून)

पिकवलेले खात नाहीत. तसेच शहरी व ग्रामीण सर्वांनीच एक दिवस मुक्तपंचमी पाळून आपणच पिकविलेले, दारात लावलेले अन्न पदार्थ खाऊन निर्मितीचा आनंद लुटायला हवा आणि निर्मितीचा वसा जपायला हवा. कारण आजकाल हे अवघड नाही फक्त मनावर घ्यायला हवे. कारण प्रत्येकाकडे गॅलरी असतेच किंवा ह्यापुढील घरांमधून असा एखादा कोपरा पॉलीहाऊस सारखा ठेवायला हवा. जिथे काहीतरी पेरता येईल. दुसरा जीवनशैलीतील बदल म्हणजे मानवाकडे मानवासारखे बघण्याची दृष्टी ! ग्रामीण भागातून ही अद्यापही थोडीफार टिकून आहे. त्यामुळे लहान लेकरु कोणाचे एकाचे न मानता सर्वांचे मानतात म्हणूनच सर्व मिळून त्याचा संभाळ करतात. नवीन पिढी घडवतात. पूर्वीच्या चाळी, वाडे ह्यांची उदाहरणे होती. तेव्हा पाळणाघरांची गरजच नव्हती. कारण लहान मूल सर्वांचे या भावनेतून कोणीही त्याला सांभाळायचे, न्हाऊ माखू घालायचे, खाऊपिऊ घालून त्याचे संगोपन करायचे.ह्या सर्वांतून मुलाला व्यापक जीवनशैलीचा लाभ व्हायचा व तेही आपला दृष्टिकोन व्यापक बनवायचे. आज हे रुजवले तर वयस्क मंडळीचीही साथ लाभून त्यांनाही जीवन शैलीत सामावले जाऊ शकेल ? त्यांच्या अनुभवसंपन्नतेचा लाभ नवागतांना होऊ शकेल?

तिसरा ग्रामीण जीवनशैलीचा महत्त्वाचा पैलू होता तो म्हणजे कोणाचीही लेक गावची लेक मानण्याचा. आजच्या स्त्रीकडे बघण्याच्या विकृत दृष्टिकोनाला आपल्या मनोवृत्तीत जरी वरील बदल केला तर आळा बसू शकेल ! एकदा आपल्या गावातली. परिसरातील लेक सर्वांचीच मानली तर तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो आणि त्यातून किमान परिसरातील अत्याचाराला, लहान बालिकांवरील अत्याचाराला आळा बसू शकतो. त्यासाठी निकोप दृष्टी स्वीकारली तरच निकोप समाज निर्माण करता येऊ शकतो. थोडक्यात पूर्वीच्या प्राकृतिक जीवन शैलीतील निसंग वृत्ती ! नंतरच्या नैसर्गिक जीवनशैलीतील पावसाला मायबाप आणि भूमीला माता मानण्याची श्रध्दाळू वृत्ती ! स्वीकारली तर आजच्या सिमेंटच्या जंगलातही कुठे कुठे हिरवे अंकुर फुलू शकतील.पूर्वी ग्रामीण भागात ढगोमेघो संप्रदाय अस्तित्वात होता. तो ढगांना, मेघांना बाप आणि धरणीला माय मानायचा. ते आता शक्य नाही पण किमान धरणीची सेवा करणाऱ्या शेतकऱ्यां बद्दल तर आपण कृतज्ञता बाळगू शकतो. अन्न खाऊ घालणाऱ्या बाईस जर आपण अन्नपूर्णा म्हणून आदराने वागवत असू तर अन्न पिकविणाऱ्याबद्दलही आदर बाळगायला हवा. किमान एखादा दिवस शेतीत राबून व्यक्त करायला हवा. एखाद्या दिवसाचे अन्नपदार्थ स्वतः पिकवून निर्मितीचा आनंद घ्यायला हवा. त्यातून आपली जीवनशैली तर विकसित होईलच पण अन्न स्वतः पिकविण्यामुळे अन्नाची किंमत कळून त्याची नासाडी करण्याची हिंमत होणार नाही. लहान लेकरांबद्दलचा 'लेकरु सर्वांचे' म्हणत नवी पिढी घडविण्याचा वसा जर सर्वांनी घेतला तर किमान आपापल्या परीने पोषक विद्यायक काम प्रत्येकाला सूचू शकेल ? आणि सर्वांच्या योगदानातून नवीन पिढीला बळ मिळू शकेल. विशेषतः स्त्रियांच्याबाबत तर पूर्वीची गावखेड्यातील दृष्टी स्वीकारायलाच हवी. त्यामुळे बालिकांवरील अन्याय कोणी सहन करणार नाही, वा तसे घडण्यापूर्वीच सर्वांच्या सावधतेमुळे तो टळू शकेल ? अथवा तसली हिंमत होणार नाही. शाश्वत जीवनशैलीसाठी दुसऱ्याकडे माणूस म्हणून बघण्याची किमया साधणे अत्यंत आवश्यक आहेच.

# मॉरिशसमधील महिला जगत



- डॉ. मधुमती कुंजल

सेवानिवृत्त मराठी विभागप्रमुख व वरिष्ठ व्याख्याता
महात्मा गांधी इन्स्टिट्यूट, मॉरिशस

सध्याच्या काळात स्त्री शक्तीचे महत्त्व आणि आवश्यकता जवळजवळ सर्वांना पटू लागली आहे. स्त्री आता कोणाचीही गुलाम बनायला तयार नसते. साहजिकच समाजात चांगले बदल यावेत. तिला योग्य तो आणि योग्य तिथे मान दिला जावा अशी तिची नेहमी इच्छा असते. तिने स्वतःच्या कर्तबगारीवर समाजात व घरात सातत्याने मानाचे स्थान पटकावले आहे. हुशार, सदाचारी मुलगी आणि स्त्री ही नेहमी कुळाचे भूषण राहिली आहे.

स्त्री लग्नाअगोदर पित्यावर, नंतर पतीवर आणि वृद्धापकाळी मुलांवर अवलंबून असते. तिने फक्त 'चूल आणि मूल' सांभाळावे ही सर्वसाधारणपणे सर्वांची अपेक्षा होती. तिची हद्द फक्त स्वयंपाकघर ते माजघर इथपर्यंत होती. यातून बाहेर पडणे तिच्यासाठी फारच कठीण होते. यानंतरच्या काळातदेखील पुरुषवर्चस्वी समाजात स्त्रियांना खूप त्रास झाला. “स्त्री जन्मा ही तुझी कहाणी - हृदयी अमृत नयनी पाणी” अशी परिस्थिती जवळजवळ सर्वत्र तिच्याबाबत निर्माण झाली. 'मुलगी जन्माला येणे आणि अविवाहित मुलगी घरात असणे' या दोन्ही गोष्टी मुलींच्या वडिलांसाठी त्यांच्या जीवाला घोर लावणाऱ्या असत. मुलीमुळे हुंड्यासारखे प्रश्न उद्भवू नये म्हणून व इतर काही कारणांस्तव स्त्री भ्रूणहत्या केली जाऊ लागली. जिथे स्त्रीशक्ती देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाई तेथे अधर्म कर्म होऊ लागली. पण आपल्या संस्कृतीचे ज्ञान असलेल्या स्त्रियांनी संस्कृतीचे रक्षण केले. त्यामुळे भारतीय संस्कृती जतन करण्याचे श्रेय स्त्रीलाच जाते.

स्त्रीने नेहमी आपली प्रत्येक जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण केली. तिने आपल्या पतीला साथ देत मुलांचे संगोपन केले. कुटुंबाचे हित चिंतले. तिने केलेल्या त्यागावर तिच्या संपूर्ण कुटुंबाचे हित नेहमी अवलंबून राहिले. पण तिने स्वतःला कमी लेखले जाते असे म्हणून आपल्या जबाबदारीकडे पाठ फिरवली नाही किंवा " मी अमुक गोष्ट करणार नाही "असे म्हटले नाही. तरीपण काही जणांनी तिला उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले. तिला नेहमी खालचा दर्जा दिला. तिला तिच्या हक्कांपासून परावृत्त केले गेले. याला कारण होता समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा प्रतिगामी दृष्टिकोन. तिच्यावर टाकलेली, लादलेली बंधने. अशा या पुरुषसत्ताक समाजात स्त्री घराला घरपण आणत होती. प्रत्येक गोष्टीत तिने तडजोड केली. आवश्यक तेथे आपण माणूस असून आपल्यालादेखील अस्तित्व आहे याची जाणीव समाजाला तिने करून दिली. ती दुर्बल नाही तर सबळ आहे याची प्रचिती दिली.

हिंदी महासागरात मॉरिशस नावाचे बेट आहे. जे भारतापासून जवळजवळ चार हजार किलोमीटर दूर आहे. मॉरिशसमध्ये भारतीय समाजदेखील स्थायिक झालेला आहे. साहजिकच भारतीय धर्म व परंपरादेखील आहेत. येथील समाज या बेटावर उसाच्या शेतात काम करण्यास आलेल्या विविध देशातील आणि धर्मातील मजुरांमुळे निर्माण झालेला आहे. येथे आलेल्या प्रत्येकाने एकत्रित समान सुखदु:खे अनुभवली. एखादे झाड मुळासकट उपटून दुसऱ्या मातीत जसे लावले जाते तसेच त्यांच्या बाबतीत झाले होते. पैसे कमविण्यासाठी आपला देश सोडून निघालेली मंडळी आणि इतर काही कारणांमुळे आलेली मंडळी येथे होती. सर्वांना दु:ख मात्र सारखेच भोगावे लागले. मनापासून अथवा मनाविरुद्ध पण त्यांना इथे स्थायिक व्हावे लागले. त्याकाळी मॉरिशसमध्ये एका कुटुंबामध्ये कधीकधी दहाबारा मुले असत. घरातील बायका-माणसांना शेतात काम करावयास जावे लागे. अशावेळी घरातील सर्वात मोठया मुलाला घरी राहून इतर भावंडांना सांभाळावे लागे. त्यामुळे शिक्षणापासून तसेच इतर बऱ्याच गोष्टींपासून त्यांना वंचित राहावे लागत असे. असे होण्यामागे पालकांची असहायता व नाईलाज होता. त्या काळी सुंदर स्त्रियांना जो धोका होता तो विशेषकरून एखाद्या गोऱ्या माणसापासून होता. त्यांच्यावर जबरदस्ती केल्याची व झाल्याची काही उदाहरणे ऐकिवात आहेत. शेतात काम करणाऱ्या स्त्रियांची मजुरी पुरुषांच्या मजुरीच्या तुलनेत कमी असे. पुरुष आणि स्त्रिया यांच्यात भेदभाव केला जात होता. पण या अतिरिक्त स्त्रियांना अबला म्हणून त्यांच्या हक्कांपासून परावृत्त करणे हे इथे मुळीच आढळत नाही असे म्हटले तर अधिक योग्य ठरेल. १९६४ साली प्राथमिक शाळेत मुलामुलींना मोफत सहशिक्षण दिले जाऊ लागले. आज शाळेत मुले मुली एकत्रित शिक्षण घेत असून मुलींना आईवडिलांच्या संपत्तीत समान हक्क मिळतो, हे स्वागतार्ह आहे. औद्योगिकीकरणामुळे महिलांची भूमिका बदलली आहे. Ministry of gender equality हे पुरुष आणि स्त्रियांच्या समान हक्काकडे लक्ष देते. त्याचप्रमाणे Femme Battue ही संस्था स्त्रियांच्या कौटुंबिक समस्या पाहते. सरकारने वारसा आणि स्थलांतराशी संबंधित भेदभाव करणारे कायदे रद्द करून समानतेला प्रोत्साहन दिले. स्त्रिया आता प्रत्येक क्षेत्रात काम करतात. उदा. येथे स्त्रिया बस ड्रायव्हर, ट्रकचालक, टॅक्सी ड्रायव्हर मेट्रोचालक, गवंडी, सिक्युरिटी गार्ड तसेच पेट्रोल पंपावर गाडीत पेट्रोल भरण्याचे काम करतात.

### मॉरिशसमध्ये महिला सबलीकरण मंत्रालयातर्फे सबलीकरण :

कार्यक्रमांद्वारे बहुविध संधी व सवलती उपलब्ध करून दिल्या जातात. लोणची आणि केक बनविणे ? विणकाम, शिवणकाम, चित्रकला, हस्तकला इ.कौशल्ये शिकविली जातात. छोट्या उद्योगधंद्यांचे प्रशिक्षण देऊन छोटया आर्थिक कर्ज योजना राबविल्या जातात. लघुउद्योग करून त्यांना स्वावलंबी करण्यासाठी शिकवण्यात येते. ग्रामपंचायत ते लोकसभा निवडणुकांमध्ये प्रतिनिधित्व करण्यासाठी स्त्रियांकरिता ३० टक्के खास राखीव जागा ठेवलेल्या असतात. कोणत्याही कामासाठी त्या अर्ज करू शकतात.

कामाच्या बाबतीत अन्याय झालेला आहे असे वाटल्यास Equal Opportunity या संस्थेत त्या तक्रार करू शकतात. मॉरिशसमध्ये शीलाबाई बापू

(... पान क्रमांक ५३ वर)

# स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास

**"मी माझ्या स्त्री असण्याचे इतके पाठांतर केले**
**आईही आता मजला काहीही शिकवत नाही"**

कवयित्री स्वाती शुक्ल यांच्या या ओळी आहेत. स्त्री जन्माचे हे अपरिहार्य परंपरागत संचित, याचा अदृश्य मुकुट तिच्या जन्मासोबतच तिच्या शिरावर विराजमान होऊन येत असतो. परंपरेने चालत आलेल्या दुय्यमत्त्वाचा ती तिच्याही नकळत स्वीकार करते नव्हे हे दुय्यमत्त्व ती मिरवते, त्यातच ती धन्यता मानू लागते. काही रुढी, परंपरांचा, रीतिभातींचा आपल्याला जाच होतोय, काही बंधनांचा काच होतोय, काही लोढण्यांचा फास होतोय याची तिला जाणीवही होत नाही.

स्त्रीचा जन्म म्हणजे हे चालायचंच, याला पर्याय नाही, यातून सुटका नाही, अशी स्वतःची पक्की समजूत तिने घातलेली असते.

कवी संजय चौधरी म्हणतात की,

**"मुलगी म्हणजे फुलपाखरू**
**विस्तवाच्या फुलावर बसू पाहणारं**
**जिचे पाय अजून भाजले नाहीत**
**अशी मुलगी मला अजून भेटली नाही "**

तर शिवकुमार डोईजोडे म्हणतात की,

**" फुलाचा जन्म म्हणजे**
**एवढे तर सोसणे आले,**
**नखाचा वार देठावर**
**सुईचे टोचणे आले "**

आपलं कुठेतरी या व्यवस्थेमध्ये शोषण होतंय याची पुसटशीही जाणीव तिला नसते आणि असली तरीही सर्रासपणे डोळ्यावर पट्टी बांधून त्याकडे ती दुर्लक्ष करते. आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य निमूटपणे पार पाडत राहते. आपल्या वाट्याचे भोग मुकाटपणे सोसत राहते. समाजाच्या तथाकथित मानमर्यादांचे, संस्कृती रक्षणाचे जोखड तिच्याच तर खांद्यावर असते. ते ओढण्यातच तिची सारी हयात सरून जाते .

आज काळ बदलला आहे. स्त्री सजग होतेय, तिच्या जाणिवांचा विस्तार होतोय. ती शिक्षित होतेय. ती कमावती होतेय. पण तरीही कवयित्री पद्मरेखा धनकर यांच्या म्हणण्यानुसार ''फक्त सैल झालाय दोर" इतकेच म्हणता येईल. ती अजूनही पूर्ण स्वतंत्र झाली असे मात्र मुळीच नाही. अजूनही खेड्या पाड्यांच्या या देशामध्ये, आदिवासी दुर्गम भागांमध्ये स्त्रीचं जगणं हे दयनीय असंच आहे. वेदकाळामध्ये मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात असणाऱ्या स्त्रियांना वेदाध्ययनाचा अधिकार होता. धार्मिक कार्यामध्ये सहभागी होण्याचा देखील अधिकार होता. पुरुषांप्रमाणेच त्यांनाही आयुष्याचा जोडीदार निवडण्याचा अधिकार होता. मैत्रेयी, गार्गी, इंद्रायणी, घोषा, अपाला, लोपामुद्रा, सिकता, रत्नावली, विश्वआरा, सूर्या, रोमाला, विलोमी, सावित्री, यमी, श्रध्दा, कामायनी, विश्वाभरा, देवयानी,



**- कवयित्री जयश्री वाघ**

कनिष्ठ लिपिक,
जलसंपदा विभाग, नाशिक

देवमाता, आदिती, तपती, प्रतिथेयी, दीर्घतमा, भामती, विद्योत्तमा यासारख्या विदुषी त्याकाळात होऊन गेल्या.

एकूणच त्याकाळी स्त्रियांचे जगणे हे आत्मसन्मानाचे असेच होते. परंतु मध्ययुगात आणि त्यानंतर स्त्री आणि पशू हे ताडनाचे अधिकारी यासारखे विचार समाजामध्ये रुजल्याने तिची प्रचंड मानहानी आणि अवमूल्यन झाले. गुलामासारखे जगणे तिच्या नशिबी आले पुरुषाच्या वर्चस्वाखाली तिचे अस्तित्व नामशेष झाले. स्वतःचे अस्तित्व, स्वतःची ओळख, स्वत्त्व या बाबी जणू कधी अस्तित्वातच नव्हत्या इतक्या त्या दुर्लभ झाल्या. स्वतःचे मन मारून यांत्रिक पद्धतीने स्वतःला कुटुंबाच्या सेवेसाठी वाहून घेणे,वर अपमान सहन करीत राहणे, कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणे, स्वतःची अस्मिता व स्वातंत्र्य हरवून एकूणच माणूस म्हणून जगण्याचा अधिकार गमावणे म्हणजेच स्त्री जीवन ही संज्ञा दृढ झाली. "यत्र नार्यस्तु" म्हणणाऱ्या देशांमध्ये स्त्री म्हणून जन्माला येणे हे पाप समजले जाऊ लागले असतानाच पाश्चात्त्य देशांतून आलेला स्त्रीवाद या अंधकाराच्या भिंतींना धडका देत आहे. स्त्रीवादाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर होत असला तरी आजही

**"धनात मोजल्या मुली, गुलाम भासल्या मुली**
**खुशाल सोंगटी परी, पटात मांडल्या मुली**
**उरात दुःख ठेऊनी, सणात दंगल्या मुली**
**वरून आलबेल या, मनात भंगल्या मुली"**

अशी परिस्थिती आजही बघायला मिळणे हे या देशाचे दुर्दैव आहे. त्यातच वाढत्या अन्याय, अत्याचाराच्या घटना ही अजून एक चिंतेची बाब आहे. रजनी परुळेकर, मल्लिका अमरशेख, प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, नीरजा, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार आदी कवयित्री व लेखिका शोषणाविरुद्ध आवाज उठवताना दिसतात .

त्यापूर्वी राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे (स्त्री पुरुष तुलना) आदींनी स्त्री स्वातंत्र्याच्या या लढ्यात आपले योगदान दिलेले आहे. तोच धागा घेऊन" सिझर कर म्हणते माती"म्हणणाऱ्या कल्पना दुधाळ, सीमा साखरे, नीलम माणगावे, मंदा कदम आदी कवयित्री लिहीत आहेत.

कवयित्री मलिका अमरशेख 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' या आत्मचरित्रामध्ये

**"माझ्या स्वप्नांचं घरटं शाबूत ठेवेल**
**असं एकही हिरवं झाड**
**आता उरलं नाही,**
**माझ्या तारुण्याचं रेशमी**
**वस्त्र चोचीत घेऊन**

**''माझा प्रियकर कधीच उडून गेलाय"** असे लिहून जातात. तर कवयित्री संजीवनी बोकिल

**"दाराशी पोरकं गोजिरं बाळ रडत असावं**
**तसं अनौरस सुख अनेकदा येतं आयुष्यात**
**त्याला उचलून घ्यावं तर ते परकं असल्याचं भय**
**आणि पाठ फिरवावी**
**तर त्याच्या मोहमुठीत अडकलेला पदर"**

अशा रीतीने व्यक्त होतात.

स्त्रियांची घुसमट या कवितांमधून त्या अत्यंत प्रभावीपणे व्यक्त करतात. परंतु आपल्या लेखणीच्या तलवारीने उभारले जाणारे हे बंड ही काही अलीकडची गोष्ट नाही.

बाराव्या शतकामध्येच स्त्रीवादी विचारांची मुहूर्तमेढ रोवली ती तेजाची पुतळी, ब्रह्मवादिनी, जीवनमुक्ता, लिंगभेद विरहित आत्मा संत जनाबाईने.

**"डोईचा पदर आला खांद्यावरी,**
**भरल्या बाजारी जाईन मी"**

असे म्हणत पुरुषी वर्चस्वाला त्यांनी हादरा दिला होता. आपले आचार, विचार व विहारस्वातंत्र्य यावर ठाम राहतानाच त्या म्हणतात की,"

**पंढरीच्या पेठे मांडीयेलें पाल**
**तळ हातावरी तेल घाला तुम्ही,**

त्याचप्रमाणे

**"स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास"** असेही त्या एका अभंगामध्ये म्हणतात .

अगदी शूद्रातील शूद्राचाही वेळ आल्यावर

**(... पुढील पानावर)**

(... मागील पानावरून)
उद्धार होत असतो. आपण आपल्या उन्नतीचे आणि उद्धाराचे प्रयत्न हार न मानता सातत्याने करत रहावेत असेच त्या सांगतात.

त्यानंतरच्या काळात डॉ.रखमाबाई राऊत यांच्या घटस्फोटाचा खटला गाजला होता. १८८४ ते ९० या काळात एखाद्या स्त्रीने नांदायला न जाणे म्हणजे महाभयंकर पापकृत्य होते. अशा कर्मठ सनातनी काळामध्ये रखमाबाईंनी न आवडणाऱ्या पतीच्या घरी नांदायला न जाण्याचे धाडस दाखवलं. या खटल्यामध्ये त्यांच्यावर चहूबाजूंनी कडाडून टीका झाली. मात्र हार न मानता राणी व्हिक्टोरिया यांना पत्र लिहून त्यांनी आपल्यावरील अन्यायाची दाद मागितली. शेवटी त्यांच्या प्रयत्नांना यश आले.पतीला नुकसान भरपाई देऊन हा खटला मागे घेण्यात आला. आपल्या मनाविरुद्ध लहानपणीच हा विवाह झालेला असून आपल्याला न आवडणाऱ्या माणसासोबत राहण्यापेक्षा तुरुंगवास पत्करण्याला या तेजस्वीतेने प्राधान्य दिले. या घटस्फोटानंतर त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले. एम.डी. झाल्या आणि भारतातल्या पहिल्या अशा महिला डॉक्टर झाल्या की ज्यांनी अविरत आयुष्यभर रुग्णसेवेला वाहून घेतले. त्याकाळी सावत्र वडिलांचा त्यांना मिळालेला पाठिंबा ही विशेष बाब म्हणावी लागेल. नाहीतर आजही **"कहती हुई स्त्री से जादा सहती हुई स्त्री समाज को ज्यादा अच्छी लगती है"**

“पालकाची भाजी निवडायची, चिरायची, धुवायची, उकडायची, घोटायची फोडणी द्यायची, उकळायची आणि तरीही तिचा रंग हिरवाच राहावा अशी अपेक्षा करायची. बाई गं जग अजूनही असंच आहे.”

नोकरी करणाऱ्या स्त्रियांची सुद्धा परिस्थिती फार वेगळी नाही उलट त्यांच्या पुढील आव्हाने अजून वाढलेली आहेत. असं म्हणतात की "औरते काम से लौटकर काम पर ही जाती है "आपल्या कामावरून घरी आल्यावर आराम न करता लगेच ती घरातल्या कर्तव्यांना आणि जबाबदाऱ्यांना जुंपून घेते. अशाप्रकारे शारीरिक, आर्थिक, मानसिक, भावनिक शोषणाला ती बळी पडत राहते. घरी असणाऱ्या स्त्रियाही यंत्राप्रमाणे अविरत राबत असतात परंतु त्याचा मोबदला त्यांना मिळत नाही.

इंग्रजीत असं म्हणतात "Every woman is working but only few are salaried." तिच्या कष्टाचा मोबदला सुद्धा ती मागत नाही परंतु किमान तिला समजून घ्यावं इतकी तिची अपेक्षा सुद्धा बऱ्याचदा पूर्ण होत नसते. Every man should know that a woman is something more than just a container of uterus and overy. केवळ एखादी विषय वस्तू व मूल जन्माला घालणारे यंत्र म्हणून तिच्याकडे न पाहता तिची वेदना, दुःख,भावना समजून घेणारा माणूस तिला हवा असतो. स्त्रीवरील आपला स्वामित्वाचा हक्क बजावत असतानाच तिचे अस्तित्व केवळ एखाद्या निर्जीव वस्तू इतकेच उरते. तिलाही मन, भावना, स्वप्न व इच्छा आहेत हे मात्र सर्रासपणे विसरले जाते . या स्वामित्वाच्या भावनेतूनच आपल्या मृत्यूनंतर देखील आपल्या पत्नीने इतर कोणाचाही विचार करू नये. इतर कुणीही तिच्या शरीराचा उपभोग घेऊ नये या हेतूने सती प्रथेमध्ये लाखो स्त्रिया जिवंत जाळल्या गेल्या. त्या पार्श्वभूमीवर कवी नारायण सुर्वेंची पुढील कविता आपल्या उदारमतवादी दृष्टिकोनामुळे कितीतरी उठून दिसते. ते म्हणतात,

**"जेव्हा मी या अस्तित्वाच्या पोकळीत**
**नसेल तेव्हा एक कर**
**तू निःशंक मनाने डोळे पूस**
**ठीकच आहे, चार दिवस**
**धपापेल, जीव गदगदेल**
**उतू जाणारे हुंदके आवर,**
**कढ आवर, नवे हिरवे चुडे भर**
**उगीचच चीरवेदनेच्या नादी लागू नको!**
**खुशाल, खुशाल तुला आवडेल असे**
**एक नवे घर कर**
**मला स्मरून कर**
**हवे तर, मला विस्मरून कर!**

आपल्या माणसाचं सौख्य हे आपल्या नंतरही अबाधित राहावं असा विचार करणारी ही एक क्रांतिकारी, स्त्रीला एक व्यक्ती व माणूस म्हणून स्थान देणारी दुर्लभ रचना म्हणता येईल .

अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी यासारख्या स्त्रियांच्या त्यागाचे, समर्पणाचे दाखले देत, त्याचे उदात्तीकरण करत वर्षानुवर्ष, शतकानुशतके स्त्रीचे शोषण हे होत आलेले आहे.

अनेक क्रांतिकारक, समाजसुधारकांनी हे चित्र बदलण्याचा तळमळीने प्रयत्न केला.

स्त्रीशिक्षण जागृती व विकास हळूहळू का होईना मूळ धरत आहे. स्त्री स्वातंत्र्याचा वृक्ष बहरत आहे हे चित्र समाधानकारक आहे.

म्हणूनच म्हणावेसे वाटते की,

**" सती अहिल्या अन सीतेचा**
**केवळ तुज परिपाठ नको**
**मुक्त मानवी आयुष्याला**
**देवत्वाचा भार नको "**

हा देवत्वाचा भार झुगारून माणूस म्हणून तिचे अस्तित्व ती जपू पाहतेय. देवी म्हणून मखरात बसण्यापेक्षा व्यक्ती म्हणून मिळणारा आत्मसन्मान ती जपू पाहतेय. कारण मखरात बसलं म्हणजे विसर्जन आलंच! परंतु तिला मात्र हवंय ध्रुवताऱ्यासारखं तिचं स्वतःचं एक अढळ असं स्थान. तिच्या वाट्याचं अर्ध आकाश!

(... पान क्रमांक ५१ वरून)
या मराठी भाषक समाजातील प्रथम मंत्री होत्या. त्या २००५ ते २०१० या काळात सामाजिक सुरक्षा, राष्ट्रीय एकता, ज्येष्ठ नागरिक कल्याण आणि सुधारणा मंत्री होत्या. याशिवाय त्यांनी १९८३ ते १९९५ आणि २०१० ते २०११ या काळात ' लैंगिक समानता, बाल संरक्षण आणि कुटुंब नियोजन' या मंत्रालयाचे मंत्रीपद सांभाळले. अमिना गुरीब-फकिम या जैवविविधता शास्त्रज्ञ आणि फायटोथेरपी संशोधन केंद्राच्या संस्थापक. त्या २०१५ ते २०१८ या काळात मॉरिशसच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होत्या. सौ. माया हनुमानजी या लोकसभेच्या अध्यक्ष होत्या. त्याचप्रमाणे मुख्य न्यायाधीश, इतर मंत्री, काही संस्थांच्या प्रमुख या स्त्रियाच आहेत.

महात्मा गांधी संस्थेच्या डायरेक्टर म्हणून सौ. सूर्या गायान तर या संस्थेत कै. दयावंती बाबाजी या मॉरिशसमधील पहिल्या महिला प्राथमिक शिक्षिका होत्या. नंतर त्यांनी पहिल्या वरिष्ठ व्याख्याता आणि मराठी विभागपमुख म्हणून काम पाहिले. यानंतर २००५ ते २०२४ या कालावधीत डॉ. मधुमती कुंजल यांनी व्याख्याता, वरिष्ठ व्याख्याता व विभाग प्रमुख म्हणून यशस्वी कामकाज सांभाळले. कै.बाबाजी आणि सौ.कुंजल या भारतात जन्मल्या आणि मॉरिशसमधील शिक्षण क्षेत्रात उच्च पदापर्यंत पोहोचल्या. त्यांच्या हातून अनेक शिक्षक घडवले गेले.

सध्या येथे अनेक स्त्रिया विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत. काही स्त्रियांनी स्वत: च्या हक्कांकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांची प्रगती झालेली नाही. स्त्रियांना हक्क देण्याबरोबरच त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांना सरकारकडून मदत केली जाते. स्त्रियांची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी समाजात अनेकांनी प्रयत्न करून यश मिळविले आहे. तरीदेखील जगातील अनेक देशात स्त्री हक्कांसाठी, न्यायासाठी आंदोलने, चळवळी करण्याची आवश्यकता आहे. जगभरात घरगुती हिंसाचार, लैंगिक छळ, बलात्कार, देह विक्री, भ्रूणहत्या इ.प्रकार बऱ्याच ठिकाणी अजूनही चालू आहे. याला आळा घातला पाहिजे. कोणी एका विद्वानाने म्हटल्याप्रमाणे. “तू कोमल आहेस, पण कमजोर नाहीस, शक्तीचे नावच नारी आहे, सर्वांना जीवन देणारी अशी तू, मृत्यूदेखील तुला शरण आहे” हे अगदी सार्थच आहे. स्त्रियांची स्थिती सुधारल्यास “जिच्या हातात पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी” या उक्तीप्रमाणे जगाचे कल्याण होईल. महात्मा फुले म्हणतात, “घरातील एक माता शिकून शहाणी झाली तर, सर्व कुटुंब शहाणे होईल, सगळ्या स्त्रिया शिकल्या की, सर्व देश जागा होईल.” सध्या आपण एकविसाव्या शतकात आहोत. सर्व स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. तेव्हा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. एक सुदृढ समाज बनण्यासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांची आवश्यकता असते. सशक्त समाज बनविणे ही दोघांची जबाबदारी आहे. यानेच सर्व जगात विकास होईल.

# स्त्रियांवरील अन्याय व महिलाविषयक कायदे







- ॲड.विद्या अविनाश गाढे
जिल्हा न्यायालय, नाशिक

म.ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या अथक परिश्रमातून स्त्रियांना केवळ शिक्षणच नाही तर त्यातून स्वावलंबी होऊन स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी जागतिक मंच मिळाला. तरीही पुरातन काळापासून स्त्रिया हया रूढी, परंपरेच्या गुलामगिरीत अजूनही अडकून पडलेल्या आहेत. त्यांच्या हक्क, अधिकारांविषयी अज्ञानी आहेत. हेच अज्ञान स्त्रियांच्या दुःखाला अथवा त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यास कारणीभूत ठरत आहे. घटनाकारांनी, विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशेष लक्ष देऊन स्त्री-पुरुष समानता आणि स्त्री उद्धार विकासासाठी घटनेत कायद्याचे रक्षण दिले.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय दंड संहितेत (नवीन नाव : भारतीय न्याय संहितेत) बलात्कारासारख्या गुन्हयाला शिक्षेची तरतूद आहे. मात्र सध्याच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात गुन्ह्यांची व्याप्ती व स्वरूप फार बदलत चालले आहे, त्या अनुषंगाने कायद्यांत नव्याने तरतुदी केल्या जात आहेत. मात्र स्त्रियांसाठी पोटगीचा कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा व संपत्तीमध्ये स्त्रियांना समान हक्क देण्याचा कायदा इ. अधिकारांविषयीची माहिती तळागाळातील स्त्रियांपर्यंत पोहचत नाही वा त्याबाबत स्त्रिया सजग नाही. आज भौतिक प्रगती कितीही असली तरी स्त्रियांवरील अत्याचार थांबलेले नाहीत. त्यांचे स्वरूप अधिक जटील झाले आहे. बालिकांपासून-वृद्ध महिलांवर होणारे बलात्कार, आर्थिक परावलंबित्त्व, पती-पत्नीची भांडणे, बालविवाह अजूनही थांबलेले नाहीत. कामाच्या ठिकाणी स्त्रियांची लैंगिक छळवणूक होत आहे. महिलांना हीन दर्जाची वागणूक दिली जात आहे. ही पुरुषी अहंकाराची कृत्ये दररोज घडत आहेत. अनेक वर्षांपासूनचा अंगवळणी पडलेला अत्याचार सहन केला जातो आहे कारण कायद्याच्या संरक्षणाबाबत अज्ञान आहे . नव्या युगात नवी आव्हाने समोर आहेत. अत्याचाराविरुद्ध दाद मागण्याचे प्रमाण आजही नगण्य आहे, दाखल झालेल्या प्रकरणांचा पाठपुरावा नीट होऊ दिला जात नाही. त्यामुळे स्त्री अधिकार आणि तिच्यासाठी कायद्याचे संरक्षण याबाबत प्रत्येक स्त्री ही सजग व्हायलाच हवी. तिच्यासाठी असलेल्या काही संरक्षणात्मक कायद्यांचा ऊहापोह पुढीलप्रमाणे :

**१) भारतीय संविधानात - घटनेत स्त्रियांचे हक्क, अधिकारांची जाणीव ठेऊन पुरुषांबरोबर स्त्रियांना देखील समान हक्क दिलेले आहेत.**

अनुच्छेद १५ अन्वये स्त्रियांसोबत लिंगभेद किंवा जातिभेद करता येणार नाही. स्त्रियांना सार्वजनिक वहिवाटीच्या जागांचा वापर करण्यास कोणीही मनाई करू शकत नाही. उदा - उपाहारगृह, करमणुकीचे स्थळ, दुकाने, सार्वजनिक वहिवाटीचे रस्ते वगैरे.

अनुच्छेद १६ अन्वये सार्वजनिक सेवा योजनेमध्ये अर्थात नोकऱ्यांमध्ये स्त्रियांसोबत भेदाभेद करता येणार नाही.

अनुच्छेद २३ अन्वये माणसांचा व्यापार करणेस मनाई आहे. त्यामुळे स्त्रिया विकत घेणे किंवा स्त्रियांना वेठबिगारी बनवणे हा अनैतिक वाहतूक प्रतिबंध कायद्यांन्वये गुन्हा आहे. (Immoral Traffic Prevention Act)

अनुच्छेद कलम ३६ ते ५१ मध्ये महिला, बालक व सर्वच नागरिकांच्या कल्याणासाठी सरकारने काय करावे यासाठी निर्देश दिलेले आहेत.

अनुच्छेद कलम ३९ मध्ये कायदे विषयक सहाय्य मोफत उपलब्ध करून देण्याबाबत तरतूद आहे.

अनुच्छेद कलम ४२, ४४ व ४७ मध्ये प्रसुती विषयक तरतूद केलेली आहे.

**२) फौजदार प्रक्रिया कायद्यातील आजच्या बदललेल्या नावानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता यात देखील स्त्रियांबाबत खास तरतुदी केलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे :**

- स्त्रियांना अटक करताना पुरुष पोलीस अधिकारी स्पर्श करणार नाही.
- पोलीस कोणत्याही महिलेला सूर्योदयापूर्वी वा सूर्यास्तानंतर अटक करणार नाही.
- स्त्रियांची झडती घेताना पोलिसांनी सभ्यता पाळावी.
- स्त्रियांची वैद्यकीय तपासणी स्त्री डॉक्टरांकडूनच करण्यात यावी.
- स्त्री आरोपीस जामिनाची विशेष तरतूद आहे.
- महिला आरोपीस तुरुंगात वेगळी कोठडी असल्याबाबतची तरतूद आहे.

बलात्कारित स्त्री ची वैद्यकीय तपासणी तिच्या संमतीने किंवा ती अज्ञान वा मानसिक रुग्ण असल्यास तिच्यावतीने तिच्या पालकांच्या समक्ष त्यांच्या संमतीने करण्यात येईल. असा अपराध घडल्याची माहिती मिळाल्यापासून २४ तासात वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे.

**३) हिंदू वारसा कायदा कलम १४ प्रमाणे हिंदू स्त्रीचे स्त्रीधन :**

स्त्रीला तिच्या विवाहापूर्वी, विवाहात, विवाहानंतर वा वैधव्य आल्यानंतर तिच्या आई वडिलांनी, पतीने तसेच दोघांच्याही नातेवाईकांनी दिलेली चीजवस्तू वा भेटवस्तू वा रक्कम ही तिची संपत्ती असून ते तिचे स्त्रीधन होय. मृत्युपत्राद्वारे दिलेली संपत्ती देखील तिचे स्त्रीधन होय. त्यावर फक्त तिचाच हक्क असतो. तिच्या पतीला अथवा तिच्या जवळच्या कोणत्याही नातेवाईकांना तिच्या या संपत्तीवर हक्क सांगता येत नाही. घटस्फोटाच्या वेळी स्त्रीला लग्नात मिळालेल्या भेटवस्तू तसेच पतीने लग्नाचे वेळी घातलेल्या दागिन्यांवरून वाद होतात. पती सर्व दागिने परत मागतो परंतु त्या भेटवस्तू व दागिने हे तिचे स्त्रीधन आहे. त्यावर फक्त तिचाच अधिकार असतो. त्या भेटवस्तू वा स्त्रीधन जर पतीने तिला परत दिले नाही अथवा ते डांबून ठेवले तर ते तिचे स्त्रीधन परत मिळण्यासाठी सदर महिला हिंदू विवाह कायद्याच्या तरतुदीप्रमाणे कौटुंबिक न्यायालयात अर्ज करू शकते. स्त्रीच्या या स्त्रीधनाची तिच्या संमतीशिवाय कोणीही व्यक्ती विल्हेवाट लावू शकत नाही. लावल्यास त्या

**(... पुढील पानावर)**

व्यक्तीच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करता येऊ शकतो. पतीच्या मृत्युनंतर विधवा स्त्रीस जर तिच्या पतीच्या नातेवाईकांनी तिचे स्त्रीधन दिले नाही तर त्यांच्याविरुध्द देखील फौजदारी गुन्हा दाखल करता येऊ शकतो. तसेच ते स्त्रीधन मागण्यासाठी दिवाणी न्यायालयात देखील दावा करता येतो.

**४) हुंडाबळी :**

विवाहित स्त्रीला क्रूरपणे वागणूक देऊन,तिचा छळ करून, तिच्या विवाहापासून सात वर्षाच्या आत जर तिचा अनैसर्गिक मृत्यू झाला असेल म्हणजेच तिला जाळून, विष पाजून किंवा विहिरीत ढकलून मृत्यू झाल्यास त्या गुन्ह्यास हुंडाबळी असे म्हणतात. थोडक्यात हुंड्याच्या मागणीसाठी वा पैशासाठी तिचा छळ होत असेल तर ते प्रकरण हुंडाबळीचे प्रकरण म्हटले जाते.

**५) विवाहासंबंधीचे गुन्हे :**

एखादी स्त्री लग्नाची पत्नी नसतानाही तिला पत्नी आहे असे भासवून तिच्याशी पत्नीसारखे फसवून शरीरसंबंध ठेवणे हा गुन्हा आहे. पती व पत्नी यांचा विवाहसंबंध अस्तित्त्वात आहे तरीही दुसऱ्या व्यक्तीबरोबर पत्नी वा पती म्हणून संबंध ठेवणे हा फौजदारी गुन्हा आहे.

पूर्वीच्या झालेल्या विवाहाची माहिती लपवून तो विवाह अस्तित्त्वात असताना दुसरा विवाह करणे हा देखील फौजदारी गुन्हा आहे.

कपट ठेऊन विवाह संस्कार उरकविण्याच्या उद्देशाने केलेला विवाह हा कायद्याने विवाह होऊ शकत नाही. त्याबद्दल दिवाणी वा फौजदारी कोर्टात दाद मागता येते.

विवाहाच्या वेळी मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास ती बाब लपवून ठेवून विवाह केल्यास त्याबाबत देखील बालविवाह प्रतिबंध कायद्याच्या तरतुदीनुसार संबंधित पालकांचे विरुध्द व असे विवाह लावण्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल होतो.

**६) विकृत वासनेने महिलांचा छळ :**

विकृत वासनेने महिलेचा छळ करणे हा देखील गुन्हा आहे. उदा - लैंगिक संबंधाची मागणी करणे. स्त्रीच्या इच्छेविरुध्द तिचे अश्लील चित्र प्रसिध्द करणे. लैंगिक इशारे करणे, लैंगिक शेरेबाजी करणे, लैंगिक हेतूने तिला अंगस्पर्श करणे ही कृत्ये फौजदारी गुन्हयाची आहेत.

सोशल मीडियावर पाठलाग करणे म्हणजे एखादया व्यक्तीची बदनामी करण्याच्या हेतूने, तिचे चारित्र्य हनन करण्याच्या हेतूने मोबाईलवरून चॅटिंग करणे, व्हॉटस् ॲप, फेसबुक वा इतर सोशल मीडियाद्वारे अश्लील मेसेज करणे हा देखील फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. महिलेचा विनयभंग होईल असे कृत्य केल्यास त्या विरुध्द देखील गुन्हा दाखल होऊ शकतो.

**७) पत्नी व अज्ञान मुलांसाठी दिवाणी व फौजदारी कायद्याअंतर्गत पोटगीची तरतूद :**

फौजदारी कायद्याचे कलम १२५ ते १२८ मध्ये पोटगी बाबतची तरतूद आहे. सदरची तरतूद सर्व धर्मियांना लागू असून त्यानुसार पोटगी मागण्याचा हक्क प्राप्त होतो.

दिवाणी कायद्यानुसार पोटगी मागण्याची तरतूद हिंदू दत्तक व पोटगी कायदा १९५६ च्या तरतुदीनुसार स्त्री ला तिच्या पतीच्या वा त्याच्या पश्चात, त्याच्या वडिलोपार्जित संपत्तीतून पतीच्या आई वडिलांकडे पोटगी मागण्याची तरतूद कायद्यात केलेली आहे. तसेच स्त्री ही तिच्या पतीकडून देखील त्याच्या संपत्तीतून मुलांसाठी व स्वतःसाठी पोटगीची रक्कम मागू शकते.

**८) नोकरी करणाऱ्या महिलांचा लैंगिक छळ :**

नोकरी करताना महिलेचा लैंगिक छळ झाल्यास म्हणजेच त्या महिला कर्मचारी, अधिकारी व कामगार यांचा नोकरीच्या ठिकाणी वा ती ज्या ठिकाणी काम करीत असेल तेथे काम करीत असताना त्या ठिकाणी तिचा कोणी व्यक्तीने लैंगिक छळ केल्यास, लैंगिक इशारे केल्यास, अंगाला स्पर्श केल्यास अथवा तिच्या स्त्रीत्त्वाचा अपमान होईल असे वर्तन केल्यास त्या व्यक्तीच्या विरुध्द कारवाई करण्याची तरतूद The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention of Prohibition, and Redressal ) Act 2013 या कायद्यात करण्यात आलेली आहे.

**९) गर्भवती स्त्रियांसाठीच्या सवलती व कायदा :**

गर्भवती व प्रसुती काळात महिलांना विशिष्ट सवलत दिलेली आहे. त्यासाठी सन १९६१ मध्ये मातृत्व फायदा कायदा (Benefit of Maternity Leave Act 1961) अस्तित्त्वात आलेला आहे. या कायद्याच्या तरतुदी अन्वये स्त्रीला १२ आठवड्यांची रजा मिळते, ६ आठवडे प्रसुती पूर्वी व ६ आठवडे प्रसुतीनंतर अशी रजा मिळते. तसेच महिला कर्मचारी गर्भवती असताना किंवा त्यावेळी ती रजेवर असेल तर तिला कामावरून काढून टाकता येणार नाही.

शासकीय महिला कर्मचारी, अधिकारी यांना देखील प्रसुतीच्या नंतर १८० दिवसांची पगारी रजा मिळण्याची तरतूद केली आहे. केंद्रीय महिला कर्मचारी व राज्य महिला कर्मचारी यांनाही मातृत्व रजा घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**१०) महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याबाबत अधिनियम २००५ :**

महिलांवरील अत्याचार हे कुटुंबात देखील घडत आहेत. त्या अत्याचारात वा हिंसाचारात बऱ्याच महिलांचा बळी गेलेला आहे. वाढत्या अत्याचाराचा व हिंसाचाराचा विचार करून वा त्याची व्याप्ती याची दखल घेऊन तसेच संविधानाने हमी दिलेल्या महिलांच्या हक्क अधिकाराचे अधिक प्रभावीपणे संरक्षण करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या बाबींचा विचार करून सदरचा अधिनियम अस्तित्त्वात आणलेला आहे. न्यायालयात या कायद्याच्या तरतुदीनुसार अनेक प्रकरणे दाखल होऊन ती प्रलंबित आहेत. तसेच संबंधित पीडीत महिला या न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. या कायद्यात पीडित वा हिंसाचार झालेल्या महिलांना सर्व प्रकारचे सहाय्य देण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने ती मागणी करू शकते, परंतु प्रलंबित प्रकरणांचा विचार करता कायद्यात असलेल्या सहाय्य तरतुदींबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे अतिशय अवघड आहे,क्लिष्ट आहे. त्यामुळे कायद्यात दिलेले सहाय्य त्या पीडित महिलेला सहजासहजी किंवा कायद्यात नेमून दिलेल्या मुदतीत मिळत नाही, असे अनुभवातून दिसून येते.

कायदा हा प्रत्येकास समान आणि न्यायाची वागणूक देण्यासाठी असतो. आजही सर्वसामान्यांचा विश्वास कायद्यावर अबाधित आहे. परंतु क्लिष्ट प्रक्रियेमुळे त्या यंत्रणेविषयी दृढ विश्वास व आपुलकी तयार होत नाही. त्यामुळे लोकशाही असलेल्या आपल्या देशात जर अस्तित्वात असलेल्या कायद्यांची, त्यातील तरतुदींची व गुन्हयांसाठी नमूद केलेल्या शिक्षेची तसेच हक्क, अधिकारांची माहिती योग्य तऱ्हेने व सोप्या पध्दतीने, तळागाळातील स्त्रियांपर्यंत पोहचल्यास नक्कीच त्यांच्या वरील अन्यायाचे प्रमाण कमी होणार आहे. प्रत्येक स्त्री सजग होणार आहे. असे झाले तरच समाजात रोज स्त्रियांवरील होणारे अत्याचार कमी होण्यास व लोकशाहीची मूल्ये टिकून राहण्यास मदत होणार आहे.

**११) राष्ट्रीय महिला आयोग :**

महिलांना संविधानाने दिलेल्या कायदेशीर अधिकाराचे जतन करण्यासाठी, महिलांना समाजात योग्य तो दर्जा मिळावा व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९० मधील तरतुदीनुसार महिलेचे हक्क डावलले जात असल्यास तसेच तिच्यावर अत्याचार होत असल्यास अशा असाह्य महिलेस कायदेशीर मदत करण्याचे कार्य महिला आयोगामार्फत केले जाते.

**१२) शासनाची विविध परिपत्रके :**

महिलांवर होणारे अत्याचार, हिंसाचार, त्यांच्या नोकरी व विविध सवलतींबाबत केंद्र व राज्य सरकारांकडून वेळोवेळी दखल घेऊन त्याअनुषंगाने विविध परिपत्रके प्रसिध्द केली जातात. ही परिपत्रके राज्य वा केंद्र सरकारच्या विहित संकेतस्थळांवरून प्रसिध्द केली जातात. या परिपत्रकांच्या माध्यमातून देखील स्त्रियांना स्वतःसाठी वा कुटुंबासाठी लाभ घेण्याची तरतूद निर्माण केलेली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता स्त्रियांनी त्यांच्या साठीच्या विशेष तयार केलेल्या कायदेशीर तरतुदींचा, सवलतींचा लाभ घेऊन स्वतः अन्यायाच्या विरुध्द बंड केले पाहिजे. कायदेशीर शस्त्र घेऊनच अन्यायाविरुध्द लढले पाहिजे. तेव्हाच ती स्त्री स्वतः सक्षम, सजग व सुदृढ होणार आहे. तेव्हाच ती स्वतःबरोबर कुटुंबाचा व जगाचा उध्दार करू शकेल.

# कायदा व महिला सक्षमीकरण



- डॉ. संध्या गडाख
प्राचार्या,
म.वि.प्र. विधी महाविद्यालय, नाशिक

महिला सक्षमीकरण ही संकल्पना १९ व्या शतकात अस्तित्वात आली. महिला सक्षमीकरणाची सुरुवात ब्रिटिश राजवटीत राजाराम मोहन रॉय, जोतीराव फुले अशा अनेक समाजसुधारकांनी महिला सक्षमी करणासाठी आंदोलने सुरू केली होती. महिलांचे सक्षमीकरण आर्थिक आणि सामाजिक परिणामांची गुरुकिल्ली आहे.

आपल्या धर्मग्रंथांमध्ये स्त्रियांचे महत्त्व सांगितलेले आहे. " यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता" म्हणजे जिथे स्त्रियांची पूजा केली जाते, तिथे देवता वास करतात. स्त्रीमध्ये इतकी शक्ती असूनही तिच्या सक्षमीकरणाची आजही गरज पडत आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे आत्ममूल्यांची भावना, स्वतःच्या आवडी निवडी ठरविण्याची त्यांची क्षमता, स्वतःसाठी आणि इतरांसाठी सामाजिक बदलांवर प्रभाव टाकण्याचा अधिकार यासाठी दिलेले प्रोत्साहन म्हणजे सक्षमीकरण होय.ही एक चळवळ आहे. जी स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय भेद दूर करण्याचा प्रयत्न करते.

कुटुंब, समुदाय आणि देशाचे आरोग्य आणि सामाजिक विकासासाठी महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. जेव्हा स्त्रिया सुरक्षित, परिपूर्ण आणि उत्पादक जीवन जगत असतात तेव्हा त्या त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचू शकतात. त्यांच्या कौशल्याचे काम करत कर्मचाऱ्यांच्यामध्ये योगदान देतात. जे अधिक आंनदी, निरोगी मूल्यांचे संगोपन करू शकतात ते शाश्वत अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर समाज आणि मानवतेला फायदा देण्यास देखील सक्षम होत आहेत.

महिलांचे सक्षमीकरण ही आर्थिक वाढ, राजकीय स्थिरता आणि सामाजिक परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे. १९९३ मध्ये पारित झालेल्या ७३ व्या आणि ७४ व्या दुरुस्त्यांत संविधानात पंचायत आणि नगरपालिका समाविष्ट केल्या. त्या संस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्यात आल्या. अनूसूचित जाती आणि जमाती यांच्या लोकसंखेच्या प्रमाणात लोकसभा आणि राज्य विधानसभांत जागा राखून ठेवण्याची तरतूद संविधानात आहे. १९ सप्टेंबर २०२३ रोजी संविधान (१२८ वी सुधारणा) विधेयक २०२३ हे लोकसभेत सादर करण्यात आले. हे विधेयक लोकसभा आणि राज्यसभेसाठी एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा प्रयत्न करते. राजकीय सक्षमीकरणावर भर देऊन . महिलांना नेतृत्व करण्यासाठी निवडले जात आहे, आणि राजकारणात सहभागी करून घेतले जात आहे. महिला सक्षमीकरणासाठी शासनाचा सहभाग मोठा आहे. महिलांच्या आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणावर भर दिला जात आहे. महिलांना संपत्तीचा वारसा आणि जमिनीच्या अधिकारापर्यंत पोहचण्यासाठी बळकट करण्यात आले आहे.

जसजसे महिला सक्षमीकरणाचे प्रमाण वाढत चालले आहे तसतसे काही अडथळे, समस्या महिलांना भेडसावत आहे. लैंगिक असमानता, शिक्षणाचा अभाव, स्त्रीभृणहत्या आणि आर्थिक मर्यादा, हिंसाचार, इंटरनेटच्या वाढत्या प्रभावामुळे महिलांचे शोषण वाढू लागले आहे. वेबसाईटवर वैयक्तिक माहिती प्रसिद्ध केल्यामुळे काही महिलांची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात आली आहे. अत्याचाराच्या प्रकारामध्ये सायबर स्टॅकिंग छळ, ऑनलाईन पॉर्नोग्राफी, फ्लेमिंग आणि विशेषतः कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ यांचा समावेश आहे. महिला कल्याण्यासाठी अनेक कायदे करण्यात आलेले आहे. जसे की, कौटुंबिक कायदे, संरक्षण कायदे, हिंसाचार विरोधी कायदे, प्रतिबंधक कायदे, स्त्री हक्काचे कायदे, समान वेतन कायदे, आरोग्यविषयक कायदे इ.

महिलांचे शोषण व छळ होऊ नये म्हणून हायकोर्टाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला सहाय्यता समिती स्थापन झाली आहे. महिला शोषण व छळ याबद्दलची तक्रार या समितीकडे महिला लेखी स्वरूपात देऊ शकते. तसेच न्याय मिळविण्यासाठी कायदेशीर सल्लागार व स्वयंसेवी संस्थांची व्यवस्था समितीतर्फे केली जाते. लैंगिक छळाविरुद्ध सुप्रिम कोर्टाने काही मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहे. तक्रारींचे झटपट निवारण करण्यासाठी प्रत्येक विभागात महिला अध्यक्षासह अर्ध्यापेक्षा अधिक महिला असणारी समिती स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

महिलेच्या अटकेसंबंधी, स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्ये ठेवता येते. १९९२ मध्ये महिला आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. महिला कोणतीही तक्रार थेट महिला आयोगाकडे करू शकतात. आयोगाला सिव्हिल कोर्टाप्रमाणे चौकशी आणि तपासाचे अधिकार असतात. हा आयोग वेळोवेळी सरकारला महिला कल्याण्याच्या योजनाही सादर करतो.

शासनाच्या साथीने महिला सक्षमीकरण करण्यास विविध योजना अमलात आल्या आहे. निराधारांसाठी , बालिका समृद्धीसाठी, इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना, महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाच्या योजना, सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, महिला बचत गट. महिला आणि बालविकास कल्याण मंत्रालय आणि भारत सरकार यांच्यामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहे. जसे की बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना, महिला हेल्पलाईन योजना, उज्ज्वला योजना, महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार, महिला शक्ती केंद्र, पंचायती राज संस्थांमध्ये 50% महिला आरक्षण त्यामुळे मोठ्या संख्येने महिला गावाचा कारभार यशस्वीपणे सांभाळताना दिसत आहे. त्यामुळे गावाचा विकास झपाट्याने होताना दिसत आहे. गावाच्या विकासात महिलांचा सहभाग वाढला, तसेच सरकारही त्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरव करून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ करण्यास मदत करत आहे.

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. विकासासाठी नवनवीन संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अनेक योजना रोजगार, शेती आणि आरोग्य यांच्याशी संबधीत आहे.

महिला सक्षमीकरण आणि महिलांच्या हक्कांना चालना देणे हा एक वैशिष्ट्यपूर्ण पायंडा पडला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय महिला दिन असे काही दिवसही मोठ्या उत्साहाने साजरे होत आहे. जसजसे महिला सक्षमीकरणाचे प्रमाण वाढत जाईल तसतसे भारत अधिक वेगाने विकसित देश बनेल. भारताची सामाजिक, आर्थिक प्रगती ही महिलांच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीवर अवलंबून आहे. म्हणूनच सांगावेसे वाटते,

**"महिला आहेत देशाचा सगळ्यात मोठा पाया
त्यांच्याच मुळे शक्य झाल्या इतक्या यशस्वी मोहिमा".**

# इंटरनेटच्या माध्यमातून तिची जागतिक गगनभरारी

करोना काळातील २०२० ते २०२२ ही दोन वर्षे आठवली, तरी आजही प्रत्येकाच्या अंगावर काटा येईल. बंधनांमध्ये अडकलेली ती जीवनशैली सर्वच गोष्टींवर परिणाम करणारी होती. त्यादरम्यान मोबाइल हाच अनेकांचा आधार बनला. मोबाइलचा अतिवापर घातकच; पण या काळात मोबाइलने अनेक गोष्टी सोप्या केल्या. व्हिडिओ कॉलद्वारे आपल्या प्रियजनांशी संवाद साधण्यापासून मोबाइलवर विविध अभ्यासक्रम शिकण्यापर्यंत अनेक गोष्टी त्या काळात घडत होत्या. याच काळात या मोबाइलने अनेक महिलांना उद्योजकतेकडे वळवलं. महिलांकडे असणाऱ्या साध्या-सोप्या पण आवश्यक जीवनकौशल्यांना जागतिक व्यासपीठ मिळालं.

रांधा, वाढा, उष्टी काढा... ही भारतीय महिलांच्या माथी थोपविलेली जबाबदारी आजही अनेक ठिकाणी आपल्याला दिसते. बुद्धिजीवींच्या तुलनेत श्रमजीवींना नेहमीच कमी लेखल्या जाणाऱ्या आपल्या देशात घरात राब राब राबणाऱ्या महिलांची काय अवस्था असेल, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. स्वयंपाक, शिवणकाम, भरतकाम, घर नीटनेटकं ठेवणं, आजारपणात घरगुती औषधं देऊन घरच्यांची काळजी घेणं, मुलांच्या अभ्यासापासून त्यांना वळण लावण्यापर्यंत त्यांची जबाबदारी उचलणं... ही आणि यापेक्षाही अनेक कामं वर्षानुवर्षे महिला करीत आहेत. विशेष म्हणजे ही कामं ही आपलीच जबाबदारी असल्याचं समजून कोणत्याही आर्थिक मोबदल्याशिवाय त्यांनी आजवर सगळं केलं. पण, आता मात्र या कामाची गणना कौशल्यात होऊ लागली आहे. इंटरनेटमुळे जवळ आलेल्या जगात त्यांच्या या कौशल्यांना आर्थिक महत्त्वही प्राप्त झालं आहे. त्यामुळेच गेल्या पाच-सहा वर्षांत भारतातील असंख्य महिला यू-ट्यूबर, इन्फ्लूएन्सर म्हणून पुढे आल्या आहेत. 'लाखो फॉलोअर्स आणि कोटींची आर्थिक कमाई' या घरगुती समजल्या जाणाऱ्या आणि तुलनेने कमी लेखल्या जाणाऱ्या कामांमधून



- डॉ. विजया सयाजीराव गायकवाड
नाशिक

त्यांनी प्राप्त केली असून, मोबाइल आणि इंटरनेटच्या माध्यमातून झालेली ही क्रांती एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे.

इंटरनेटने जग जवळ आणलं, हे वाक्य आपण अनेकदा ऐकलं किंवा ग्लोबल व्हिलेज यासारख्या संकल्पनाही विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात अभ्यासल्या. परंतु याचे प्रत्यक्ष उदाहरण या महिलांच्या रूपाने आपल्या समोर आहे. साडी कशी नेसायची, इथपासून तुमच्या मुलांशी संवाद कसा साधायचा, यासारख्या लहान-सहान पण दैनंदिन आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टींचे सल्ले आज महिला सोशल माध्यमांद्वारे देत आहेत. विशेष म्हणजे त्यांना मिळणारा प्रतिसादही चांगला आहे. विविध खाद्य पदार्थांच्या रेसिपीज, स्वयंपाकघराचे व्यवस्थापन, मेक-अप आणि फॅशन टीप्स यासारख्या विषयांवर काम करणाऱ्या महिला आज चक्क सेलिब्रेटी बनल्या आहेत. शिक्षण क्षेत्रातील अनेक महिलांनी यू ट्यूब चॅनलच्या माध्यमातून आपले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले आहे. इतकेच काय तर लोणची-पापडाच्या, दिवाळीच्या फराळाच्या रेसिपीजना सोशल मीडियावर प्रसिद्धी देऊनही या पदार्थांसाठी परदेशातून मागणी मिळविणाऱ्या महिलाही आज कमी नाहीत. महिलांच्या या सगळ्या प्रवासाकडे आपण बारकाईने पाहिले, तर यामध्ये मोबाइल आणि इंटरनेट याचा अतिशय महत्त्वपूर्ण सहभाग असल्याचे दिसून येईल.

मोबाइलचे दुष्परिणाम, इंटरनेटमुळे खासगी आयुष्यावर झालेले आक्रमण, तरुणाईमधील वाढणारी मोबाइल, गेमिंगची व्यसनाधीनता, सायबर गुन्हेगारी, फेक व्हिडिओज, सोशल माध्यमांवरील बदनामी यासारखे मोबाइल इंटरनेटचे अनेक दुष्परिणाम आपल्यासमोर सातत्याने येतात. परंतु मोबाइल आणि इंटरनेटची ही दुसरी बाजूही नाकारून चालणार नाही, जी या महिलांच्या रूपाने समोर आली आहे. आज या माध्यमातून अनेक महिला आर्थिक सक्षम झाल्या आहेत. त्याचसोबत त्यांना त्यांच्या कामामुळे एक वेगळी ओळखही मिळाली आहे. मोबाइल आणि इंटरनेटचा वापर आपल्या उत्थानासाठी कसा करावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे या महिला! ज्या महिलांच्या कौशल्याला नेहमीच घराच्या चार भिंतीआड बंदिस्त ठेवले गेले, त्यांची ओळख केवळ त्यांच्या पती किंवा कुटुंबाशी जोडली गेली, ज्या महिलांना आर्थिक स्वातंत्र्यापासून दूर राहावे लागले, अशा कित्येक महिलांनी त्यांची वेगळी ओळख बनवली ती इंटरनेट आणि मोबाइलच्या माध्यमातून. या क्षेत्रात पुरुषांचे प्रमाणही कमी नाही. पण या क्षेत्रात यश मिळविण्यासाठी लागणारी चिकाटी, संयम हे गुण महिलांकडे उपजतच असल्याने, त्याचा महिलांना अधिक प्रमाणात फायदा झाल्याचे दिसून येते.

कॉलेजपासून आवड म्हणून योगासने करणारी अपर्णा आज ऑनलाइन पद्धतीने देश-विदेशातील महिलांना योगासने शिकवते. घरात किलो-किलो दिवाळीचे फराळाचे पदार्थ करणाऱ्या स्वातीला तिच्या हातच्या चवीची किंमत कळाली ती तिच्या यू ट्यूब चॅनलवर आलेल्या प्रतिसादांमुळे. आपल्या मुलाच्या डब्यासोबत इतरांनाही मार्गदर्शन करावं, या उद्देशाने सुरू केलेल्या इंस्टा पेजला लाखो फॉलोअर्स मिळाले, तेव्हा प्रतीक्षाला तिच्या कामाचे महत्त्व समजले. हौस म्हणून मैत्रिणीचा मेक-अप करणारी आणि त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करणारी सीमा आज स्टायलिंग एक्सपर्ट बनली आहे. या बदलात मोबाइल आणि इंटरनेटचा असलेला महत्त्वाचा वाटा, अनेक महिलांना वेगळी वाट दाखवणारा ठरला आहे.

# बौध्दिक संपदा संरक्षण चळवळीतील प्रकाशात लढवय्या



एका झेक चित्रपटातून चित्रपट जगतात पदार्पण केलेली हेडी लामार मूळ ऑस्ट्रीयाची. व्हिएना ते लंडन व्हाया पॅरिस असे मार्गक्रमण करत हेडी हॉलीवूडला येऊन पोहोचली आणि चित्रपट तारका झाली.

ती १९४० च्या दशकात. पण यानंतर तिच्या कारकीर्दीत आणखी एक वळण आलं, आणि ती संशोधक झाली. हेडीचा पती, फ्रिट्झ मॅन्डल हा एक शस्त्रास्त्रांचा व्यापारी होता. त्याचं काम हेडीने जवळून बघितलेलं होतं. मॅन्डलच्या शस्त्रास्त्रांच्या व्यवहारांच्या वाटाघाटींना हेडी कधीकधी हजर असायची. त्यातल्याच एका मीटिंगमध्ये तिला असं समजलं की नौसेनेला आपल्या पाणबुड्यांतून चालवलेल्या टॉर्पेडोजना मार्ग दाखवणारी काही यंत्रणा असणे गरजेचे वाटत होते. नंतर काही वर्षांनी आपल्या एका संगीतकार मित्राशी बोलताना तिला फ्रिक्वेंसी हॉपिंगची कल्पना सुचली, आणि त्यावर तिने पेटंट घेतलं. हा दुसऱ्या महायुद्धाचा काळ होता. याच काळात अमेरिकन नौदलाने हेडीच्या रेडियो फ्रिक्वेंसी हॉपिंग या तंत्रज्ञानावर आधारीत यंत्रणा उभारली. आज आपण वापरतो ते ब्ल्यू टूथ, जीपीएस किंवा वायफाय तंत्रज्ञान देखील हेडीच्या याच फ्रिक्वेंसी हॉपिंग तंत्रज्ञानाचा वापर करते. पण हेडीला तिच्या अवघ्या हयातीत कधीही तिच्या या तंत्रज्ञानाची उद्गाती म्हणून ओळखलं गेलं नाही. ना कधी तिला त्याचा काही मोबदला मिळाला. योग्य श्रेय दिलं गेलं असतं तर हेडी आपल्या या संशोधनच्या जीवावर अब्जाधीश झाली असती. पण ते झालं नाही आणि हयातीच्या शेवटी तर एका मोठ्या दुकानातून वस्तू चोरण्याच्या आरोपाखाली तिला पोलीस कोठडीत जायला लागलं होतं.

मागरिट किएन ही एक अमेरिकन चित्रकार. तिची 'बिग आय' नावाची पेंटिंग्ज १९६० च्या दशकात अमेरिकेत मोठी प्रसिद्ध होती. पण तिच्या नवऱ्याने,



**- डॉ. मृदुला बेळे**

समन्वयक, प्रज्ञा (एमव्हीपीज सेंटर फॉर प्रमोशन, रिसर्च अॅन्ड अवेयरनेस ऑफ इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी अॅण्ड इनोव्हेशन)

वॉल्टर किएनने ही चित्रं आपल्या नावाने विकायला सुरुवात केली. तिच्या जेव्हा हे लक्षात आलं तेव्हा तिने याला कडाडून विरोध केला. पण त्यामुळे तिच्या पदरात पडला नवऱ्याने केलेला छळ. वॉल्टर दिवसेंदिवस प्रसिद्ध होत गेला आणि त्या चित्रांची खरी निर्माती मागरिट मात्र दुर्लक्षित राहिली. शेवटी त्यांचे वाद इतके टोकाला गेले की त्यांचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतर पाच वर्षांनी मागरिटने तिच्या नवऱ्याची चलाखी जगजाहीर केली. नवऱ्याने अर्थातच असं काही केलं आहे याला नकार दिला. प्रकरण न्यायालयात गेलं. तिथं न्यायाधिशांसमोर मागरिटने ते बिग आय पेंटींग सहज करून दाखवलं आणि वॉल्टरने मात्र माझा खांदा दुखावलेला आहे असं म्हणत माघार घेतली. आणि शेवटी तब्बल ३६ वर्षांनंतर जगाने मागरिटची बिग आय चित्रांची निर्माती म्हणून दखल घेतली. हेडी आणि मागरिटसारख्या कितीतरी स्त्रिया जगात आजही आहेत. ज्यांच्या संशोधनाचे श्रेय त्यांना मिळालं नाही, त्यांची बौद्धिक संपदा त्यांच्या नावावर नाही अशा स्त्रिया... ज्यांच्या नावाने ' नाही चिरा नाही पणती' अशा स्त्रिया!

२६ एप्रिलला जगभरात आंतरराष्ट्रीय बौद्धिक संपदा दिवस साजरा केला जातो. २०२३ सालातला बौद्धिक संपदा दिवस हा हेडीसारख्या अगणित महिला संशोधकांना समर्पित होता. बौद्धिक संपदा या विषयातील महिलांचा सहभाग वाढवून संशोधनच्या प्रक्रियेला चालना कशी देता येईल हे या निमित्ताने शोधायचे होते. जागतिक बौद्धिक संपदा संघटनेने काही महिन्यापूर्वी जी आकडेवारी प्रसिद्ध केली त्यानुसार जगभरात घेतल्या जाणाऱ्या पेटंटवर संशोधक म्हणून अवघ्या १७.७% महिला आहेत. ही संख्या इतकी तुटपुंजी का? संशोधनाच्या क्षेत्रात आणि त्यामुळे होणाऱ्या बौद्धिक संपदांच्या निर्मितीत महिलांचे योगदान इतके कमी का? तर त्याची अनेक कारणं आहेत.

मुळात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) या विद्याशाखांत प्रवेश घेणाऱ्या स्त्रीयांची संख्या पुरुषांपेक्षा बरीच कमी असते. त्यात शिक्षण घेऊन पदवी मिळवणे आणि नंतर संशोधन करण्याइतकी मजल फार कमी महिला मारतात. ज्या इथवर येऊन पोहोचतात त्यांना कामाच्या ठिकाणी पदोपदी संघर्ष करायला लागतो. आपल्या पुरुष सहकाऱ्यांकडून हेटाळणी सहन करावी लागते. संशोधनात सहभागी झाल्याच तर त्यातल्या त्यात कमी दर्जाची कामं त्यांच्याकडून करून घेतली जातात. त्याचे पुरेसं श्रेय त्यांना दिलं जात नाही. जिथे खूप महत्त्वाचं - ज्यावर भरपूर पेटंट्स फाइल केली जाऊ शकतील असं - संशोधन होणार आहे त्यात संशोधक म्हणून स्त्रियांना कधीही प्राधान्य दिलं जात नाही. जग भरात सर्वात जास्त पेटंटस घेतली जातात ती मेकॅनिकल इंजिनियरिंग आणि इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगच्या क्षेत्रात. या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांची संख्या मुळातच पुरुषांपेक्षा कमी असते. त्यामुळे अर्थातच बायकांच्या नावावर कमी पेटंट्स घेतली जातात. लेखाच्या सुरुवातीला सांगितलं तसं काम करून देखील त्याचं श्रेय न मिळणाऱ्या हेडी लमारसारख्या कितीतरी महिला संशोधक आहेत. पण त्या अन्यायाविरोधात बोलण्याची त्यांची ताकद कमी पडते. आपल्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या मीटिंग्समध्ये तरी किती महिला धडाडीने आपली मतं मांडताना दिसतात? त्यांच्या नजरेसमोर

**(... पान क्रमांक ६० वर)**

# कौशल्य विकास आणि स्वयंरोजगारातून महिलांचे सक्षमीकरण



- ज्योती लांडगे
(संचालिका, जन शिक्षण संस्थान, कौशल्य विकास मंत्रालय, भारत सरकार )

स्वयंरोजगार हा महिलांना घरातील सर्व कामे व जबाबदाऱ्या सांभाळून पैसे मिळविण्याचा उत्तम मार्ग आहे. त्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते.त्यांना आत्मविश्वासाने समाजात वावरण्यास मदत होते. स्वयंरोजगारासाठी महिलांनी काही आवश्यक गुण आणि कौशल्ये आत्मसात केली तर त्या यशस्वी होऊ शकतात. ती कौशल्ये पुढीलप्रमाणे :

**१. उद्यमिता क्षमता:**

नवीन कल्पनांची ओळख आणि त्यांना व्यवसायात रूपांतरित करण्याची क्षमता.

**२.संयोजन कौशल्य:**

कामकाजाचे व्यवस्थापन, वेळेचे नियोजन आणि संसाधनांचा योग्य वापर.

**३.आत्मविश्वास:** स्वतःवर विश्वास ठेवणे आणि आव्हानांचा सामना करण्याची तयारी.

**४.सामाजिक कौशल्ये :** ग्राहक, भागीदार आणि सहकाऱ्यांशी चांगले संबंध निर्माण करणे.

**५.आर्थिक ज्ञान :** बजेटिंग, खर्च नियंत्रण आणि आर्थिक व्यवस्थापनाची माहिती.

**६.सृजनशीलता :** नवीन विचार आणि उपाय शोधण्यात आवड.

**७.अनुकुलता :** बदलत्या परिस्थितीसाठी जलद अनुकूलता साधणे.

**८.शिक्षण व कौशल्य विकास :** नवीन कौशल्ये शिकण्यासाठी आणि स्वतःला अपडेट ठेवण्यासाठी उत्सुकता.

**९.संवाद कौशल्य :** ग्राहकांशी, वरिष्ठांशी आणि कर्मचाऱ्यांशी महिलांनी चांगला संवाद साधल्यावर बिझनेस वाढतो.

या गुणांमुळे महिलांना स्वतःचा व्यवसाय यशस्वीपणे चालवण्यास मदत होऊ शकते.

**ग्रामीण महिला आणि स्वयंरोजगार**

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी स्वयंरोजगार हे महत्त्वाची भूमिका बजावतात. हे रोजगार महिलांना त्यांच्या कौशल्यांचा वापर करून स्वतःचा व्यवसाय उभारण्याची संधी देतात. ज्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते आणि सामाजिक सशक्तीकरण होते. ग्रामीण भागातील महिला स्वतःच्या व्यवसायातून किंवा स्वतःच्या पैशांतून आपले आर्थिक स्थैर्य प्राप्त करू शकतात. त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्याची संधी स्वयंरोजगारामार्फत करून दिली जाते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबासाठी एक प्रकारचे आर्थिक पाठबळ मिळत असते. बऱ्याचदा ग्रामीण भागातील मुलींची लवकर लग्न केली जात असल्यामुळे त्यांची स्वप्ने, इच्छा,आकांक्षा या मनातच दबल्या जातात. त्यांची इच्छा असूनही त्या काही करत नाही. शेवटी त्यांना परिस्थितीपुढे नतमस्तक व्हावे लागते वा झुकते माप घ्यावे लागते. इतर सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागल्यामुळे आपल्या स्वप्नांना त्यांना आवर घालावा लागतो. पण आता मराठा विद्या प्रसारक समाज संचलित जन शिक्षण संस्थान, नाशिक मार्फत व स्किल इंडिया अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगार प्रशिक्षण संधी प्राप्त झाली आहे. ज्या मार्फत त्या उत्तम प्रशिक्षण घेऊन आपल्या कौशल्याच्या बळावर स्वतः चा व्यवसाय उभा करू शकतात. व्यवसाय उभारण्यासाठी जन शिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणा अंतर्गत मिळालेले प्रमाणपत्र दाखवून त्यांना बँकेद्वारे कर्ज मिळू शकते. अनेकदा ग्रामीण भागातील महिला या उत्तम हस्तकला, गृह उद्योजिका असतात. त्यांना पारंपरिक हस्तकला, शिवणकाम विणकाम, बांबू किंवा मातीच्या वस्तू तयार करण्याची कौशल्ये ज्ञात असतात. या वस्तूंची बाजार पेठेमध्ये मोठ्या प्रमाणात विक्री होऊ शकते परंतु बहुतेक वेळा महिलांना आपल्या हाताने बनवलेल्या वस्तू या खुल्या बाजारपेठांमध्ये विकता येत नाही. मुळात त्यांना विक्रीचे परिपूर्ण ज्ञान नसते. त्यासाठी ग्रामीण भागातील महिलांनी ऑनलाईन बाजारपेठेमध्ये देखील पाऊल टाकले पाहिजे व आपल्या वस्तू त्यांना ऑनलाईन देखील विकता आल्या पाहिजे.

जेणेकरून त्यांनी निर्माण केलेल्या वस्तू या जगभरातील ग्राहकांना बघता येतील व विकत घेता येतील.

**स्वयंरोजगार उद्योग**

१) मसाले व पापड लोणची बनवणे. उदा. जॅम, जेली, वेफर्स, शेव फरसाण, शेवई
२) फास्ट फूड स्टॉल/हॉटेल
३) एम्ब्रोईडरी डिझाईन साडी वर्क
५) पारंपरिक पद्धतीने लाकडी वस्तू बनविणे.
५) पिठाची गिरणी
६) मेणबत्ती आणि अगरबत्ती बनविणे.
७) मातीची भांडी बनविणे.
८) टेलरिंग (शिवणकाम)
९) ब्युटी पार्लर
१०) ज्वेलरी मेकिंग
११) बांबूपासून विविध वस्तू तयार करणे.
१२ ) रोपवाटिका
१३) शेळी व कुकुटपालन
१४) पेपर प्लेट/ द्रोण तयार करणे.
१५) रजई व गोधडी तयार करणे.
१६ ) कापडी बाहुल्या व खेळण्या बनविणे.

(... पुढील पानावर)

**(... मागील पानावरून)**

१७) जूटच्या विविध वस्तू बनविणे.

१८) कागदी फुले आणि पाकिटे बनविणे इ.

**स्वयंरोजगारातून होणारे फायदे :**

१) महिला स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात.

२) त्यांना वेगवेगळ्या स्तरावर कमाईची संधी उपलब्ध होते.

३) त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो.

४) आनंद आणि आत्मविश्वास वाढतो.

५) कौटुंबिक व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतात.

६) महिला आत्मनिर्भर होतात.

७) कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात हातभार लागतो.

८)समाजात प्रतिष्ठा मिळून आत्मसन्मान वाढतो.

९) कुटुंबातील मुलांवर व्यावसायिक दृष्ट्या उत्तम संस्कार होतात.

१०) कुटुंबाचे राहणीमान उंचावते.

असे असले तरी स्वयंरोजगार सुरू केल्यानंतर काही वेळेस महिलांना बराच संघर्ष करावा लागतो. घरातील मुलांच्या, नातेवाईकांच्या , कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि स्वतःचा व्यवसाय सांभाळणे यामुळे ताण येऊ शकतो, टेंशन येते. पण जिद्द, चिकाटीने , कुटुंबातील व्यक्तींची मदत घेऊन प्रश्न सुटू शकतात. 'लोक काय म्हणतील ' याचा विचार न करता आपले काम अजून चांगले कसे करता येईल. ग्राहकाला चांगली सेवा आणि वस्तू कशा देऊ शकू, हा विचार करून प्रशिक्षणे घेतली पाहिजेत. आपल्या सोबत इतर महिलांनाही प्रोत्साहित केले पाहिजे.

**वेळेचे व्यवस्थापन :** सर्वांसाठी घड्याळाची वेळ सारखीच असते. दिवसभराच्या कामाचे नीट टाइमटेबल बनविले तर वेळ वाया जात नाही . उलट जास्त काम होते.

**आर्थिक व्यवस्थापन :** महिलांनी स्वतः बँकेत जाऊन व्यवहार समजून घेणे आवश्यक आहे. व्यवसाया संदर्भातील कायदेशीर बाबी समजून घेतल्या पाहिजेत. स्वतः च्या छोट्या व्यवसायाचे उद्यम रजिस्ट्रेशन केले पाहिजे. गोड बोलून आणि नातेसंबंध सांभाळून व्यवसाय वाढवला पाहिजे. हे सर्व करीत असताना महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजीही घेतली पाहिजे. व्यायाम, वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. हसतमुख आणि आनंदी राहून जीवनाचा आनंद घेतला पाहिजे. आपल्यावर होणाऱ्या टीकेला जास्त महत्त्व न देता दुर्लक्ष करावे . आपल्यावरील टीकेने आपल्यातील दोष आपल्याला समजतात आणि सुधारणा करता येतात.

महिला उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी बऱ्याच सरकारी योजना आहेत,महिलांनी त्यांची माहिती मिळवावी. ही माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे. विविध योजनांमधून उद्योगांसाठी कर्ज सुद्धा मिळते, उदा. मुद्रा योजना, राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन, स्टँड अप इंडिया, स्किल इंडिया, हस्तकला आणि कारागीर योजना इ. बचत गटांसाठी कर्ज योजना आहेत. सोशल मीडिया (उदा. यूट्यूब, इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉटसअप) सारखी साधने वापरून महिला आपल्या व्यवसायाची जाहिरात करून ग्राहक मिळवू शकतात.

अशा रीतीने महिलांनी ठरविले तर त्या अधिक सक्षम होऊ शकतात. आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि भावनिक सक्षमता येण्यासाठी शिक्षणासोबतच कौशल्ये आणि स्वयंरोजगार संधी मिळविणे हेच खरे महिला सक्षमीकरण आहे. एक सक्षम महिला स्वतःच्या कुटुंबासोबत गावाचा, शहराचा पर्यायाने राज्याचा विकास करू शकते आणि अशा खूप महिला एकमेकींच्या आधाराने, प्रोत्साहनाने तयार झाल्या तर आपला देश विकसित देश म्हणून ओळखला जाईल.

---

**(... पान क्रमांक ५८ वरून)**

यशस्वी महिला संशोधक म्हणून किती आदर्श आपल्या समाजाने निर्माण केले आहेत? तर अगदी बोटावर मोजण्या इतके! मग असं असताना महिला कुठून प्रेरणा घेणार? म्हणतात ना It's hard to be what we cannot see. कुठे पोहोचायचे आहे, कोण व्हायचे आहे हे ठाऊकच नसेल तर तिथे आपण जाऊ शकते याची खात्री तरी स्त्रिया कशी बाळगणार?

या सगळ्या परिस्थितीत एक महिला म्हणून बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात काम करताना मला काय दिसलं? तर सगळ्याच क्षेत्रात आहे तसा या क्षेत्रात देखील संघर्ष हा महिलांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. पण त्या संघर्षातून मार्ग काढत जर कुणी संशोधन क्षेत्रात भरारी घेतली, तर त्यावर त्यांचे बौद्धिक संपदा हक्क प्रस्थापित करण्यासाठी मदत करता यावी म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमध्ये प्रज्ञा या बौद्धिक संपदा केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करत या केंद्राचे उद्घाटन आदरणीय शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्राची समन्वयक म्हणून माझ्यावर टाकलेली जबाबदारी फार मोठी व शिकवणारी आहे. इथे आम्ही काय करतो? तर मविप्रच्या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षक प्राध्यापकांना बौद्धिक संपदा या विषयाबाबत सजग करतो. तुम्ही लावलेल्या शोधावर पेटंट घेतलं पाहिजे की इंड्स्ट्रीयल डिझाइन हे तुम्ही कसं ओळखाल? पेटंट करण्याजोगे संशोधन केले असेल तर पेटंट नोंदणीकृत करेपर्यंत काय काळजी घ्याल हे सगळ्यांपर्यंत पोहोचवतो. हा विषय शालेय विद्यार्थ्यांना देखील शिकवला गेला पाहिजे असे खरे तर भारत सरकारचे धोरण आहे. पण शाळेतल्या विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदांसारखा क्लिष्ट विषय शिकवायचा असेल तर तो वेगळ्याप्रकारे शिकवला गेला पाहिजे, असं मला वाटतं. नुकतेच मविप्रच्या दोन शाळांमध्ये आम्ही मुलांचे 'शोध शिक्षण' या विषयाच्या कार्यशाळा घेतल्या. कोणते तरी नवे उपकरण बनवताना कसा विचार करायचा, आणि मग त्या तयार झालेल्या नव्या उत्पादनांना बौद्धिक संपदांचा वापर करून कसं करायचं हे आम्ही इथल्या विद्यार्थ्यांना काही तरी कृती करायला देऊन त्यातून शिकवलं. शाळेतल्या मुलामुलींना वयाच्या या टप्प्यावर हे प्रशिक्षण दिले तर त्यातील स्त्री पुरुष भेदभाव नक्कीच कमी होईल असा मला विश्वास वाटतो. अशा प्रकारची प्रशिक्षणं आम्ही ग्लोबल आयपी अलायन्सच्या इंडिया चॅप्टरच्या सहयोगाने घेत आहोत. याशिवाय इथल्या विद्यार्थी आणि प्राध्यापक संशोधकांनी प्रज्ञामध्ये केव्हाही यावं, त्यांच्या संशोधनावर बौद्धिक संपदा घेता येतील का याची चर्चा करावी असं वातावरण आम्ही तयार केलं आहे. अशा चर्चांना आम्ही 'आयपी क्लिनिक्स' असं नाव दिलं आहे. इथं प्रशिक्षणासाठी एक छोटा ट्रेनिंग हॉल देखील आहे. तिथे देखील मर्यादित लोकांसाठी अशी प्रशिक्षणे आम्ही घेत असतो.

विद्यार्थी आणि प्राध्यापकांची पेटंट्स आणि डिझाइन्स लिहिण्यासाठी आम्ही मदत करतो. त्यासाठी कुठलीही फी इथे आकारली जात नाहीच. पण पेटंट कार्यालयाच्या फी पैकी अर्धी फी देखील मविप्र देते. या कामासाठी लागणारा पेटंट सर्च डेटाबेस आपण घेतलेला आहे. या कामासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनने तीन प्रशिक्षणार्थी तीन वर्षांसाठी प्रायोजित केले आहेत. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनच्या श्री विवेक सावंत सरांचे याकरता मौलिक मार्गदर्शन लाभलेले आहे. बघता बघता प्रज्ञाचा परिवार पाच माणसांचा झाला आहे. मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आणि प्राध्यापक आमच्याकडे संशोधनं घेऊन येऊ लागले आहेत. त्यांना सल्ला देताना कुठेही स्त्रीयांवर अन्याय होणार नाही, याबाबत एक स्त्री म्हणून मी स्वत: अत्यंत दक्ष असते. एक स्त्री संशोधिका कुठल्या दिव्यातून गेली असणार याची पूर्ण जाणीव मला आहे. आणि स्त्री संशोधकांना जास्तीत जास्त बौद्धिक संपदांवर आपलं नाव कोरावं हाच प्रज्ञाचा आणि मविप्रचा ध्यास आहे!

# महिलांसाठी शिक्षणाच्या संधी देणारी ॲप्स

अगदी दहा वर्षांपूर्वी आपण कल्पना सुद्धा करू शकत नव्हतो एवढे बदल शिक्षण क्षेत्रात वेगाने घडत आहेत व त्याचा फायदा स्त्रियांना निश्चितच होत आहे. अनेकदा महिलांसाठी घरातील जबाबदाऱ्या सांभाळून, उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयात प्रवेश घेऊन प्रगती साधणे तारेवरची कसरत ठरते. अशावेळी, उपलब्ध वेळात, जगभरातील विद्यापीठ वा संस्था यामधून शिक्षण घेण्याकरिता इंटरनेटचा वापर प्रभावीपणे कसा करायचा. थोडक्यात ऑनलाईन कोर्सेस आणि ट्युटोरियल्सच्या जगाबद्दल जाणून घेणे गरजेचे ठरेल. ज्यामुळे ह्याही क्षेत्रात महिला मागे न राहता अधिक सक्षमतेने या ॲप्सच्या माध्यमातून करिअर म्हणून त्याकडे पाहू शकेल.

Coursera, Khan Academy, Udemy, Swayam, edx आणि YouTube सारख्या ॲप्सचा वापर करून कधी विनामूल्य तर कधी सशुल्क असे कोर्सेस करता येतात. यामध्ये जगभरातील विविध विद्यापीठे आणि तेही वेगवेगळ्या विषयांसाठी आपले MOOC (Massive Open Online Courses- व्हिडिओ लेक्चर्स, क्विझेस आणि असाइनमेंट्ससह) उपलब्ध करून देत आहेत. या अभ्यासक्रमांचे मोड्यूल्स असतात, जे ठराविक कालावधीत पूर्ण केल्यावर ऑनलाइन परीक्षाही घेतली जाते. यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी शिकवलेला अभ्यास मन लावून करणे (ऐकणे, बघणे) अपरिहार्य ठरते तसेच घरबसल्या शैक्षणिक सामग्रीही मिळते.

**Coursera :** जगभरातील १८० पेक्षा अधिक प्रसिद्ध विद्यापीठे (स्टॅनफर्ड, येल, आयआयटी, मिशिगन, इलिनॉइस, हॉपकिन्स इ.) या प्लॅटफॉर्मच्या सोबत विविध कोर्सेस बनवतात. प्रामुख्याने संगणक, विज्ञान, व्यवसाय, Data Science आर्टस इ. कोर्सेसच्या डिग्री या अनेक ठिकाणी मान्यताप्राप्त आहेत.

**Khan Academy:** हा मोफत ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे. त्यावर मुख्यतः गणित, विज्ञान, इतिहास आणि अर्थशास्त्र विषयांसाठी हरप्रकारे शिकवण्याचे प्रयत्न चाललेले दिसतात. यामध्ये व्हिडिओ मार्फत



**- डॉ. प्रतिमा पंडित वाघ**

प्राचार्या, श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प, नाशिक

समजाऊन सांगणे व सराव प्रश्न देणे चालते. एव्हढ्यावरच न थांबता SAT, MCAT, GMAT यांसारख्या परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य देणारा म्हणून हा प्लॅटफॉर्म ओळखला जातो. 'त्वरीत फिडबॅक देणारे' अशी ख्याती असलेला हा प्लॅटफॉर्म आहे. किचकट वाटणाऱ्या संकल्पनांना साध्या सोप्या भाषेत समजावल्यामुळेच हे प्लॅटफॉर्म गरजूंनी तातडीने स्वीकारलेले दिसतात.

**Udemy :** जगभरातील मान्यवर शिक्षकांनी शिकवलेल्या व्यावसायिक तसेच कौशल्य आधारीत (IT, डिझाईन, मार्केटिंग व व्यवसाय विकास) प्रशिक्षणासाठी Udemy लोकप्रिय आहे.

अनेकदा यांचे कोर्स सवलतीच्या दरात मोफतही उपलब्ध आहेत. एकदा कोर्स खरेदी केल्यावर त्याच्या वापरासाठी कायमस्वरूपी प्रवेश मिळतो.

**YouTube :** हा एक व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म आहे, जेथे शिक्षक, व्यावसायिक, आणि संस्था या मोफत शैक्षणिक सामग्री तयार करून अपलोड करतात. ज्याचा लाभ इच्छूक विनासायास घेताना दिसतात. येथे शैक्षणिक चॅनेल्स जसे की Crash Course, TED-Ed, Veritasium येथे उच्च-गुणवत्तेचे शैक्षणिक व्हिडिओ दिसतात. अभ्यास हा कुठल्याही गोष्टीचा असू शकतो याचा पूरेपूर विचार करणारा हा प्लॅटफॉर्म आहे.

**edx** सारखे प्लॅटफॉर्म इंटरॅक्टिव्ह रितीने शिक्षण देताना दिसतात. येथे कमेंट्स आणि कम्युनिटी चर्चा यासारख्या वैशिष्ट्यांसह विषय समजाऊन घेऊन शिकता येते. येथे फक्त शिकण्याची इच्छाशक्ती असायला हवी, जी पारंपरिक शिक्षणातही गरजेची असते. (मात्र ऑनलाइन प्रकारात वैयक्तिक जबाबदारी जरा जास्त आहे)

**Duolingo:** भाषा खेळाच्या माध्यमातून देखील शिकवता येते हे सांगणारे व गेमिफिकेशन तंत्राचा वापर करणारे हे ॲप आहे. जगभरातील विविध भाषा, उदा. इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन, इटालियन आणि इतर अनेक भाषांमध्ये येथे कोर्सेस ऑफर केले गेले आहेत. याचे वैशिष्ट्य म्हणजे शिकणाऱ्यास प्रोत्साहन मिळेल अशी व्यवस्था केलेली असते. त्यामुळे सहसा विद्यार्थी कोर्स अर्धवट न सोडता आनंदाने पूर्ण करतो. ॲपमध्ये शब्द जुळवणे, वाक्यांचे भाषांतर करणे, बोलण्याचे आणि ऐकण्याचे काम करणे यासारखे विविध सराव प्रकार असतात. यामुळे शब्दसंपत्ती, व्याकरण आणि उच्चार सुधारतात. येथे प्रगतीचा मागोवा ही घेतला जातो व शेवटी अभिप्राय पण मिळतो. सर्वात महत्वाचे म्हणजे हे ॲप संबंधित भाषेतील सांस्कृतिक पैलूंचा परिचय करून देते, ज्यामुळे त्या भाषेतील खाचाखोचा समजून घ्यायला मदत होते.

**Photomath:** हे ॲप गणित शिकू इच्छिणाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी डिझाइन केलेले आहे. गणितातील समीकरण स्कॅन करून, तपशीलवार निराकरण करत जाणाऱ्या पायऱ्या येथे दिसतात. फोनच्या कॅमेराने समस्या स्कॅन केल्यावर, ॲप लगेच समाधानकारक उत्तराने आणि तेही टप्प्याटप्प्याने स्पष्टीकरण देत जाते. इंटरनेट कनेक्शनशिवाय देखील हे ॲप वापरू शकतो. याचा परिणाम म्हणजे मर्यादित कनेक्टिव्हिटी असलेल्या भागात हे ॲप फारच उपयुक्त ठरते.

**Google Books, Kindle** आणि शैक्षणिक वेबसाइट्ससारख्या प्लॅटफॉर्मद्वारे विविध ई-बुक्स आणि लेख उपलब्ध होतात. पाठ्यपुस्तकांचे PDF किंवा संशोधन निबंध डाउनलोड करून ऑफलाईन वाचता येतात. थोडक्यात Google Books म्हणजे एक ऑनलाइन डिजिटल ग्रंथालय समजायला हरकत नाही. जुने ग्रंथ तसेच काही पुस्तकांच्या हार्ड कॉपीच्या आवृत्त्या उपलब्ध नसल्याने संशोधकांनी त्याचा चांगला वापर केल्याचे दिसून येते.

**Kindle : Amazon** द्वारे विकसित केलेला Kindle हा एक लोकप्रिय ई-बुक रीडर आणि प्लॅटफॉर्म आहे. जेथे लाखो ई-बुक्स मिळण्याची सोय आहे. अनेक

**(... पान क्रमांक ६३ वर)**

# स्त्री: कुटुंबाचा कणखर कणा

भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्था ही सर्वोच्च व्यवस्था मानली जाते आणि त्या कुटुंब व्यवस्थेचा कणा स्त्री असते.

**"विश्वाची मी प्रतिमा, मजमध्ये समृद्धी वसे।**
**संस्कृती जणू मी समूर्त, स्त्री हे माझे नाव असे॥"**

अशी ही स्त्री संस्कृतीच्या केंद्रस्थानी आहे. कुटुंब म्हणजे व्यक्ती मधील नातेसंबंधांनी तयार झालेल्या व्यक्तींचा समूह. अनेक नात्यांनी बनलेले कुटुंब परस्पर प्रेम आणि सहकार्याने वृद्धिंगत होत असते.

आज पुरुष हा कुटुंबप्रमुख मानला जात असला तरीही स्त्री संपूर्ण कुटुंबाचा कणा असते हे नाकारून चालणार नाही. पूर्वी आपली भारतीय संस्कृती मातृसत्ताक होती. द्रविड हे भारतातील मूळ रहिवासी. स्त्री ही कुटुंबाची आणि समूहाचे नेतृत्व करीत असे. याचा अर्थ त्याकाळी महिलांचे महत्त्व सर्वमान्य होते. परंतु काळानुरूप स्त्री-पुरुषांचे कुटुंबातील स्थान बदलले. पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्था, समाज व्यवस्था आपल्याकडे असली तरी स्त्रीचे महत्त्व कमी होत नाही.

अर्ध-नारीनटेश्वर ही प्रतिमा आपल्या संस्कृतीचा मूलाधार आहे.स्त्री-पुरुष हे व्यक्ती भेदासाठी नव्हे तर एकमेकांसाठीच्या पोषक आणि परिपूर्ततेसाठी प्रकृतीने निर्मिलेले आहेत. दोघांच्या समन्वयाने बनलेले कुटुंब खऱ्या अर्थाने समर्थ व परिपूर्ण असते .

कुटुंबातील स्त्रीची भूमिका, तिचे अस्तित्व पाहिले म्हणजे लक्षात येते की ती कुटुंबाचा आधार असते, ती घराचे चैतन्य असते. घरावर जोपर्यंत स्त्रीचा हात फिरत नाही, जेथे तिचा वास नाही तोपर्यंत घर म्हणजे फक्त दगडी भिंतींचा निवारा असतो. पण जेव्हा गृहलक्ष्मीचा हात घरावर फिरतो.तेव्हा घराचा स्वर्ग बनतो. घराला घरपण देण्याचे, कुटुंबाला सुखी करण्याची जादू स्त्रीच्या हातात असते. ती गृहलक्ष्मी, सरस्वती, जन्मदात्री, काली, ललिता, अन्नपूर्णा, सिद्धीदात्री, आरोग्यदायिनी आणि स्वामीनी अशा नऊ रूपात कार्यरत असते.

स्त्रीच्या अनेक रूपांपैकी तिचे मातृत्व रूप हे सर्वश्रेष्ठ असते. आई, आजी, पत्नी, बहीण, मुलगी या विविध रूपात ती सर्वार्थाने कुटुंबाला परिपूर्ण करत असते. कर्ता पुरुष कुटुंबासाठी अर्थार्जन करणारा तसेच कुटुंबासाठीचे सर्व निर्णय घेणारा असतो.या सर्वांत घरातील स्त्री दृश्य-अदृश्य स्वरूपात सहभागी असते. घरातील कर्त्या स्त्रीशिवाय घराचे पानंही हलत नसते. घरातील स्त्री उठल्यापासून ते झोपेपर्यंत घरातील काम करत असते. आज तर अनेक स्त्रिया कुटुंबाला आर्थिक दृष्टीने भक्कमपणा देण्याचे काम करत असतात.

कुटुंबातील स्त्री ही साक्षात अन्नपूर्णा असते.



**सौ.सुरेखा अशोक बोऱ्हाडे**
संचालिका
यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र, नाशिक

ती सर्वांच्या आहाराची काळजी घेते. घरातील वयोवृद्ध व्यक्ती, मुलं, पती यांच्या आवडी-निवडीनुसार आणि त्यांच्या आरोग्याला आवश्यक असे पोषक, चौरस अन्न स्वतः कष्टाने शिजवून ती प्रेमाने, आपुलकीने वाढत असते. हॉटेलमधील किंवा बाहेरून उपलब्ध होणाऱ्या अन्नपदार्थात ती गोष्ट नसते. घरातील सर्वांच्या आरोग्याची काळजी ती घेत असते. घरात कुणाला बरं नसेल तर लगेच प्राथमिक उपचार सुरू करते. आजीचा बटवा त्यासाठी प्रसिद्ध आहे. म्हणून तिला घरगुती वैद्य म्हणतात. कुटुंबातील आजारी व्यक्तींची रात्र-रात्र जागून सेवा करत असते. कुटुंबातील व्यक्तींचे शारीरिक आरोग्य चांगले राहण्यासाठी ती कष्ट करते. त्याबरोबरच नवऱ्याचे, मुलांचेच नाहीतर संपूर्ण कुटुंबाचे मानसिक, भावनिक आरोग्य आनंददायी ठेवण्यासाठी ती कायम प्रयत्नशील असते. प्रसंगी स्वत: त्रास सहन करून कुटुंबाला आनंद देत असते. संकट प्रसंगी ती सर्वांना आधार देते.

मुलं शाळा, कॉलेजातून आल्यावर आई,बहिणीला तेथील घटना ,प्रसंग ,गंमती-जंमती सांगतात.मन मोकळे करतात.पतीने बाहेर कितीही पराक्रम गाजवला किंवा कधी अपयश आले तर तो आधी पत्नीपाशी किंवा आईपाशी व्यक्त होतो.कठीण प्रसंगात किंवा संकटात तीच त्याला आधार देते.या दृष्टीने ती सर्व घराची ललिता म्हणजे मैत्रिण असते. यक्षाने युधिष्ठराला प्रश्न केला ," पुरुषाचा सर्वात जास्त जवळचा मित्र कोण?"

त्याने उत्तर दिले," त्याची पत्नी ! "

घरातील प्रत्येक सदस्याची स्त्री ही पर्सनल असिस्टंट असते. स्वतःचे काम सांभाळून मुलांना शाळा, क्लास, कॉलेजसाठी जायचं असेल किंवा पतीला ऑफिस वा कामाच्या ठिकाणी जायचं असेल तर त्या सर्वांच्या दिवसभराच्या कार्यक्रमाचे मॅनेजमेंट एकही पैसा न घेता ती करत असते. तिचे घड्याळ भिंतीवर टांगलेल्या घड्याळाच्या वेळेनुसार नाही तर कुटुंबातल्या सदस्यांच्या वेळापत्रकाप्रमाणे चालत असते. घरातील प्रत्येक गोष्टीत तिचा हात असतोच. घराच्या कानाकोपऱ्यात तिचा हात फिरत असतो. कुटुंबातील व्यक्तींनी घाई गर्दीत स्वतः ठेवलेली वस्तू अगदी डिटेक्टिव्ह एजन्सीची मदत घेऊनही सापडणार नाही परंतु ती वस्तू सापडण्याचे काम करते ती फक्त घरातील कर्ती स्त्रीच!

कुटुंबातील स्त्रीला गृहलक्ष्मी म्हणतात. घरातील आर्थिक नियोजन ती अतिशय काटकसरीने, योग्य आणि उत्तम करीत असते. अनेक कुटुंबातील स्त्रिया अर्थार्जन करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असतात. घरातल्या सर्वांच्या इच्छा पुरवणारी, भागवणारी ती सिद्धलक्ष्मी असते.

स्त्री घराच्या संस्कार-संस्कृतीच्या केंद्रस्थानी असते. कुटुंबातील विशेषत: माता रूपातील स्त्री ही कुटुंबाची वंशवेल वृद्धिंगत करणारी जन्मदात्री असते. मुलाला जन्म देण्याबरोबरच त्याला चांगले संस्कार ती देत असते. मुलांची पहिला गुरू आई हीच असते. घराला शिस्त लावण्याची काम आईच करत असते. मुला - मुलींचे संस्कार तिच्या संस्कारावरून ठरत असतात. साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक तर संस्काराची मातृगाथा आहे.

स्त्री काय नाही करू शकत? ती माणसाला महात्मा, संत, योद्धा, राजकारणी, कुशल प्रशासक बनवते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारले ते जिजाऊंच्या प्रेरणेने! गुरुनानक सांगतात,"स्त्रियां मुळीच अबला नाहीत. जगातील महापुरुषांना त्यांनी जन्म दिला, घडवलं. स्त्रिया नाही तर या जगाला अर्थ नाही."

स्त्रीचे सामंजस्यच कुटुंबाला सावरत असते.'अतिथी देवो भव:' हा मंत्र तर ती प्रत्यक्ष जीवनात राबवत असते. तिची आतिथ्यशीलता घरात येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांस सुखवत असते. तिच्या गृहदक्षतेमुळे कुटुंबाचा गौरव होतो. कुटुंबाची पत - प्रतिष्ठा सांभाळणे गृहिणीच्याच हातात असते. पत्नीमुळे पुरुषाच्या कार्य-कर्तृत्वाला, लौकिकाला झळाळी येते. ज्याची पत्नी सुशील, समंजस असते त्याचा संसार सुखाचा, तेजस्वी होतो.

विचित्र वागणाऱ्या, मंदबुद्धी असणाऱ्या,

**(... पुढील पानावर)**

(... मागील पानावरून)
जगाने लाथाडलेल्या एडिसनला त्याच्या आईनेच घडवले. त्याच्या मनात जिद्द भरली, त्याला शिकविले. याच एडिसनने बल्बचा शोध लावून साऱ्या जगाला प्रकाशमान केले. तो पुढे मोठा उद्योगपती झाला. अशी कितीतरी उदाहरणे आहेत.आपला पती, मुलगा आणि कुटुंबाच्या यशासाठी, प्रगतीसाठी ती कायम धडपड असते, प्रयत्न करत असते. ती स्वतः चार पावले मागे राहून पुरुषाच्या कर्तृत्वाला आभाळ मोकळे करून देते. तेव्हाच पुरुष पुढे जाऊ शकतो , प्रगती करतो हे विसरून चालणार नाही.

स्त्री कुटुंबासाठी खस्ता खाते, काम करते. कुटुंबाच्या सुखापुढे ती स्वतःच्या सुखाचा, आरामाचा विचार करत नाही. कुटुंबातील स्त्री ही संयमी,सहनशील असते. कुटुंबाच्या सुखासाठी ती कायमच नमतं घेत असते. त्यामुळे अनेक गोष्टीत तिला गृहीत धरून दुय्यम दर्जा दिला जातो , कमी महत्त्वाचे समजले जाते. याचाच परिणाम म्हणून ती स्वतःच स्वतःला कमी समजायला लागते. ती कुटुंबाच्या भल्यासाठी सर्व गोष्टी करत असते. प्रत्येक स्त्रीने आपल्या मनातील स्वतःची प्रतिमा उंचावली पाहिजे. मी ही घरातील एक महत्त्वाचा घटक आहे असे समजले पाहिजे.

घर हे फक्त चार भिंतींनी तयार होत नसते तर त्यात राहणाऱ्या व्यक्तींच्या एकमेकांवरील प्रेमाने, सहकार्याने, वात्सल्याने आणि काळजीने तयार होत असते.घराला घरपण देण्याचे, स्नेह देण्याचे काम कुटुंबातील स्त्री करत असते.ती जननी बनून ज्ञान-संस्कार देत असते. जीवनाचा अर्थ शिकवत असते. पत्नी बनून ती मैत्रीण, सहचारिणी बनत असते. जीवनभर त्याच्या सुख-दुःखात साथ देत असते. तर मुलगी बनून आपल्या रुणझुणत्या पैंजणांनी आनंददायी बाग फुलवत असते. अशी ही स्त्री अनेक रूपांनी कुटुंबाला इंद्रधनुषी रंगाने रंगवत असते. तिच्या शिवाय कुटुंबाचे वर्तुळ पूर्ण होऊ शकत नाही. समाज जरी कुटुंबकेंद्रित असला तरी कुटुंब हे मात्र स्त्रीकेंद्रित असते.

ती स्वतः बाहेर काम करत असली तरी तिच्या जीवनात पहिली प्रायोरिटी असते ती घराला. ती आपला कॉलिटी टाईम कुटुंबासाठी देत असते. स्वतःसाठी नव्हे तर घरासाठी जगत असते. तिच्याशिवाय घराचं पानही हालत नाही. ती नसली तर घर कोलमडून पडते. जीवनाला अर्थ उरत नाही

**"ही दुर्गामाता जेव्हा घेते रूप**
**रणरागिणीचे**
**असतो तेव्हाही तिच्या हातात**
**अमृताने भरलेला कलश ...!"**

आणि हा अमृताने भरलेला कलश ती आपल्या कुटुंबासाठीच वापरत असते. कारण तिचा सर्व जीव कुटुंबात रंगलेला, दंगलेला असतो. अशी ही स्त्री कुटुंबाला संजीवन देणारी अमृतवेल असते. ती खऱ्या अर्थाने कुटुंबाचा कणखर कणा असते आणि म्हणूनच घर ताठपणे उभे असते!

(... पान क्रमांक ६१ वरून)
पाठ्यपुस्तके, शैक्षणिक जर्नल, कादंब-याचा यात समावेश आहे. अनेक प्रकाशक त्यांच्या पाठ्यपुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या Kindle वर उपलब्ध करून देतात.

Kindle मध्ये बिल्ट-इन शब्दकोश आणि भाषांतराची सोय उपलब्ध करून दिली आहे, ज्यामुळे वाचन करताना अनोळखी शब्द शोधणे किंवा टेक्स्टचे भाषांतर करणे सोपे जाते.

**पोर्टेबिलिटी:** हजारो पुस्तकं वाहून नेण्याची त्याची क्षमता सोयीस्कर ठरली आहे. याचबरोबर Kindle इतर स्मार्टफोन, टॅबलेट, आणि संगणक यांच्या सोबतीने देवाण घेवाण करू शकतो. प्रवास करताना वाचन करणे सोपे होते.

**Zoom, Google Meet आणि Microsoft Teams** सारख्या ॲप्स चा वापर करून कुठूनही ऑनलाइन वर्गांमध्ये सहभागी होऊ शकतो.

**व्हर्च्युअल/आभासी वर्ग:** Zoom एक इंटरॲक्टिव्ह प्लॅटफॉर्म असल्याने शिक्षक विद्यार्थ्यांसोबत थेट वर्ग घेऊ शकतात.

**रेकॉर्डिंग फीचर्स:** वर्ग रेकॉर्ड करता येतात, त्यामुळे आपआपल्या सोयीनुसार पाहिजे तेव्हा रेकॉर्ड झालेला धडा पुन्हा एकदा डोळ्याखालून घालण्याची संधी मिळते.

**स्क्रीन शेअरिंग:** शिक्षक स्लाइड किंवा शैक्षणिक व्हिडिओ सादर करण्यासाठी त्यांचे स्क्रीन शेअर करू शकतात, एकाचवेळी ऐकणे आणि दिसणे होत असल्याने याचा फायदा दोघांनाही होतो.

पोल्स आणि रिॲक्शन्स सारखे इंटरऐक्टिव्ह फीचर्स थेट फीडबॅक देतात.

**Google Meet:** Google Docs, Sheets Slides वर एकाचवेळी अनेकजनांना एकमेकां सोबत काम करणे सोपे होते.

**लाइव्ह कॅप्शनिंग फीचर:** ऐकण्यात अडचण असलेल्यासाठी मोलाचे ठरले आहे.

**Microsoft Teams:** शिक्षक थेट प्लॅटफॉर्मवर असाइनमेंट्स तयार करून त्याचे वितरण तसेच ग्रेडिंग पण करू शकतात.

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग:** Microsoft Teams थेट वर्गांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगला परवानगी देते.

**WhatsApp आणि Telegram** ही सध्याची सर्वात लोकप्रिय आणि प्रामुख्याने संदेश पाठवणारे प्लॅटफॉर्म शिक्षक आणि विद्यार्थ्यांना संवाद साधण्याची परवानगी देत असल्याने येणाऱ्या शंकांचे तातडीने निराकरण करणे, महत्त्वाच्या सूचनांचे आदानप्रदान करणे सोपे होते.

**ग्रुप चॅट:** शिक्षक चॅटमध्ये थेट PDFs, चित्रे, व्हिडिओ आणि ऑनलाइन लिंक्स पाठवू शकतात.

**आवाज आणि व्हिडिओ कॉल:**
WhatsApp आवाज आणि व्हिडिओ कॉल द्वारे व्हर्चुअल ट्यूटोरियल सत्रे घेऊ शकतात.

Telegram हे WhatsApp च्या तुलनेत मोठ्या फाईल्स पाठवू शकते. Telegram कामे स्वयंचलित करण्यासाठी बॉट्सचा वापर करू देते (क्विझ, सर्वेक्षण).

आजकाल कानावर पडणारे ग्रहण करणारी मंडळी एका वेगळ्या माध्यमाच्या प्रेमात आहेत ते म्हणजे Audible किंवा Spotify

**ऑडिबल:** ही कंपनी तिच्या मोठ्या ऑडिओबुक्स, पॉडकास्ट आणि मूळ ऑडिओ सामग्रीसाठी ओळखली जाते. महिलांना मल्टीटास्किंग करताना ऐकत ऐकत शिकणे सोपे जाते. यापूढचे 'ऐकूण' शिकण्याचे माध्यम म्हणजे 'स्पॉटिफाय'! यापूर्वी अनेकांना स्पॉटिफाय हा संगीत स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म आहे असेच वाटत होते पण यामध्ये शैक्षणिक सामग्रीसाठी अनेक पॉडकास्टही आहेत. त्यातही अनेक भाषा शिकण्याचे पॉडकास्ट आहेत.

**Google Scholar** सारख्या शैक्षणिक प्लॅटफॉर्म्सचा वापर करून संशोधन निबंध, लेख आणि विविध विषयांवरील विश्वासार्ह माहिती मिळवता येते. हे रेफरन्सिंगसाठी व्यवस्थित मदत करते. (APA, MLA, Chicago, इत्यादी)

**इंटरॅक्टिव्ह लर्निंग टूल्स:** Brainly, Quizlet किंवा Wolfram Alpha सारख्या ॲप्सचा वापर करून सिम्युलेशन, क्विझ आणि इंटरॅक्टिव्ह मॉड्यूल्ससह शिकण्याचा अनुभव मिळतो.

**Brainly:** प्रश्न पोस्ट करण्यास आणि तज्ज्ञ वापरकर्त्यांकडून उत्तरे मिळविण्यासाठी परवानगी देते. यामुळे 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ', म्हणायला येथे जागा आहे.

**Quizlet:** विविध शिक्षणाच्या ex फ्लॅशकार्ड, क्विझ आणि गेम्स द्वारे शिक्षण देण्यासाठो वापरले जाते. Quizlet हे Learn, Test, आणि Match, सारख्या पद्धती वापरते. येथे आभासी वर्गमित्रांसोबत ग्रुप स्टडी होऊन विषय चांगला समजतो.

Wolfram Alpha चा उपयोग विविध विषयांमध्ये संशोधन आणि डेटा विश्लेषणासाठी करू शकतो. याचा सर्वात चांगला उपयोग म्हणजे रिअल वर्ल्ड मधल्या प्रॉब्लेम्सची माहिती आणि डेटा उपलब्ध करून देण्याचे काम ते करतात.

हे सर्व बघता या सर्व तंत्रविद्येचा परिणाम म्हणजे आजची स्त्री, पाठीमागे अनेक व्याप असूनही, वेळात वेळ काढून, कुठल्याही प्रहरी शिकू शकते कारण हे 'self-paced courses' आहेत. मोबाइल मार्फत मिळणारी ही ज्ञानगंगा ' देता, किती घेशील दो कराने' अशा स्थितीस येऊन पोहोचली आहे, गरज आहे ती फक्त ह्या माहितीचा सागरात डुंबण्याची. थोडक्यात सर्व काही आत्मसात करण्याची आणि आजची बहुआयामी स्त्री हे शिवधनुष्य लीलया पेलणार यातही शंका नसावी!

# महिलांचे आरोग्य आणि भौतिकोपचार



**डॉ. अमरित कौर**
प्राचार्या,
मविप्र भौतिकोपचार महाविद्यालय, नाशिक

स्त्रिया अनेकदा त्यांच्या स्वत:च्या आरोग्य आणि कल्याणापेक्षा त्यांच्या कुटुंबाच्या गरजांना प्राधान्य देतात. या प्रवृत्तीचे महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतात, ज्यामुळे शारीरिक, भावनिक आणि मानसिक आरोग्य आव्हाने निर्माण होतात. स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याची स्त्रियांची प्रवृत्ती ही सामाजिक नियम, भावनिक घटक आणि वेळेची मर्यादा यांच्यात मूळ असलेली एक जटिल समस्या आहे. हा संघर्ष ओळखणे हे आरोग्यदायी निवडींना प्रोत्साहन देण्याच्या दिशेने पहिले पाऊल आहे आणि महिलांना त्यांच्या कल्याणाला प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहित करणे आहे. स्वत: ची काळजी आणि समर्थनाला महत्त्व देणारे वातावरण वाढवून, आम्ही महिलांना संतुलित आणि परिपूर्ण जीवन प्राप्त करण्यास मदत करू शकतो, ज्यामुळे स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबियांना फायदा होतो.

तंदुरुस्ती आणि फिजिओथेरपी महिलांचे आरोग्य आणि कल्याण वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. शारीरिक ते मानसिक आरोग्य लाभांपर्यंत, नियमित व्यायामात गुंतून राहणे आणि आवश्यकतेनुसार फिजिओथेरपी घेणे स्त्रियांना निरोगी, अधिक परिपूर्ण जीवन जगण्यास सक्षम बनवू शकते.

### महिलांच्या आरोग्यामध्ये फिजिओथेरपीची भूमिका :

फिजिओथेरपी ही महिलांच्या आरोग्याच्या विविध पैलूंना संबोधित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, ज्यामध्ये शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यावर परिणाम करणाऱ्या अनेक परिस्थितींचा समावेश होतो. प्रसूतीपूर्व काळजीपासून ते रजोनिवृत्तीच्या समर्थनापर्यंत, फिजिओथेरपिस्ट महिलांना निरोगी जीवन जगण्यासाठी सक्षम बनवणारे अनुरूप उपचार प्रदान करण्यासाठी सुसज्ज आहेत.

### 1.शारीरिक आरोग्य लाभ

• स्नायू आणि हाडे मजबूत करणे: नियमित व्यायामामुळे स्नायूंची ताकद वाढण्यास आणि हाडांची घनता सुधारण्यास मदत होते, विशेषत: स्त्रियांच्या वयानुसार ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी होतो

• वजन व्यवस्थापन: सक्रिय राहणे निरोगी वजन राखण्यासाठी मदत करते, ज्यामुळे मधुमेह आणि हृदयरोगासह विविध आरोग्य समस्या टाळता येतात.

• वर्धित लवचिकता आणि संतुलन: फिटनेस दिनचर्या, विशेषत: ज्यामध्ये स्ट्रेचिंग आणि बॅलन्स प्रशिक्षण समाविष्ट आहे, लवचिकता सुधारू शकते आणि फॉल्सचा धोका कमी करू शकतो, जे विशेषत: स्त्रियांच्या वयानुसार महत्वाचे आहे.

### 2. प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर काळजी :

गर्भधारणेमुळे असंख्य शारीरिक बदल होतात ज्यामुळे अस्वस्थता आणि गुंतागुंत होऊ शकते. गर्भधारणेदरम्यान फिजिओथेरपी अशा समस्यांचे व्यवस्थापन करण्यात मदत करू शकते जसे की:

• ओटीपोटात वेदना: विशेष व्यायाम आणि मॅन्युअल थेरपी ओटीपोटाच्या क्षेत्रामध्ये, पाठीच्या खालच्या भागात आणि नितंबांच्या वेदना कमी करू शकतात.

• कोअर स्ट्रेन्थइनिंग : स्त्रियांना त्यांच्या मूळ स्नायूंना कसे बळकटी द्यावी याबद्दल शिक्षित केल्याने शरीरात बदल होत असताना स्थिरता आणि आधार वाढू शकतो.

• श्वास घेण्याची तंत्रे: फिजिओथेरपिस्ट प्रसूती आणि प्रसूतीदरम्यान फायदेशीर ठरू शकणाऱ्या श्वासोच्छवासाच्या पद्धती शिकवतात.

जन्मानंतर, फिजिओथेरपी यावर लक्ष केंद्रित करते:

• पेल्विक फ्लोअर रिहॅबिलिटेशन: अनेक महिलांना बाळंतपणानंतर पेल्विक फ्लोर डिसफंक्शनचा अनुभव येतो. फिजिओथेरपिस्ट या स्नायूंना बळकट करण्यासाठी, मूत्राशय नियंत्रण सुधारण्यासाठी आणि अस्वस्थता कमी करण्यासाठी विशिष्ट व्यायामाची रचना करू शकतात.

• डायस्टॅसिस रेक्टी व्यवस्थापन: ही स्थिती, जिथे गर्भधारणेदरम्यान पोटाचे स्नायू वेगळे होतात, लक्ष्यित व्यायामाद्वारे संबोधित केले जाऊ शकते.

### 3. मासिक पाळी आरोग्य आणि विकार

डिसमेनोरिया (वेदनादायक कालावधी) किंवा एंडोमेट्रिओसिस यासारख्या मासिक पाळीच्या विविध विकारांनी पीडित महिलांना फिजिओथेरपी देखील मदत करू शकते. तंत्रांमध्ये हे समाविष्ट असू शकते:

• मॅन्युअल थेरपी: हँड-ऑन तंत्र पेल्विक वेदना कमी करू शकतात आणि रक्त प्रवाह सुधारू शकतात.

• व्यायाम थेरपी: सौम्य व्यायाम कार्यक्रम वेदना कमी करण्यास आणि एकंदर कल्याण सुधारण्यास मदत करू शकतात.

### 4. रजोनिवृत्ती व्यवस्थापन

स्त्रिया रजोनिवृत्तीमध्ये बदलत असताना, त्यांना गरम चमक, मूड बदलणे आणि मस्क्यूकोस्केलेटल वेदना यासह अनेक लक्षणे दिसू शकतात. फिजिओथेरपी ही लक्षणे व्यवस्थापित करण्यात मदत करू शकते:

• व्यायाम कार्यक्रम: अनुकूल फिटनेस पद्धती हाडांची घनता सुधारू शकतात, ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी करू शकतात आणि एकूण आरोग्य सुधारू शकतात.

• शिक्षण आणि समर्थन: फिजिओथेरपिस्ट लक्षणे व्यवस्थापित करण्याबद्दल मौल्यवान माहिती देतात, स्त्रियांना त्यांच्या आरोग्याविषयी माहितीपूर्ण निवडी करण्यात मदत करतात.

### 5.तीव्र वेदना व्यवस्थापन

फायब्रोमायल्जिया आणि तीव्र पेल्विक वेदना यासारख्या परिस्थितींचा स्त्रियांवर विषम परिणाम होतो. फिजिओथेरपी या परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते:

• वेदना कमी करण्याचे तंत्र: अल्ट्रासाऊंड, इलेक्ट्रिकल स्टिम्युलेशन आणि मॅन्युअल थेरपी यासारख्या पद्धती आराम देऊ शकतात.

• शिक्षण आणि स्व-व्यवस्थापन: मुकाबला करण्याच्या रणनीती आणि स्वयं-व्यवस्थापन तंत्र शिकवण्यामुळे महिलांना त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम बनवता येते.

### 6. महिलांचे आरोग्य आणि फिटनेस

फिजिओथेरपिस्ट महिलांना सक्रिय जीवनशैली राखण्यासाठी, व्यायाम आणि खेळातील सहभागाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करू शकतात. हे यामध्ये समाविष्ट आहे:

• दुखापती प्रतिबंध: महिलांना दुखापती टाळण्यासाठी योग्य तंत्रे आणि शरीर यांत्रिकी शिकवणे.

• व्यायाम प्रिस्क्रिप्शन: वैयक्तिक फिटनेस प्रोग्राम विकसित करणे जे जीवनाच्या विविध अवस्था, क्षमता आणि आरोग्य परिस्थिती सामावून घेतात.

### 7. मनोसामाजिक समर्थन

फिजिओथेरपीच्या सर्वांगीण दृष्टिकोनामध्ये मानसिक आणि भावनिक आरोग्याकडे लक्ष देणे समाविष्ट आहे. महिलांना अनेकदा सामाजिक दबाव आणि मानसिक आरोग्याच्या आव्हानांचा सामना करावा लागतो, विशेषत: जीवनातील महत्त्वपूर्ण बदलांदरम्यान. फिजिओथेरपी मदत करू शकते:

• मन-शरीर तंत्र: उपचारांमध्ये विश्रांतीची तंत्रे, सजगता आणि तणाव व्यवस्थापन धोरणे समाविष्ट करणे.

• सपोर्ट नेटवर्क्स: कनेक्शन आणि समज वाढवण्यासाठी समर्थन गट किंवा समुदाय संसाधनांमध्ये सहभागास प्रोत्साहित करणे.

**(... पुढील पानावर)**

# 'ती'ची कसरत



- सविता दिवटे-चव्हाण

उपशिक्षिका, श्रीमती जिजाबाई रघुनाथराव गुंजाळ विद्यालय, चांदवड

विविध अंगी भूमिकेला न्याय देणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे स्त्री....आजी, आई, बहीण, पत्नी, मुलगी, सखी अशा भूमिका ती सहजपणे निभावत असते. स्त्री जन्मत:च सहनशीलता, त्याग, समर्पण भावना घेऊन येते. त्यामुळे एकाच वेळी अनेक गोष्टी ती करत असते. पूर्वीच्या स्त्रीचे 'चूल आणि मूल' एवढेच जग होते. पण स्त्रीने शिक्षण घेतले आणि ती घराबाहेर पडली, काळ बदलला, परिस्थिती बदलली आणि तिला आपल्या भूमिका बदलणे क्रमप्राप्त झाले. शिक्षणाबरोबरच स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबाला आर्थिक हातभार लावणे काळाची गरज झाली. बदलत्या काळात कुटुंबाच्या गरजा वाढल्या. प्रत्येकाला आपले जीवन आणि राहणीमानाचा दर्जा भौतिक दृष्टीने स्टँडर्ड असावा असे वाटायला लागले आहे. त्यासाठी आर्थिक स्रोत चांगला हवा म्हणून पुरुषांबरोबर कुटुंबातील स्त्रीने अर्थार्जनासाठी मदत करावी या हेतूने तिने नोकरीधंदा करावा अशा अपेक्षा वाढत चालल्या आहेत. तिलाही वाटतं, आपल्या कलागुणांना संधी मिळावी. स्वत:ला सिद्ध करता यावं... यासाठी ती धडपडत असते, मग सुरू होते नोकरी-धंदा करणाऱ्या स्त्रीची तारेवरची कसरत...

तिचा दिवस सुरू होतो तो घड्याळाच्या काट्यावर. किचन पासून ते ऑफिस पर्यंत तिचं नियोजन ठरलेलं असतं. त्यात मध्ये काही व्यत्यय आला तर तिची तारांबळ उडते. कुटुंबाच्या सोयीसाठी बऱ्याच स्त्रियांना घर ते नोकरीच्या ठिकाणी दूर अंतरापर्यंत अपडाऊन करावे लागते. प्रवास, प्रवासात होणारा वेळेचा अपव्यय, शारीरिक त्रास आणि त्यातून होणारी चिडचिड. त्यातच आपल्या लहान बाळाला घरी सांभाळण्यासाठी कुणी नसेल तर पाळणा घरात ठेवावे लागते. जड अंत:करणाने आपल्या चिमुकल्याला सोडताना तिचा जीव नेहमीच कासावीस होत असतो. हिरकणीची ऊर्जा मनात साठवून ती आपल्या कामावर जात असते. आजची मध्यम वयाची स्त्री ही कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या, अपत्य जन्म, त्याचं योग्य संगोपन, घरातल्यांची काळजी, पै-पाहुणे, सण उत्सव, रुढी - परंपरा यांची जपणूक या सर्व गोष्टी साग्रसंगीत होण्यासाठी आग्रही असते. कामाच्या ठिकाणी आपण 'परफेक्ट' असण्याचा तिचा आटोकाट प्रयत्न असतो.ही 'सुपरवुमन' ची प्रतिमा जपण्यासाठी रात्रंदिवस कष्ट उपसण्याची ती तयारी ठेवते. आपला स्वाभिमान जपत ती काम करत असते.

आज सर्वच क्षेत्रात स्त्रीने पाऊल ठेवले आहे व स्वत:ला सिद्ध करत आहे. उच्च पदावर असतानाही तिला प्रसंगी कर्तव्य कठोर व्हावे लागते. कर्तव्य बजावताना अनेकांचा रोष सुद्धा पत्करावा लागतो. ती जेवढी यशाची शिखरे पादाक्रांत करत असते, तेवढा तो काटेरी मुकुट तिला अंत:स्थ वेदना देतच असतो. कामाच्या ठिकाणी वेळी-अवेळी कामाच्या निमित्ताने थांबावे लागणे, कामाचा अतिरिक्त ताण पडणे, त्यात कुटुंबातून योग्य ती साथ आणि पाठबळ असेल तर ठीक नाहीतर तिची मानसिक कुचंबणा होत राहते. पण ती थांबत नाही कारण स्वावलंबन हा दागिना मनस्वी तिला आनंद तर देतोच पण शोभूनही दिसतो. स्त्री नोकरी किंवा धंदा करते म्हणून तिला कौटुंबिक जबाबदारीतून फारशी सुटका नसतेच. तिला नोकरीबरोबरच कौटुंबिक कर्तव्याची जाणीव ठेवावीच लागते. कुटुंबातील व्यक्तींचे, मुलांचे आजारपण, आरोग्य, संगोपन यात आपण कुठे कमी पडू नये यावर तिचा कटाक्ष असतोच. पण घरातल्या, जवळच्या नातेवाईकांच्या काही सुख-दु:खाच्या प्रसंगी इच्छा असूनही नोकरीमुळे तिला फारसा वेळ देता येत नाही. तरीपण सुवर्णमध्य साधण्याचा ती प्रयत्न करतच असते. हे सर्व करताना स्वत:च्या आवडीनिवडी, छंद यांना तिने केव्हाच तिलांजली दिलेली असते. तिला स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायलाही वेळ मिळत नाही. आरोग्याची ही हेळसांड कधी तिच्या जीवावरही बेतते.

आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी हल्ली शहरात कॉर्पोरेट क्षेत्रातही स्त्रिया या मोठ्या प्रमाणात नोकरी करताना दिसतात. कधीकधी तिच्या क्षमतेपेक्षाही जास्त काम तिला करावे लागते पण पर्यायही नसतो. कामाच्या वाढलेल्या ताणामुळे बौद्धिक थकवा तिला जाणवत राहतो. त्यामुळे सर्वच कौटुंबिक जबाबदाऱ्या ती पार पाडू शकत नाही आणि त्यातून कधीकधी कुटुंबात कलहाचे प्रमाण वाढत जाते. तरीपण समाज काही प्रमाणात बदल स्वीकारत आहे. आताची तरुणाई, खास करून तरुण मुलींचे स्वत: चे करिअरचे प्लॅनिंग असते. वैचारिक दृष्ट्या सक्षम, शिकलेल्या मुली शारीरिक कष्टापेक्षा आपल्या बुद्धीचा कस लावतात. पैसा कमावतात आणि योग्य प्रकारे स्वत:च्या आनंदासाठी सुद्धा त्याचा वापर करतात. परंपरेने चालत आलेल्या घरकामाला फाटा देऊन आपल्यातील कलागुणांना, क्षमतेला वाव देत, सिद्ध करत त्या वेगळेपणाने आयुष्य जगत असतात. हे प्रमाण तसे फार कमी आहे पण थोडेसे आशादायी आहे.

तिच्या मनावर संस्कारांचा एवढा पगडा आहे की ती आर्थिक दृष्ट्या कितीही सक्षम असली तरी संसार, घर, प्रपंचाची आसक्ती तिला कुटुंबाशी भावनिक दृष्ट्या जोडून ठेवते. या भावनिक गुंतवणुकीमुळे ती घराचं गोकूळ सदा फुलवत ठेवते. घराचे घरपण तिच्यामुळे आहे, मनाचा एक हळवा कोपरा तीच कायम जपते. ती संसार आणि नोकरीचा मेळ घालते. त्यासाठीच ती तारेवरची कसरत करते.

---

**(... मागील पानावरून)**

• तणाव कमी करणे: व्यायाम एंडोर्फिन सोडण्यासाठी ओळखला जातो, ज्यामुळे तणाव आणि चिंता कमी होण्यास मदत होते. नियमित शारीरिक हालचाली मूड सुधारू शकतात आणि एकूणच मानसिक कल्याण वाढवू शकतात.

**8. क्रोनिक स्थिती व्यवस्थापित करणे**

• वेदना व्यवस्थापन: फिजिओथेरपी योग्य व्यायाम कार्यक्रम आणि मॅन्युअल थेरपीद्वारे फायब्रोमायल्जिया आणि संधिवात यांसारख्या तीव्र वेदनांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करू शकते.

• स्थिती-विशिष्ट कार्यक्रम: फिजिओथेरपिस्ट विशिष्ट आरोग्य समस्यांसाठी व्यायाम पथ्ये तयार करू शकतात, जसे की हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, मधुमेह किंवा ऑस्टिओपोरोसिस, ज्यामुळे स्त्रियांना त्यांच्या परिस्थिती सक्रियपणे व्यवस्थापित करण्यास सक्षम करते.

**9. निरोगी सवयींना प्रोत्साहन देणे**

• लवचिकता निर्माण करणे: नियमित फिटनेस दिनचर्या स्थापित केल्याने शिस्त आणि लवचिकता, कौशल्ये वाढतात ज्यामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रांना फायदा होऊ शकतो.

**निष्कर्ष :** महिलांच्या आरोग्यामध्ये फिजिओथेरपीची भूमिका सर्वसमावेशक आणि बहुआयामी आहे. लक्षित हस्तक्षेप, शिक्षण आणि सहाय्य प्रदान करून, फिजिओथेरपिस्ट स्त्रियांना जीवनाच्या विविध टप्प्यांवर विविध आरोग्य आव्हानांना नेव्हिगेट करण्यासाठी सक्षम करतात. वैयक्तिक दृष्टिकोनातून, फिजिओथेरपी जीवनाची गुणवत्ता वाढवते, निरोगीपणाला प्रोत्साहन देते आणि महिलांना त्यांचे आरोग्य उद्दिष्ट साध्य करण्यात मदत करते. महिलांच्या आरोग्याच्या समस्यांबाबत जागरुकता वाढत असल्याने, या क्षेत्रातील फिजिओथेरपीचे महत्त्व जास्त अनन्य साधारण आहे.

# गरज महिला सुरक्षिततेची



**कु.श्रुती पाटील**

इ.१० वी, मराठा हायस्कूल, नाशिक

ज्या राष्ट्राच्या मातीत गार्गी, मैत्रेयी सारख्या स्त्रियांचा सुगंध आजही दरवळतो. ज्या राष्ट्राच्या मातीत रजिया सुलताना दिल्लीच्या तक्तावर बसली. जिथे रणरागिणी झाशीच्या राणीने घोड्यावर बसून तलवार चालवली आणि जिथे मदर तेरेसा अख्ख्या जगाची आई झाली. अशा कर्तृत्ववान महिलांचा इतिहास साक्षी असताना देखील आज गर्भातच एखाद्या स्त्रीचे आयुष्य मातीमोल होतंय. उमलण्याआधीच कळ्यांना निष्ठूरपणे खुडलं जातंय ही लाजिरवाणी गोष्ट आहे. जर आज या देशाची शान राखायची असेल तर स्त्रीचा सन्मान आपल्याला करावाच लागेल. आज स्वातंत्र्य मिळालेल्या स्त्रीला सुरक्षिततेची देखील गरज भासू लागली आहे. वर्षानुवर्षे परंपरेने निर्माण केलेल्या चौकटी ओलांडून महिलांनी या आधुनिक काळात सर्वच क्षेत्रात उत्तम कामगिरी केली आहे. घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडून ती आपले स्वप्न देखील पूर्ण करण्याचा प्रयत्न करते आहे. जेव्हा स्त्री ही फक्त चूल आणि मूल यातच गुरफटलेली होती तेव्हा तिच्यावर सामाजिक अन्याय होत होता. शिक्षणाने प्रगल्भ झालेल्या स्त्रियांचा समावेश हा मुख्यतः १९९० नंतर हळूहळू पुरुष मक्तेदारी असलेल्या क्षेत्रांतही होऊ लागला. आज स्त्रियांना स्वातंत्र्य मिळतंय त्यामुळे त्या सर्वच क्षेत्रात आत्मविश्वासाने कार्यरत आहेत. अर्थात आज पण आपल्या स्वप्नपूर्तीसाठी घरातून बाहेर गेलेली महिला पुन्हा सुखरूप घरी येईल का? याची मात्र आजच्या काळात शाश्वती राहिलेली नाही. या स्त्रीला आता सुरक्षिततेची गरज भासू लागली आहे. मग या गरजेसाठी तिला वयोमर्यादा राहिलेली नाही. अगदी रस्त्यावर आपल्या मैत्रिणींबरोबर खेळणारी लहान चिमुकली, शाळेत जाणारी एक मुलगी, कॉलेजमध्ये शिक्षण घेणारी युवा स्त्री, ऑफिसमध्ये जाणारी महिला आणि घरातल्या वस्तू खरेदी करण्यासाठी काठीचा आधार घेत जाणारी रस्त्यावरील वृद्ध महिला या सर्वांचा समावेश यातच होतो. तुमच्या माझ्या जन्माचे मूळ आणि अखिल मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याचे कूळ जर कोण असेल तर ती म्हणजे स्त्री होय. जर मुलगी स्वतःच्या आईच्या गर्भात सुरक्षित राहू शकत नसेल तर ती या जगात कशी सुरक्षित राहणार? या सर्व गोष्टींमागे अनेक कारणे आहेत. बऱ्याच वेळा जर एखाद्या मुलीवर काही अन्याय, अत्याचार झाला तर समाज त्या मुलीला दोष देऊन मोकळा होतो की आजच्या तरुण मुलीच बिघडल्या आहेत. मात्र हे खरंच असं असेल तर आताच घडलेल्या बदलापूरच्या घटनेमध्ये त्या तीन वर्षाच्या चिमुकलीचा काय दोष होता ? आज मंजुळासारखी स्त्री जर कारागृहात सुरक्षित राहू शकत नसेल तर समाजात कोपर्डीच्या ताईसारख्या अनेक निरागस ताई कशा सुरक्षित राहतील?

आपण जर भारताच्या इतिहासात डोकावून बघितलं तर आधी स्त्रीचा मान, सन्मान राखला जात होता. आपल्या पुराण ग्रंथांमध्ये स्त्रियांना देवीसमान मानत "यत्र नार्यस्तु पूज्यंते तत्र रमंते देवताः। " | अशा वाक्यात स्त्री शक्तीचे वर्णन केलेले आहे. समाजाकडून आज स्त्रीला तो मान, ते संरक्षण मिळण्यासाठी संस्कारांची, सद्विचारांची गरज आहे. प्रत्येक व्यक्ती जन्माला येताना दृष्टी घेऊन येते, पण या दृष्टीने काय पाहावे याचे ज्ञान संस्कारांतूनच मिळते. म्हणूनच घरातील प्रत्येक मुलावर जर लहानपणीच आपण जगात वावरणारी प्रत्येक मुलगी माझी बहीण व प्रत्येक स्त्री ही माझी आईच आहे असे संस्कार केले तर अशा भयंकर कृत्यांना आळा घालण्यासाठी आपण दोन पावले पुढे जाऊ हे नक्की. स्त्रियांना देवीची उपमा देणाऱ्या देशात त्या स्त्रियांना देवी सोडाच पण माणूस म्हणून न वागवता जनावरांप्रमाणे वागणूक दिली जात असेल तर हेच माझ्या देशाचे दुर्दैव आहे. आपल्यासमोर येणारी प्रत्येक स्त्री ही आपली संधी नसून ती आपली जबाबदारी आहे हे जेव्हा प्रत्येकजण ओळखेल तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्री सुरक्षित होईल. ग्रामीण भागातील स्त्रियांना शहरी भागाच्या तुलनेने कमी स्वातंत्र्य मिळते, पण सद्यस्थिती ही बदलत चालली आहे.आज ग्रामीण भागात स्त्रिया जास्त सुरक्षित आहेत. भोगवादी वृत्ती, अतिरिक्त व्यसनाधीनता, सोशल मीडिया या बाबी स्त्री अत्याचारांची कारणे ठरत आहे. कारण याच सोशल मीडिया मधून लोकांच्या भावना बळावतात व याच अविवेकी भावना लोकांना असे वाईट कृत्य करण्यासाठी प्रवृत्त करतात. या सोशल मीडियामुळे अडल्ट कंटेन हे लोकांना मिळू लागले आहे.पण या गोष्टींवर आज विचार करायला मात्र कुणीच तयार होत नाहीये.

भारत हा वेगाने व उत्साहाने प्रगती करणारा देश आहे. पण मागच्या काही दशकांमध्ये याच भारतात महिला हिंसाचारातही वाढ दिसून येत आहे. अर्थात, विकासाकडे वाटचाल करताना अशा राक्षसी कृत्यांकडे होणारी वाटचाल खेदजनक आहे. म्हणूनच आज समाजात स्त्रियांना ५० टक्के आरक्षण नाही तर १०० टक्के संरक्षणाची गरज भासू लागली आहे. आजच्या २१ व्या शतकात देखील मुलगा हाच वंशाचा दिवा असतो अशा बुरसटलेल्या विचारांचा गळा आवळण्यासाठी आणि या देशाची आन-बान व शान जोपासण्यासाठी स्त्री सुरक्षिततेकडे लक्ष द्यायलाच हवे. एक स्त्री एक मुलगी ही फक्त वंशाचा दिवा नाही तर ती एक तेजस्वी तारा देखील होऊ शकते. स्त्री ही समाजाला गरजेचा हात देऊन माणुसकीची साथ निभावू शकते.

पूर्वी भारतात मुघल, इंग्रज, पोर्तुगीज यांच्या वाईट नजरा होत्या. अशा वाईट नजरा रोखण्याचं काम खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाहीत झालं. त्याचप्रमाणे अविचारी माणसांच्या मनात असलेल्या वाईट विचारांचा एन्काऊंटर हा त्या प्रत्येक माणसाने करायला हवा. असं झालं तर स्त्री अत्याचारांच्या घटनांना कुठेतरी पूर्णविराम लागेल. शासनाने देखील याबाबत कटाक्ष पाळायला हवा. स्त्री सुरक्षा हा मुद्दा लक्षात घेता स्त्रीला फक्त लाठ्या-काठ्यांच्या प्रशिक्षणाने सुरक्षितता मिळेल की शिक्षणाने असा प्रश्न उपस्थित होतो. अर्थात भारतात महिला शिक्षण देखील महत्त्वाचं आहे. भारतीय स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत ३० टक्के जास्त अशिक्षित आहे.

सध्या जग हे फार वेगाने प्रगती करत आहे. एकविसावे शतक हे स्त्री जीवनातील आनंदी शक्यतांचे शतक आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे येत जागृत व सक्रिय झाली आहे. कुणीतरी फार छान म्हटले की," जेव्हा स्त्री तिच्यावर लादलेल्या बेड्या आणि बंधने तोडायला लागते तेव्हा जगातील कोणतीही शक्ती तिला रोखू शकत नाही. " हेच तर तिच्या आनंदाचे क्षण. आज लोकांची विचारसरणी जरी बदलत असली तरी महिला सुरक्षितता या दिशेने प्रयत्नांची आणि कार्यक्षमतेची अजूनही गरजच आहे.

# स्त्री जीवनातील योग साधनेचे महत्व



- डॉ.मीनाक्षी गवळी
क्रीडा संचालिका,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

भारतीय स्त्रीचे जीवन म्हणजे तारेवरची कसरतच आहे. तिची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती बदललेली असली व त्यात तिचे वेगळे स्थान असले तरी जीवनातील साध्या, सरळ राहणीला ती मुकलेली आहे. आर्थिक आणि कौटुंबिक स्थैर्य आणण्यासाठी तिची जबाबदारी दुप्पटीने वाढलेली आहे. तिची सामाजिक प्रतिष्ठा, कौटुंबिक व आर्थिक जबाबदाऱ्यांतून येणारे ताण व निसर्ग नियम या सर्वांची परिणती मानसिक तणावात व पर्यायाने शारीरिक व्याधीत होत आहे. अशा परिस्थितीत स्त्रीला स्वतःचे शारीरिक आरोग्य सांभाळणे आणि मानसिक संतुलन राखणे आवश्यक आहे. हे संतुलन राखण्यासाठी एक सर्वोत्तम उपाय तिच्याजवळ आहे, आणि तो म्हणजे योग होय. भारताने योग, आयुर्वेद, ज्योतिर्विद्या, रसशास्त्र, गणिती शून्य, रागदारीवर आधारित शास्त्रीय संगीत या व अशा अनेक देणग्या आजवर संपूर्ण जगाला दिल्या. त्यात कदाचित सर्वश्रेष्ठ ठरावी अशी विद्या म्हणजे योगविद्या होय. शरीर व मनाच्या यंत्रणेचे आरोग्य उत्तमरित्या सांभाळण्याकरता आपल्याच भूमीत विकसित झालेले शास्त्र, कला व तंत्रज्ञान म्हणजे योग. दिवसातून किमान अर्धा तास तरी तिने स्वतःसाठी योग साधना करणे आवश्यक आहे. योग कला ही वेदांइतकीच प्राचीन आहे, वेदकालीन स्त्रिया अनेक क्षेत्रांत अग्रस्थानी होत्या कारण त्या योगाभ्यास करत होत्या, त्याचे अनेक पुरावे भारतीय इतिहासात आहे. योगाचे ज्ञान संपादन करणारी पार्वती ही पहिली स्त्री. तिने योग कलेचे ज्ञान आपल्या पतीकडून म्हणजेच भगवान शंकरांकडून मिळवले होते. मैत्रेयी याज्ञवल्क्य यांची पत्नी योग साधना करत होती. रामायणातील वनवास गमनाच्या प्रसंगी माता कौशल्याच्या मनस्थितीचे हृदयद्रावक वर्णन केले आहे, पुत्र विरहाच्या कल्पनेने कौशल्येला दुःखावेग अनावर झाला होत, अशा अवस्थेत तिने रामासमोर येण्यास नकार दिला. आसन व प्राणायाम यांच्या साधनेने अंतर्मन शांत करूनच आशीर्वाद देण्यासाठी कौशल्या माता रामासमोर आली, असे सांगितलेले आहे. महाभारतात सुलभा नावाच्या बैरागिनीने योग विद्येचा अभ्यास करून मिथिलाधीश जनकाला योगशास्त्रावरील विवादात सपशेल पराभूत केल्याची नोंद आहे. मदालसा नामक योगिनीची कथा सर्वांनाच माहिती आहे. चौदाव्या शतकात लल्ला नावाच्या काश्मिरी साध्वीने संपूर्ण देशात योगाचा प्रचार केला.

महाराष्ट्रातील संत बहिणाबाई या कवयित्रीने भक्ती व ध्यान यांचा मार्ग स्वीकारून आपले आयुष्य संपन्न केले. श्रीरामकृष्ण परमहंसाची पत्नी शारदा देवी यांचे आसन व प्राणायामावर अभ्यासपूर्ण प्रभुत्व होते. सांख्ययोगात स्त्रीला प्रकृतीची उपमा दिली आहे. प्रकृती प्रमाणेच स्त्रीला देखील आपल्या घरातील सुख समाधान कायम ठेवण्यासाठी सतत कार्यरत राहावे लागते. जीवनाच्या रंगमंचावर ती एकाच वेळी कन्या, बहीण, पत्नी, माता, सखी अशा अनेक भूमिका समर्थपणे निभावित असते. सुप्रसिद्ध लेखक जॉन रस्किन म्हणतात, "स्त्री ही निसर्गाची सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे." स्त्रीच्या सौंदर्यात, तिच्या सुडौलपणात व मृदू स्वभावात या म्हणण्याचे जणू प्रमाणच आहे. स्त्रीला बाह्य सौंदर्य तर आहेच पण मृदू व डौलदार देहाच्या आड सहजासहजी न दिसणारे खंबीर, सहनशील मनही लाभलेले आहे. पुरुषाच्या कडक, आड-दांड व घट्ट्या कट्ट्या शरीराच्या तुलनेत स्त्रीची काया मऊ, मुलायम, लवचीक असून हालचाली सहजसुंदर व डौलदार असते. आसने उत्तम रीतीने करण्यासाठी शरीर लवचीक असावे लागते आणि विधात्याने याबाबतीत तरी स्त्रीला झुकते माप देऊन तिच्या देहाची जडण-घडण योगाभ्यासासाठी उचित अशीच केली आहे. प्रजोत्पादनाची नैसर्गिक जबाबदारी देखील स्त्रीवरच पडते.

राष्ट्राची समृद्धी व पुढील पिढ्यांचे आरोग्य राष्ट्रातील स्त्रियांच्या सुस्थितीवरच अवलंबून आहे. स्त्री पुरुषातील शारीरिक व भावनिक भिन्नता व स्त्रीचा वयानुसार बदलणारा शरीरधर्म लक्षात घेता असे जाणवते की, 'स्त्रियांनी आसन प्राणायामाचा मार्ग आपल्या आयुष्याचा घटक म्हणून स्वीकारल्यास त्यांच्या जीवनात अनेक अर्थपूर्ण हितकारक बदल घडून येतील.' योगासनांचा नियमित सराव स्त्रीला नित्याची कार्य पार पाडण्यास तसेच कांती, तेज व स्त्रीत्व जपण्यास उपयुक्त ठरतो. रक्ताभिसरण सुधारल्यामुळे त्वचेवर झळाळी येते व सौंदर्य प्रसाधनांची गरज भासत नाही. योगासनांमुळे सर्व इंद्रिय व संस्था सचेतन होतात. प्रत्येक आसन शरीरावर तसेच मनावर समान संस्कार करीत असल्यामुळे सुदृढ शरीर व निरोगी मन हे नियमित योगासनांचे फलित आहे. योग हा निसर्ग उपचाराचाच एक प्रकार आहे.परंतु हा बाह्य निसर्ग उपचार नसून अंतर्गत प्रकृतीचा प्राकृतिक उपचार होय. योग केवळ रोग प्रतिबंधक नाही तर अनेक रोगांवर गुणकारी आहे. योग हा शरीर मन व आत्मा या तिन्ही अंगांचा संस्कार आहे. खेळाडू व महिला क्रीडापटू यांच्यासाठी योग हे विशेष वरदान आहे. अवयवांमध्ये ताण उसण, लचक आणणाऱ्या स्नायूंच्या सदोष हालचाली आसनाने सुधारता येतात. अनावश्यक दबाव व तणावांपासून मुक्ती लाभते. तसेच खेळात असलेले वेग लवचीकता, बळ, चिकाटी व संतुलन हे गुण आसनांनीच प्राप्त होतात. आसनांमुळे थकवा जाऊन चैतन्य प्राप्त होते. म्हणूनच योगकला ही अद्वितीय आहे. स्त्रियांसाठी तर योग एक कल्पतरूच आहे. योगविद्येच्या अध्ययनाने प्रचंड व्यक्ती विकास होतो, नैतिक व मानसिक बळ वाढते. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होतो. गर्व आणि अहंकार नष्ट होतो. विनम्रतेचा भाव वाढीला लागतो. स्त्रीच्या आयुष्यातील ऋतूप्राप्ती, गर्भारपण व प्रसूती आणि रजोनिवृत्ती या तीन अवस्थांमध्ये जी महत्त्वाची स्थित्यंतरे घडतात यात योगाभ्यासाने शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवता येते. यासाठी प्रत्येक स्त्रीने नियमितपणे आसने, प्राणायाम व ध्यान करणे आवश्यक आहे.

# वास्तुकला : महिलांना करिअर संधी देणारे सर्वोत्तम क्षेत्र



- डॉ. प्राजक्ता बस्ते
प्राचार्या,
मविप्र वास्तुकला महाविद्यालय, नाशिक

वास्तुकला हे महिलांसाठी व्यवसाय करण्यासाठी उत्तम संधी देणारं क्षेत्र आहे. या क्षेत्राची सध्याची परिस्थिती आणि येणाऱ्या काळात त्याचे स्वरूप कसे असेल हे जाणून घेणे नक्कीच फायद्याचे ठरणार आहे.

वास्तुकलेचा सध्याचा अभ्यासक्रम हा वास्तुकला या क्षेत्राची एक संपूर्ण ओळख करून देणारा आहे. या पाच वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये वास्तुकलेच्या वेगवेगळ्या विषयांचे मूलभूत ज्ञान आणि नंतर येणाऱ्या त्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रांची ओळख दिलेली आहे.हा मूलभूत अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कुठलाही पदवीधर स्वत:चा व्यवसाय करू शकतो व शासकीय विभागांमध्ये नोकरी करू शकतो. भारतात सध्या पदव्युत्तर अभ्यासक्रम पुढील क्षेत्रात उपलब्ध आहेत. या वेगवेगळ्या विद्याशाखा म्हणजेच लँडस्केप आर्किटेक्चर, अर्बन डिझाईन, एन्व्हायरमेंटल आर्किटेक्चर, सस्टेनेबल आर्किटेक्चर, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट, सिटी प्लॅनिंग, अर्बन अ‍ॅन्ड रिजनल प्लॅनिंग, ट्रान्सपोर्टेशन डिझाईन, सस्टेनेबल बिल्डिंग टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड कन्स्ट्रक्शन इत्यादी होत.

स्वत:चा व्यवसाय करणे, वैशिष्ट्यपूर्ण मोठ्या कामांसाठी निगडित क्षेत्रातल्या व्यावसायिकांशी भागीदारी करून वेगळ्या मार्गाने व्यवसाय करणे, अथवा मोठ्या आस्थापनांमध्ये नोकरी करणे याबरोबरच शासकीय विभागांत नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. वेगवेगळ्या शहरांमध्ये नगररचना विभाग, मेट्रोपॉलिटन रिजनल डेव्हलपमेंट ॲथॉरिटी, कंजर्वेशन डिपार्टमेंट, अर्बन डिझाईन डिपार्टमेंट, म्हाडा, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, नवीन एवं नवकरणीय उर्जा विभाग इत्यादी विभागांमध्ये नोकरी मिळण्याच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत.

आज जवळपास सगळेच व्यवसाय हे बहुविद्याशाखीय झालेले आहेत. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये हीच अपेक्षा व्यक्त केलेली आहे. व्यवसायात चांगली आणि सर्वांगीण प्रगती करण्यासाठी मूलभूत विद्याशाखेतील ज्ञानाबरोबरच तुम्हाला वेगवेगळ्या शाखांमधील थोडे- थोडेसे ज्ञान आता सध्या आवश्यक आहे. मग ते ज्ञान माहितीच्या स्वरूपात असेल अथवा कौशल्यांच्या स्वरूपात असेल, ते आत्मसात करणे आवश्यक आहे. व्यवसायाचे बदलते स्वरूप पाहता इंटरनेटचे माध्यम हे महत्त्वाचे आणि प्रभावी ठरलेले आहे. या माध्यमावर स्वत:बद्दल आणि स्वत:च्या कामांची माहिती देण्यासाठी जी अद्ययावतता किंवा जे कौशल्य पाहिजे त्याची तयारी करणे आवश्यक आहे. त्यामध्ये विशेषत: वेगवेगळे सॉफ्टवेअर्स वापरणे, तुमच्या कामांबद्दलची माहिती नेमकेपणाने आणि चांगल्या पद्धतीने तुम्हाला लिहिता येणे, तुमच्या कामांबद्दलच्या चांगल्या आणि अर्थपूर्ण गोष्टी लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माध्यमांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

वास्तुकला आणि बांधकाम क्षेत्राविषयी सध्या जे साहित्य प्रकाशित होते आहे.त्याचा बराचसा भाग हा आता 'ई-संसाधन' म्हणून सगळ्यांना उपलब्ध असतो. इंटरनेट अथवा ई-रिसोर्सेस च्या माध्यमातून आपल्या कामाची सर्व जगाला माहिती देणे आणि त्यामधून आपला व्यवसाय वृद्धिंगत करणे यासाठीचे कौशल्य आणि ज्ञान पुढच्या पिढीला असणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रोजेक्टसाठी अथवा उपक्रमांसाठी फिजिबिलिटी रिपोर्ट तयार करणे, वास्तुकलेच्या क्षेत्रात नवीन उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाची माहिती आणि त्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आपण पर्यावरणाला पूरक असे योगदान बांधकाम क्षेत्रात देऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) वापर सध्या वाढतो आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा येणाऱ्या काळामध्ये चांगल्या पद्धतीने वापर करणे हे एक आव्हान नवीन पिढीसमोर आहे.

जगामध्ये ग्लोबल इनोवेशन इंडेक्स- जी.आय.आय,च्या अभ्यासामधून असे दिसून येते की अभ्यासक्रमांमधून नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे वा काम करणे यात भारताचा ३९ वा क्रमांक आहे. वास्तुकलेच्या क्षेत्रातून जर नावीन्यपूर्णतेचा स्तर उंचवायचा असेल तर संशोधन करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यासाठी समर्पक अशा योजना देखील राबविल्या पाहिजे. अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये आणि त्याच्या रचनेमध्ये जर बदल झाला तर संशोधनाला प्राधान्य आणि जागा देणे शक्य आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळत आहे.बदलत्या काळातले शैक्षणिक धोरण पाहता वास्तुकलेचा अभ्यासक्रम संशोधन आधारित अथवा उपक्रमांवर आधारित असा असू शकतो. हा बदल झाल्यास येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे आणि क्षमतेप्रमाणे या क्षेत्रामध्ये ज्ञान संपादन करून व्यवसाय अथवा नोकरी करण्यास वाव मिळू शकतो आणि प्रत्येक जण काम करू शकतो. शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक आदी क्षेत्रांत भारतातील महिलांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. इतर क्षेत्रांप्रमाणे वास्तुकला या क्षेत्रात अभ्यास करण्यासाठी मुलींची संख्या वाढते आहे. आपल्या संस्थेच्या या महाविद्यालयातून पदवी घेतलेल्या विद्यार्थिनी आज काही ना काही स्वरूपामध्ये व्यवसायात त्या जिथे स्थायिक झालेल्या असतील तिथे काम करीत आहेत. काही विद्यार्थिनींनी वास्तू कलेशी निगडित किंवा जवळचे एखादे क्षेत्र निवडून त्यामध्ये काम करायला सुरुवात केली आहे. ज्ञान, कौशल्य आणि मेहनत यांच्या बळावर आत्मनिर्भर होण्याचा मार्ग शोधत आहेत.

वास्तुकला क्षेत्रात भारतातील उत्कृष्ट काम केलेल्या महिलांची अधिक माहिती WADE ह्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. या क्षेत्रात उत्कृष्ट करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणींनी त्यातून प्रेरणा घेत आपली भविष्यकालीन वाट सुकर करणे आवश्यक आहे.

# * संस्था दृष्टिक्षेपात *

| | | |
|---|---|---|
| स्थापना | : | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | : | रजि. नं. ए-४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | : | १०,१९७ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | : | ४६३ |
| शाखांची संख्या | : | ५०४ |
| विद्यार्थ्यांची संख्या | : | २,१३,५७६ |
| सेवक संख्या | : | ११, १६१ |

# * शाखा विस्तार *

| | |
|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७२ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७० |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १८ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०३ |
| आश्रमशाळा (उच्च माध्यमिक) | ०२ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०९ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ६३ |
| अध्यापक विद्यालये | ०४ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ |
| फार्मसी कॉलेज | ०२ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापन संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ |
| सेंटर फॉर कोलॅबोरेशन ॲण्ड एक्सलन्स | ०१ |
| उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय | ०१ |

| | |
|---|---|
| प्रिंटींग प्रेस | ०१ |
| आय.टी.आय. | ०८ |
| मेडिकल कॉलेज | ०१ |
| मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| विद्यार्थी वसतिगृहे | २५ |
| शेतकी शाळा | ०१ |
| ललितकला महाविद्यालय | ०१ |
| जनशिक्षण संस्थान | ०१ |
| पदविका फार्मसी महाविद्यालय (डी फार्म) | ०२ |
| परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कृषी महाविद्यालय | ०१ |
| भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| विधी महाविद्यालय | ०१ |
| कॉलेज ऑफ सोशल वर्क | ०१ |
| पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| ग्रामीण आरोग्य केंद्र | ०३ |
| प्रतिभा संपादन कक्ष | ०१ |
| प्रज्ञा बौध्दिक संपदा केंद्र | ०१ |
| **एकूण** | **५०४** |




# भारतीय प्रथम महिला

(अंकाविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया प्राचार्य डॉ. दिलीप पवार यांच्या ९८८१४५१८६६ या व्हाट्सअप क्रमांकावर किंवा media@mvp.edu.in या मेलवर पाठवाव्यात.)